## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९३३

निर्णय दिनांक १७-०७-२००८

श्री. रमेश लखमीचंद गौड, : अपिलार्थी
मु. पो. घोटी बु. तालुका इगतपुरी,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, इगतपुरी,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी, नाशिक

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रमेश लखमीचंद गौड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रमेश कारभारी मिसाळ, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, इगतपुरी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. महेश भास्करराव पाटील, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी

(महसूल), नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे घोटी बु., तालुका इगतपुरी येथील बिनशेती जागा वापराच्या बदलाबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ ओम् अन्नपुर्णामाता फुडस् प्रा. लि. धोटी यांनी निवासी बिनशेती जागा औद्योगिक बिनशेती होण्यास अर्ज दिला काय ? कधी ? अर्जदाराने काही पुर्तता करणे आवश्यक होते काय ? तसे अर्जदारास कळविले होते काय ? कधी ? अर्जदाराने त्याची पुर्तता केली काय ? कोणती ? कधी ? या प्रकरणी काही कार्यवाही झाली काय ? कोणती ? अर्जदाराने या कामी संबंधीत अधिका-याशी काही पत्रव्यवहार व / वा समक्ष संपर्क केला काय ? कधी ? किती वेळेस ? कोणता ? अर्जदाराने अजुन काही पुतर्ता करणे आवश्यक आहे काय ? कोणती ? तसे अर्जदारास कळविले आहे काय ? कधी ? नसल्यास का नाही ? आज अर्जाची परिस्थिती कोणती ? अर्जदाराची मागणी मान्य होण्यास काय बाधा आहे ? अर्जदाराची मागणी मागणी मान्य होईल काय ? कधी ? त्या साठी अर्जदाराने काय करणे आवश्यक आहे ? ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सरळ प्रतिसाद न देता अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये उपस्थित केलेल्या माहिती संदर्भातील प्रकरण उपविभागीय अधिकारी, नाशिक यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्याचे कळवून त्याची एक प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे, तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०९-२००७ रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १२-१०-२००७ रोजी पारित केले आहेत. सदर निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तात्काळ विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली नाही, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता सुनावणीमध्ये त्यांना खोटी, लबाडीची माहिती देऊन त्यांची दिशाभूल केली. जन अपिलीय अधिकारी यांनी तात्काळ माहिती देण्याचे आदेश देऊनही अडीच महिन्यापेक्षा जास्त कालावधी लोटून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची पुर्तता केली नाही, त्यामुळे वरिष्ठांची व न्यायालयाची अशा प्रकारे दिशाभूल करणारी खोटी माहिती देणा-या व आदेशाची पायमल्ली करणा-यास जास्तीत जास्त शासन करण्याची कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. याबरोबर त्यांना या प्रकरणात झालेल्या आर्थिक,

शारीरिक, मानसिक हानीची व काळाच्या अपव्ययासंदर्भात जास्तीत जास्त भरपाई संबंधिताकडून त्यांना प्राप्त होण्यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे विनंती केलेली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात खोटी माहिती पुरविली, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात त्यांना दिनांक ११-०२-२००८ रोजी काही माहिती पुरविली असून सदर माहिती दुस-या विषयाशी संबंधित आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजघडीला आवश्यकता नाही कारण या प्रकरणाचा आता अंतिम निर्णय झाला आहे. उपरोक्त प्रकरणी माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ३१-०८-२००७ रोजी उपस्थित राहिल्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगास सादर केला. यावरुन अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्यांच्या कार्यालयात हजर राहिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेली सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीने ज्या उद्देशाकरिता ही माहिती मागविली आहे त्या उद्देशाची प्रतीपूर्ती करण्याकरिता अपिलार्थीने त्यांच्याकडे प्रस्तावित केलेल्या बिगर शेतीच्या मागणीसंदर्भात त्यांनी त्यांचे वरिष्ठ, व सक्षम अधिकारी, "उपविभागीय अधिकारी", नाशिक यांच्याकडे त्यांचा प्रस्ताव पाठवून दिला व त्याची प्रत अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली. मौजे घोटी बु. तालुका इगतपुरी येथील सर्व्हे नंबर २२/१, २/२ क्षेत्र ०-३८.५ हेक्टर मध्ये, हे क्षेत्र अर्जदार यांची आई कमळाबाई लखमीचंद गौड यांच्या नावाने आहे. येथील

जमिनीवर कोणतेही बांधकाम नसतांना बांधकाम असल्याचे भासवून त्यांनी उपविभागीय अधिकारी, नाशिक यांच्याकडून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये अनधिकृत बिनशेतीचे तात्पुरते आदेश मिळविले. या आदेशातील शर्त क्रमांक ७ नुसार अर्जदार यांनी सहाय्यक संचालक, नगर रचना यांच्याकडून एका वर्षाच्या आत बांधकाम नकाशा मंजूर करुन घेतल्यानंतर बिनशेती उपयोग नियमित करण्याबाबत अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतील असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. तथापि मुळात अपिलार्थीने या क्षेत्रावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम केल्याचे त्यांना या जागेस भेट दिल्यानंतर आढळून आले नाही व त्याप्रमाणे पंचनामा करुन त्यांनी वरिष्ठांना अपिलार्थीने दावा केल्याप्रमाणे या जागेवर कोणतेही बांधकाम नसल्याचा अहवाल पाठविला आहे. अर्जदार यांनी जमीन बिनशेती नसतांना जमीन बिनशेती असल्याचे भासवून जमीन महसूल कायद्यातील अनेक तरतुदींचा भंग करुन जमिनीची विक्री केली व शासनाची फसवणूक केली आहे. त्यांची ही बेकायदेशीर कृती झाकण्यासाठी ते प्रशासनावर दबाव आणून औद्योगिक बिनशेती परवानगी मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत. सदरची जागा रहिवासी क्षेत्रात मोडत असल्याने औद्योगिक बिनशेती परवानगी वापरासंदर्भात त्यांना परवानगी देता येणार नाही असे अपिलार्थीस त्यांनी कळविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक ०३-०९-२००७ रोजीचा अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक १९-०९-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी यासंदर्भात दिनांक ०८-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १२-१०-२००७ रोजी यासंदर्भातील आपले आदेश पारित केले आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांचा परामर्श घेऊन त्यांनी अपिलार्थीस त्यांचा उद्देश सफल होण्याकरिता कशा प्रकारे कारवाई करावी लागेल याची माहिती त्यांना तोंडी स्वरुपात माहिती दिली होती. व त्याप्रमाणे अपिलार्थीने कारवाई

देखील केली होती, तथापि सहाय्यक संचालक, नगर रचना यांच्या अभिप्रायानंतर अपिलार्थीची जमीन औद्योगिक बिगर शेती वापराकरिता रुपांतरित होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती बव्हंशी प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासे व त्यांचे अभिप्राय मागणारी अशा स्वरुपाची होती. त्यांच्या मूळ अर्जाचा उद्देश लक्षात घेता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची शेतीची जागा औद्योगिक बिनशेती होण्यासाठी त्यांच्याकडे अर्ज सादर केला होता असे दिसून येते. यासंदर्भात अपिलार्थीच्या अर्जातील, अर्जदाराने त्याची पुर्तता केली काय, आणि अर्जदाराच्या अर्जाची सद्य:स्थिती या मुद्दयावरील माहिती वगळता उर्वरित माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी आवश्यक तेवढी सुसंगत नसल्याचे दिसून येत आहे, मात्र आता उपस्थित केलेल्या या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमामध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये पुरविणे अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित होते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी कधीही सरळपणे पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अपिलार्थीने ज्या उद्देशाने माहिती मागविली आहे तो उद्देश सफल होण्यासाठी अपिलार्थीस मदत करण्यासाठी त्यांनी अपिलार्थीचा प्रस्ताव, या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी जे सक्षम अधिकारी आहेत म्हणजे, उपविभागीय अधिकारी, नाशिक याच्याकडे पाठविला. जन माहिती अधिकारी यांची माहिती अर्जासंदर्भात त्यांनी केलेली ही कृती जरी त्यांचा अपिलार्थीस सहकार्य करण्याचा उद्देश असला तरी सर्वथा चुकीची आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास व सदर माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यास त्यांनी माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (१) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित प्राधिकरणाकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील तरतुदीनुसार भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाकरिता त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, येथून पुढे माहिती अधिकार अधियिमातील तरतुदीअन्वये त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिक सतर्कतेने सकारात्मक कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने ज्या उद्देशाने माहिती विचारली आहे त्या उद्देशाच्या अनुपालनाप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही, मात्र त्यांनी विचारलेली माहिती अधिनियमातील तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये त्यांना देणे अनिवार्य आहे याची त्यांनी इत:पर नोंद घ्यावी असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता नाही. त्यामुळे त्यांना ही माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

नाशिक
दिनांक १७-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रमेश लखमीचंद गौड, मु. पो. घोटी बु. तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२१५

निर्णय दिनांक  १७-०७-२००८

श्री. अनिल कृष्णराव पाटील, : अपिलार्थी
रा. इंदिरानगर, भडगांव रोड, पाचोरा,
तालुका पाचोरा, जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा महाराष्ट्र कृषि उद्योग विकास
महामंडळ मर्यादित, कृषि उद्योग भवन,
दिनकरराव देसाई मार्ग, आरे दुग्ध
वसाहत गोरेगाव (पुर्व), मुंबई – ६५

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा महाराष्ट्र कृषि उद्योग विकास
महामंडळ मर्यादित, कृषि उद्योग भवन,
दिनकरराव देसाई मार्ग, आरे दुग्ध
वसाहत गोरेगाव (पुर्व), मुंबई – ६५

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : व्यवस्थापक, (कार्मिक/औ.सं), कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, राजन हाऊस, ३

रा माळा, प्रभादेवी, मुंबई – २५

जन अपिलीय अधिकारी : व्यवस्थापकीय संचालक, कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, राजन हाऊस, ३ रा माळा, प्रभादेवी, मुंबई – २५

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अनिल कृष्णराव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. गणेश नारायण राऊत, जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, (कार्मिक/औ.सं), कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रदीप व्यास, जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवा प्रकरणाशी संबंधित एकूण ८ मुद्दयावर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित चे कर्मचा-यांना लागु केलेले व लागु असलेले नमुनेदार स्थायी आदेश कधीपासुन लागु झाले ?

२. लागु केलेल्या नमुनेदार स्थायी आदेशाची लागु झालेपासुन आज पावेतोची अद्यावत साक्षांकित प्रत.

३. श्री. अनिल कृष्णराव पाटील, कृषि पर्यवेक्षक, कृषि संशोधन, व विकास केंद्र, पाचोरा यांची खाते निहाय चौकशी करण्याचे कोणी ठरविले होते ?

त्याबाबत कोणाचे आदेश तसेच निर्णय होते ? त्या आदेशाची व निर्णयाची साक्षांकित प्रत.

४. श्री. अनिल कृष्णराव पाटील यांचे विरुध्दचा खाते निहाय चौकशीचा निर्णय ज्या ठरावान्वये झाला होता त्याची साक्षांकित प्रत.

५. उपव्यवस्थापक (प्रशासन) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित याचे पत्र क्रमांक प्रशासन/ममाअ/२००५/०८७८ दिनांक १२/४/२००५ चे पत्रात नमुद केले आहे की, "चौकशीच्या निष्कर्षामध्ये आरोप सिध्द झाले नाहीत असे – चौकशी अहवालात नमुद केले आहे" असे असतांना सदरचे निष्कर्ष लगेच आरोपी सेवकास चौकशी अहवालाचे प्रतिसह का कळविणेत आले नाहीत ?

६. श्री. अनिल कृष्णराव पाटील, रा. इंदिरानगर, भडगाव रोड, पाचोरा यांचे विरोधातील चौकशीचे चौकशी अहवालाची साक्षांकित प्रत पुरवावी.

७. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित च्या कर्मचा-यांना स्वेच्छानिवृत्ती योजना कधीपासुन लागु करण्यात आली ? त्या योजनेचे नियम काय आहेत ? तसेच स्वेच्छा निवृत्ती योजना स्विकारुन तिची अंमल बजावणी करणे बाबतच्या व्यवस्थापक मंडळाचे निर्णयाची साक्षांकित प्रत.

८. श्री. अनिल कृष्णराव पाटील यांनी तक्रार कायम ठेवुन (Under protest) सादर केलेला स्वेच्छा निवृत्ती प्रस्ताव कोणी मंजुर केला, कधी मजुर केला व तो मंजुर केल्याबाबत श्री. पाटील यांना कोणत्या पत्रान्वये कधी कळविण्यात आली ? ज्यांनी मंजूर केला ते याबाबत सक्षम अधिकारी होते काय ? "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी लागणारे शुल्क रुपये ५४ इतके भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २९-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर दिनांक ०५-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक १०-१०-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-११-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ०२-११-२००६ रोजी पारित केले आहेत. सदर अपील निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस काही माहिती देण्याची सूचना करुन अपिलार्थीच्या अपील अर्जामधील माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित नसल्याचे अनुमान काढले व सदर अर्ज अपिलार्थीने स्वतःच्या खातेनिहाय चौकशी संदर्भात केला असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना मागितलेली

माहिती पुरविली नाही व चुकीचा निष्कर्ष काढून त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले असल्याबाबत आयोगास अवगत केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथम प्रतिसाद देतांना त्यांच्या निर्णयाविरुध्द कोणाकडे प्रथम अपील करावयाचे हे त्यांच्या निर्णयामध्ये कळविले नाही, तसेच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या मुद्दयांसंदर्भात कोणताही माहिती त्यांना स्पष्ट स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमुळे कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नसल्याचे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. संबंधित व्यवस्थापनाच्या या निर्णयाविरुध्द त्यांनी मा. उच्च न्यायालयाकडे दावा दाखल केला असून सदर दाव्याचा निर्णय त्यांच्या बाजूने लागला आहे. त्यांनी त्यांच्या सेवेसंदर्भात संबंधित कंपनीच्या विरुध्द न्यायालयात व कामगार न्यायालयात दावा दाखल केला असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांना आवश्यक ती माहिती न पुरविल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या पुस्तकामध्ये उपलब्ध आहे त्या पुस्तकाची माहिती (पुस्तकाचे नांव) त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या पत्रामध्ये पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये ८ ही मुद्दयावर पुरविलेली माहिती बरोबर आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००६ रोजी प्रथम अपिलावर निर्णय देतांना त्यांना असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती स्पष्टपणे दिली नाही, त्यामुळे ती माहिती सुधारित करुन अपिलार्थीस देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले व तशी माहिती दिनांक १०-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली. अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीवर ज्यावेळी खातेनिहाय चौकशी करण्यात आली, त्यावेळी त्यांना दिलेल्या पत्रामध्ये समाविष्ठ आहे त्यामुळे हीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे. या प्रकरणातील चौकशी अधिका-याच्या चौकशी अहवालावर कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व ६ शी संबंधित माहिती त्यांनी पुरविली नाही. मुद्दा क्रमांक ७ व ८ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आली असल्याने सदर माहिती पुरविण्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश दिले नाहीत. अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२००६ रोजीच्या अपील अर्जावर जो त्यांच्याकडे दिनांक १०-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्यावर, त्यांनी दिनांक ०२-११-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ८ मुद्दयावर बहुतांशी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे. यातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे अपिलार्थीने त्यांच्या प्रकरणासंदर्भात चौकशी अहवालातील निष्कर्ष अपिलार्थीस का कळविण्यात आले नाही अशी माहिती विचारली

आहे.  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

कलम २ (च)

‘‘ ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. ’’

वरील व्याख्येचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती, या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येत आहे.  माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील फक्त उपलब्ध माहिती देणे अभिप्रेत आहे.  त्यांनी एखादी विशिष्ट कारवाई का केली नाही किंवा एखादा निर्णय का घेतला अशा प्रकारची जन माहिती अधिकारी यांना माहिती विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दल, त्यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबद्दल अर्जदारास खुलासा करणे हे माहितीची मागणी करणे व माहिती पुरविणे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक ५ ची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित त्रोटक माहिती दिली असल्याचे दिसून येत आहे, तथापि यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर माहिती कधी उपलब्ध होऊ शकेल याचा सविस्तर तपशील कळविला

आहे.  तथापि या माहितीमध्ये त्यांनी अपिलार्थीस संबंधित पुस्तकाचे नाव कळविल्याचे दिसून येत नाही.  मुद्दा क्रमांक ३ व ४  शी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः पुरविलेली माहिती ही त्रोटक स्वरुपाची असून यामध्ये सदर निर्णय सक्षम प्राधिकरणाने घेतलेला होता, एवढीच माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीने या माहितीमध्ये कोणाचे आदेश व कोणता निर्णय होता याची साक्षांकीत प्रत मागितली होती व हा निर्णय ज्या ठरावाव्दारे झाला त्याची साक्षांकीत प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती.  अशा प्रकारची साक्षांकीत प्रत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येत नाही.  सबब या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीचा खातेनिहाय चौकशी करण्याचा निर्णय ज्या नस्तीवर झाला आहे त्या नस्तीतील संबंधित पृष्ठांच्या प्रती साक्षांकीत करुन त्या अपिलार्थीस त्यांनी पुरवाव्यात.  अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये आयोगास अशी माहिती दिली की, खातेनिहाय चौकशीचा निर्णय त्यांच्या संचालकाच्या बैठकीमध्ये कोणत्याही ठरावाव्दारे घेतला जात नसून अपिलार्थीने मागणी केलेल्या ठरावाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही, कारण अशा प्रकारचा प्रशासकीय निर्णय घेण्याच्या संदर्भात अशा प्रकारची पध्दत अवलंबिली जात नाही.  मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे पडले की, अपिलार्थीच्या विरुध्द केलेल्या चौकशी संदर्भात त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या चौकशी अहवालावर कोणताही निर्णय त्यांनी घेतला नसल्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही, तथापि जन माहिती अधिकारी यांचे हे कारण आयोग अमान्य करत असून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस चौकशी अहवालाची सत्यप्रत साक्षांकीत करुन त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.  मुद्दा क्रमांक ७ व ८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या व दिनांक १०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये

आवश्यक माहिती पुरविल्याचे दिसून येते, त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक १ व २ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती "The Industrial Employment standing order act 1946" या पुस्तकामध्ये उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. जेव्हा एखादा अर्जदार जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारची माहिती मागतो त्यावेळी त्या अर्जदारास ही माहिती कशा प्रकारे स्पष्टपणे देता येईल याचा जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक विचार करणे, हे माहिती अधिकार अधिनियमामध्ये मुळात अभिप्रेत आहे. अपिलार्थी ज्या जन माहिती अधिका-याकडून माहिती मागवत असतात त्याच जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस ती माहिती पुरवावी असे देखिल एक मूलभूत तत्त्व माहिती अधिकार अधिनियम तयार करतांना विचारात घेतले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर ती माहिती ज्या पुस्तकामध्ये उपलब्ध होती, त्या पुस्तकातील ज्या पृष्ठावर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती अशा पृष्ठाची झेरॉक्स प्रत काढून व त्यासाठी त्यांच्याकडून आवश्यक ते शुल्क आकारुन त्यांनी ही माहिती त्यांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे, हे या प्रकरणी सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत होते, परंतु जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करता अपिलार्थीस प्रथमतः मोघम व नंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर थोडीशी अधिक स्पष्ट प्रमाणात माहिती दिली, ही माहिती देतांना देखिल त्यांनी ही माहिती ज्या पुस्तकामध्ये उपलब्ध आहे त्या पुस्तकाचे नाव अपिलार्थीस कळविले नाही, त्यामुळे ही माहिती मिळूनही अपिलार्थीस त्याचा फारसा उपयोग होईल, असे आयोगास वाटत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते

की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती संदर्भीय पुस्तकातील ज्या पृष्ठावर उपलब्ध आहे त्या पृष्ठाच्या झेरॉक्स प्रती काढून त्या त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात.

अपिलार्थीकडून एकूण ५४ रुपये इतके अधिक शुल्क अदा करुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना फक्त एकाच पानाची माहिती पुरविल्याचे त्यांच्या दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या पत्रावरुन दिसून येत आहे. त्यामुळे या टप्प्यावर देखिल त्यांना अपिलार्थीकडून फक्त एका पृष्ठाच्या माहितीकरीता रुपये २ अधिक पोस्टेज खर्च इतकेच जन माहिती अधिकारी यांना देय ठरतो. उर्वरित शुल्क त्यांनी अपिलार्थीस परत केल्याचे दिसून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना माहिती पुरविण्यापोटी त्यांच्याकडून घेतलेले जादाचे शुल्क रुपये ४७ इतके (५ रुपये पोस्टेज खर्च व १ पृष्ठाची माहिती दिली त्यासाठी रुपये २ असे रुपये ७ वजा करुन) त्यांना हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीच्या माहितीचे वरीलप्रमाणे केलेले विश्लेषण पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ ते ४ व ६ या मुद्यावरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असेही त्यांना पुढे आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूतः टाळाटाळ केली असल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल केवळ अपिलार्थीने माहिती मागितली म्हणून त्यांना माहिती देण्यासंदर्भात चुकीची कारवाई केली असल्याचे आयोगास आढळून आले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेला निर्णय हा अर्धन्यायिक स्वरुपाचा असल्यामुळे त्यांनी दिलेल्या निर्णयाची कारणमिमांसा त्यांना विचारणे योग्य होणार नाही व तसे आयोग करु इच्छित नाही. त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला पटेल अशा त-हेने त्यांनी सदर निर्णय दिला आहे.

त्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगाला नसल्यामुळे अपिलार्थीची जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची मागणी आयोग फेटाळून लावत आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अधिक स्पष्टपणे देता आली असती परंतु त्यांनी या प्रकरणी तसे केल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीबाबत आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जांबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन अधिक सतर्कतेने कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहिती देण्यापोटीचे आकारलेले जादा शुल्क त्यांना हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत परत करावे.

४. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

नाशिक
दिनांक १७-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनिल कृष्णराव पाटील, रा. इंदिरानगर, भडगांव रोड, पाचोरा, तालुका पाचोरा, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, (कार्मिक/औ.सं), कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, राजन हाऊस, ३ रा माळा, प्रभादेवी, मुंबई – २५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, राजन हाऊस, ३ रा माळा, प्रभादेवी, मुंबई – २५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२१६

निर्णय दिनांक १७-०७-२००८

श्री. रविंद्र दत्तू चौधरी, : अपिलार्थी
प्लॉट नं. ३, गजानन कॉलनी, रिंगरोड,
जळगाव, तालुका जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सह आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई

जन अपिलीय अधिकारी : सह आयुक्त (प्रशासन), राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रविंद्र दत्तू चौधरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. मानसिंग बापूराव नलावडे, सहाय्यक आयुक्त, जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे

प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त (प्रशासन), राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे  गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुकंपा तत्त्वावर स्वातंत्र्यसैनिक, प्रकल्पग्रस्त इत्यादी प्रवर्गातील उमेदवारांना खास बाब म्हणून नोकरीत सामावून घेण्याबाबत या विषयावरील दिनांक ०८-०१-१९९६ ते ०७-०१-१९९७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ म. उपसचिव गृह विभाग श्री. सु. मो. जोशी यांनी सह आयुक्त श्री. व्ही. व्ही. मलकलपट्टे रा. उ. शु. म. रा. मुंबई यांना लिहीलेले अ. शा. पत्र क्र. ई. एस. टी. ४०९३/१८२/भाग-२ गृहविभाग मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ८ जानेवारी १९९६ अन्वये अ. क्र. ३ (एक) मधील विषयांकीत माहीती दि. १२/१/१९९६ पर्यंत पाठविण्याबाबत कळविले आहे.
>
> म. उपसचिव गृह विभाग श्री. सु. मो. जोशी यांचे पत्रास पाठविलेल्या उत्तराची व त्यासोबतच्या सहपत्रांची छायांकीत प्रत ज वक क्र. व दिनांकासह मिळावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील नस्तीचा पास करण्याचे काम त्यांच्याकडे चालू असल्याचे कळविले आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस नस्ती उपलब्ध होताच त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्यात येईल असे आश्वासीत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन एका अतिरिक्त मुद्दयाचीही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मागितल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०९-२००६ रोजी सुनावणी ठेवल्याचे दिसून येत आहे, मात्र यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय पारित केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सदर सुनावणी झाल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर मान्य केले, मात्र यासंदर्भातील कोणतेही आदेश त्यांना प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये रिक्त असलेल्या दुय्यम निरीक्षक, जवान, लिपीक व चपराशी या पदांवर नवीन उमेदवारांची भरती करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील पद भरतीसंदर्भातील होती, तथापि मूलतः शासनाकडून प्राप्त होणा-या धोरणात्मक निर्णयाव्दारे त्यांच्याकडील उपलब्ध पदांच्या संख्येमध्ये होणारी घट लक्षात घेता त्यांच्या खात्यातील प्रशासनाने सदर पदे न भरण्याचा निर्णय घेतला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अभिलेख्याच्या ''क'' या प्रवर्गात मोडते. अशा प्रकारचे अभिलेखे जतन करण्याचा कालावधी ५ वर्षे इतका असतो त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नष्ट केली गेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात, त्यांच्या वरिष्ठांकडे व मंत्रालयीन संबंधित विभागाकडे मागवूनही ती सापडली गेली नसल्याने ते अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुरवू शकत नाही व तसे त्यांनी आयोगास शपथपत्रावर कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या विषयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती तो विषय जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील पद भरतीशी संबंधित होता. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे त्यावेळी रिक्त होणा-या पदांचा अंदाज घेऊन त्यांनी ही पदे भरण्यासंदर्भात काही उमेदवारांच्या लेखी परीक्षा घेतल्या होत्या. अपिलार्थीही त्यापैकी एक होते, मात्र तदनंतर त्यांच्या वरिष्ठ प्रशासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार, अशा प्रकारची भरती न करण्याचे ठरविल्यामुळे त्यांच्या कार्यालयाने या पदावर कोणाचीही भरती केली नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती रिक्त पदावर नेमणूक देण्यासंदर्भात केलेले अर्ज व त्यावरील पुढील प्रक्रिया यासंदर्भातील होती व ही कागदपत्रे शासनाच्या ''क'' वर्गीय अभिलेखे या प्रवर्गामध्ये मोडत असून अशा

प्रकारचे अभिलेखे जतन करण्याचा कालावधी संबंधित विभागाने ५ वर्षे इतका ठरवून दिला आहे, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाने नष्ट केली असण्याची शक्यता देखिल जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे व संबंधित मंत्रालयीन विभागाकडे देखिल मागितली होती, तथापि या दोन्ही प्राधिकरणाकडून जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे शोध घेऊनही उपलब्ध होत नसल्याचे कळविले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सकारात्मक प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीचया माहितीची ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती उपलब्ध होऊ शकणार नाही हे उघड आहे, मात्र अपिलार्थीने ज्या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे त्या विषयावरील तत्कालीन स्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-११-२००६ रोजी कळविली असल्याने अपिलार्थीचा माहिती मागण्याचा मूळ हेतू साध्य होत आहे, हे पाहता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )
दिनांक १७-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र दत्तू चौधरी, प्लॉट नं. ३, गजानन कॉलनी, रिंगरोड, जळगाव,

तालुका जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त (प्रशासन), राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२३०

निर्णय दिनांक    १७-०७-२००८

श्री. हरीदास नरहरी लोहकरे,    :    अपिलार्थी
मु. मायदरा पो. टाकेद बु.
तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी    :
तथा गट विकास अधिकारी (उ. श्रे.),
पंचायत समिती, इगतपुरी, जिल्हा
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी    :    प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी
अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हरीदास नरहरी लोहकरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. श्रीराम नामदेव तायडे, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी (यापुढे त्यांना जन माहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन १९९८-९९-२००० या कालावधीशी संबंधीत वैयक्तीक शौचालयासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " सदर वैयक्तिक शौचालये कोणकोणत्या लाभार्थ्यांना देण्यात आली. त्यांची नावे कळावी तसेच त्यांनी सम्मतीपत्रक किंवा इतर काही कागदोपत्री पुर्तता केली होती किंवा याची माहिती मिळावी. सदर शौचालयांची ग्रामपंचायत दप्तरामध्ये नोंद आहे काय ? सविस्तर माहिती मिळावी. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे म्हटले असून सोबत पुराव्याची छायांकीत जोडली असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविल्याचे दिसून येत आहे. तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून ती दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०३-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १२-०५-२००६ रोजी

पारित केले आहेत.  सदर आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या कथित चुकीच्या व दिशाभूल करणा-या माहितीसंदर्भात अपिलार्थीस सक्षम प्राधिकरणाकडे चौकशीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.  तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अशा प्रकारे अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशात सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याबद्दलचा लेखी खुलासा सादर केलेला नाही.  जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे कबूल केले आहे.  खुद्द जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना मिळण्याबाबत त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००६ रोजीच्या पत्राने पुरविली आहे.  ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरुन त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पूर्ण स्वरुपात दिलेली आहे.  अपिलार्थीस पूर्वी पुरविण्यात आलेल्या

माहितीव्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे कोठेही मान्य केले नव्हते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २८-१२-२००५ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. याव्दारे त्यांनी अपिलार्थीस एकूण ५० लाभार्थ्यांची यादी दिल्याचे दिसून येत आहे, मात्र अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, या यादीमध्ये ढोकळवाडी येथील क्रमांक २ श्री. देवराम महादू करवंदे व क्रमांक १६ श्री. देवराम महादू करवंदे, आणि क्रमांक ८ श्री. निवृत्ती हरी ठोकळ व क्रमांक १८ श्री. निवृत्ती हरी ठोकळ वर एकाच व्यक्तींची नांवे २ वेळा देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, देवराम महादू करवंदे व निवृत्ती हरी ठोकळ या नावाच्या प्रत्येकी दोन व्यक्ती या गावामध्ये अस्तित्वात आहेत. दोन्ही व्यक्ती स्वतंत्रपणे आस्तित्वात असल्याबाबत त्यांनी ग्रामपंचायतीकडील कोणतेही अभिलेखे, जेणेकरुन त्यांचे स्वतंत्र अस्तित्व सिध्द होईल असे, आयोगास उपलब्ध करुन दिलेले नाहीत. निवडणूक आयोगाच्या संबंधितांच्या ओळखपत्राच्या अथवा मालमत्ता उतारे किंवा मतदार यादी यावरुन त्यांना हा मुद्दा सहजपणे सिध्द करता आला असता, तथापि त्यांनी अशा प्रकारची आजपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. या माहितीतील अचूकता व सत्य समोर येण्याच्या दृष्टीने एखाद्या त्रयस्थ यंत्रणेकडून अपिलार्थीच्या या मुद्दयाची चौकशी होणे आयोगास आवश्यक वाटते. सबब या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी मौजे ढोकळवाडी ग्रामपंचायत, पो. मायदरा, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक येथील श्री. देवराम महादू करवंदे व श्री. निवृत्ती हरी ठोकळ या नावाच्या

प्रत्येकी दोन व्यक्ती अस्तित्वात आहेत किंवा कसे याचा शोध घेऊन यासंदर्भातील आपला अहवाल विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच २ महिन्याच्या आत पाठवावा. अपिलार्थीने आज रोजी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये एकाच नावाच्या २ व्यक्ती असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी भासवून शौचालय बांधकाम प्रकरणी त्यांनी रकमेचा अपहार केल्याचा त्यांना संशय आहे. अपिलार्थीच्या या मुद्दयावर जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक यांनी तपास करणे आयोगास आवश्यक वाटते, त्याप्रमाणे त्यांनी तपास करुन या प्रकरणी संबंधितांनी काही आर्थिक गैरव्यवहार केला असेल तर त्यांनी पुढील कार्यवाही करुन या संदर्भातील त्यांचा अहवाल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक ज्यांचे जिल्हा परिषदेवर प्रशासकीय नियंत्रण आहे त्यांच्याकडे २ महिन्याच्या आत सादर करावा. सदर अहवाल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना प्राप्त झाल्यानंतर, संबंधितांवर प्रचलीत नियमाप्रमाणे सर्व संबंधितांवर यथायोग्य कारवाई त्यांनी २ महिन्याच्या आत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्याने व या माहितीची सत्यासत्यता ठरविण्याचे आयोगाचे कार्यक्षेत्र नसल्याने, यावर आयोग या टप्प्यावर माहितीच्या दर्जाविषयी कोणतेही भाष्य करु शकत नाही, मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिल्याने (या टप्प्यापर्यंत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच चुकीची माहिती दिली आहे किंवा कसे हे सिध्द झालेले नाही) अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळून लावण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील

प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक यांनी मौजे ढोकळवाडी, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक येथील देवराम महादू करवंदे व निवृत्ती हरी ठोकळ या नावाच्या दोन स्वतंत्र व्यक्ती अस्तित्वात आहेत किंवा कसे याचा शोध घेऊन यासंदर्भातील आपला अहवाल महसूल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना २ महिन्याच्या आत सादर करावा. जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक यांचा अहवाल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संबंधितांवर सक्षम प्राधिकरण या नात्याने प्रचलीत नियमाप्रमाणे यथायोग्य कारवाई २ महिन्याच्या आत करावी / प्रस्तावित करावी.

नाशिक
दिनांक १७-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत, १ श्री. हरीदास नरहरी लोहकरे, मु. मायदरा, पो. टाकेद बु., तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (उ. श्रे.), पंचायत समिती, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२४८

निर्णय दिनांक     १७-०७-२००८

श्री. गणेश सुरेश बो-हाडे, : अपिलार्थी
साई निवास, झोळे, पो. चंदनापुरी,
तालुका संगमनेर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-२,
सहकारी संस्था (पदुम) अहमदनगर, जिल्हा
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष कार्यकारी अधिकारी,
लेखा परिक्षा मंडळ (पदुम) महाराष्ट्र राज्य,
मुंबई

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ (प.दु.म.४)
विशेष कार्याधिकारी लेखा परिक्षा मंडळ
(प.दु.म.) महाराष्ट्र राज्य मुंबई

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. किशोर दयाराम पाटील, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (पदुम) अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. अजय मधूकर ससाने, जन अपिलीय अधिकारी तथा विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ (प.दु.म.४) विशेष कार्याधिकारी

लेखा परिक्षा मंडळ (प.दु.म.) महाराष्ट्र राज्य मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. गणेश सुरेश बो-हाडे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३-२००४ व २००४-२००५ या कालावधीची संबंधित लेखापरिक्षक यांच्या लेखापरिक्षण कार्यक्रमासंबंधी व इतर मुद्दयावरील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ आपल्या जिल्ह्यातील शासकीय लेखापरिक्षण (दुग्ध) कार्यालयातील शासकीय लेखापरिक्षकांनी वरील कालावधीत ज्या संस्थांचे लेखापरिक्षण करावयाचे होते. त्याकरिता जो वार्षिक लेखापरिक्षण कार्यक्रम मंजुरीसाठी आपल्या कार्यालयाकडे सादर केला त्या वार्षिक लेखापरिक्षण कार्यक्रमाची झेरॉक्स प्रत प्रमाणित करुन मिळावी. तसेच आपण सनदी लेखापाल व प्रमाणित लेखापरिक्षक यांना वाटपासाठी ज्या संस्था वर्ग करावयाच्या आहे, अशा संस्थांची यादी आपण वरिष्ठ कार्यालयास ज्या टपालाव्दारे पाठविली त्या टपालाची झेरॉक्स प्रत व संबंधीत संस्थांची यादी झेरॉक्स प्रत प्रमाणित करुन मिळावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र दिनांक ०७-०३-२००७ च्या पत्राने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना, प्राप्त करुन घेण्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे अद्यापही प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीने त्यांच्याकडे माहिती मागविली आहे याची कल्पना त्यांना प्रथमतः आयोगाची सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर आली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ते आता अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे

दिसून येते की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अर्ज प्राप्त झालेला नाही, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अद्यापपावेतो पुरविता आली नाही, त्यांचा हा मुद्दा आयोग मान्य करत नाही, कारण जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, त्यांच्याकडे शासनाकडून, अपिलार्थीने शासनाकडे केलेला अपील अर्ज प्राप्त झाला असल्याचे दिसून येत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केल्यानुसार ते अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ७ दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत हे पाहता व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप, जे अत्यंत मर्यादित व ज्यातील माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत - आहे असे आहे. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यामध्ये कोणतीही अडचण नसावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाची प्रत मागितली होती, तथापि अपिलार्थीकडे मागणी करुनही त्यांनी मूळ अर्जाची प्रत त्यांना दिली नाही. आयोगाची नोटीस प्राप्त होईपर्यंत संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध झालेला नव्हता. आयोगाची नोटीस त्यांना प्राप्त झाल्यानंतर ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे आता तयार आहेत व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडण करण्यास अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

नाशिक
दिनांक १७-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेश सुरेश बो-हाडे, साई निवास, झोळे, पो. चंदनापुरी, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (पदुम) अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ (प.दु.म.४) विशेष कार्याधिकारी लेखा परिक्षा मंडळ (प.दु.म.) महाराष्ट्र राज्य मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३५७

निर्णय दिनांक १७-०७-२००८

श्री. अन्सारी मो. रमझान मो. मक्की, : अपिलार्थी
घर नं. ११२, मौ. मक्की मंझील,
राजानगर, मालेगाव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, सरदार हायस्कूल व
कनिष्ठ महाविद्यालय, मालेगाव,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. खान इनामूर रहमान शब्बीर अहमद, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरदार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, मालेगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सुकदेव हरि डेरे,

सहाय्यक शिक्षण संचालक, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. अन्सारी मो. रमझान मो. मक्की हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९२ ते १९९७ या कालावधीतील त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "Application was lecture in Sardar High School and Junior Collecge, Malegaon and needs inspection report of Junior College from the year 1992 to 1997 subjects allotted to each teachers of Sardar Junior College Malegaon from the year 1992 to 1997 and the subjects oermitted to be taught in the said Junior College by Deputy Director of Education in the above said period."

अपिलार्थीने सदर माहिती पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अपिलार्थीने शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग यांच्याकडे केले आहे. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे १९-०९-२००७ रोजी प्राप्त झाला.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली कोणतीही माहिती दिली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे या विषयावरील माहिती वेगवेगळ्या अर्जांव्दारे यापूर्वी मागितली होती. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी पुरविली आहे. ही माहिती प्राप्त करुन घेतल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्या शिक्षण संस्थेविरुध्द शिक्षण न्यायाधिकरणाकडे दावा दाखल केला होता. या दाव्यासंदर्भात न्यायाधिकरणाने अपिलार्थीच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. अपिलार्थीस त्यांनी या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती यापूर्वीच वेगवेगळ्या अर्जासंदर्भात दिली असल्याने अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडून अपिलार्थीस प्रतिसाद दिला गेला नाही. अपिलार्थीने अशाच प्रकारच्या माहितीकरिता माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीस अनुसरुन त्यांच्याकडे दुस-या एका प्रकरणी माहितीची मागणी केली होती, तथापि सदर माहिती ते विहित मुदतीत देऊ न शकल्याने त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे

२५,००० रुपये इतकी शास्ती लावण्यात आली होती व सदर शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारामध्ये दोन हप्त्यात केला आहे त्यामुळे त्यांना परत शास्ती लावण्यात येऊ नये, अशी त्यांनी आयोगास विनंती केली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता ते अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत ही माहिती पुरविली नाही. अशीच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वेळोवेळी केलेल्या वेगवेगळ्या अर्जांच्यासंदर्भात यापुर्वी पुरविली आहे. सदर पुरविलेली माहिती पाहता या माहितीमध्ये, अपिलार्थीने आता मागणी केलेल्या माहितीचा ब-याचशा प्रमाणात समावेश असल्याचे दिसून येत आहे, तथापि एखादी माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने जर तीच माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत अर्ज केला तर सदर माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित पध्दतीचे पालन करुन ती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असू नये, त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांनी दुस-या अर्जांच्यासंदर्भाने पुरविली असल्याने त्यांना ही माहिती त्यांनी पुरविली नाही, हा त्यांचा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही. जन माहिती अधिकारी यांना यापूर्वीच मा. मुख्य माहिती आयुक्तांनी याच अपिलार्थीच्या अशाच प्रकारच्या अपिलासंदर्भात एकदा २५,००० रुपये इतकी शास्ती लावली होती व सदर शास्तीचा त्यांनी शासकीय कोषागारात भरणा केला आहे हे पाहता, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देऊन दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा

अभावाबद्दल त्यांना सक्त ताकीद देणे आयोगास गरजेचे वाटते. या सक्त ताकीदीची नोंद अध्यक्ष, सिटीझन वेलफेअर सोसायटी, मालेगाव यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०३-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती ७ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

प्रशंगावशात् उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब शिक्षण संचालक, पुणे यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची यथायोग्य नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
३. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

नाशिक
दिनांक १७-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अन्सारी मो. रमझान मो. मक्की, घर नं. ११२, मौ. मक्की मंझील, राजानगर, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरदार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ अध्यक्ष, सिटीझन वेलफेअर सोसायटी, मालेगाव (मार्फत - जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरदार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, मालेगाव, जिल्हा नाशिक) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११८६

निर्णय दिनांक : १८.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. लक्ष्मण गंगाधर कुमावत,<br>रा. येवला, जि.नाशिक | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, येवले,<br>जि.नाशिक.<br>२ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त, कार्यालय, नाशिक. | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०७.२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. लक्ष्मण गंगाधर कुमावत, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अमोल प्रभाकर बागूल, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, येवले जि.नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दत्तात्रय बाबूराव बारगळ, सहा.प्रादेशिक संचालक,न.प.प्रशासन, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०३.०८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ या वर्षातील येवले नगर परिषदेच्या हद्दीतील सर्वे नं. ९२ वर चालू असलेल्या बांधकामाशी संबंधित खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

" १) सर्व्हे नं. ९२ च्या बांधकामाला अधिकृत परवानगी घेतली आहे का? घेतली असेल त्यांची नक्कल मिळावी.

२) सर्व्हे नं. ९२ च्या बांधकामाबाबत लेआऊट मंजूर आहे काय ? असल्यास त्यांचा लेआऊटची नक्कल मिळावी.

३) सर्व्हे नं. ९२ ही जागा कोणत्या कारणाने आरक्षित आहे. ते आरक्षण झोन बदले आहे काय ? बदले असल्यास त्या आरक्षण बदल्याची नक्कल मिळावी.

४) सदर चालू असलेले बांधकाम कोणकोणत्या कारणाने अनाधिकृत आहे. त्यांची लेखी माहिती मिळावी.

५) सदरच्या बांधकामाबाबत नियंमत्र पत्रिका छापलेले आहे. सदर पत्रिकेत सार्वजनिक बांधकाम मंत्री छगनरावजी भुजबळ आहे. तसेच जिल्हाधिकारी महेश झगडे आहे. तसेच येवलेचे नगराध्यक्ष पंकज पारख हे जबाबदार अधिकारी व पदाधिकारी असल्याने सदर बांधकाम बेकायदेशिर असल्यास मंत्री महोदय छगनरावजी भुजबळ, जिल्हाधिकारी महेश झगडे तसेच नगराध्यक्ष पंकज पारख यांचे विरुध्द सन २००२ च्या सुधारित अधिनियम नुसार कोणती कारवाई करणार यांची लेखी माहिती मिळावी.

६) बेकायदा बांधकामाचे उद्घाटन करणे, बेकायदा बांधकाम चालू ठेवणे, आरक्षण झोन न बदलने सर्व नियम ढाब्यावर बसवणे या कृतीबद्दल मंत्री महोदय छगनरावजी भुजबळ यांचे विरुध्द आपण मा.

राज्यपाल यांचे कडे त्यांनी केलेल्या गैरकृत्याबद्दल अहवाल पाठविणार आहे काय ? असल्यास त्या नक्काली लेखी माहिती मिळावी ही विनंनी. सदर माहिती जनहित याचिकेसाठी हवी आहे. देण्यांची तातडीने कृपा करावी."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली. तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.०८.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.९.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ११.९.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व अपूर्ण माहिती दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने, त्यांना, माहिती प्राप्त करुन घेण्याचा त्यांचा हक्क त्यांनी हिरावून घेतल्यासारखे वाटत आहे. येवला येथील सर्व्हे नं. ९२ वर झालेल्या अनधिकृत बांधकामाच्या उद्‌घाटनास नगराध्यक्ष, श्री. पंकज पारख, बांधकाम मंत्री, श्री. छगन भुजबळ व तत्कालीन जिल्हाधिकारी, श्री.

महेश झगडे हे हजर होते.नगरपरिषद कायदा २००२ मध्ये अशा अनधिकृत बांधकामाच्या कोणत्याही समारंभास हजर राहणाऱ्या अशासकीय सदस्यांना निलंबित करुन त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावी, अशा अर्थाची तरतुद आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या माहितीवरुन, त्यांच्या वरिष्ठांच्या दबावामुळे त्यांनी, अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले असल्याचे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. २०.६.२००८ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थी यांच्या दि. ३.८.२००६ रोजीच्या अर्जास नगरपरिषदेतर्फे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दि. १९.८.२००६ रोजी, नगरपरिषदेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यांवरुन त्यांना माहिती पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने, त्यांना नगरपरिषदेकडील उपलब्ध अभिलेखे व कागदपत्रे यावरुन माहिती देण्यात आली. संबंधित अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.५.२००८ रोजी त्यांना संपूर्ण माहिती मिळाल्याबद्दल व या संदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याबद्दल लेखी पत्राने कळविले आहे. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेल्या दि. ३१.५.२००८ रोजी लिहिलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत दाखविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी बरोबर उत्तर दिले असल्याने, त्यांच्या दि. २४.८.२००६ रोजीच्या अपील अर्जावर दि. ११.९.२००६ रोजी आदेश देऊन अपिलार्थीचे अपील त्यांनी फेटाळून लावले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ३.८.२००६ रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे

एकूण सहा मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली होती. त्यांतील मुद्दा क्र. ५ व ६ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेली माहिती ही भविष्यकाळातील असून त्यामध्ये संबंधितांवर २००२ च्या सुधारित नियमानुसार कोणती कारवाई करणार, तसेच मंत्रीमहोदयांच्याविरुध्द आपण मा. राज्यपाल यांच्याकडे अहवाल पाठविणार आहात काय, अशा अर्थाची माहिती विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्र. ५ व ६ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, या व्याख्येशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती संबंधितांच्या मागणीनुसार त्यांना अधिनियमातील तरतुदीच्या अधीन राहून द्यावयाची असते. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्तमानकाळात उपलब्ध असलेल्या त्यांच्याकडील नस्ती,अभिलेखे यावरुन त्यांना अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना भविष्यातील प्रश्न विचारणे व त्याचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अशाप्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्र. ५ व ६ ची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस मूळात देय होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ४ शी संबंधित माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिल्याचे त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिल्याचे दिसून येते. यामध्ये, "येवला येथील सर्व्हे नंबर ९२ ची मालकी शासनाची असून, याच सर्व्हेनंबरवर ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम झाले आहे. हे बांधकाम नियमानुकूल करण्यासाठी या जागेवर असलेले 'हरीत पट्टया'चे

आरक्षण बदलून त्याचा शासकीय व निमशासकीय उद्देशाकरिता वापर करण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही शासनस्तरावर चालू आहे. अद्यापपावेतो या जागेवर असलेल्या आरक्षणात आवश्यक तो बदल केला गेला नाही", अशी माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे, ती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिली आहे व ती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात्, सचिव (नगर विकास) यांना असे सूचित करण्यात येते की, येवला नगरपरिषदेकडील या सर्व्हेनंबर ९२ च्या आरक्षण बदलाबाबत त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावावर त्यांनी त्वरेने निर्णय घ्यावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मण गंगाधर कुमावत, भोईगल्ली, येवला, जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद येवले, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (नगर विकास), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२०८

निर्णय दिनांक : १८.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रामदास ओंकार पवार,<br>रा.चाळीसगाव जि.जळगाव. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, चाळीसगाव,<br>जि. जळगाव. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०७.२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रामदास ओंकार पवार, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. शंकर बबन गोरे, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, चाळीसगाव, जि. जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विठ्ठल तेजबराव जरे,जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०५.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००१ ते २००६ या कालावधीशी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व्हे नं. ३७९/४अ+ब मधील बांधकामासंदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

" सर्वे नं. ३७९/४अ+ ब मधील अतिक्रमण काढणेबाबत दि. ३.४.२००१ रोजी मा. जिल्हाधिकारी सो यांचे लोकशाहीदिनी तक्रार केली होती. सदरबाबत न.पा.ने कोणती कार्यवाही न केल्याने दि. ६/६/२००१ रोजी न.प.ला उपोषणास बसण्याची नोटीस दिली. न.पा. कार्यालयाने जा.क्र.न.पा/बांध/२/२१४ दि. ६/६/२००१ रोजी पत्र देवुन सदर अतिक्रमणधारकांवर जा.क्र.न.पा./बांध/२/१९५ दि. ३०/५/२००१ अन्वये त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करणे करिता म.पो.निरी सो ४०गाव यांचेकडे अर्ज दाखल केलेला आहे असे कळवुन उपोषण मागे घेण्याचे आवाहन केले होते. आज पावेता सदर अतिक्रमण बाबत कार्यवाही झालेली नाही तरी जा.क्र.न.पा./बांध/२/१९५, दि. ३०/५/२००१ अन्वये अतिक्रमणधारकावर केलेली कार्यवाही कोणत्या स्तरावर आहे. तसेच या अतिक्रमण काढण्या बाबतच्या तक्रारीवर न.पा.ने कोणती कार्यवाही केलेली आहे याची विस्तृत माहिती मिळावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.०८.२००६ रोजी प्रथम अपील

केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ७.९.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १५.९.२००६ रोजी पारित केले आहेत. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य करुन, जन माहिती अधिकारी यांना त्यांनी अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणासंदर्भात संबंधित पोलीसस्टेशनकडे दाखल केलेल्या फिर्यादी संदर्भातील अद्ययावत माहिती पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २३.१०.२००६ रोजी या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामासंदर्भात अद्ययावत माहिती पुरविल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, संबंधित अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणासंदर्भात त्यांनी दि. ३.४.२००१ रोजी चाळीसगाव नगरपालिकेकडे अर्ज दाखल केला होता. या अर्जावर त्यांनी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही. नगरपरिषदेने त्यांना दि. ६.६.२००१ रोजी पत्र देऊन या पत्रामध्ये त्यांनी सदर अतिक्रमणासंदर्भात कार्यवाही करण्याचे अपिलार्थीस आश्वासित केले होते. तथापि यानंतर सहा वर्षांचा कालावधी व्यपगत होऊनही जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. संबंधित नगरपरिषदेने या संदर्भात कोणतीही कार्यवाही न केल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीच्या आधारे दि. ५.७.२००६ रोजी त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात त्यांनी पूर्वी केलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही केली, याची माहिती मागितली आहे. त्यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त

झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या अर्जासंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी पोलीसस्टेशन चाळीसगावशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांचे सदर उत्तर त्यांना मान्य नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.१०.२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. यामध्ये देखील त्यांच्या दि. ३.४.२००१ च्या अर्जाच्या संदर्भात त्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत काहीही कळविले नाही व याद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३) १ व २ चा भंग करुन त्यांनी माहिती देण्याचे हेतुपूर्वक टाळले व कर्तव्यात कसूर केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ५.७.२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २७.७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस अपेक्षित माहिती पुरविली आहे. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जात व राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात नमूद केलेले आक्षेप त्यांना मान्य नाहीत. अपिलार्थीने दि. ३.४.२००१ रोजी जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे लोकशाहीदिनी अतिक्रमणाबाबत न.पा.कडून कार्यवाही न झाल्यामुळे या संदर्भात तक्रार केली होती. सदर प्रकरणात नगरपालिकेने दि. ३०.५.२००१ रोजी पोलीस निरीक्षक, चाळीसगाव यांच्याकडे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ प्रमाणे फिर्याद दाखल करणेबाबत पत्र दिलेले आहे.  तसेच अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना पूर्णतः पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.७.२००६ व २३.१०.२००६ रोजी पुरविलेली माहिती बरोबर व वस्तुस्थितीवर आधारित अशी आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर

त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या माहितीमध्ये सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांना प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतरही त्यांनी अपिलार्थीस सर्व्हे नंबर ३७९/४ अ+ब या प्रकरणाबाबतची पोलीसस्टेशनकडील सद्यःस्थिती देखील त्यांच्याकडील दि. २३.१०.२००६ च्या पत्रान्वये पुरविली आहे. अपिलार्थीच्या एकंदरित युक्तीवादावरुन त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भिय अतिक्रमण हटविण्यासंदर्भात त्यांनी केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्वरेने प्रतिसाद न देऊन तो उशिरा दिला आहे. अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यासाठी पूर्णपणे कायद्यातील तरतुदीचे पालन करणे आवश्यक असल्याने या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती कार्यवाही चालू असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. मात्र सदर अतिक्रमणे अनधिकृत आहेत किंवा कसे, तसेच ती काढण्याबाबत निर्णय घेण्याची अधिकारिता ही संबंधित नगरपरिषद व महसूल खाते यांची आहे त्यामुळे या संदर्भात आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने माहिती देण्याचे टाळल्याचे आयोगाच्या निदर्शनास आलेले नाही. तसेच उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरेशा विस्तृत प्रमाणात माहिती दिल्याचे आढळून येत असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे

दाखल केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपीलार्थी यांचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामदास ओंकार पवार, रा. शिव कॉलनी, जुना मालेगाव रोड, चाळीसगाव जि. जळगाव-४२४ १०१.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद चाळीसगाव जि. जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३७२

निर्णय दिनांक : १८.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गजानन पांडुरंग जाधव,<br>रा.जळगाव | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा शहर अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव<br>२ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (सा.प्र.),<br>जळगाव शहर महानगरपालिका,<br>जळगाव | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०७.२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गजानन पांडुरंग जाधव, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुनिल सुर्यकांत भोळे, जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, सा.बां.विभाग, महानगरपालिका, जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. रावसाहेब रंगनाथ काळे, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२१.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २४.१०.२००५ ते १६.१०.२००६ या कालावधीतील जळगाव महानगरपालिका हद्दीतील मेहरुण सर्व्हेनंबर २६० वरील दफनभूमीमध्ये बांधलेल्या वॉलकंपाऊण्डच्या बांधकामासंदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

" मेहरुण सर्वे नं. २६० दफनभूमीस वॉलकंपाऊंड बांधणे बाबत...."

अर्जातील माहितीचा विषय या मुद्यासमोर अपिलार्थीने

माहितीचा विषय - "वॉल कंपाऊंड बांधकामा बाबतचे अंदाजपत्रकाची प्रमाणीत प्रत." असे नमूद केले आहे.

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांच्या दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्राने प्रत्यक्षतः २९.१२.२००६ रोजी पुरविली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तीस दिवसांच्या आत माहिती पुरविली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.१.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ७.२.२००७ रोजी पारित केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे अपील मंजूर केल्याचे दिसून येते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील

कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.०२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यापासून तीस दिवसांच्या आत म्हणजेच दि. २०.१२.२००६ रोजी अगर तत्पूर्वी माहिती देणे अपेक्षित होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २९.१२.२००६ रोजी म्हणजेच विहित मुदतीपेक्षा आठ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविली आहे. तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना माहिती देण्यासाठी आवश्यक ते शुल्क त्यांनी कळविले नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविण्यात आलेल्या नकाशावर उत्तर दिशा दाखविली नसल्याने या नकाशावर कंपाऊंड वॉलचे गेट कोणत्या दिशेला आहे, याचा त्यांना उलगडा झाला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरविलेली माहिती तयार करुन तीन दिवसांच्या आत पुरविण्यात यावी, असे आदेश दिले. तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी तीन दिवसांनी अपिलार्थीस पूर्वी दिलेल्या माहितीतील चुक दुरुस्त करुन त्यांना माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने व चुकीची माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची कारवाई करण्यात यावी. या प्रकरणी त्यांना झालेल्या आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रासाबद्दल रु.५०००/- इतकी नुकसान भरपाई त्यांना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची त्यांनी आयोगास पुढे विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते दि. २२.११.२००७ पासून या पदावर कार्यरत असून त्यांच्यापूर्वी शहर अभियंता या पदावर, श्री. डी.एस.खडके नावाचे अधिकारी कार्यरत होते. सध्या ते जळगाव महानगरपालिकेमध्ये सहायक अभियंता या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीचा दि. २१.११.२००६ रोजीचा

मूळ अर्ज त्यांना दि. २३.११.२००६ रोजी प्राप्त झाला आहे. अपिलार्थीच्या या अर्जानुसार त्यांनी त्यांच्याकडील दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार करुन ठेवली व ती अपिलार्थीस प्रत्यक्षतः दि. २९.१२.२००६ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे. त्यांना दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले होते. त्यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणीस ते उपस्थित नव्हते. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील आदेश त्यांना दि. ७.२.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर दि. ९.२.२००७ रोजी त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २२.१२.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि.१६.१.२००७ रोजी सुनावणी घेऊन, आपले आदेश दि. ७.२.२००७ रोजी पारित करुन सुनावणीमध्ये अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांनी सुनावणीचे वेळी उपस्थित केलेल्या त्रूटींची पूर्तता करुन तीन दिवसांच्या आत माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप साधे व सरळ होते.अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१.११.२००६ रोजी प्रथम अर्ज केला होता. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.११.२००६ रोजी प्राप्त झाला, असा जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद केला आहे, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलासोबतच्या त्यांच्या प्रथम अर्जाच्या प्रतीवरुन सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१.११.२००६ प्राप्त झाल्याचे दिसून येते, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीचा अर्ज त्यांना दि. २३.११.२००६ रोजी प्राप्त झाला, हा युक्तीवाद आयोग ग्राहय धरत नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे

प्राप्त होताच त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) प्रमाणे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क, त्यांना देण्यात येणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची संख्या इ. तपशील त्यांनी तीस दिवसांचे आत पुरविणे भाग होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी याबाबत कोणतीही कृती न करता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि. २१.१२.२००६ रोजी तयार करुन ठेवली. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगरपरिषद हद्दीतील सर्व्हेनंबर ९२ मधील स्मशानभूमीच्या कंपाऊंड वॉलच्या अंदाजपत्रकाची प्रमाणित प्रत मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षिली असताना याबाबत कोणतीही कृती न करुन जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती स्वतःकडे तयार करुन विनाकार्यवाही ती त्यांच्याकडे ठेवून घेतली व अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित झाल्यानंतर दि. २९.१२.२००६ रोजी ती त्यांना व्यक्तिशः हस्तांतरित केली. या माहितीमध्ये काही त्रूटी असल्याचे अपिलार्थी यांच्या निदर्शनास आले. या अंदाजपत्रकाच्या नकाशाच्या प्रतीमध्ये 'उत्तर' दिशा दाखविली नसल्याने त्यांना कंपाऊंड वॉलचे गेट कुठल्या दिशेला आहे, याचा त्यांना अर्थबोध झाला नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता, कंपाऊंड वॉलचे फक्त एकच गेट प्रस्तावित केल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमामधील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशी स्पष्ट केली आहे. त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी अपिलार्थीस ती पुरविणे अभिप्रेत आहे. सदर माहितीमध्ये काही तथाकथित उणीवा राहिल्या असल्यास त्या दुरुस्त करणे हा भाग या माहितीपेक्षा पूर्णतः वेगळा असू शकतो. अपिलार्थीने या अंदाजपत्रकामध्ये दर्शविलेल्या त्रूटीची पूर्तता करुन जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या निर्णयानंतर अपिलार्थीस या त्रूटींच्या पूर्ततेसह आवश्यक तो नकाशा त्यांना पुरविला आहे.

मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती पाहता, अपिलार्थीने त्यांच्या कंपाऊंड वॉलच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाची प्रतच मागितल्याचे दिसून येते, यामध्ये नकाशा शब्दाचा उल्लेख नाही, तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये आवश्यक असलेल्या माहितीचा "मेहरुण सर्वे नं. २६० दफनभूमीस वॉलकंपाऊंड बांधणे बाबत...", असा उल्लेख केला आहे. या माहितीवरुन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये माहितीचा विषय या सदरासमोर, "वॉल कंपाऊडच्या बांधकामाबाबतचे अंदाजपत्रकाची प्रमाणीत प्रत" असा दर्शविला आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जात अशाप्रकारची त्रूटी असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती, ती तशीच्या तशी पुरविली आहे. या माहितीतील अपिलार्थीने निदर्शनास आणलेली ही तांत्रिक त्रूटी माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदी लक्षात घेता, अपिलार्थीच्या अर्जातील मूळ विषयाबाहेरची आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल माहितीमध्ये काही तांत्रिक उणिवा असू शकतात पण या उणिवा आहेत म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती पुरविली असा त्यांचा अर्थ होऊ शकत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती पुरविली, हे अपिलार्थी यांचे म्हणणे आयोग अमान्य करीत आहे.

आता प्रश्न राहिला तो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबाबतचा. या संदर्भात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत तयार करुन ठेवली होती. फक्त ती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून देण्याऐवजी त्यांनी ती अपिलार्थीस दि. २९.१२.२००६ रोजी व्यक्तिशः हस्तांतरित केली. त्यांच्याकडून ही चुक झाल्याचे दिसून

येते. तथापि ही चूक त्यांनी अपिलार्थीस माहिती घ्यावयाची नाही अशा उद्देशाने मुद्दाम हेतुपूर:स्सर केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, अन्यथा अपिलार्थीने वर म्हटल्याप्रमाणे प्रथम अर्जामध्ये चुकीच्या पध्दतीने मागणी करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिली नसती. त्यांच्या अशाप्रकारच्या चुकीबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात असून, त्यांना असे सूचित करण्यात येते की, येथून पुढे भविष्यात माहिती अधिकार अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर, अपील अर्जावर त्यांनी अधिक सतर्कतेने व अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने त्यांना चुकीची माहिती पुरविली, असे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द न झाल्याने, अपिलार्थीने मागणी केलेल्या नुकसान भरपाई संदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.तसेच आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्रूटींची पूर्तता करुन त्यांना पुरविली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक : १८.०७.२००८ राज्य माहिती आयुक्त ,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन पांडुरंग जाधव, रा. ‘नारायणी’, २५-अ, नवीन जोशी हाऊसिंग सोसायटी, सिंधी कॉलनीरोड, जळगाव ता.जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३७३

निर्णय दिनांक : १८.०७.२००८

१ श्री. मोहन प्रेमचंद चौधरी, : अपीलार्थी
रा. ता.जि. जळगाव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषी अधिकारी, चोपडा
जि.जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उपविभागीय कृषी अधिकारी, चोपडा,
जि.जळगाव

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः मंडळ कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय चोपडा,
जि.जळगाव

जन अपिलीय अधिकारीः तालुका कृषी अधिकारी, चोपडा,
जि.जळगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०७.२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. ज्ञानेश्वर वना पाटील, कृषि पर्यवेक्षक, जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, चोपडा जि. जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. भालचंद्र वल्लभ बैसाने (तत्कालीन) व श्री. हरीशचंद्र लक्ष्मण वळवी (सध्याचे) जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, चोपडा, जि.जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दौलत भिला पाटील, उपविभागीय कृषी

अधिकारी, अमळनेर हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. मोहन प्रेमचंद चौधरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०२.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-२००६ या कालावधीशी संबंधित त्यांच्या मंडळ क्षेत्रातील कृषि विज्ञान केंद्राशी संबंधित खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

" १. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात चोपडा तालुक्यात स्थापन केलेली गांववार कृषि विज्ञान मंडळांची यादी.

२. या आर्थिक वर्षात कृ.वि.मं. चे प्राप्त झालेले अनुदान.

३. या आर्थिक वर्षात कृषि विज्ञान मंडळांतर्गत गांववार झालेला खर्च व खर्चाच्या पावत्या. "

अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना, त्यांच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांची पदे भरली नसल्यामुळे, देता येणे शक्य होणार नाही व त्याचबरोबर त्यांच्या कार्यालयात येऊन आवश्यक असलेली माहिती अवगत करुन घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले.तथापि यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०२.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले होते. सदर अपील अपिलार्थीने उपविभागीय कृषी अधिकारी, अमळनेर कृषी विभाग यांच्याकडे केले होते. तथापि या प्रकरणी उपविभागीय कृषी अधिकारी हे अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये तालुका कृषी अधिकारी,

चोपडा, जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत, त्यांच्याकडे प्रथम अपील करण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत तालुका कृषी अधिकारी, चोपडा यांना देऊन त्यांना अपिलार्थीस नियमानुसार माहिती देण्याचे सूचित केले. या पत्रासोबत त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज तालुका कृषी अधिकारी,चोपडा यांच्याकडे पाठविल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. मात्र त्यांनी या अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीस दि. १८.१.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी रु. २९६/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर शुल्क न भरता, यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, ते हे द्वितीय अपील आयोगाकडे करत असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यावेळी तापी नदीस आलेल्या महापूरात शेतीच्या झालेल्या नुकसान भरपाईप्रित्यर्थ अनुदान वाटपाचे काम त्यांच्यावर सोपवले होते, त्या कामात व्यस्त असल्यामुळे, तसेच त्यांच्याकडे त्यांच्या नियमित पदभाराशिवाय मंडळ कृषि अधिकारी, कृषि

पर्यवेक्षक,चोपडा-२ या पदांचाही अतिरिक्त पदभार होता. नियमित कामाचा बोजा जास्त असल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत पुरविता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. भालचंद्र वल्लभ बैसाने यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अपील करतेवेळी शेती अनुदान वाटपाचे काम त्यांच्याकडे असल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देण्यासाठी त्यांना वेळ मिळाला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सरळ व सोपे होते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. या संदर्भात अपिलार्थीशी प्रथम पत्रव्यवहार दि. ५.१.२००७ रोजी केल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. तथापि त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीतील दि. ५.१.२००७ रोजीची नोंद पाहिल्यास, अपिलार्थीस त्यांनी या विषयावर पत्रव्यवहार केल्याचे स्पष्ट होत नाही. तसेच त्यांनी अपिलार्थीस दि. १८.१.२००७ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २९६/- त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. या पत्राची जावक नोंदवहीत घेतलेली नोंद संशयास्पद असून या पत्रास त्यांनी ११५-अ असा क्रमांक दिलेला आहे. मात्र आयोगाकडे सादर केलेल्या या पत्राच्या प्रतीवर जा.क्र. ११५ असा दिलेला आहे. एकाच क्रमांकाची दोन विषयावरील वेगळया क्रमांकामध्ये असलेली ही विसंगती लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.१.२००७ रोजीचे पत्र पाठविले नाही, असे आयोग गृहीत धरत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एवढी साधी, सरळ व सोपी माहिती मागवूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची

माहिती, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील करेपर्यंत दिली नाही, ही निश्चितपणे कोणत्याही सुविद्य नागरिकास उद्विग्न करणारी बाब आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास प्रतिसाद दिला नाही, तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी अथवा पत्रव्यवहार केला नाही. या दोन अधिकाऱ्यांनी याचे कारण त्यांच्याकडे अनुदान वाटपाचे जादा आलेले काम असे दिले आहे. तसेच त्यांनी केलेल्या युक्तीवादावरुन त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे नेमून दिलेले जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकाऱ्याचे काम हे त्यांना अतिरिक्त असल्यासारखे वाटत आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणारे अर्ज, अपील अर्ज यांच्यावर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत यथायोग्य कार्यवाही करणे, हा त्यांच्या दैनंदिन नित्य कर्तव्याचा एक अविभाज्य भाग आहे, याचे त्यांनी भान ठेवावे. अपिलार्थीस माहिती न देण्यामागे वरीलप्रमाणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले समर्थन आयोग स्वीकारत नाही. आयोगाच्या मते केवळ त्यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हेच कारण, त्यांनी अपिलार्थीस माहिती न देण्यामागे असावे. तथापि त्यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हे अपिलार्थीस विहित मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न देण्याच्या त्यांच्या कृतीचे समर्थन करु शकत नाही.  या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. त्यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दि. ५.१.२००७ रोजीच्या कथित पत्रामध्ये त्यांच्या कार्यालयाकडे आवश्यक त्या कर्मचाऱ्यांची उपलब्धता नसल्याने अपिलार्थीस माहिती देता येणे शक्य होणार नाही, असे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस अशाप्रकारे प्रतिसाद न

देण्याची कृती त्यांच्या मनातील अपिलार्थीस माहिती न देण्याची त्यांची तीव्र इच्छा, या बाबीकडेच अंगुलीनिर्देश करते.

वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव पुरेशा प्रमाणात स्पष्ट करुन या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब कृषि आयुक्त, पुणे यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या अशाप्रकारच्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन अथवा त्यांच्या अर्जावर कोणताही निर्णय न घेऊन अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद कृषि आयुक्त, पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, असे निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्याकडील जावक नोंदवहीमधील जावक क्रमांकाच्या नोंदीमध्ये हेतुपूरःस्सर चुका करुन आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे, याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल कृषि आयुक्त, पुणे यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

४.जन माहिती अधिकारी यांनी आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे, या ताकिदीची नोंद अधीक्षक जिल्हा कृषि अधिकारी यांनी संबंधितांच्या सेवापुस्तकात घ्यावी.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहन प्रेमचंद चौधरी, १, विद्युत कॉलनी, ४, शुभदा अपार्टमेंट, कलाभवनसमोर जळगाव, जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, चोपडा, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, चोपडा, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे -०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३७४

निर्णय दिनांक : १८.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. आनंदराव राजाराम पाटील,<br>रा.ता.धरणगाव जि.जळगाव | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक निबंधक सहकारी संस्था,<br>एरंडोल, जि.जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,<br>जळगाव | | |
| १ श्री गणेश सहकारी गृहनिर्माण संस्था, धरणगाव | : | त्रयस्थपक्ष |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०७.२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. आनंदराव राजाराम पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. निलकंठ ज्ञानदेव करे, जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, एरंडोल, जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच त्रयस्थपक्ष श्री. दिनेश भिका लोहार, चेअरमन व श्री. हिम्मतराव शंकर पाटील, सचिव श्री गणेश सहकारी गृह निर्माण संस्था,मर्या.धरणगाव जि.जळगाव (यापुढे त्यांना त्रयस्थपक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,

जि.जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१५.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री गणेश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., धरणगाव या संस्थेत झालेल्या अफरातफरीच्या चौकशी अहवालाची प्रत मिळणेबाबत खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे.

" जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव यांचेकडील पत्राचा जा.क्र.औ.१/२६३२/हौसिंग/अफरातफर चौ/तक्रार/वशी ५८०/सन ०५ दिनांक २०/७/२००५ यांचे आदेशावरुन श्री गणेश सहकारी गृहनिर्माण संस्था म.धरणगाव या संस्थेत झालेल्या अफरातफरीचा चौकशी अहवाल "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क रु.१०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे कळविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले, तथापि या पत्राची प्रत त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले, तसेच सदर कथित दि. १३.१०.२००६ रोजीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.११.२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ६.१२.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ७.१२.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले आहे. सदर अपील

फेटाळताना, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दि. १३.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे माहितीपोटीच्या रु.१०/- इतक्या शुल्काचा भरणा केला नाही व सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर होते, या दोन प्रमुख कारणावर आधारित आपला निर्णय दिल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक नमूद नसलेले द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर अपील अर्ज राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात दि.२०.२.२००७ रोजी प्राप्त झाला आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी ठेवून जन माहिती अधिकारी यांचे दि. १३.१०.२००६ रोजीचे पत्र व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (जन अपिलीय अधिकारी) यांनी दि. १६.११.२००६ रोजीच्या त्यांना दि. ६.१२.२००६ रोजी सुनावणीसाठी हजर राहण्याबाबतचे पत्र त्यांना मिळाले नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच श्री गणेश सहकारी गृह निर्माण संस्था मर्या.,धरणगाव या संस्थेमध्ये साधारणतः तीन लाख रुपयांची अफरातफर झाली असल्याने तालुका उपनिबंधक व जिल्हा उपनिबंधक हे माहिती देण्यासाठी हेतूतः टाळाटाळ करीत असल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दि. १५.९.२००६ रोजी आवश्यक असलेली माहिती मागण्याकरिता तसेच या गृहनिर्माण संस्थेसंदर्भात त्यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एम.यु.राठोड यांच्याशी बराच पत्रव्यवहार करुन देखील त्यांना अपेक्षित माहिती न मिळाल्याने त्यांनी ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मागविली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. १३.१०.२००६ रोजीचे शुल्क भरण्याबाबतचे व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,

जळगाव यांच्याकडील दि. ६.१२.२००६ रोजीचे सुनावणी ठेवल्याबाबतचे दि. १६.११.२००६ रोजीचे पत्र त्यांना अद्यापही प्राप्त झालेले नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती, त्यांना न्यायालयीन कामासाठी आवश्यक होती, तथापि संबंधितांकडून ती प्राप्त न झाल्याने त्यांची गैरसोय झाली. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एम.यु.राठोड यांनी संबंधित गृहनिर्माण संस्थेला पाठीशी घातले आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत. त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस पाठविलेल्या दि. १३.१०.२००६ रोजीच्या, अपिलार्थीस शुल्क भरावयाचे सूचित करण्यासाठी कळविलेल्या पत्राची स्थळप्रत त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही, मात्र त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीत त्यांनी अपिलार्थीस दि. १३.१०.२००६ रोजी पत्र पाठविल्याचे दिसून येते. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी दि. १३.१०.२००६ रोजीच्या पत्रातील मजकूर स्पष्ट झाला आहे, त्यावरुन अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नसल्याने, अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त होऊ शकली नाही, असे सिध्द होत आहे.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दि. १३.१०.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क

रु.१०/- भरण्याचे सूचित केले असले तरी या पत्राची स्थळप्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही, तर सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने केवळ जन माहिती अधिकारी नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडीलही पत्र त्यांना प्राप्त झाले नसल्याचे आयोगास सांगितले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेल्या त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीवरुन त्यांनी अपिलार्थीस शुल्क भरण्याबाबतचे पत्र पाठविल्याचे स्पष्ट होते.

उपरोक्त प्रकरणी असे दिसून येते की, केवळ अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे व अपिलार्थीने सुनावणीच्या पूर्वीच्या संपूर्ण तेरा/सतरा महिन्याच्या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा संपर्क न साधल्याने अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. आता अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यास तयार आहेत, न ही माहिती देण्यासाठी त्रयस्थपक्षाची काहीही हरकत नाही. हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ते शुल्क प्राप्त करुन घेऊन त्यांना, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने, त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. आनंदराव राजाराम पाटील, प्लॉट नं.३०, हेडगेवारनगर धरणगाव ता.धरणगाव जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, एरंडोल, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३८५

निर्णय दिनांक : १८.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती एस.आर.शेवाळे,<br>रा. ता.जि.नाशिक. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>धुळे जि.धुळे | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक,<br>धुळे, जि.धुळे | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः पोलीस उपअधीक्षक (गृह),
धुळे, जि.धुळे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०७.२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. दत्तू दामू माळी, व.लिपीक, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह) धुळे, जि.धुळे यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. संजय जगन्नाथराव पाटील, पोलीस निरीक्षक, जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, धुळे, जि.धुळे यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्रीमती एस.आर.शेवाळे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१९.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९.३.२००४ ते ३१.३.२००४ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित त्यांचे कार्यालयातील खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " आपले संदर्भीय पत्र क्र. २९६/अर्ज/केमाअ/९२/एसआरशे/०६ दि. २२.९.२००६ नुसार आपल्या अधिपत्याखालील पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घडलेल्या गुन्हयासंबंधीच्या माहीतीच्या नोंदी पोलीस नियंत्रण कक्ष. धुळे यांच्याकडे घेण्यात येतात, नंतर गुन्हयासंबंधीच्या माहीतीच्या प्रती तयार करुन वृत्तपत्रांच्या वार्ताहरांना देण्यात येतात. तसेच दैनंदिन अहवालाच्या प्रती पोलीस नियंत्रण कक्षात ठेवण्यात येतात. तरी दैनंदिन अहवालावरुन २९/०३/०४ ते ३१/०३/०४ या ३ दिवसांच्या कालावधीत किती लोकांना अटक करण्यात आली ? अशा अटक करण्यात आलेल्या व्यक्तींची नावांची यादी मिळणेबाबत वरील माहिती देतांना अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव, संबंधीत पोलीस ठाणे, अटकेचे कारण, अटकेचे नेमके ठिकाण, अटकेची नेमकी वेळ इ.स्वरुपात द्यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती साध्या टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही

प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संबंधात अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना, हे अपील त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे करेपर्यंत, कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे म्हटले असून, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. डी.डी.माळी, व.लिपीक,पोलीस अधीक्षक कार्यालय,धुळे यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २०.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयास दि. १५.११.२००६ रोजी पाठविली असल्याचे नमूद करुन, सदर माहिती त्यांना परत हवी असल्यास योग्य ते शासकीय चलन भरुन माहिती नियंत्रण कक्ष, धुळे येथून घेऊन जाण्याचे सूचविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार अपिलार्थीने दि. २९.५.२००७ रोजी रु. ४५/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करुन त्यांच्याकडून ही माहिती हस्तगत करुन घेतली.

जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. संजय जगन्नाथ पाटील, पोलीस

निरीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, धुळे यांच्यातर्फे युक्तीवाद करण्यात आला. सदर प्रतिनिधीस आज सुनावणीचे वेळी, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेण्याचे कारण विचारले असता, त्यांना आयोगासमोर समर्पक उत्तर देता आले नाही व याबाबतचे कोणतेही कारण आयोगास सांगता आले नाही. ते त्यांच्या युक्तीवादामध्ये फक्त अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे, अशाचप्रकारचा युक्तीवाद वारंवार करीत राहिले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे पाहता, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी गृह विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयात कशा तऱ्हेने केली जाते, याचे सम्यक दर्शन घडते. आजच्या सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांना आयोगासमोर आपले प्रतिनिधी म्हणून पाठविले आहे, ज्यांना आयोगाने विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारकरित्या उत्तरे देखील देता आली नाहीत. त्यांनी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून आवश्यक ते माहितीसाठीचे शुल्क रु. ४५/- इतके त्यांच्या कार्यालयात भरुन घेऊन दि. २९.५.२००७ रोजी त्यांना माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास दाखविलेल्या व अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते, तथापि येथे प्रश्न एकूण दोन मुद्यांवर उपस्थित होतात, त्यापैकी पहिला मुद्दा म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १९.१०.२००६ रोजीच्या अर्जास माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीप्रमाणे विहित मुदतीमध्ये प्रतिसाद दिला किंवा कसे हा आहे, तर दुसरा मुद्दा त्यांनी

अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक ती माहिती देण्यापोटी आकारलेल्या शुल्कासंबंधीचा आहे. जन माहिती अधिकारी अपिलार्थीस मूळात माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु.४५/- त्यांच्या कार्यालयात भरण्याच्या सूचना त्यांच्याकडील दि. २९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिल्या. सदर सूचना त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत नाहीत. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी लागणारे शुल्क त्यांनी माहितीसाठीचा अर्ज केल्यापासून तीस दिवसांच्या आत, अपिलार्थीस त्यांना देण्यात येणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर यासहीत कळविणे अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार बंधनकारक असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात भराव्या लागणाऱ्या शुल्काची कल्पना चार महिने इतक्या विलंबाने दिली. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सरळ व सोपे असे होते, एवढे असताना देखील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस माहिती न देण्याचे एकमेव कारण म्हणजे जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हेच असावे, असे आयोगास वाटते. अर्थात हा इच्छाशक्तीचा अभाव त्यांच्या अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद देण्याच्या कृतीचे कोणत्याही प्रकारे समर्थन करु शकत नाही. त्यांनी या प्रकरणातील त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनामुळे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव तर स्पष्ट केला आहेच, शिवाय अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित ठेवले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी

यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय पाच महिने इतक्या विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- इतक्या रकमेची शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे माहिती देण्यास पाच महिने इतका कालावधी व्यपगत होऊन देखील जन माहिती अधिकारी यांनी रु.४५/- इतके शुल्क ही माहिती त्यांना देण्यापोटी आकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर असून अधिनियमातील कलम ७(६) नुसार त्यांना सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावयास हवी होती. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणात अपिलार्थीकडून घेतलेले माहितीपोटीचे शुल्क रु.४५/- इतके, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस परत करावे.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता माहिती दिली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन व कोणताही निर्णय न देऊन त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(६) चा निःसंशयपणे भंग केल्याचे येथे आढळून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीची नोंद सचिव (गृह), यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणात माहिती देण्यापोटी त्यांच्याकडून घेतलेले शुल्क रु.४५/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय पाच महिने इतक्या विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- इतक्या रकमेची शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत आयोगाकडे खुलासा प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १८.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती एस.आर.शेवाळे, ३, वसंतपुष्प गोविंदनगर, नाशिक-९

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), धुळे, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, धुळे जि.धुळे यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/२७५

निर्णय दिनांक १८-०७-२००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री. एल. एस. बागडे,<br>नाशिक. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपआयुक्त (प्र),<br>नाशिक महानगरपालिका,<br>नाशिक | : | उत्तरवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. जुगलसिंह एम. ढाकरे, जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्र), नाशिक महानगरपालिका,नाशिक (यापुढे त्यांना उत्तरवादी असे संबोधण्यात येईल.) व श्री. विलास ठाकूर, जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक हे हजर आहेत, तर तक्रारदार श्री. एल.एस.बागडे (यापुढे त्यांना तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल. ) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी त्यांच्याकडील दि. २१.१.२००८ रोजीच्या अर्जानुसार राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ व १९ (७)(८ख) अन्वये अशी तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयोग यांनी दि. २७.९.२००७ रोजी आदेशित करुनही आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी त्यांच्या प्रकरणात अंतिम निर्णय घेतलेला नाही व त्यांना त्याप्रमाणे कळविले नाही तसेच नाशिक

महानगरपालिकेच्या डॉ. कासलीवाल यांच्याप्रमाणेच त्यांना देखील दि. २०.९.२००१ पासून व्यवसायभत्ता लागू करावा व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणूनबुजून संबंधित नस्ती पाहणीसाठी वेळेत उपलब्ध करुन न देता त्यांना ८५ दिवस इतक्या विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२१,४५०/- इतकी शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. यावर उत्तरवादी यांच्यातर्फे असा खुलासा करण्यात आला की, राज्य माहिती आयोग यांच्या दि. २७.९.२००७ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांना कार्यवाही करुन त्यांच्याकडील दि. ७.३.२००८ रोजीच्या आदेशान्वये तक्रारदारास दि. २०.९.२००१ ते ३१.१०.२००३ या कालावधीतील व्यवसाय रोध भत्ता मंजूर करुन त्यांच्याकडील वेतनदेयक प्रमाणक क्रमांक ३९१६, दि.२०.६.२००८ अन्वये संपूर्ण रक्कम अदा केलेली आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस आवश्यक ती नस्ती तपासणीसाठी उपलब्ध करुन देऊनही अपिलार्थीने ही नस्ती पाहण्याचे नाकारले.

याच विषयावर राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील दि. २७.९.२००७ रोजी आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांना तक्रारदाराच्या प्रकरणामध्ये वैयक्तिक लक्ष घालून आपला निर्णय त्वरित पारित करण्याचे व जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणातील भूमिकेसंदर्भात त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आदेशित केले होते. त्याप्रमाणे आयुक्त, महानगरपालिका,नाशिक यांनी त्यांच्याकडील दि. ७.३.२००८ रोजीच्या आदेशान्वये निर्णय घेऊन अपिलार्थीस पूर्वलक्षी प्रभावाने व्यवसायरोध (एन.पी.ए.) भत्ता मंजूर केल्याचे व जन माहिती अधिकारी यांचेवर या प्रकरणी प्रशासकीय कार्यवाही केल्याचे दिसून येते.

तक्रारदाराच्या मूळ तक्रारीचे आता उत्तरवादी यांच्याकडून निराकरण झाले असल्याने तक्रारदाराची आयोगाकडे केलेली तक्रार निकाली काढण्यात येत आहे

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८-०७-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ डॉ. एल.एस.बागडे, वैद्यकीय अधिकारी, सावित्रीबाई फुले प्रसुतीगृह, सिन्नर फाटा, नाशिकरोड, महानगरपालिका, नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्र), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/२७६

निर्णय दिनांक   १८-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. एल. एस. बागडे,<br>नाशिक. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपआयुक्त (प्र),<br>नाशिक महानगरपालिका,<br>नाशिक | : | उत्तरवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. जुगलसिंह एम.ढाकरे, जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्र) (यापुढे त्यांना उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) व श्री. विलास ठाकूर, जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक हे हजर आहेत, तर तक्रारदार श्री. एल.एस.बागडे (यापुढे त्यांना तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल. ) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी त्यांच्याकडील दि. २१.१.२००८ रोजीच्या अर्जानुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, "आयुक्त, महानगरपालिका, नाशिक श्री. विलास ठाकूर यांनी त्यांच्या सेवा सलग धरुन त्यांना वेतन दिले नाही व त्यांना तसे कळविले नाही व मुख्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या आदेशाचे पालन त्यांनी

केले नाही, म्हणून त्यांची आयोगातर्फे चौकशी होऊन त्यांना योग्य न्याय मिळावा व डॉ. डी.बी.पाटील यांना जो नियम लावून मागील शासकीय सेवा सलग धरुन सेवाज्येष्ठता देवून वेतनवाढ दिली तोच नियम लावून मला सुध्दा डी.बी.पाटील यांच्याप्रमाणे माझी सेवा सलग धरुन मला त्याप्रमाणे सेवेचे लाभ मिळावेत. तसेच उत्तरवादी यांना रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावावी, उत्तरवादी यांच्यावर कायद्याने कारवाई करावी व मुख्य माहिती आयुक्त यांच्या आदेशाचे पालन न केल्याबद्दल नाशिक महापालिकेचे आयुक्त श्री. विलास ठाकूर यांच्यावर या कायद्यान्वये कडक कारवाई करण्यात यावी." असे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर उपस्थित उत्तरवादी यांनी असा खुलासा केला की, डॉ. डी.बी.पाटील हे पूर्वी शासकीय सेवेत होते. शासकीय सेवेतून त्यांना महानगरपालिकेच्या सेवेमध्ये घेण्यात आले असून शासन निर्णय क्र.एनएमसी २००२/८१४/प्र.क्र.४७/नवि-२५, दि. २१.९.२००४ अन्वये डॉ.डी.बी.पाटील यांची शासनाकडील सेवा महानगरपालिकेच्या सेवेशी संलग्न करण्यात आली आहे. मात्र अपिलार्थी हे पूर्वी शासकीय सेवेत होते, त्यांनी शासनाकडे त्यांचे एक महिन्याचे वेतन जमा करुन शासनसेवेतून मुक्त झाल्यानंतर ते महानगरपालिकेच्या सेवेत रुजू झाले असल्याने त्यांची शासनाकडे झालेली सेवा महानगरपालिकेच्या सेवेशी संलग्नित करण्यात आली नाही व तसे तक्रारदारास दि. १५.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तक्रारदारास नियमाप्रमाणे रजा व सेवानिवृत्ती वेतनासंदर्भात सर्व लाभ देण्याचे परंतु सेवाज्येष्ठता न देण्याचा निर्णय तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांनी दि. १०.३.२००४ रोजी घेतला आहे.

तक्रारदाराची त्यांच्या शासनाकडील सेवा महानगरपालिकेच्या सेवेशी संलग्न धरण्याची सेवासातत्याची मागणी, उत्तरवादी हे त्यांच्या या पदावर येण्यापूर्वीच तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून अमान्य करण्यात आली आहे. तसेच

तक्रारदार यांनी उत्तरवादी यांच्याविरुध्द त्यांनी तक्रारदाराकडे दीड लाख रुपये इतक्या रकमेची मागणी केल्याची खोटी तक्रार देखील केली असून तक्रारदार त्यांच्या विरुध्द अशाप्रकारे अर्ज करुन त्यांच्याकडून आपले इप्सित साध्य करण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणत आहेत.उत्तरवादी यांनी आपल्या युक्तीवादामध्ये शेवटी असेही स्पष्ट केले की, आयोगाच्या प्रत्येक निर्णयाचा योग्य तो मान राखून, अनुपालन करण्यात आलेले आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेली तक्रार व त्यामधील आयोगाकडे केलेली विनंती लक्षात घेता तक्रारदारास डॉ.डी.बी.पाटील यांच्याप्रमाणेच त्यांची शासकीय सेवा महानगरपालिका,नाशिक येथील सेवेशी संलग्न करुन हवी आहे. तथापि हा निर्णय पूर्णतः प्रशासकीय असल्याने व याप्रमाणे निर्णय घेण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने, तक्रारदाराच्या अर्जातील या भागावर आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत. तक्रारदाराने उत्तरवादी व नाशिक महानगरपालिका आयुक्त, श्री. विलास ठाकूर यांच्यावर अनुक्रमे कडक कारवाई व दंडात्मक कारवाई करण्याची मागणी आयोगाकडे केली आहे, तथापि उत्तरवादी यांनी तक्रारदारास आवश्यक तो प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत असल्याने अपिलार्थीची सदर तक्रार फेटाळून लावण्यात येत आहे. उत्तरवादी यांनी तक्रारदारास या संदर्भातील नस्ती पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिली असता तिची तक्रारदार यांनी पाहाणी करण्याचे नाकारले आहे. सदर नकार देण्याचे कारण त्यांनी आयोगाकडे तक्रार केली असल्याचे उत्तरवादी यांना दिले आहे. उत्तरवादी यांना आता परत सूचित करण्यात येते की, तक्रारदार हे त्यांच्याकडे या विषयासंदर्भातील नस्ती पाहणी करण्यासाठी ज्या-ज्या वेळी मागणी करतील, त्या-त्या वेळी अधिनियमातील तरतुदीनुसार नस्ती त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी.

महानगरपालिका आयुक्त व उत्तरवादी यांनी या प्रकरणी आपले कर्तव्य योग्यरितीने पार पाडल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून आले असल्याने, त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १८-०७-२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ डॉ. एल.एस.बागडे, वैद्यकीय अधिकारी, सावित्रीबाई फुले प्रसुतीगृह, सिन्नर फाटा, नाशिकरोड, महानगरपालिका, नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (प्र), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपिल क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३७१,
१३७५, १३७६ व १३७७

निर्णय दिनांक १९-०७-२००८

१ श्री. महारु दयाराम सोनवणे, : अपिलार्थी
मु. डोमकानी पैकी तलावपाडा,
तालुका साक्री, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १३७१/०७)

२ श्री. तोताराम टिला बागूल,
मु. डोमकानी पैकी तलावपाडा,
तालुका साक्री, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १३७५/०७)

३ श्री. भिमराव गुलाब सोनवणे
मु. डोमकानी पैकी तलावपाडा,
तालुका साक्री, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १३७६/०७)

४ श्री. शंकर गंगाराम पवार,
मु. जामकी पो. वासकडी,
तालुका साक्री, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १३७७/०७)

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे<br>कार्यालय, धुळे | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे<br>कार्यालय वनविभाग, धुळे यांचे कार्यालय,<br>धुळे | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक वनसंरक्षक (जंकास) , पश्चिम धुळे विभाग, धुळे |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची एकत्रित सुनावणी आज दिनांक १९-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. विलास गंगाधर कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), पश्चिम धुळे विभाग, धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विजय सर्जेराव शेळके, जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. महारु दयाराम सोनवणे, श्री. तोताराम टिला बागूल, श्री. भिमराव गुलाब सोनवणे व श्री. शंकर गंगाराम पवार (यापुढे त्यांना अनुक्रमे अपिलार्थी १, २, ३ व ४ असे संबोधण्यात येईल) हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी क्रमांक १, २, ३ व ४ यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील

प्रमाणे २ मुद्दयांवर दिलेले धनादेश व रोखालेखासंबंधी, दर्शविलेला कालावधी वगळता एकसारखी माहिती मागितली होती.

"१. आपल्या कार्यालयाने वनक्षेत्रपाल साक्री यांना दिनांक ०१-०६-१९८९ ते डिसेबर १९९८ पर्यतच्या कालावधीत निरनिराळ्या योजनेखाली जे धनादेश दिले त्यांच्या छायांकित प्रती तयार करुन त्या साक्षांकित करुन पुरवाव्यात.

२. वनक्षेत्रपाल साक्री यांच्या कार्यालयाने विविध योजनेखाली दिनांक ०१-०६-१९८९ ते डिसेबर १९९८ पर्यतच्या कालावधीत दरमहा जे रोखालेख सादर केलेत त्या सोबतच्या प्रमाणकांच्या (व्हाऊचर्स, मस्टर्स सह सर्व) छायांकित प्रती करुन त्या साक्षांकित करुन पुरवाव्यात ही विनंती. "

अपिलार्थी क्रमांक १, २, ३ व ४ यांनी सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

चारही अपिलार्थी यांच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०१-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन यापूर्वी आपणास हजर दिवसांची हीच माहिती दिनांक २९-०५-२००६ अन्वये पुरविण्यात आलेली आहे, तसेच वनपरिक्षेत्र अधिका-यांना निरनिराळ्या योजने अंतर्गत दिलेल्या धनादेशाच्या मूळ प्रती महालेखापाल, नागपूर कार्यालयास सादर केल्या असल्यामुळे त्यांच्या छायांकित प्रती पुरविणे शक्य नाही असे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी क्रमांक १, २, ३ व ४ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दिनांक १८-१२-२००६, ०९-०१-२००७, ०९-०१-२००७ व ०९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थी क्रमांक १, २, ३ व ४ यांच्या या अपिलांवर जन अपिलीय

अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००७ रोजी स्वतंत्रपणे आपले आदेश पारित केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या या निर्णयामध्ये, अपिलार्थी क्रमांक १, २, ३ व ४ यांच्या प्रथम अर्जास शासकीय माहिती अधिका-याने दिनांक ०१-११-२००६ रोजी दिलेल्या उत्तरास सहमती दर्शविली व त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भातील मस्टर्स जागेवर अवलोकन करण्याची त्यांना पुन्हा संधी देत असल्याचे नमूद करुन अपिलार्थींचे सर्व अपील अर्ज निकाली काढले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या सदर निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थी क्रमांक १, २, ३ व ४ यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी प्रत्येकी एक अशी एकूण चार स्वतंत्र अपीले दाखल केली आहेत. या अपिलांमध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी क्रमांक १, २, ३ व ४ हे गैरहजर असल्याने त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हेच त्यांचे युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती पुरविली आहे, माहिती न पुरविता अन्य कार्यालयातर्फे अपिलार्थीस माहिती पुरविण्याची कारवाई प्रगतीपथावर असल्याचे नमूद करुन आंगठेबाज व्यक्तींना मस्टर अवलोकनासाठी बोलावून माहिती देण्यास तयार आहे असा जन माहिती अधिकारी बहाणा करण्याचा प्रयत्न करत आहेत, इत्यादी आक्षेप त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा व त्याचा पाठपुरावा करावा अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या सर्व अपिलार्थींच्या दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक ०१-११-२००६ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली आहे. या माहितीमध्ये त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात धनादेशाच्या मूळ प्रती, मासिक रोखालेखासोबत महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करण्यात आल्याने त्या अपिलार्थीस पुरविता येत नसल्याचे स्पष्ट केले आहे तर अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात त्यांनी मागणी केलेल्या व्हाऊचर्सच्या प्रती, आता सदर व्हाऊचर्स मूळ प्रतीमध्ये महालेखापाल, नागपूर यांच्याकडे सादर केल्या गेल्या असल्याने त्याच्या प्रती अपिलार्थीस पुरविणे दुरापास्त असल्याचे अपिलार्थीस कळविले. मात्र या मुद्दयातील मस्टर्सच्या उप मुद्दयांचा परामर्श घेतांना दिनांक ०१-०६-१९८९ ते डिसेंबर १९९८ पर्यतच्या कालावधीतील त्यांच्याकडील उपलब्ध असलेले सर्व मस्टर्स अत्यंत जीर्ण झाले असल्याने व त्याच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस पुरविता येणे शक्य होत नसल्याने अपिलार्थीस त्यांनी या मस्टर्सच्या प्रती पाहण्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये बोलाविले होते, तथापि अपिलार्थी सदर मस्टर्सची पाहणी करण्याकरिता त्यांच्या कार्यालयाकडे कधीही उपस्थित राहिले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी क्रमांक १ यांच्या दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या अपील अर्जावर व उर्वरित ३ अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २५-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्यांचे अपील निकाली काढले. या अपील अर्जामध्ये त्यांनी सर्व अपिलार्थींना संबंधित मस्टर्स जीर्ण झाले असल्याने त्याची जागेवर अवलोकन करण्याची पुन्हा संधी दिली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे

दिसून येते की, उपरोक्त चारही अपील प्रकरणाशी संबंधित सर्व अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सारख्याच दोन मुद्दयांवर दिनांक १०-१०-२००६ रोजी माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये दिनांक ०१-११-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-११-२००६ रोजीचा दिलेला प्रथम प्रतिसाद पाहता, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस धनादेशाच्या मूळ प्रती या मासिक रोखालेखासोबत महालेखापाल व्दितीय महाराष्ट्र, नागपूर यांना सादर करण्यात आल्या असल्याने त्याच्या छायांकित प्रती पुरविता येणे शक्य नसल्याचे कळविले आहे. तसेच या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या एका पूर्णतः वेगळ्या अर्जाचा उल्लेख करुन अपिलार्थीस वनक्षेत्रपाल यांच्या कार्यालयातील रोजकिर्दीच्या छायाप्रती पुरविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचे कळविले आहे. वास्तविक या संपूर्ण प्रतींचा अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी कोणताही संबंध नाही, मात्र या प्रतीचा उल्लेख करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रामध्ये त्यांच्या जखमेवर जन माहिती अधिकारी यांनी मीठ चोळत असल्याचे प्रतीत झाले आहे. याच अर्थाचे विधान अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या विचाराधीन अपिलामध्ये केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०१-११-२००६ रोजीच्या पत्रातील क्रमांक ३ च्या परिच्छेदावरुन अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांच्या वरील आरोपास पुष्टी मिळते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये धनादेशाच्या छायांकीत प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या. धनादेशाच्या प्रती अर्थातच पुढील प्रक्रियेसाठी बँकेकडे पाठविण्यात येत असल्या व अशा प्रकारच्या दिलेल्या धनादेशाच्या छायांकित प्रती काढून घेण्याची पध्दत शासकीय कार्यालयात प्रचलीत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस पुरविणे जन माहिती अधिकारी यांना शक्य नाही. परंतु या धनादेशाच्या काऊंटर फॉईल्स जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे आवश्यक आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे प्रथम अपील करतांना हाच मुद्दा उपस्थित केल्याचे दिसून येत आहे. या काऊंटर फाईल्स जन माहिती अधिकारी यांनी कायम स्वरुपी जतन करणे अभिप्रेत असल्याने या काऊंटस फॉईल्सच्या सर्व प्रती त्यांना आता अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्या लागतील. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील क्रमांक २ मधील मुद्दयाचे अवलोकन करता असे दिसून येईल की, अपिलार्थीने दिनांक ०१-०६-१९८९ ते डिसेंबर १९९८ पर्यतच्या अपिलार्थी क्रमांक २ यांनी दिनांक ०१-०६-८९ ते मार्च २००१ पर्यतंच्या व्हॉऊचर्स व मस्टर्सच्या सर्व छायांकित प्रती मागितल्या आहेत. याबाबत व्हॉऊचर्स हे मूळ स्वरुपात मासिक रोखालेखा सोबत महालेखापाल, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात येत असल्याने व्हॉऊचर्सच्या झेरॉक्स प्रती त्यांना आता अपिलार्थीस पुरविता येणार नाहीत ही जन माहिती अधिकारी यांची भूमिका बरोबर आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मस्टर्सबाबत त्यांनी आयोगासमोर असे विधान केले की, सदर मस्टर्स अत्यंत जीर्ण झाले असून त्या मस्टर्सच्या छायांकित प्रती काढता येणे शक्य नाही. सदर मस्टर्सच्या प्रती आता हातात जरी घेतल्या तरी त्यांचे सहज तुकडे होतात. मा. उप लोकआयुक्त यांनी देखील अशा प्रकारचे निरीक्षण या प्रकरणातील संबंधित एका आदेशामध्ये करुन ते नोंदविल्याचे त्यांनी आयोगास दाखविले. मा. उप लोकआयुक्त यांच्याकडे मुंबई येथे झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी ही जीर्ण झालेली हजेरीपत्रके मा. उप लोकआयुक्तांना दाखविली होती व त्याप्रमाणे मा. उप लोकआयुक्तांनी आपले निरीक्षण त्यांच्याकडील श्रीमती सिंधुबाई उत्तम कोळी विरुध्द वनसंरक्षक, धुळे यांच्या अपील क्रमांक ७२२/२००५ मधील आदेशामध्ये नोंदविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी नमूद केलेली व प्रत्यक्षात असलेली ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीने या मस्टर्सचे अवलोकन करण्याचा जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा प्रस्ताव मान्य करणे श्रेयस्कर राहील, असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनावरुन आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वनक्षेत्रपाल साक्री यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०१-०६-१९८९ ते डिसेंबर १९९८ या कालावधीतील धनादेशाच्या काऊंटर फॉईल्सच्या प्रती अपिलार्थीना विनामूल्य देण्यासाठीचा मुद्दा विचाराकरिता उरत आहे. उपरोक्त परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक १ शी संबंधित त्यांच्याकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये धनादेशाच्या प्रती मागितल्या आहेत. धनादेश याचा अर्थ धनादेशासोबत असलेली काऊंटरफॉईल्स असा होत नाही. अपिलार्थीने मूळ अर्ज करतांना काउंटरफॉईल्सची मागणी स्पष्टपणे सर्वसाधारण परिस्थितीत करणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची मागणी येथे केली असल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक ०१-११-२००६ च्या पत्रातील माहिती जरी सदोष असली तरी ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही असद्‌हेतूने दिल्याचे अथवा त्याव्दारे अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांनी टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने अधिनियमातील कलम २० प्रमाणे त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही, मात्र या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या सदोष प्रतिसादाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून येथून पुढे भविष्यात त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाखालील माहिती देतांना त्यांच्या कार्यशैली मध्ये सतर्कता बाळगावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची अपिले अंशत: मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील क्रमांक १३७१/०७, १३७५/०७, १३७६/०७ व १३७७/०७ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी, सर्व अपिलार्थींना त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली मुद्दा क्रमांक १ शी संबंधित त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महारु दयाराम सोनवणे, मु. डोमकानी पैकी तलावपाडा, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

२ श्री. तोताराम टिला बागूल, मु. डोमकानी पैकी तलावपाडा, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

३ श्री. भिमराव गुलाब सोनवणे मु. डोमकानी पैकी तलावपाडा, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

४ श्री. शंकर गंगाराम पवार, मु. जामकी पो. वासकडी, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

५ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास) , पश्चिम धुळे

विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपिल क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३७८,

१३७९, १३८०, १३८१, १३८२, १३८३ व १३८४

निर्णय दिनांक १९-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भिमराव गुलाब सोनवणे,<br>मु. डोमकानी पैकी तलावपाडा,<br>तालुका साक्री, जिल्हा धुळे<br>(अपील क्रमांक १३७८/०७) | : | अपिलार्थी |
| २ | श्री. लक्ष्मण सुक्राम बोरसे,<br>मु. जांभोरा पो. ब्राम्हणवेल,<br>तालुका साक्री, जिल्हा धुळे<br>(अपील क्रमांक १३७९/०७) | : | |
| ३ | श्री. शंकर गंगाराम पवार,<br>मु. जामकी, पो. वासकडी,<br>तालुका साक्री, जिल्हा धुळे<br>(अपील क्रमांक १३८०/०७) | : | |
| ४ | श्री. मधुकर भादू मोरे, मु. चिंचगांव<br>(थंडाणे) पो. देवभाने,<br>तालुका जिल्हा धुळे<br>(अपील क्रमांक १३८१/०७) | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | श्री. यादव महादू मोरे,<br>मु. पो. सडगांव, तालुका जिल्हा धुळे<br>(अपील क्रमांक १३८२/०७) | : | |
| ६ | श्री. भिवसन देवचंद ठाकरे (भिल),<br>मु. पो. अजंदे बु. तालुका शिंदखेडा,<br>जिल्हा धुळे<br>(अपील क्रमांक १३८३/०७) | | |
| ७ | श्री. जगन्नाथ हरचंद सोनार,<br>मु. पो. भडणे, तालुका शिंदखेडा,<br>जिल्हा धुळे<br>(अपील क्रमांक १३८४/०७) | : | |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे<br>कार्यालय, धुळे | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे<br>कार्यालय वनविभाग, धुळे यांचे कार्यालय,<br>धुळे | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक वनसंरक्षक (जंकास) , धुळे वन विभाग, धुळे |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे |

## निर्णय

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १९-०७-२००८ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. यादव महादू मोरे, श्री. भिवसन देवचंद ठाकरे व श्री. जगन्नाथ हरचंद सोनार (यापुढे त्यांना अपिलार्थी क्रमांक ५, ६ व ७ असे संबोधण्यात येईल), श्री. विलास गंगाधर कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), धुळे वन विभाग, धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विजय सर्जेराव शेळके, जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. भिमराव गुलाब सोनवणे, श्री. लक्ष्मण सुक्राम बोरसे, श्री. शंकर गंगाराम पवार व श्री. मधुकर भादू मोरे (यापुढे त्यांना अनुक्रमे अपिलार्थी क्रमांक १, २, ३ व ४ असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी क्रमांक १, २, ३, ४, ५, ६ व ७ यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील अनुक्रमे दिनांक १४-०२-२००६, १४-०२-२००६, १४-०२-२००६, ११-०७-२००६, १०-१०-२००६, ०४-११-२००६ व १०-०८-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागातंर्गत वेगवेगळया कालावधीत त्यांनी रोजंदारी/संरक्षण/रोपवन मजूर म्हणून काम केले असल्याने केलेल्या कामाबाबत खालील प्रपत्रात माहिती पुरविण्याची मागणी केली होती.

| महिना व वर्ष | हजर दिवस | रोजंदारी दर | आदा केलेली रक्कम | प्रमाणक क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

सर्व अपिलार्थी यांनी सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. यापैकी अपिलार्थी क्रमांक ४, ६ व ७ यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला आहे. या संदर्भात पुरावा म्हणून अपिलार्थी क्रमांक ४ यांनी

तहसील, धुळे व अपिलार्थी क्रमांक ६ व ७ यांनी तहसील, शिंदखेडा यांच्याकडून प्राप्त झालेल्या कौटुंबिक शिधापत्रिका/पुरवठापत्रिकेच्या प्रती सादर केल्या आहेत.

सातही अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील अनुक्रमे दि. १४-०२-२००६, १४-०२-२००६, १४-०२-२००६, १०-१०-२००६, ०४-११-२००६ व १०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. अपिलार्थी क्रमांक १, २, ३, ४, ५, ६ व ७ यांच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त पत्रान्वये अनुक्रमे वनक्षेत्रपाल साक्री (प्रा), वनक्षेत्रपाल साक्री (प्रा), वनक्षेत्रपाल साक्री (प्रा), वनक्षेत्रपाल धुळे (प्रा), वनक्षेत्रपाल रोहयो धुळे, वनक्षेत्रपाल, धुळे, वनक्षेत्रपाल, शिंदखेडा (प्रा), वनक्षेत्रपाल धुळे यांना अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाससादर करण्याबाबत सूचित केले. त्यानंतर अपिलार्थी क्रमांक १, २ व ३ यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८-०२-२००६ च्या पत्रान्वये माहितीपोटीचे शुल्क रु.३१/- इतके चलनाद्धारे भरणा करण्याबाबत सूचित केले. त्या अनुषंगाने संबंधितंनी आवश्यक शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.५.२००६ च्या तीन स्वतंत्र पत्रांसोबत अपिलार्थी क्रमांक १, २ व ३ यांनी मागणी केलेली माहिती त्यांना पुरविल्याचे दिसून येते.

अपिलार्थी क्रमांक ४, ५, ६ व ७ यांनी मूळ अर्जाद्धारे मागणी केलेली माहिती अनुक्रमे वनक्षेत्रपाल, धुळे व वनक्षेत्रपाल (रोहयो), धुळे, वनक्षेत्रपाल, धुळे (प्रा), वनक्षेत्रपाल, धुळे, व वनक्षेत्रपाल, धुळे यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर माहिती अपिलार्थी क्रमांक ४, ५, ६ व ७ यांना त्यांच्याकडील अनुक्रमे दि. १२-०५-२००८ व १३-०५-२००८, ४.१.२००७, २२.१.२००७ व २२.११.२००६ च्या पत्रासोबत पुरविल्याचे दिसून येते. सदर माहिती अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्यांना प्राप्त झाल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने/प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थी क्र. १, २, ३, ४, ५, ६व ७ यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये त्यांच्याकडील अनुक्रमे दि. ४.७.२००६, ४.७.२००६, ४.७.२००६, ८.९.२००६, २७.११.२००६, १८.१२.२००६ व १०.१०.२००६ अन्वये प्रथम अपील केले आहे. यापैकी अपिलार्थी क्र. १, २, ३, ५ व ६ यांच्या प्रथम अपिलांवर अनुक्रमे दि. २१.७.२००६, २१.७.२००६, २१.७.२००६, ६.१.२००७ व २५.१.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थींना दिलेल्या माहितीशी सहमती दर्शवून, अपिलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याने अपिलार्थींचे प्रथम अपील अर्ज निकाली काढले तर, अपिलार्थी क्र. ४ व ७ यांच्या अपिलांवर अनुक्रमे दिनांक ११.१०.२००६ व १७.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांना वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) धुळे यांच्याकडून अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होताच ती अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होताच ती अपिलार्थी यांना तात्काळ देण्याबाबत व वन क्षेत्रपाल (प्रा) धुळे यांना सदर माहिती जन माहिती अधिकारी यांना तात्काळ पुरविण्याबाबत आदेशित केले व प्रथम अपील अर्ज निकाली काढले. सदर निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांना वनक्षेत्रपाल, धुळे यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थी क्रमांक ४ व ७ यांना अनुक्रमे दि. १२.५.२००८ व १३-०५-२००८ व २२.११.२००६ रोजी माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थी क्र. ५ व ६ यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर तथापि सदर अपिलांच्या सुनावणीपूर्वी जन माहिती अधिकारी यांनी (वनक्षेत्रपाल, धुळे यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाल्यानंतर) त्यांच्याकडील अनुक्रमे दि. ४.१.२००७ व २२.१.२००७ रोजी त्यांना पुरविल्याचे दिसून येते.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थी क्र. १, २, ३, ४, ५, ६ व ७ यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्याकडील अनुक्रमे दि. १९.१०.२००६, १९.१०.२००६, १९.१०.२००६, १२.१.२००७, ४.४.२००७, २०.१.२००७ व १२.१.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे.

या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी प्रथम अपिलीय प्राधिकरण व वनक्षेत्रपाल साक्री यांच्याकडून त्यांना पुरविण्यात आलेली माहिती खोटी असून शासकीय माहिती प्राधिकरणाविरुध्द दंडनीय कारवाई करण्याचे, तसेच प्रथम अपील प्राधिकरण यांनी शासकीय माहिती प्राधिकरणास पाठीशी घालून दिशाभूल करणारे उत्तर दिल्याने त्याचीही दखल घेण्यासाठी आयोगास विनंती करुन आयोगाच्या स्तरावरुन प्रथम अपिलीय प्राधिकरण यांच्याविरुध्द शासनाकडे अहवाल सादर करण्याची आयोगास विनंती केली आहे. या अपील अर्जामध्ये पुढे असे म्हटले आहे की, त्यांना प्राप्त झालेली माहिती खोटी कशी आहे ते सिध्द करण्याकरिता माहिती अधिकारामध्ये ते अधिक कागपत्रांची माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी क्रमांक ५ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी त्यांना वन विभागाकडून कायमस्वरुपी काम मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली. अपिलार्थीच्या या म्हणण्यावर जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय विचारले असता त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यावरुन दिल्याचे आयोगास दाखविले. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या डाव्या आता अंगठा त्यांच्या कार्यालयातील दिनांक ०४-०१-२००७ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर

घेतला आहे. अपिलार्थीने सदर अंगठा करतांना तो श्री. एस. आर. राजपूत, आगार वनरक्षक, धुळे यांच्या समक्ष केलेला आहे. अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती वन परिक्षेत्र अधिकारी, धुळे यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या हजेरपटावरुन काढल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर माहिती चुकीची असून त्यांनी काम केलेले एकूण दिवस जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीचे दर्शविले गेले आहेत. जर जन माहिती अधिकारी माहिती देत नसतील तर किमान त्यांनी अपिलार्थीस काम द्यावे अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये शेवटी व्यक्त केली आहे.

अपिलार्थी क्रमांक ६ यांनी अपिलार्थी क्रमांक ५ यांच्या युक्तिवादाशी सहमती दर्शवून आपला युक्तिवाद त्यांच्यासारखाच असल्याचे आयोगास सांगितले.

अपिलार्थी क्रमांक ७ यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते वन परिक्षेत्र धुळे येथे दिनांक ०१-०४-१९८६ ते १५-१०-१९९६ या कालावधीमध्ये वन मजूर या पदावर कार्यरत होते, तथापि या कालावधीचा पगार त्यांना अद्यापही प्राप्त झाला नाही, तो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरीत प्राप्त व्हावा अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्राने अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने माहिती पाठविली आहे असे त्यांचे म्हणणे आहे, तथापि ते यासंदर्भात कोणताही ठोस पुरावा आयोगाने सुनावणी नोटिशीमध्ये लेखी कळवूनही दाखवू शकले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सर्व अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती संबंधित वनक्षेत्रपाल यांच्याकडून त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या हजेरीपत्रकावरुन तयार करुन नंतर ती अपिलार्थींना पुरविण्यासंदर्भात कार्यवाही केली आहे. सर्व अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती ही जुन्या काळातील असून, जुन्या काळातील अभिलेखे शोधण्यासाठी वनक्षेत्रपाल यांना विशेष परिश्रम घ्यावे

लागले व ही माहिती जुन्या अभिलेख्यामधून शोधून काढण्यासाठी त्यांना वेळ लागला. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती, या माहितीकरिता त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील वनक्षेत्रपाल यांच्याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती प्राप्त करुन घेऊन तदनंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थी क्रमांक १, २ व ३ यांना दिनांक २९-०५-२००६ रोजी सशुल्क माहिती पुरविली आहे. अपिलार्थी क्रमांक ४ यांना दिनांक १३-०५-२००८ रोजी, अपिलार्थी क्रमांक ५ यांना दिनांक ०४-०१-२००७ रोजी, अपिलार्थी क्रमांक ६ यांना दिनांक २२-०१-२००७ रोजी व अपिलार्थी क्रमांक ७ यांना दिनांक २२-११-२००६ रोजी माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थींनी वेळोवेळी केलेल्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक २१-०७-२००६, ११-१०-२००६, ०६-०१-२००७, २५-०१-२००७ व १७-११-२००६ रोजी आपले निर्णय संबंधितांना कळविले आहेत. या सर्व निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने आदेश देऊन त्यांची अपीले निकाली काढली आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, सर्व अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात तयार स्वरुपात उपलब्ध नव्हती. प्रत्यक्षत: सदर माहिती संबधित वनक्षेत्रपालांच्या ताब्यात होती, त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना संबधित वनक्षेत्रपाल यांच्यावर अवलंबून राहावे लागत होते. वन विभागामध्ये वनक्षेत्रपाल यांना सहाय्यक माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास सांगितले. आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी आयोगास असे दिसून आले की, सर्व अपिलार्थी हे वन विभागातील वेगवेगळ्या कामावर पुर्वीच्या काळात नेमले गेलेले

वन मजूर असून, सर्व अपिलार्थींना वन खात्यामध्ये कायमस्वरुपी नेमणूक करुन हवी आहे. राज्याच्या वन विभागाने १९९६ साली, वन खात्यातील ज्या रोजंदारी मजुरानी दिनांक ०१-११-१९८९ ते ३१-१०-१९९४ या कालावधीमध्ये प्रतीवर्षी, रोजगार हमी योजना वगळता, एकूण २४० दिवस सलग काम केले आहे, अशा पाच वर्षे सेवा पूर्ण झालेल्या मजुरांना वन मजूर म्हणून "कायम स्वरुपी वन मजूर" या प्रवर्गामध्ये त्यांच्या नेमणूका नियमित केल्या आहेत. सर्व अपिलार्थींना आता "वन मजूर" या प्रवर्गात कायम स्वरुपी नेमणुका हव्या आहेत. १९९६ साली त्यावेळच्या ज्या अपिलार्थींनी आवश्यक त्या अटींची पुर्तता केली नव्हती त्यांच्या सेवा वन खात्यातर्फे वन मजूर म्हणून कायमस्वरुपी केल्या गेल्या नाहीत, त्यामुळे व्यथित होऊन त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा मार्ग अवलंबविल्याचे दिसून येत आहे. अर्थात त्यांचा शासकीय सेवेमध्ये समावेश करणे अथवा इतर कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यासाठी त्यांचा प्रशासकीय विभाग सक्षम आहे व तशा प्रकारचे आदेश देण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी संबंधित वनक्षेत्रपाल यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेली माहिती जशीच्या तशी अपिलार्थीस पुरविली असल्यामुळे व ही माहिती अपूर्ण व चुकीची असल्याबद्दल कोणत्याही अपिलार्थीने एकही पुरावा आयोगासमोर सादर केला नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता कोणतेही आदेश देणे उरत नाही. (सर्व अपिलार्थींना व्दितीय अपील सुनावणीपुर्वीच माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविले.)

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास यावेळी अशीही माहिती दिली की, सर्व अपिलार्थींना ते वनविभागाकडे ज्या कालावधीमध्ये वन मजूर म्हणून कार्यरत होते त्याबाबतचा पुरावा सादर करण्यास मा. उप लोकायुक्तांनी मागणी केली होती त्याप्रमाणे एकूण ५२ मजुरांनी आवश्यक ते पुरावे सादर केले होते. या पुराव्याच्या आधारे त्यांच्या नेमणुकीबाबत निर्णय घेण्याची प्रक्रिया शासनस्तरावर चालू आहे.

अपिलार्थीनी माहितीसाठीचे केलेले अर्ज व अपिलार्थीस प्रत्यक्षः जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती या कालावधीचे अवलोकन करता अपिलार्थी क्रमांक ४ यांना अंदाजे एक वर्षे १० महिने, अपिलार्थी क्रमांक ५ यांना ५५ दिवस, अपिलार्थी क्रमांक ६ यांना ४९ दिवस व अपिलार्थी क्रमांक ७ यांना ७३ दिवसांच्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. हे सर्व पाहता संबंधित वन क्षेत्रपाल यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमाबाबत जरी ते अनाभिज्ञ असले तरी ही माहिती विलंबाने पुरविल्याबाबतचे कोणतेही समर्थन उपस्थित जन माहिती अधिकारी येथे करु शकत नाहीत. अर्थात या विलंबास ते स्वतः जरी प्रत्यक्षतः जबाबदार नसले तरी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील वनक्षेत्रपाल हे निश्चितपणे त्यासाठी जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे जे संबंधित सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थी क्रमांक ४, ५, ६ व ७ यांना माहिती देण्याप्रीत्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंब लावल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंब लावल्याने विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेख्रा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे, वन विभाग, धुळे यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करुन त्यानंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास ७ दिवसाच्या आत सादर करावा. सर्व अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील असे त्यांनी पहावे व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल सप्टेबर २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास सादर करावा.

आजच्या सुनावणीमध्ये जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती पुरविल्याचे सर्व अभिलेखे आयोगास दाखविले असले तरी या अपिलार्थींना प्रत्यक्षतः माहिती प्राप्त झाली किंवा कसे हे त्यांना स्पष्टपणे आयोगास सांगता आले नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत या सर्व अपिलार्थींना त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व्यक्तिशः देऊन त्याची पोच प्रत त्यांच्या अभिलेख्यावर ठेवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपिले क्रमांक १३७८/०७, १३७९/०७, १३८०/०७, १३८१/०७, १३८२/०७, १३८३/०७ व १३८४/०७ निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, सर्व अपिलार्थीना त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पूरवून सदर माहिती त्यांना प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्याची पोच त्यांच्या कार्यालयामध्ये ठेऊन घ्यावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत प्रतिदिन रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीच्या रकमेचा भरणा त्यांनी वर निकालपत्रातविवेचन केल्याप्रमाणे करावा.

४. सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे, वन विभाग, धुळे यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तदनंतर आयोगास ७ दिवसाच्या आत सादर करावा.

५. उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे, वन विभाग, धुळे यांनी वरील क्रमांक ३ च्या आदेशाचे अनुपालन योग्यरितीने होईल असे पहावे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भिमराव गुलाब सोनवणे, मु. डोमकानी पैकी तलावपाडा, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

२ श्री. लक्ष्मण सुक्राम बोरसे, मु. जांभोरा पो. ब्राम्हणवेल, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

३ श्री. शंकर गंगाराम पवार, मु. जामकी, पो. वासकडी, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

४ श्री. मधुकर भादू मोरे, मु. चिंचगांव (थंडाणे) पो. देवभाने, तालुका जिल्हा धुळे.

५ श्री. यादव महादू मोरे, मु. पो. सडगांव, तालुका जिल्हा धुळे.

६ श्री. भिवसन देवचंद ठाकरे (भिल), मु. पो. अजंदे बु. तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

७ श्री. जगन्नाथ हरचंद सोनार, मु. पो. भडणे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

८ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास) , पश्चिम धुळे विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जिल्हा कोषागार अधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३१७

निर्णय दिनांक : २१.०७.२००८

१ सौ. ज्योती गोविंदराव कराळे, : अपिलार्थी
मु.पो. शिराढोण ता. कंधार जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याध्यापक,
कै.शंकर पा.प्राथमिक आश्रमशाळा,
शिराढोण ता.कंधार जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा विशेष समाजकल्याण अधिकारी,
नांदेड.

त्रयस्थ पक्षः सौ. चावरे शोभा माधवराव

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सौ.ज्योती गोविंदराव कराळे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. विश्वंभर दिगंबरराव गुणाले, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका कै.शंकर पा.प्राथमिक आश्रमशाळा,शिराढोण ता.कंधार जि.नांदेड यांचे वकील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दिपक रावसाहेब वडकुते, जन अपिलीय अधिकारी तथा विशेष समाजकल्याण अधिकारी, नांदेड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२२.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कै. शंकर पा.प्राथमिक आश्रमशाळा,शिराढोण ता.कंधार जि.नांदेड संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली आहे.

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णनः- "कै. शंकर पा.आश्रम शाळा शिराढोण ता. कंधार जि. नांदेड या शाळेच्या मुख्याध्यापकाच्या कारभारासंबंधी, कर्मचारी नेमनुक संबंधी माहिती. "

माहितीचा विषयः- " १) कै. शंकर पा.आश्रम शाळा शिराढोण इमारतबदल करणेचा खात्यास पाठवलेला प्रस्तावाचा शाळेचा जावक क्र. व पाठवलेला प्रस्ताव.

२) शाळा इमारत बदल केल्यासंबंधीच्या कारवाईची शाळेची माहिती

३) सौ. चावरे एस.एम. शाळेने केलेली प्रथम नेमनुक व दिनांक

४) सौ. चावरे एस.एस.शाळेची नेमनुक व प्रथम पगार पत्रक

५) सौ.चावरे एस.एम. ५-८-२००६ नंतर शाळेत रुजु झालेला रिपोर्ट. "

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ९.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन

त्यासंदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या अपील निर्णयाचे अवलोकन करता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दि. ९.३.२००७ व २८.६.२००८ रोजी पोस्टाचा दाखला घेऊन अपिलार्थीस पाठविली. तथापि अपिलार्थीने सदर माहिती त्यांना पोस्टाद्वारे मिळाली नसल्याचे त्यांनी आज सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांच्या समोर कथन केले. ही माहिती प्रभारी मुख्याध्यापकाने अपिलार्थीस प्रथम अपिलाच्या सुनावणीचे वेळेस देऊ केली होती तथापि अपिलार्थी यांनी सदर माहिती त्यावेळी घेण्यास नकार दिला, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज निकाली काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक व प्रशासकीय कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २२.२.२००७ रोजी कोणताही अर्ज केला नव्हता. त्यांनी त्यांचा कथित दि. २२.२.२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडील दि. १०.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला होता. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस दि. ९.३.२००७ रोजी माहिती पाठविल्याचा दावा बरोबर नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांचे वडील पोस्टमास्तर या हुद्यावर असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविल्याचा बनावट पुरावा तयार केला आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांचे वकील यांनी असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दि. २२.२.२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे कधी प्राप्त झाला हे त्यांना सांगता येणार नाही, तथापि अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये म्हटल्याप्रमाणे हा अर्ज कुठल्याही पत्रासोबत जोडून त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी दि. ९.३.२००७ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने त्यांना पाठविली आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस न मिळाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांचेही म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेली माहिती त्यांनी स्वतः अपिलार्थीस देऊ केली होती, तथापि सदर माहिती घेण्यास अपिलार्थीने नकार दिला. अपिलार्थीने या अर्जाद्वारे ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती अपिलार्थी यांच्या पतीने दि. ७.७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांना मागितली होती. ती माहिती अपिलार्थीच्या पतीस दि. १६.८.२००७ रोजी पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीच्या पुतण्याने देखील हीच माहिती मागितली होती, त्यांनाही ती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ शी संबंधित, सौ.चावरे एस.एम.यांचा शाळेत रुजू झालेला रिपोर्ट तत्कालीन मुख्याध्यापिका श्रीमती डी.के.कराळे यांच्याकडे उपलब्ध असून सध्या त्या त्रिकुटेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ,कापसी (बू) यांच्याकडील शाळेच्या सेवेत नाहीत. त्यांनी केलेल्या गैरवर्तनामुळे विशेषतः शाळेचे सर्व उपलब्ध रेकॉर्ड सोबत नेल्यामुळे त्यांना शाळेच्या सेवेमधून कमी केले आहे.सदर प्रकरण विशेष समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी प्रलंबित आहे. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पुरविता येणार नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १८.४.२००७ रोजीच्या अपिलावर त्यांनी दि. १५.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय पारित केला. सुनावणीच्या दिवशी संबंधित

मुख्याध्यापिकेने अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती देऊ केली होती, तथापि सदर माहिती घेण्याचे अपिलार्थीने नाकारले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन अत्यंत मोघम स्वरुपात केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. मात्र अपिलार्थीने सादर केलेल्या विहित नमुन्यातील अर्जातील 'माहितीचा विषय' या सदरासमोर एकूण पाच मुद्दे मांडले आहेत. यावरुन अपिलार्थीस या पाच मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असावी, असे अनुमान काढण्यात येत आहे.अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशाप्रकारे एकूण पाच मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यापैकी मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही, कारण ही माहिती तत्कालीन मुख्याध्यापिका,श्रीमती डी.के.कराळे या त्यांच्याबरोबर घेऊन गेल्या आहेत व त्या आता संबंधित शिक्षण संस्थेच्या सेवेमध्ये नाहीत. याबाबत श्रीमती कराळे यांच्यावर उस्माननगर, नांदेड येथे दि. ९.५.२००८ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आयोगास दाखविण्यात आलेल्या एफ.आय.आर. च्या प्रतीवरुन सदर फिर्यादीचा क्रमांक १२३२१ असा असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या उपस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अत्यंत मोघम स्वरुपात अपिलार्थीस देऊ केली असल्याचे दिसून येते, त्यामुळे आता अपिलार्थीने मागणी केलेली निश्चित माहिती जन माहिती अधिकारी यांना पुरवावी लागेल. या पैकी मुद्दा क्र.१ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या शाळेची इमारत बदल करण्यासाठीच्या जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर केलेल्या प्रस्तावास त्यांनी मान्यता दिली

असल्यास,सदर प्रस्तावाच्या मान्यतेच्या आदेशाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन, ही माहिती हस्तगत करुन ती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र.२ मध्ये शाळेसंबंधी विचारलेली माहिती ही अत्यंत मोघम स्वरुपाची असल्याने ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकेल, त्यामुळे या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरवावी लागतील.

वरील विवेचन पाहता व जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी एकमेकांवर दर्शविलेला अविश्वास पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस या अपिलाच्या निर्णयानंतर द्यावयाच्या प्रस्तावित माहितीची एक प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठवावी. यावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशाप्रकारे त्यांना प्राप्त झालेल्या माहितीची प्रत, अपिलार्थीस त्यांच्याही कार्यालयातर्फे पाठविण्यात येईल, असे आयोगास आश्वासित केले, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ वगळता उर्वरित सर्व माहिती त्यांना व जन अपिलीय अधिकारी यांना दहा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात

येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती (मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित माहिती) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. ज्योती गोविंदराव कराळे, मु.पो.शिराढोण ता. कंधार, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कै. शंकर पा.प्राथमिक आश्रामशाळा, शिराढोण, ता. कंधार जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष समाजकल्याण अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३५८

निर्णय दिनांक : २१.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख अजीजभाई अब्दुल कादीर<br>रा. संगमनेर जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,<br>नाशिक | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: उपजिल्हाधिकारी (रोहयो),
जिल्हाधिकारी कार्यालय,
अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी: जिल्हाधिकारी, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. शेख अजीजभाई अब्दुल कादीर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रावसाहेब वामन बुधवंत, उपलेखापाल, जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), अहमदनगर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. रामचंद्र

गोविंद कुलकर्णी, उपआयुक्त (रोहयो) जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२१.०३.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दि. १८.३.१९९६ रोजी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना दिलेल्या पत्रासंदर्भात कोणती कार्यवाही केली याची माहिती मागविली होती. या अर्जासोबत त्यांनी आपल्या दि. १८.३.१९९६ रोजीच्या जिल्हाधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत सोबत जोडली होती.

अपिलार्थीने सदर माहिती साध्या टपालाद्वारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ११.०५.२००६ रोजी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्यचे दिसून येते. अपिलार्थीने सदर अपील अर्ज महसूल आयुक्त, नाशिक यांच्याकडे केला होता तथापि या प्रकरणात महसूल आयुक्त, नाशिक हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडील दि. २३.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस जिल्हाधिकारी, अहमदनगर हे जन अपिलीय अधिकारी आहेत, असे कळवून, निकाली काढला. या पत्राबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा दि. ११.५.२००६ रोजीचा अपील अर्ज जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे पाठविला व हा अर्ज जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना प्राप्त झाला, असे उपस्थित जन माहिती व अपिलीय

अधिकारी यांनी आयोगास सांगितले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.६.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांच्या अर्जासंदर्भात जिल्हा स्तरावर माहिती अधिकारी म्हणून काम करणारे उपजिल्हाधिकारी (रोहयो) व जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडून त्यांना त्यांच्या अर्जासंदर्भात कोणत्याही प्रकारचा निर्णय देण्यात आला नाही. तसेच विभागीय आयुक्त यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती देण्याबाबत अथवा त्यासंबंधी त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याबाबत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना आजपर्यंत कोणतीही सूचना केली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षकांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे त्यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे, त्यांना जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडून माहिती न मिळाल्याप्रित्यर्थ प्रथम अपील केले होते. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.सुमारे दोन वर्षे चार महिने इतका कालावधी लोटूनदेखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती न दिल्याने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्यावर शास्तीची व शिस्तभंगाची कार्यवाही तसेच त्यांना झालेल्या त्रासाबद्दल रु.२०००/- इतक्या रकमेची त्यांना नुकसानभरपाई मिळावी. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या कार्यालयातील अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत फारसे गंभीर नाहीत. त्यांनी आज सुनावणीसाठी देखील त्यांच्या कार्यालयातील दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यास,

ज्याला या प्रकरणासंबंधी काहीही माहिती नाही, अशा अधिकाऱ्यास पाठविले, यावरुन त्यांना याची पर्वा नाही, हे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील अपील, विभागीय आयुक्त यांच्याकडे करण्याच्या सूचना दिल्या होत्या, हे त्यांचे म्हणणे अयोग्य असून त्यांच्या कार्यालयातील जन माहिती व अपिलीय अधिकारी कोण आहेत, याची माहिती दर्शविणारे फलक कार्यालयात लावले आहेत. या प्रकरणी उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांच्याकडून राज्य माहिती आयोगाला त्यांचे लेखी निवेदन प्राप्त झाले असून यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीचे सदर प्रकरण जुने असल्याने त्याची संचिका उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयामध्ये आढळून येत नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना कागदपत्र उपलब्ध करुन देता येत नाहीत.त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील चौकशी विभाग व तहसीलदार, संगमनेर यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची तजविज करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात वेळोवेळी अर्ज दिले होते. त्या सर्व अर्जास त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी माहिती पुरविली आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एक महिन्याच्या आत पुरविण्याचे आश्वासित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ११.५.२००६ रोजीच्या अर्जावर ते या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने, त्यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही, मात्र अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडील दि. २३.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला व त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. सदर

दिनांक २३.५.२००६ रोजीचे त्यांचे पत्र अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम दि. २१.३.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती सरळ व सोपी होती. अपिलार्थीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि. १८.३.१९९६ रोजी पळसखेडे, ता. संगमनेर जि. अहमदनगर येथील पाझर तलावाच्या रोहयो अंतर्गत झालेल्या कामातील कथित भ्रष्टाचाराबाबतचा अर्ज जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे केला होता व या अर्जाची मूळ प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रथम अर्ज करतेवेळी सादर केली होती. अपिलार्थी यांचे असे म्हणणे पडले की, त्यांच्या अर्जासोबत त्यांनी दि. २१.६.१९९३ व १९.७.१९९३ रोजी केलेल्या तक्रार अर्जाची प्रत देखील जोडली होती. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने व उपजिल्हाधिकारी रोहयो, अहमदनगर यांनी अपिलार्थीचे प्रकरण जुने असल्याने या संदर्भातील कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे म्हटले आहे. हा त्यांचा युक्तीवाद जरी खरा मानला तरी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने दि. २१.३.२००६ रोजी अर्ज करुनही त्यांना या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) अन्वये काय निर्णय झाला याची साधी माहिती देखील अपिलार्थीस पाठविली गेली नाही, या बाबीचा विशेष गांभीर्याने आयोगास विचार करावा लागत आहे. उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या कार्यालयाकडे अपिलार्थीचा दि. २१.३.२००६ रोजीचा प्रथम अर्ज (या अर्जासोबत संदर्भित केलेल्या कागदपत्रांसह), अपिलार्थीचा दि. ११.५.२००६ रोजीचा अपील अर्ज एवढी सर्व कागदपत्रे सादर झाली असताना अपिलार्थीच्या या अर्जावर व अपील अर्जावर अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार

कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून दीर्घकाळ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे येथे निःसंशयपणे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध न होऊ शकण्याचे केवळ एकच कारण आयोगास दिसून येत आहे, ते म्हणजे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातील इच्छाशक्तीचा अभाव, त्यांच्या मनात जरी अपिलार्थीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करावयाची नसली, तरी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी त्यांना तसे करुन देणार नाही किंबहुना त्यांचे तसे करणे निश्चितपणे बेकायदेशीर म्हणून समजले जाईल. अपिलार्थीस दोन वर्षे चार महिने इतक्या प्रदीर्घ कालावधीकरिता त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कृतीने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक व इतर अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अन्वये तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे एकूण रु.२५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित असलेले सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

लेखाशीर्ष- **“००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ”**

सदर शास्तीची अधिकारी/कर्मचारीनिहाय विभागणी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी हे आदेश निर्गमित होताच यथायोग्यरित्या सात दिवसांचे आत करावी व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल आयोगास तद्नंतर सात दिवसात सादर करावा. सदर शास्तीची रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील, असे विभागीय महसूल आयुक्त, नाशिक यांनी पहावे व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल सप्टेंबर, २००८ पासून दरमहा नियमितपणे, शास्तीची संपूर्ण रक्कम शासकीय कोषागारात भरणा होईपर्यंत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस सदर माहिती तीस दिवसांच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, त्यामुळे या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थी हे ज्येष्ठ नागरिक आहेत, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या निष्काळजीपणामुळे आयोगाकडे द्वितीय अपील करावे लागले व सुनावणीसाठी वैयक्तिकरित्या हजर राहावे लागले, त्यांनी केलेल्या अपील अर्जाला कोर्ट-फी-स्टॅम्प रु.२०/- अधिक टपालखर्च रु. १०/- व संगमनेर ते औरंगाबाद एस.टी.चे भाडे जाणे-येणे यासाठी रु.९६/- असे एकूण रु.१२६/- इतकी नुकसान भरपाई त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अदा करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. सदर आदेश त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(ख) नुसार देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे एकूण रु.२५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी हे वरील अ.क्र.३ मधील शास्तीची रक्कम नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील याची विभागीय आयुक्त, नाशिक यांनी खात्री करावी व आपला अनुपालन अहवाल सप्टेंबर २००८ पासून दरमहा, शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत नियमितपणे आयोगास सादर करावा.

५. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस या प्रकरणी नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु. १२६/-इतकी त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अदा करण्यात यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ शेख अजीजभाई अब्दुल कादीर, ४४, नाईकवाडपुरा, संगमनेर जि. अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३५९

निर्णय दिनांक : २१.०७.२००८

१ श्री. अब्दुल सत्तार मुख्तार अहमद, : अपिलार्थी
रा. ता.मालेगाव जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
प्राध्यापक,
मोहम्मदिया तिब्बिया कॉलेज ॲण्ड अस्सायार
हॉस्पीटल, मन्सुरा, मालेगाव जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी
तथा प्राचार्य,
मोहम्मदिया तिब्बिया कॉलेज ॲण्ड अस्सायार
हॉस्पीटल, मन्सुरा, मालेगाव जि.नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अब्दुल सत्तार मुख्तार अहमद यांचे प्रतिनिधी श्री.एकबाल अह.मो.नजीर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अन्सारी अब्दुल्लाह, जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक मोहम्मदिया तिब्बिया कॉलेज ॲण्ड अस्सायर हॉस्पीटल, मन्सुरा, मालेगाव जि.नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्र.अजहर हसन, जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,मोहम्मदिया तिब्बिया कॉलेज ॲण्ड अस्सायार हॉस्पीटल, मन्सुरा,

मालेगाव जि.नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.३०.१२.२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोहम्मदिया तिब्बिया कॉलेज ॲण्ड अस्सायर हॉस्पीटल येथे नोकरी करणारे व शिक्षण घेणारे विद्यार्थी, नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सन १९९५ ते दि.३०.१२.२००५ या कालावधीतील एकूण ३४ मुद्यांवर माहिती मागितली आहे.

अपिलार्थीने सदर अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नियुक्ती आदेशापासून ते त्या महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांशी संबंधित वैयक्तिक माहिती, बेकायदेशीर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांवरील केलेल्या कार्यवाहीसंदर्भातील माहिती, विद्यार्थ्यांनी भरलेल्या प्रेफरन्स फॉर्मस्च्या झेरॉक्स सर्टीफाईड कॉपीज्, प्रवेश प्रक्रियेकरिता वर्तमानपत्रातील जाहिरातीनुसार प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांनी भरलेल्या फीच्या पावत्याच्या झेरॉक्स प्रती, महाविद्यालयाने पुणे विद्यापीठाशी केलेला पत्रव्यवहार इत्यादी प्रकारच्या माहितीशिवाय महाविद्यालयाचे माजी प्राचार्य, डॉ.मोहम्मद अब्दुल्ला मोहंमद अन्सारी यांना खाजगी दवाखाना चालविण्यासाठी एन.पी.ए. मिळतो का, मिळत असल्यास, कधीपासून मिळतो व चालू वर्षाच्या एन.पी.ए.ची प्रत, सर्जरी विभागाचे डॉ.अबुल्लैस आजमी यांना चंदनपूरी ग्रामपंचायत इमारतीमध्ये खाजगी दवाखाना चालविण्यासाठी संस्थेमार्फत परवानगी दिल्याच्या प्रमाणपत्राची प्रत, महाविद्यालयातील काही शिक्षकांनी खाजगी दवाखाना चालविणार नाही याबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची झेरॉक्स प्रत, त्यांनी केलेल्या महाविद्यालयातील परीक्षा विभागाच्या कामकाजाचा तपशील मिळणे श्री. रोशन अली ऊर्फ मोहंमद इस्माईल या कर्मचाऱ्यांच्या संस्थेमध्ये बेकायदेशीर प्रवेश देण्यात आल्यासंदर्भात त्यांना प्रवेश देण्यात आलेल्या व नंतर रद्द करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स इ.व

या सारख्या विस्तृत स्वरुपाच्या माहितीच्या मागणीचा समावेश आहे. अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.१.२००६ रोजीच्य पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन खालीलप्रमाणे उत्तर दिले आहे.

"महाविद्यालय व रुग्णालय बाबत माहितीचे आपले वरील अर्ज confusing असुन आपलया अर्जावरुन असे स्पष्ट होत नाही कि, आपणास सदर माहिती कितपत व कशा बद्यल आवश्यक आहे तरी आपण जातीने स्वतः दिनांक १२/०१/२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्राचार्य (माहिती अधिकारी) मोहम्मदिया तिब्बिया महाविद्यालय व अस्सायर रुग्णालय, मन्सुरा मालेगाव यांच्या कार्यालयात हजर रहावे, जेणे करुन माहिती पुरविण्याबद्यल पुढील कार्यवाही करण्यात येईल."

या पत्रास अनुसरुन त्यांनी अपिलार्थीस पुढे दि. १७.१.२००६, २५.१.२००६ व ११.२.२००६ या दिवशी पत्र लिहून अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये हजर राहण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.०३.२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेलया प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.६.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर कलम (२०) प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांच्या प्रतिनिधीने असा युक्तीवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत कोणतीच माहिती न दिल्याने त्यांच्यावर रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्यात यावी. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असून सदर माहिती त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने प्राप्त व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ३०.१२.२००५ रोजी माहितीसाठीच्या केलेल्या अर्जावर अपिलार्थीने रु.१०/- इतक्या किंमतीचा कोर्ट फीचा स्टॅम्प डकविला नव्हता, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस कोणतीच माहिती पुरविली नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जास रु.१०/- इतक्या किंमतीचे विहित शुल्क न लावल्याने व अपिलार्थी हे त्यांना केवळ त्रास देण्यासाठी माहिती मागवित आहेत, अशी त्यांची खात्री आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दि. ७.१.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीस त्यांना सदर माहिती कितपत व कशाबद्दल आवश्यक आहे, याची विचारणा केली आहे व अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात माहिती घेण्यासाठी उपस्थित राहण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस अशाप्रकारे माहिती मागण्याची कारणे विचारण्याची व अपिलार्थीने पोस्टाने माहिती मागविल्यानंतर ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे अपिलार्थीस सूचित करण्याची त्यांची कृती चुकीची आहे, तथापि या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला आहे की, अपिलार्थीस त्यांनी एकदा काही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली होती. सदर रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेली

माहिती अपिलार्थीने स्वीकृत केली व याबाबत त्यानंतर त्यांनी या पाकीटामध्ये रद्दी पेपर होते, अशी तक्रार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केली होती. अपिलार्थीच्या अशाप्रकारच्या वर्तनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी अपिलार्थीस प्रत्यक्षतः हजर राहून माहिती घेण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी वेळोवेळी पाठविलेली पत्रे ते स्वीकारत नाहीत. यासंदर्भात त्यांच्याकडे पुरावे उपलब्ध आहेत. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना विनातामिली परत प्राप्त झालेले पाकीट दाखविले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३४ वेगवेगळया मुद्यांवर त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधित माहिती मागविली आहे. या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १० ची अंशतः माहिती, मुद्दा क् १८ व १९ ची तपशीलासह खुलासा ही माहिती, तसेच मुद्दा क्र. २७ या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देय नाही, कारण अपिलार्थीने या माहितीद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे खुलासे अपेक्षित केले आहेत, जे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' देणे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही. अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाच्या स्पष्ट केलेल्या व्याख्येचे अवलोकन करता, ही माहिती सदर व्याख्येशी विसंगत असल्याने, ती अपिलार्थीस देय होत नाही.अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र. १२, १४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अपेक्षित नसल्याने (सदर माहिती संबंधित विद्यार्थी यांच्याकडेच उपलब्ध असते) ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. तर अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३,१७,२४,२५ व ३० या मुद्यासंदर्भातील

माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मोघम स्वरुपात विचारली असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. सदर मुद्दे वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थीने केलेल्या माहितीच्या दि. ३०.१२.२००५ रोजीचा मूळ अर्ज दाखविला असता, या अर्जावर अपिलार्थीने कोठेही अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक असलेले विहित शुल्काचे रु. १०/- इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविले नाहीत, तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. ३०.१२.२००५ रोजीच्या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे, यासंदर्भातील कोणताही उल्लेख त्यांनी केलेला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जामधील या उणीवा लक्षात घेता, वास्तविक रु.१०/- इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प न लावता, जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला मूळ अर्जच अवैध ठरत आहे. त्यामुळे अपिलार्थीस या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता आवश्यक असेल तर त्यांनी आवश्यक त्या रकमेचे कोर्ट फी स्टॅम्प रु.१०/- इतक्या किमतीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमा करावे, त्यानंतर जन माहिती अधिकारी हे कळवतील, त्याप्रमाणे माहितीपोटीच्या आवश्यक त्या रकमेचा भरणा करुन ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तांतरित करुन घ्यावी, असे त्यांना सूचविण्यात येत आहे. अपिलार्थी हे जर अर्ज करण्याच्या दिवशी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असतील, तर ते जन माहिती अधिकारी यांचेकडून विनामूल्य माहिती घेण्यास पात्र होतात. अशावेळी त्यांनी रु. १०/- इतक्या किंमतीचा कोर्ट फी स्टॅम्प भरण्याची आवश्यकता राहणार नाही. अपिलार्थीस आजही माहितीची आवश्यकता असल्यामुळे त्यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ११.१०.२००५ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे विहित केलेल्या परिपत्रकातील सूचनेप्रमाणे माहितीची मागणी करावी व अपिलार्थीकडून अशाप्रकारच्या माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील तरतुदीनुसार त्यावर कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचन पाहता मूळात, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम माहितीसाठीचा अर्जच चुकीच्या पध्दतीने भरला असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न देण्याची त्यांची कृती येथे वैध ठरते. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील, जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल सत्तार मुख्तार अहमद (मुर्गेवाले) घ.नं.४७०, अंगनूसेठ मस्जिदच्या पाठीमागे किल्ला रविवार वॉर्ड,मालेगाव ता.मालेगाव जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी प्राध्यापक,मोहम्मदिया तिब्बिया कॉलेज ॲण्ड अस्सायर हॉस्पीटल, मन्सुरा, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, मोहम्मदिया तिब्बिया कॉलेज ॲण्ड अस्सायर हॉस्पीटल, मन्सुरा, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३६०

निर्णय दिनांक : २१.०७.२००८

१ श्री. अन्सारी अफरोज मो. उस्मान, मालेगाव. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव,जि.नाशिक : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव, जि.नाशिक :

१ त्रयस्थ पक्षः श्रीमती खुलैजा अ. रशीद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी, श्री. गुलाबराव य.पाटील,सहायक कार्यक्रम अधिकारी, जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक,म.न.पा.शिक्षण मंडळ, मालेगाव जि.नाशिक व जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी म.न.पा. शिक्षण मंडळ मालेगाव जि.नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच त्रयस्थ पक्ष श्रीमती खुलैजा अ.रशीद यांचे प्रतिनिधी श्री. मो.रमजान (यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर व

अपिलार्थी श्री. अन्सारी अफरोज मो. उस्मान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव महानगरपालिका यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १९.७.२००८ रोजीचे पत्र त्यांच्या प्रतिनिधीने आयोगास सादर केले. सदर पत्रात त्यांनी असे नमूद केले आहे की, "दि. २७.२.२००६ रोजी अर्जदार अफरोज अहमद,१८१, चुना भट्टी, मालेगाव यांनी मुख्याध्यापिका, मौलाना आझाद गर्ल प्रा.स्कुल यांनी १,७९,००० रुपयाचा अपहार केला या प्रकरणी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत प्रमाणित करुन द्यावी याबाबत माहिती अधिकार अर्ज दि. २७.०२.२००६ रोजी माहिती अधिकारी म.न.पा.शि.मं.मालेगांव यांचेकडे केलेला होता. मात्र मुदतीत माहिती अधिकारी तथा व.लि. यांनी दि. ७/३/२००६ रोजी विषयांकित प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने व त्यामुळे चौकशी अहवाल देता येत नसल्याबाबत कळविले होते. त्यानंतर अर्जदार यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी यांचेकडे दि. २७/०३/२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी म.न.पा.शि.म.जा.क्र.१२/२००६ दि. ने अपिलकार यांना माहिती अधिकारी यांनी कळविलेली माहिती बरोबर असल्याचे कळविलेले आहे. त्यानंतर अपिलकार यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कळविलेल्या पत्राने व्यथित होऊन मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे दि. ८.५.२००६ रोजी माहिती अधिकार नियम २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले.

दरम्यानचे काळात न्यायालयीन कामासाठी वकीलांकडे दिलेली कागदपत्रे मिळाल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी, म.न.पा.शि.म.मालेगांव यांनी अपिलकार यांना दि. १६/०६/०८ रोजी कार्यालयात बोलाऊन अर्जदार यांनी दि. २७/०२/२००६ रोजी माहिती अधिकार अंतर्गत केलेल्या अर्जात मागणी केलेला चौकशी

अहवाल व कागदपत्र पडताळणीसाठी उपलब्ध करुन दिली व संदर्भिय चौकशी अहवाल अपिलकारास उपलब्ध करुन दिला. त्यामुळे अपिलकार यांनी आपल्या कार्यालयाकडे केलेले अपिल मागे घेत असल्याबाबतचे निवेदन दि. १६/०६/२००८ रोजी प्रशासनाधिकारी, म.न.पा.शि.मं.मालेगाव कार्यालयात दाखल केले व ते सोबत जोडले आहे."

उपरोक्त विवेचनावरुन आता अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील अर्ज मागे घेत असल्याचे त्यांनी आयोगास दि. १६.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. ही वस्तुस्थिती पाहता त्यांनी आयोगाकडे केलेले द्वितीय अपील क्र.१३६०/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १३६०/२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अन्सारी अफरोज अहमद मो.उस्मान १८१, चुनाभट्टी मालेगाव जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षणमंडळ, मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३६४

निर्णय दिनांक २२-०७-२००८

श्री. अर्जुन फकिरा शिंपी, : अपिलार्थी
शिवशक्ती कॉलनी, खोटेनगरजवळ, गट नं.
१०१, प्लॉट नं. ३१, जळगाव
तालुका जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,
जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,
जळगाव

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे मंडळ (स्थानिक स्तर), नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अर्जुन फकिरा शिंपी (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. भाईदास डोंगरदास निकुंभ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे मंडळ (स्थानिक स्तर), नाशिक हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लघुपाटबंधारे विभाग पहुर पिंपळगाव तालुका जामनेर शी संबंधित सन २००४ ते २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. ल. पा. योजना पहूर पिंपळगांव (देवळी नाला) तालुका जामनेर या कामाची साईट ते आंबे वडगाव तालुका जामनेर येथील दगडाची खदाण हे अंतर २० किलोमिटर आहे. या अंतरात बांधकामासाठी उपलब्ध असलेल्या शासकीय दगडाच्या खदाणींचे नांवे व त्या खदाणींचे साईटपासूनचे अंतर याची माहिती नकाशासह सत्यप्रतीत मिळावी.

२. ल. पा. योजना पहूर पिंपळगांव (देवळी नाला) तालुका जामनेर, या कामाची साईट ते सुनसगांव वाघूर नदी २२ किलोमिटरचे अंतर आहे. सदर अंतरात बांधकामासाठी उपलब्ध असलेली रेती असलेल्या नदीचे/नाल्याचे नांव व त्यांचा नकाशा याची छायांकित सत्यप्रत मिळावी.

३. ल. पा. योजना पहूर पिंपळगांव (देवळी नाला) तालुका जामनेर कामाची साईट कामासाठी लागणा-या खडीचे २० किलोमिटर पेक्षा कमी अंतरांवर उपलब्ध असलेली खडी याचे ठिकाण दर्शविणारा नकाशा याची छायांकित सत्यप्रत मिळावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५०० इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०५-२००६ रोजीचे पत्र रजिस्टर्ड पोस्टाव्दारे दिनांक ०९-०५-२००६ रोजी पाठविल्याचे दिसून येते.

यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वत: त्यांच्या कार्यालयात हजर होण्यास सूचित केले. सदर पत्र त्यांनी दिनांक २४-०५-२००६ रोजीच अपिलार्थीस पाठविले असल्याचे दिसून येते. अशाच अर्थाचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०५-२००६ रोजी परत पाठविल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी सूचना देऊनही अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणताही संपर्क न साधता, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने सदर अपील कार्यकारी अभियंता यांना उद्देशून केले आहे. (या प्रकरणात प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी हे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे मंडळ (स्थानिक स्तर), नाशिक आहेत.) या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर रुपये २५० प्रमाणे प्रतिदिनी या दराने शास्ती लावण्याची मागणी करुन त्यांच्यावर शिस्तभंगाच्या कारवाईची मागणी केल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जळगाव यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीचा

अपील अर्ज अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे मंडळ (स्थानिक स्तर), नाशिक यांच्याकडे पाठविल्याचे दिसून येत नाही.  मात्र त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००६ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात येऊन स्वत: त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना लेखी उत्तर प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.  तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारे निर्णय न दिल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नसून त्यांनी अपील अर्जामध्ये त्यांचे म्हणणे लेखी सादर केले आहे.

आपल्या लेखी युक्तिवादामध्ये त्यांनी असे स्पष्ट केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०६-०५-२००६ च्या पत्रास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०५-२००६ रोजीच्या पत्राने उत्तर देऊन त्यांना देण्यात येणा-या संभावीत माहितीच्या पृष्ठांच्या आवश्यक प्रती, संभावीत पृष्ठ दर याची विचारणा केली होती, तसेच सदर माहिती व्यक्तिश: हस्तगत करण्याकरिता ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित उपविभागीय अधिकारी हे कार्यालयात त्यांना भेटले नाहीत.  त्यांच्या कार्यालयातील इतर कर्मचारीवर्गाने त्यांना त्यांच्या म्हणण्याबाबत काहीही सांगण्यास असमर्थतता व्यक्त केली.  त्यांनी जिल्हाधिकारी यांना उद्देशून दिनांक

२०-०७-२००६ रोजी पत्र लिहिलेले असून त्यामध्ये ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १८-०५-२००६, १९-०५-२००६, २२-०५-२००६, २६-०५-२००६, ०७-०६-२००६, १०-०७-२००६, १५-०७-२००६ व १८-०७-२००६ रोजी गेल्याचे नमूद केले आहे. सदर पत्र दिनांक २३-०५-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याबाबत त्यांनी आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या सुचनेवरुन अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात दिनांक १८-०७-२००६ रोजी हजर राहिले होते, तथापि त्यावेळी त्यांना कोर्टाच्या कामाकरिता जाणे जरुरीचे वाटल्याने अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात ५ वाजेपर्यंत परत येतो असे सांगून निघून गेले, तथापि तदनंतर अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाशी कधीही संपर्क साधला नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे अत्यंत मर्यादित होते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०४-२००६ रोजी केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५०० इतके भरण्यासाठी सूचित केले, तथापि या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस देण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना काय दराने आकारण्यात आली आहे याचा उल्लेख केलेला नाही. अधिनियमातील कलम ७ (३) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी असे अर्जदारास कळविणे आवश्यक आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-

०५-२००६ रोजी पाठविलेले हे पत्र अवैध ठरते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. व्यक्तिशः माहितीची अपेक्षा करणे याचा अर्थ अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः हजर राहून हस्तगत करुन घेणे असा होतो. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आपला प्राधिकृत प्रतिनिधी पाठविणे या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही, त्यामुळे या प्रकरणाबाबत मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तयार झाली किंवा याबाबत जन माहिती अधिकारी यांचे काय म्हणणे आहे हे समजून घेण्याकरिता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहणे जरुरीचे आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेले दिनांक ०६-०५-२००६ रोजीचे पत्र अवैध ठरले असले तरी येथे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०५-२००६ रोजी परत एक पत्र लिहून अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात त्यांनी मागितलेल्या माहितीबाबत स्वतः उपस्थित राहण्यासाठी निमंत्रित केले होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत त्यांच्याकडील दिनांक २७-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयात श्री. सी. डी. पाटील यांच्याकडे माहिती तयार असल्याचे व त्यांच्याकडून माहिती घेऊन जाण्याचे कळविले. ती माहिती घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही हजर झाले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांच्याकडील दिनांक २४-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम वैध प्रतिसाद दिला आहे, हे पाहता आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०५-२००६ रोजी पत्र पाठविल्याचा पुरावा म्हणून त्यांनी आयोगासमोर त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची प्रत सादर केली आहे. त्यानुसार

अपिलार्थीस हे पत्र दिनांक २४-०५-२००६ रोजी ७१९/०६ या क्रमांकाने पाठविल्याची नोंद जन माहिती अधिकारी यांच्या जावक नोंदवहीच्या पृष्ठ क्रमांक ३३ वर दिसून येते.

वरील परिस्थिती पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या नकाशाची किंमत ४०० रुपये आहे, तथापि या नकाशाच्या भागाचे ए-४ या आकारमानात रुपांतर केले असता ते १० पृष्ठे इतके बनते. त्यामुळे नकाशाकरिता २० रुपये व माहितीकरिता २ असे एकूण २२ रुपये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आकारुन त्यांना आवश्यक असलेली माहिती वर नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे हेतूपुरःस्सर टाळाटाळ केल्याचे अथवा अपिलार्थीपासून कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याचे आयोगाचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, ही माहिती देण्याप्रीत्यर्थ एकूण २२ रुपये इतके शुल्क आकारुन सदर माहिती अपिलार्थीस ते व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २२-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अर्जुन फकिरा शिंपी, शिवशक्ती कॉलनी, खोटेनगरजवळ, गट नं. १०१, प्लॉट नं. ३१, जळगाव तालुका जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे मंडळ (स्थानिक स्तर), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३६५

निर्णय दिनांक २२-०७-२००८

श्री. रविंद्र नामदेव इंगळे, : अपिलार्थी
संपादक, साप्ता सावज सावधान, धुळे,
७६, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी, देवपूर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद
बांधकाम उपविभाग, पंचायत समिती,
धडगाव, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद
बांधकाम उपविभाग, पंचायत समिती,
धडगाव, जिल्हा नंदुरबार

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, धडगाव, जिल्हा नंदुरबार

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रविंद्र नामदेव इंगळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. र. रा. शेवाळे, जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, धडगाव

(यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, धडगाव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एप्रिल २००५ ते ३१ मे २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

‘‘अ. रोहयो योजना रस्ते (स्कील-अनस्कील)

ब. आमदार खासदार निधी रस्ते व अन्य विकास कामे

क. ३०५४ शिर्षकांअतर्गत किरकोळ रस्ते दुरुस्ती कामे

ङ संपूर्ण ग्रामिण योजने अंतर्गत करण्यात आलेले रस्ते व इतर कामे

इ. १२ वा वित्त आयोग

ई. अन्य योजने अंतर्गत रस्ते व इतर कामे

अ. खालील नमुन्यात यादी

कामाचे नांव ----- कामाचे स्वरुप ----- रस्ता असल्यास की. मी. ----- पासून ----- पर्यंत ----- रुंदी ----- साईड पट्टीची एकूण जाडी व रुंदी ----- योजनेचे नाव ----- अंदाजपत्रकीय रक्कम ----- मंजुर रक्कम ----- प्रत्यक्ष झालेला खर्च ----- प्रशासकीय मंजुरी दिनांक ----- कार्यादेश दिनांक ----- कामाचा कालावधी ----- काम सुरु केल्याची तारीख ----- कामपुर्ण झाल्याची तारीख ----- मेन्टनेस कालावधी ----- खडी, मुरुम, दगड मंजुर क्वारीचे नाव व कामापासूनचे अंतर ----- खडीची साईज ----- अपेक्षीत क्रश ----- कामपुर्ण

कींवा अपुर्ण त्याची कारणे ----- अंतिम मोजमाप दिनांक ----- ठेकेदाराचे नाव व पत्ता ----- उपस्थीत मजुरांच्या गावाचे नाव (रो.ह.यो.) ----- देयेक अदाकेल्याचा दिनांक व रक्कम ----- चेक नं. ----- संबधीत कामावर देखरेख ठेवणा-या कनिष्ठ अभियंत्याचे नांव ----- या संबधीची माहीती. ''

अपिलार्थीने सदर माहिति नोंदणीकृत शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० इतकी शास्ती लावण्याची व विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणतीही कारवाई न केल्याने त्यांच्यावर देखील कारवाई करण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास पुढे विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या, उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, धडगांव पंचायत समिती धडगाव, जिल्हा नंदूरबार यांना उद्देशून केलेल्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर अर्ज दिनांक ०१-०७-२००६ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. तसेच त्यांचा दिनांक १६-०८-२००६ रोजीचा अपील अर्ज दिनांक १७-०८-२००६ रोजी याच उप अभियंत्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. हे दोन्ही अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांना पोस्टाची पावती प्राप्त झाली असून सदर पावतीची झेरॉक्स प्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगास या दोन्ही अर्जाच्या पावत्यांची सत्यप्रत सादर केली. तसेच या पावत्यांच्या मूळ प्रती देखिल त्यांनी आज आयोगास दाखविल्या आहेत. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज व अपील अर्ज केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून व प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे प्रतिसाद प्राप्त झाला नाही, त्यामुळे संबंधितांवर अधिनियमातील तरतुदीनुसार दंड आकारुन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरविण्यात यावी, तसेच आयोगाकडे हजर राहण्यासाठी त्यांना करावा लागलेला येण्याजाण्याचा खर्च देखिल त्यांना मंजूर करावा, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या अर्जाव्दारे त्यांच्याकडे माहिती मागितली होती तो अर्ज त्यांच्याकडे अद्यापही अप्राप्त आहे, मात्र अपिलार्थीचा दिनांक १६-०८-२००६ रोजीचा प्रथम अपील

अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला असून, त्यांच्याकडे नियमीत कामकाजासाठी आवश्यक तो कर्मचारीवृंद उपलब्ध नसल्याने अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयामध्ये प्रथमतः सापडला नाही, परंतु आयोगाची सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये बरीच शोधाशोध केली व तदनंतर अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला. अपिलार्थीचा प्रथम अर्ज व आयोगाकडील सुनावणीची नोटीस यामध्ये बराच कालावधी व्यपगत झाला, त्यामुळे या अपील अर्जावर त्यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही. अपिलार्थीने अशाच प्रकारच्या माहितीची मागणी दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या अर्जामध्ये केली असता त्यांना ती दिनांक १०-०५-२००७ रोजी पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. सदर अर्ज माहिती अधिका-यास प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ संबंधित रजिस्टर्ड पावत्यांची झेरॉक्स प्रती अपिलार्थीने आयोगाकडे सादर केल्या आहेत, या त्यांनी सुनावणीचे वेळी व त्यांच्या मूळ प्रती देखिल आयोगास त्यांनी दाखविल्या आहेत. यावरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज व अपील अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे, मात्र अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नसल्याचे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीचा अर्ज प्राप्त न झाल्याचा त्यांचा दावा आयोग अमान्य करत आहे, कारण सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने आयोगाकडे ठोस पुरावा सादर केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली

माहिती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) मधील तरतुदींअन्वये त्यांना पुरविणे हे त्यांचे कर्तव्य आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे हे कर्तव्य पाळण्यात कसूर केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांचा त्यांच्या कार्यालयात अपुरा कर्मचारीवृंद असल्याचा दावा देखिल आयोग फेटाळून लावत आहे. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने अशाच प्रकारची माहिती त्यांच्या दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या अर्जाने मागितली असता ती माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत दिल्याचे नमूद केले आहे, तथापि अपिलार्थीच्या या अर्जाचा या विचाराधीन व्दितीय अपील अर्जाशी काहीही संबंध नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा हाही युक्तिवाद आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीस आता त्यांनी त्यांच्या दिनांक ०१-०७-२००६ रोजी केलेल्या अर्जामधील माहिती जन माहिती अधिकारी यांना पुरविणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०७-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. माहिती देण्याचा विहित कालावधी आता संपुष्टात आल्याने अधिनियमाच्या कलम ७ (६) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना आता विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे वर नमूद केल्याप्रमाणे नि:संशयपणे सिध्द झाले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशा प्रकारच्या वर्तनाने स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार

यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व कर्मचारी / सहाय्यक यांच्यावर यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा व याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन आपल्या कार्यशैलीतील जो कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई दर्शविली आहे याची देखिल त्यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी.

प्रसंगावशात् येथे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, माहिती अधिकार अधिनियमाव्दारे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागावयाच्या माहितीच्या आकारमानावर बंधने घालण्याची आता निश्चित आवश्यकता आहे, असे आयोगास प्रतीत होत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांच्यावर यांनी त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमित होताच २ महिन्याच्या आत पूर्ण करुन, आपला अनुपालन अहवाल तदनंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २२-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र नामदेव इंगळे, संपादक, साप्ता सावज सावधान, धुळे, ७६, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी, देवपूर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, धडगाव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, पंचायत समिती, धडगाव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३६६

निर्णय दिनांक २२-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. खलील अहमद मोहंमद बशीर,<br>४२५, किल्ला, रविवार वॉर्ड, मालेगाव,<br>जिल्हा नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव,<br>जिल्हा नाशिक | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्रशासन अधिकारी, मालेगाव<br>महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव,<br>जिल्हा नाशिक | : | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. खलील अहमद मोहंमद बशीर यांचे प्रतिनिधी श्री.अन्सारी अफरोज अहमद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. भास्कर झिप्रुलाल तिवारी, जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,

महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव व जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, मालेगाव महानगरपालिका, शिक्षण मंडळ, मालेगाव, यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे तहजीब प्राथमिक शाळेच्या शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रस्तावाची सन २००० व २००१ शी संबंधित प्रमाणित प्रत मिळण्याबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" मुख्याध्यापक तहजीब प्राथमिक शाळा बजरंगबाडी मालेगाव यांनी आपल्याकडे लिपीक व शिपाईची जागा मंजूरीसाठी पाठविलेले खालील प्रस्तावची प्रमाणित प्रत द्यावी.

१. मुख्याध्यापकांचे पत्र जा. क्र. 38/TPS/A.O/2000 दिनांक १४-०९-२००० व सर्व कागदपत्र प्रमाणित करुन द्यावे.

२. मुख्याध्यापकांचे प्रस्ताव जा. क्र. TPS/A.O/82/2001 दिनांक ०५-०१-२००१ प्रस्ताव सोबत जोडलेले सर्व कागदपत्र प्रमाणित करुन द्यावे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने, ही माहिती त्यांनी संबंधितांकडून मागविली आहे व ती संबंधितांकडून प्राप्त होताच अपिलार्थीस पुरविण्यात येईल असे नमूद केले आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीच्या उपस्थित प्रतिनिधीने कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली कोणतीही माहिती अद्यापपावेतो पुरविली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यांनी आपल्या युक्तिवादा-मध्ये पुढे असेही स्पष्ट केले की, तहजीब प्राथमिक शाळा, मालेगाव या शाळेकरिता श्री. जाकीर अ. गनी देशमुख व श्रीमती जुबेदा सुलेमान या दोन कर्मचा-यास अनुक्रमे लिपीक व शिपाई या पदावर नेमणुकीसाठी सक्षम प्राधिकरणाने मान्यता दिली होती, तथापि संबंधित शिक्षण संस्थेने या पदावर श्री. महंमद मुदखीर अ. शकूर व श्री. अ. रशीद मोहंमद आयुब या नावाच्या व्यक्तींच्या नेमणूका केल्या होत्या. सदर व्यक्ती मुख्याध्यापक व संस्थाचालक यांच्या जवळच्या नात्यातल्या असून संबंधित शिक्षण संस्थेने शिक्षण संचालकाच्या आदेशास धाब्यावर बसवून आपल्या मर्जीतल्या व्यक्तींच्या नेमणुका केल्या आहेत. संबंधित संस्थेची सदर कृती बेकायदेशीर असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रथमतः त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती. सर्वसाधारण प्रचलीत संकेताप्रमाणे सर्व शिक्षण संस्था त्यांच्याकडील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुकींबाबतचा प्रस्ताव त्यांच्याकडे ज्या मूळ प्रतीत सादर करतात, त्या सर्व मूळ प्रती जशाच्या तशा ते शिक्षण उपसंचालक कार्यालयाला पाठवित असतात व तदनंतर शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून त्या प्रस्तावांची छाननी होऊन शिक्षण उपसंचालक स्तरावर याबाबतीत अंतिमतः निर्णय घेतला जातो. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी संबंधित शिक्षण संस्थेकडे व शिक्षण उप संचालक कार्यालयाकडे विचारली असता अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध नाही अशी त्यांना दोन्ही प्राधिकरणाकडून माहिती मिळाल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध नसल्याबाबत कळविले. तथापि विशेष प्रयत्न करुन त्यांना संबंधित शिक्षणसंस्था चालकाकडून आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्या प्रती प्राप्त झाल्या असून त्या अपिलार्थीस विनामूल्य देण्यास ते तयार आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी का घेतली नाही असे विचारले असता मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्रतिनिधीने आयोगास असे सांगितले की, त्यावेळी ते त्या ठिकाणी कार्यरत नसल्याने या माहितीसंदर्भात ते कोणताही खुलासा आयोगास करु शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व विशेषतः अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादामध्ये तहजीब प्राथमिक शाळेतील अनियमिततेबाबतचा मुद्दा लक्षात घेता, या संपूर्ण प्रकरणामध्ये शिक्षण संचालकाच्या स्तरावरुन तहजीब प्राथमिक शाळा, मालेगाव या शाळेची चौकशी करणे जरुरीचे आहे, असे आयोगास वाटते. सबब शिक्षण संचालक, पुणे यांना असे सुचविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी तहजीब प्राथमिक शाळा, मालेगाव यांनी त्यांच्याकडील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सन २००० व २००१ मध्ये नेमणुकासंदर्भात केलेल्या

प्रक्रीयांची सखोल चौकशी करुन चौकशीअंती अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संस्थेंकडून अनियमितता घडली असल्यास या शाळेला दिले गेलेले अथवा देण्यात येणारे अनुदान यापुढे देण्यासंदर्भात निश्चितपणे ठोस कारवाई करावी. आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीच्या दोन्ही पत्राच्या प्रती आयोगास दाखविल्या व सदर प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे, त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत देण्यात यावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात दाखविलेल्या निष्काळजीपणाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी भविष्यात माहिती अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात अधिक सतर्कतेने कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच शिक्षण संचालक, पुणे यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाई स्पष्ट केली आहे, त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी.

प्रसंगावशात् जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, मालेगाव महानगरपालिकेतील शिक्षण मंडळातील प्रशासकीय अधिकारी हे शिक्षण खात्यातील वर्ग-३ चे कर्मचारी असून ते प्रतिनियुक्तीने महानगरपालिकेकडे शिक्षण खात्यातर्फे नियुक्त केले जातात. महानगरपालिका शिक्षण मंडळातील प्रशासकीय अधिकारी हे एक महत्त्वाचे पद असून या पदावर किमान वर्ग-२ पदाच्या अधिका-याची नेमणुक करण्यासंदर्भात राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने विचार

करणे जरुरीचे आहे असे आयोगास वाटते. आयोगाच्या या प्रस्तावाबाबत सचिव (शालेय शिक्षण), त्यांनी यथायोग्य विचार करुन आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २२-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. खलील अहमद मोहंमद बशीर, ४२५, किल्ला, रविवार वॉर्ड, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, मालेगाव महानगरपालिका

शिक्षण मंडळ, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३८६

निर्णय दिनांक : २३.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. व्ही. कृष्णन,<br>नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>परिमंडळ कार्यालय<br>नाशिक.<br>२ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>नाशिक, विभाग नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. दिनकर बालाजी डाफणे, सिस्टीम ॲनॅलिस्ट (प्रणाली विश्लेषक), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.परिमंडळ कार्यालय, नाशिक व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. व्ही. कृष्णन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१८.१०.२००६ रोजीच्या

अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००४ ते दि.१८.१०.२००६ या कालावधीतील वैयक्तिक घरगुती दूरध्वनीचा कार्यालयीन कामाकरिता वापर करण्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"SE/EHV O & M Nashik circle submitted a proposal wide letter number SE EHVC/NSK/GAD/0092 dt.7 jan 2004 to CE Nashik zone MSEB Nashik road for clarification and approval/ guidance from AM in consultation with TM & secretory for which the proposal submitted by TD distribution to DOP Mumbai letter number 40449 dt sep 1999 in the correction slip number 4 dt 16 oct 2002 to GSO 324 dt 24 mar 1958

Whether the above proposal submitted to HO if so copy of correspondence made to and received from HO or form any authority, any action, direction, taken by any authority in these respect. Copy of the same may be provided"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दि. २.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावरील माहितीवरुन अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून या विषयासंदर्भातील उपलब्ध अभिलेखे व पत्रे यांच्या तपासणीची मागणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केली आहे.

मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१.११.२००६ व दि. २२.११.२००६ रोजी त्यांच्याकडून माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न

केल्याचे दिसून येते तथापि त्यांना सदर माहिती प्राप्त झाली नाही, असे त्यांच्या जन माहिती अधिकारी यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारावरुन दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी या संदर्भात त्यांच्याकडील दि. ४.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देऊन त्यांचे अपील फेटाळले आहे. सदर अपील फेटाळण्याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांनी असे दर्शविले आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे दाखवून वस्तुस्थितीबाबत सक्षम प्राधिकरणाच्या मतांविषयी पुरेसे स्पष्टीकरण केले होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ अर्जातील व प्रथम अपील अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे. सदर अपील करण्याचे कारण त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कागदपत्रे उपलब्ध करुन दिले नाहीत, असे दिले आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी हे नियत वयोमानानुसार वीज कंपनीच्या सेवेमधून आता सेवानिवृत्त झाले आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती कागदपत्रे दाखविली आहेत, ती निश्चितपणे कोणत्या तारखेस

दाखविली याची त्यांना कल्पना नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. २.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः त्यांच्या दि. १८.१०.२००६ रोजीच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधीक्षक अभियंता, नाशिक यांनी मुख्य अभियंता, नाशिक विभाग यांच्याकडे दि. ७ जानेवारी, २००४ च्या पत्राद्वारे दाखल झालेल्या प्रस्तावावर काय कार्यवाही त्यांच्याकडून करण्यात आली, अशी माहिती विचारली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना लिहिलेल्या दि. २८.११.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, अपिलार्थी त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २१.११.२००६ व २२.११.२००६ रोजी हजर झाले होते, तथापि त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे दिसून येते. कोणत्याही अर्जदाराने 'व्यक्तिशः' माहितीची मागणी करणे याचा अर्थ त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी व्यक्तिशः उपस्थित राहून हस्तगत करणे असा होतो. त्यामुळे एकदा व्यक्तिशः माहितीची मागणी केली की, सदर माहिती प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी अपिलार्थी यांची असते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २१.११.२००६ व २२.११.२००६ रोजी हजर राहिल्याचे त्यांनी त्यांच्याकडील दि. २८.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे सिध्द केले आहे. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांनी त्यांच्याकडील दि.०२.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता यांच्या दि. ७.१.२००४ च्या पत्रासंदर्भात मुख्य अभियंता, नाशिक विभाग यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे कळविले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दि. २.१२.२००६ रोजी पुरविल्याचे सिध्द होत आहे.अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करताना व आयोगाकडे द्वितीय अपील करताना अपीलामध्ये प्रत्यक्ष अभिलेख्याची व नस्त्यांच्या तपासणीची मागणी करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढविल्याचे दिसून येते. येथे असे लक्षात घेतले पाहिजे की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी व आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व द्वितीय अपील करताना त्यांनी मूळ अर्जाद्वारे ज्या माहितीची मागणी केली आहे, त्याच माहितीच्या मागणीसंदर्भात त्यांनी सदर अपील करणे माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीने वाढीव मुद्यावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करणे हे अवैध ठरते, एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे दाखविण्यात आली असल्याचे आयोगासमोरील आपल्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केले आहे. तसेच अपिलार्थीस संबंधित अभिलेखे व नस्त्या दाखविल्याचा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ४.१.२००७ रोजीच्या अपिलार्थीच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात त्यांनी दिलेल्या निर्णयामध्ये दिसून येतो. त्यांच्या या मुद्यांचे खंडण करण्यासाठी आज अपिलार्थी हे उपस्थित नाहीत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस सर्व कागदपत्रे दाखविल्याचा युक्तीवाद आयोग ग्राहय धरत आहे. अपिलार्थीस सर्वसाधारण परिस्थितीत त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये दि. १७.११.२००६ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः प्राप्त होणे आवश्यक होते, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २.१२.२००६ रोजी म्हणजेच पंधरा

दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याप्रित्यर्थ संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र ठरत आहेत. मात्र संबंधित जन माहिती अधिकारी आजमितीस नियतवयोमानानुसार वीज कंपनीच्या सेवेतून निवृत्त झाल्याने त्यांच्यावर कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत, तथापि सध्या कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे माहितीची मागणी करणारे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी.

आजमितीस अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याने व अपिलार्थीच्या प्रथम व द्वितीय अपील अर्जातील वाढीव माहितीची व्याप्ती वरील परिच्छेदामध्ये अवैध ठरविली गेली असल्याने, अपिलार्थीचे द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळून आदेश देण्यात येत आहेत.

प्रसंगावशात्, या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि. १८.१२.२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना सदर निर्णय माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने पारित करण्यात आला आहे. माहिती अधिकाऱ्याच्या निर्णयावर अपिलार्थीने ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अपील अर्ज केला आहे, त्याच प्राधिकरणातील जन अपिलीय अधिकारी यांनी अपील निर्णयावर स्वाक्षरी करणे गरजेचे आहे, मात्र या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावरील निर्णय स्वतःच्या स्वाक्षरीने पारित न करता तो जन माहिती अधिकारी यांच्या सहीने व सही देखील माहिती अधिकारी हा हुद्दा दर्शवून पारित केला आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय

अधिकारी यांची ही कृती सर्वथैव चुकीची असून अशाप्रकारच्या चुकीच्या पध्दतीने निर्णय पारित करण्याचे त्यांनी यापुढे टाळावे, असे त्यांना सूचित करण्यातआहे.

**आदेश**

**१. अपील फेटाळण्यात येत आहे.**

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. व्ही. कृष्णन, 'कृष्णमणी', उत्तरननगर, तपोवन रोड, द्वारका क्वॉर्नर,नाशिक-४२२ ०११.

२. जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,विद्युत भवन,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विद्युत भवन, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३८८

निर्णय दिनांक : २३.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती मिनाक्षी रामनाथ कचरे,<br>रा. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहमदनगर | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रीमती मिनाक्षी रामनाथ कचरे, यांचे प्रतिनिधी (पती) श्री. भिमराज नारायण डगळे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अनिल नारायण सदावर्ते, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. कोंडीराम माधवराव नागरगोजे, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०४.०८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज

अहमदनगर या संस्थेने जून, २००६ मध्ये केलेल्या नेमणूकीसंदर्भात, जून, २००६ ते ४.८.२००६ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" अहमदनगर जिल्हा मराठा विदया प्रसारक समाज अहमदनगर यांनी माहे जुन २००६ मध्ये नेमणुक केलेल्या शिक्षण सेवक पदाच्या नेमणुकीस मान्यता देण्याचा प्रस्ताव आपल्या कार्यालयास प्राप्त झाला असेल तर त्या प्रस्तावातील खालील नमूद केलेले दस्तऐवज मिळणेबाबद.

१. मराठी विषयासाठी किती उमेद्वार उपस्थित होते त्यांचा गुणात्मक तक्ता.
२. संस्थेचा अनुशेष तक्ता.
३. मुलाखत समितीने तोंडी घेतलेल्या मुलाखतीचा गुणात्मक तक्ता.
४. आपण सस्थंने दिलेल्या नेमणुकीस मान्यता देताना कोणत्या शासन निर्णयाचा अवलंब करुन मान्यता देता तो शासन निर्णय व इतर आवश्यक ती परिपत्रके.
५. मी दिनांक २६ जुलै २००६ रोजी दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली कार्यवाहीची प्रत. "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागितलेली माहिती संस्थेच्या अखत्यारीतील असल्याने सदर माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीस दिलेल्या या दि. १९.८.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी संदर्भ म्हणून अपिलार्थीचा दि. १९.८.२००६ चा अर्ज असे दर्शविल्याचे दिसून येत आहे. आज रोजी सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामधील सदर संदर्भ नजरचुकीने टंकलिखित केला गेला आहे, असे आयोगास सांगितले व

सदर दि. १९.८.२००६ रोजीचे पत्र हे अपिलार्थीचा प्रथम अर्ज दि. ४.८.२००६ च्या संदर्भात दिले आहे, असे आयोगासमोर स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३०.१०.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ ची माहिती शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाशी निगडीत आहे, तथापि सदर माहिती संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची दिशाभूल करुन माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे म्हटले आहे. सदर अपील अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अहमदनगर यांना उद्देशून केला होता, तथापि त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने व जिल्हा परिषदेच्या विविध विभागाचे प्रमुख हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने त्यांनी सदर अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे पाठवून दिला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ६.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधित संस्थेच्या अध्यक्षांकडे प्रथम अपील करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी (त्यांचे पती) यांनी असा युक्तीवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना या प्रकरणी प्रथम अपील करावयाचे होते, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी कोण आहेत, याची निश्चित

माहिती त्यांच्या कार्यालयातून त्यांना प्राप्त न झाल्याने व असे कोणतेही फलक त्यांच्या कार्यालयात न लावल्याने त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या कार्यालयात प्रथम अपील केले. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा), जि.प.अहमदनगर यांनी दिलेल्या सूचनेनुसार त्यानंतर त्यांनी संबंधित संस्थेच्या सचिवांकडून माहिती मागविली.तथापि त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष अपिलीय अधिकारी होते. त्यांनी देखील कोणतीही माहिती त्यांना पुरविली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. २१.५.२००७ पासून या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना संबंधित शिक्षण संस्थेकडून याच माहितीसाठी त्यांनी संस्थेकडे केलेल्या वेगवेगळया अर्जातील प्रतिसादाद्वारे दिनांक ७.२.२००७ रोजी प्राप्त झाली आहे. तथापि सदर माहिती चुकीची आहे, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ मध्ये संदर्भित केलेला दि. २६.७.२००६ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे अपिलार्थीने माहितीसाठीचा सदर अर्ज करतेवेळी प्राप्त झाला नव्हता. अपिलार्थीचा कथित दि. २६.७.२००६ रोजीचा अर्ज त्यांना दि. ३.१.२००८ रोजी प्राप्त झाला आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेल्या मुद्दा क्र. ४ व ५ ची माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत देण्यास ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, या प्रकरणी उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद हे माहिती अधिकारी असून शिक्षणाधिकारी हे अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांनी चुकीच्या प्राधिकरणाकडे दाखल केल्याने तो अर्ज त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्याकडे पाठवून दिला होता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ४.८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना विचारलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सोपे व मर्यादित असे होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे सदर अर्ज केला, त्यावेळी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेकडून त्यांनी केलेल्या जून २००६ मधील नेमणूकीसंदर्भातील प्रस्ताव त्यांच्याकडे प्राप्त झाला नव्हता, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र. १,२ व ३ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी संबंधित संस्थेच्या नेमणूकीच्या प्रस्तावास मान्यता देताना, ज्या शासन निर्णयाचा अवलंब केला होता, त्या शासन निर्णयाची प्रत मागितली होती व मुद्दा क्र. ५ द्वारे त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.अहमदनगर यांच्याकडे केलेल्या दि. २६.७.२००६ रोजीच्या अर्जावर काय कार्यवाही केली, याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा कथित दि.२६.७.२००६ रोजीचा अर्ज प्राप्त झाला नव्हता. त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती.अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात शासनाने कोणताही विशिष्ट निर्णय वा कुठलेही परिपत्रक पारित केले नसून संस्थेकडून करण्यात आलेल्या नेमणूकीच्या प्रस्तावास मान्यता देताना माध्यमिक शाळा संहितेतील तरतुदींचा आधार घेऊन त्यांच्या कार्यालयाने एक विशिष्ट कार्यपध्दती आखून दिली आहे. सदर आखीव कार्यपध्दतीची तंतोतंत अंमलबजावणी होण्यासाठी त्यांच्या कार्यालयाने तयार केलेल्या परिपत्रकाची प्रत अपिलार्थीस त्यांना विनामूल्य देणे आता भाग आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपेक्षिलेल्या माहितीचे वरील परिच्छेदात केलेले विश्लेषण पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना

असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी जिल्हा परिषद अहमदनगर येथील त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या केलेल्या नेमणूका संदर्भातील केलेली कार्यवाही, आयोगास स्पष्ट केली. त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सर्व स्तरावरील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूकी केल्या आहेत. त्यांनी केलेली सदर कार्यवाही ही सविस्तरपणे व योग्य तऱ्हेने केल्याचे आयोगास आढळून आल्याने, आयोग समाधान व्यक्त करीत आहे. त्यांच्या या व्यवस्थेमुळे प्रथम अपील स्तरावर अपिलार्थीस आवश्यक तो न्याय मिळू शकेल, अशी अपेक्षा आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती मिनाक्षी रामनाथ कचरे,८-‘अ’, त्रिमुर्ती, उत्कर्ष कॉलनी, गुंजन सोसायटीजवळ,

बोरुडे मळा, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३८९

निर्णय दिनांक : २३.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अब्दुल मजीद मुसा शाह<br>रा. मालेगाव,<br>नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.<br>शहर उपविभाग, क्र.३, जुने आग्रा रोड,<br>मालेगाव,जि. नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.<br>मोतीभवन, मालेगाव,<br>जि. नाशिक | | |
| १ श्रीमती नौशाद बानो मजिद शाह | : | त्रयस्थ पक्ष |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. अन्सारी महमद ताहेरोद्दीन, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. शहर उपविभाग, मालेगाव,जि. नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. विठ्ठल परशुराम नरवाडे, (प्र) जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मालेगाव

जि.नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. अब्दुल मजीद मुसा शाह (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्रीमती नौशाद बानो मजीद शाह( यापुढे त्यांना त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१२.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे घरगुती वीज कनेक्शन देण्यासंदर्भात दि. १.१.२००६ ते १२.७.२००६ या कालावधीतील एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितली होती.

> या माहितीमध्ये " एकूण घरगुती नवीन वीज कनेक्शनसाठी प्राप्त झालेले अर्ज, अर्जदारांची नावे, ज्या ठिकाणी वीज कनेक्शनची मागणी केली त्या ठिकाणाचा संपूर्ण पत्ता व माहिती अधिकारी यांच्याकडील त्यांचा प्रकरण क्रमांक , तसेच यापैकी किती जणांना वीज कनेक्शन देण्यात आले व याबाबतचा हाच तपशील, किती जणांनी कोटेशन रक्कम भरले आहे, कोटेशन नं., किती जणांना कोटेशन दिले आहे, याचे नाव तसेच श्रीमती नौशाद बानो मजीद शहा यांनी दि. ७.३.२००६ रोजी विहित नमुन्यात अर्ज केला असून त्यांना आजपर्यंत वीज कनेक्शन न देण्याची कारणे, नौशाद बानो मजीद शहा या वीज कंपनीच्या ग्राहक आहेत काय, दोन्ही घरांचे पुरावे हे खरे आहे किंवा कसे याचा लेखी खुलासा, नौशाद बानो मजीद शहा यांनी वीज कनेक्शन मिळण्यासंदर्भात केलेला पाठपुरावा, फोटोपास, रिव्हीजन उतारा, घ.नं. १२१ ची घरपट्टी खरी आहे किंवा कसे, इ. माहितीचा समावेश होता. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्य

कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.९.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि उपरोक्त सुनावणीस अपिलार्थी हजर न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २२.९.२००६ रोजी सुनावणी ठेवल्याचे पत्र जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.९.२००६ रोजी त्यांना पाठविले आहे. सुनावणीस अपिलार्थी हजर राहता यावे, म्हणून सुनावणीच्या प्रस्तावित दिनांकापूर्वी किमान १५ दिवस इतक्या कालावधीचा विचार करुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीस हजर राहण्याचे पत्र पाठविणे भाग होते. तथापि त्यांनी, अपिलार्थीस पत्र प्राप्त होऊन, अपिलार्थीस आवश्यक तो कालावधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे, कदाचित अपिलार्थीस सुनावणीस हजर राहता आले नसावे, असे अनुमान आयोगातर्फे काढण्यात येत आहे. अंतिमतः ही सुनावणी झाली नाही.जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची व जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अधिनियमाचा भंग केला असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी दि. ११.८.२००६ रोजी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीकडे वीज बीलाची थकबाकी असल्यामुळे त्यांचे वीज कनेक्शन तोडण्यात आले होते, तथापि त्यांनी सदरची थकबाकी भरल्यानंतर त्यांची वीज पूर्ववत जोडण्यात आली आहे. त्यांचे वीज कनेक्शन तोडल्यामुळे, ते अशाप्रकारची माहिती त्यांच्याकडे वारंवार मागत असतात.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दि. २२.९.२००६ रोजी आयोजित सुनावणीस हजर राहण्यासाठी त्यांच्या कार्यालयाच्या दि. १९.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हजर राहिले नाहीत. अपिलार्थीस सुनावणीसाठी दि. १९.९.२००६ रोजी पाठविलेल्या पत्राची सत्यासत्यता पडताळून पाहण्यासाठी या संदर्भातील आयोगाने पृच्छा केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाची नोंदवहीमधील त्याबाबतची आवश्यक ती कागदपत्रे आयोगास दाखविण्यास असमर्थता व्यक्त केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. १२.७.२००६ रोजी त्यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जातील एकूण ११ मुद्यांपैकी अपिलार्थीने मुद्दा क्र. ५,६,७,८ व ११ द्वारे जन माहिती अधिकारी यांचे खुलासे/कारणे व त्यांचे वैयक्तिक अभिप्राय अपेक्षित असलेली माहिती विचारलेली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका एका विश्वस्ताची असून त्यांच्याकडील जी माहिती, ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती त्यांनी अर्जदारास देणे या अधिनियमामध्ये साधारणपणे अभिप्रेत आहे. त्यांच्याकडील या माहितीतील निर्णय, परिपत्रके यातील सदर निर्णय का घेतला, तो कायदेशीर आहे किंवा कसे

व इतर प्रकारचे अभिप्राय अर्जदारांनी जन माहिती अधिकारी यांना विचारणे व अर्जदारास त्यांनी उत्तरे देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस वरील मुद्दा क्र. ५,६,७,८ व ११ या मुद्यांवरील मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना देणे भाग आहे. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ११.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये संपूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या कथित दि. ११.८.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती अपेक्षिली असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पाहण्याकरिता त्यांच्या कार्यालयात बोलाविले आहे, तसेच मुद्दा क्र. १,२,३ च्या संदर्भातही त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास सादर केली, सदर प्रत अर्धवट, वाचता न येण्याजोगी व अस्पष्ट आहे. तिचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही, असे म्हणणे जास्त योग्य होईल, असे आयोगास वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.७.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत स्पष्ट स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.८.२००६ रोजी पत्र पाठविल्याच्या पुराव्यापृष्ठयर्थ आयोगाकडे, आयोगाने सुनावणी नोटिशीद्वारे पूर्वसूचना देऊनही कोणताही पुरावा सादर केला नाही, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही, असा निष्कर्ष आयोग काढत असून जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता सात दिवसांचे आत विनामूल्य माहिती पुरविण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे स्पष्ट होत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब मुख्य अभियंता, परिमंडळ कार्यालय,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्या. नाशिक यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच, दोन महिन्याचे आत करुन, तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याची सूचना सुनावणीच्या केवळ दोन दिवस आधी पाठवून त्याद्वारे अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी एकप्रकारे नाकारुन, आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद संबंधित मुख्य अभियंता यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल मुख्य अभियंता,नाशिक परिमंडळ,नाशिक यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण

करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल मजीद मुसा शाह रा. किल्ला झोपडपट्टी, रविवार वॉर्ड, घ.नं. १२२ गल्ली नं. ४, मालेगाव,जि. नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.शहर उपविभाग, क्र.३, जुने आग्रा रोड, मालेगाव,जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. मोतीभवन मालेगाव,जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, नाशिक परिमंडळ कार्यालय, नाशिकरोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३९०

निर्णय दिनांक : २३.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे,<br>अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस उपअधीक्षक (गृह),<br>धुळे, जि.धुळे. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक,<br>धुळे, जि. धुळे | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रमेश भिमराव मुंडे, पोलीस निरीक्षक, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), धुळे व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, धुळे यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०९.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये श्री. खंडेराव शिंदे, पोलीस उपआयुक्त, शरणपूररोड, नाशिक यांचेकडे दि. २४.९.२००३ ला दिलेल्या अर्जानुसार त्यांच्या कार्यालयात झालेल्या चौकशीच्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" रत्नमाला सुरेश बोरसे यांनी मा. खंडेराव शिंदे, पोलीस उपआयुक्त, शरणपूररोड, नाशिक यांना दि. २४/९/०३ रोजी अर्ज दिला होता त्या अर्जाची चौकशी ऑक्टोबर २००३ मध्ये आपल्या कार्यालयात झाली होती. त्यात रत्नमाला सुरेश बोरसे, सुरेश सुकलाल बोरसे, सुकलाल पितांबर बोरसे, ज्ञानेश्वर सुकलाल बोरसे, गुलाब सुकलाल बोरसे, संजय सुकलाल बोरसे, विश्राम पितांबर बोरसे, श्याम श्रीराम बोरसे, श्रीराम पितांबर बोरसे, शिवाजी पंडीत जाधव, शालीग्राम मन्साराम ठाकरे व अजूनही बरेच लोकांची चौकशी आपल्या कार्यालयात झाली होती. त्यांचे जाब जवाब व चौकशी अहवालाच्या सत्यप्रती मिळाव्यात. "

या अर्जामध्ये माहितीशी संबंधित कालावधी अपिलार्थीने सन २००३ असा दर्शविला आहे.

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.१२.२००६ रोजी पोलीस अधीक्षक, धुळे यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या चौकशी अहवाल विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्याकडे दि. २२.१०.२००३ रोजी पाठविल्याचे नमूद करुन, तसेच या अहवालासोबत संबंधित जबाब देखील पाठविण्यात आल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पोलीस निरीक्षक यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी या पत्रात अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहितीकरिता विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी कसलाही पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.१.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी पोलीस निरीक्षक, धुळे यांनी पोलीस अधीक्षक, धुळे यांना दि. ६.१२.२००६ रोजी दिलेले पत्र दिशाभूल करणारे असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी हीच माहिती दि. ९.११.२००६ पूर्वी २ ते ३ वेळा जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती, तथापि त्यांच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने, शेवटी माहिती अधिकार अधिनियमाखाली दि. ९.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी हा अर्ज त्यांनी सादर केला. त्यांनी पोलीस अधीक्षक, धुळे यांच्याकडे सदर अर्ज सादर केल्यानंतर पोलीस अधीक्षक, धुळे यांनी पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, धुळे यांना त्यांच्या दि. २८.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पुरविण्याचे आदेशित केले. तथापि पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा यांनी त्यांच्याकडील दि. ६.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्याकडे सर्व संबंधितांच्या जबाबासह पाठविली असल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ न शकल्यामुळे त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाने दि. ७.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले, तथापि त्यांच्या या अपिलावर पोलीस अधीक्षक, धुळे यांनी कोणताही निर्णय दिला नाही. यानंतर त्यांना आवश्यक त्या माहितीसाठी गृह विभागातील विविध खात्यांशी वेळोवेळी पत्रव्यवहार केला परंतु त्यांना

अद्यापपावेतो आवश्यक ती माहिती पुरविण्यात आलेली नाही. सदर अहवाल त्यांना न्यायालयाच्या कामकाजास्तव अत्यावश्यक होता. या चौकशी अहवालअभावी त्यांच्या आयुष्याचे कधीही भरुन न निघणारे असे नुकसान झाले आहे. त्यानंतर बऱ्याच पत्रव्यवहारानंतर त्यांना पोलीस महानिरीक्षक यांच्या कार्यालयातून रु. ११५/- इतके शुल्क भरुन घेऊन अस्पष्ट स्वरुपात माहिती पुरविण्यात आली, जी वाचता येईल इतकी देखील स्पष्ट नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व सदर माहिती त्यांना विनामूल्य हवी आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी पोलीस निरीक्षक यांनी असा युक्तीवाद केला की, ते या पदावर दि. १८.६.२००८ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली, विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती, कागदपत्रे संबंधितांकडून घेऊन सदर माहिती अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ९.११.२००६ रोजीच्या अर्जास अधिनियमातील विहित मुदतीत म्हणजे, दि. ६.१२.२००६ रोजी आवश्यक तो प्रतिसाद दिला असला तरी, या प्रतिसादाने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाली नाही. कोणत्याही अर्जदाराने मागितलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्यास अशा प्रकरणी काय कार्यवाही करावयाची, याचे सुस्पष्ट विवेचन अधिनियमातील कलम ६(३) मध्ये केलेले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत, अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती, त्या प्राधिकरणाकडे पाठवून, त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील या तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कार्यवाही केली नाही. त्यांनी फक्त अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी तर अपिलार्थीच्या दि. ७.१२.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही किंवा अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. या सर्व घटनांचा परिपाक म्हणजे अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्या, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित राहिल्या आहेत. आज रोजी त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, त्यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्या कार्यालयात माहितीपोटीचे शुल्क रु. ११५/- भरुन देखील त्यांना अस्पष्ट स्वरुपात माहिती प्राप्त झालेली आहे. त्यांना आता सदर माहिती स्पष्टपणे वाचता येईल, अशा स्वरुपात व साक्षांकित करुन हवी आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेला वरील युक्तीवाद लक्षात घेता व या प्रकरणाची पार्श्वभूमी लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन त्यातील सर्व कागदपत्रांच्या, वाचता येतील अशा स्पष्ट प्रती साक्षांकित करुन त्या अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच, दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घकाळ वंचित राहिल्याचे आयोगास दिसून येत आहे. सबब या प्रकरणी विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच, दोन महिन्याच्या आत करुन, या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर एक महिन्याचे आत सादर करावा.

प्रसंगावशात्, पोलीस अधीक्षक, धुळे कार्यालयाने पोलीस निरीक्षक कार्यालयाने केलेला पत्रव्यवहार पाहता, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या नावाचा एकेरी उल्लेख

केला असल्याचे दिसून येते, अशाप्रकारचा त्रयस्थ पक्षासंदर्भात विशेषतः महिलासंदर्भात एकेरी उल्लेख त्यांनी त्यांच्याकडील पत्रव्यवहारामध्ये करण्याचे येथून पुढे टाळावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांचे आत वाचनीय स्वरुपात व साक्षांकित करुन, विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल विशेष पोलीस महानिरीक्षक,नाशिक यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत पूर्ण करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे, स्मृती हौसिंग सोसायटी, बाबू गेनु मार्ग, स्टेशनरोड,

आगरकर माळा, अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक,गडकरी चौक,कालिका मंदिराजवळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३९१

निर्णय दिनांक : २३.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हेमंत शंकरराव कवडे,<br>रा. मनमाड ता.नांदगाव जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, मनमाड, ता.नांदगाव, जि.नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>नाशिक. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. हेमंत शंकरराव कवडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) श्री. सुभाष जनार्दन तनपूरे, प्रशासन अधिकारी, नगरपरिषद, मनमाड, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, मनमाड ता.नांदगाव, जि.नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. विठ्ठल तेजबराव जरे, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.०१.०२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. १.१.२००५ ते ३१.१२.२००५ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम ४ मधिल पोटकलम (१) (क) (ख) मधिल एक ते सतरा (ग) (घ) तसेच पोटकलम (२)(३)(४) हया सर्व कलमाप्रमाणे शासनाच्या दिलेल्या आदेशाने, विहित नमुन्यात ठेवली आहेत का?

२) आपण ठेवलेल्या माहितीमधुन कलम ४ मधिल पोटकलम (१) चे ख ११ प्रमाणे, सर्वयोजनांचा तपशिल, प्रस्तावीत खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा अहवाल,

३) तसेच कलम ४ मधिल (१) चे (ख) मधिल बारा अर्थसाहय कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमाच्या लाभाधिकाऱ्यांच्या तपशिल, हि संपुर्ण माहीती वर दिलेल्या मुदतीतील असावी. व शासनाने प्रकाशील केलेल्या विहीत नमुन्यात असावी "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे वेबसाईट व्यवस्थापन तयार झाले नसल्याने ती तयार करण्यासाठी विलंब लागणार आहे, तेव्हा याबाबतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून अवधी मागवून नगरपरिषदेस सहकार्य करण्याची विनंती केली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम

१९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०३.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.४.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २०.४.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य करुन अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी, जी माहिती लगेच उपलब्ध आहे अशी माहिती व जी माहिती देणेकामी विलंब लागणार आहे अशी माहिती, अनुक्रमे प्रथमतः १५ दिवसांचे आत व त्यानंतर उर्वरित माहिती ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य अथवा सशुल्क द्यावयाची, या संदर्भात त्यांनी कोणतेही आदेश दिले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०७.२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती देण्याचे त्यांना आदेशित करण्याची व या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून नुकसान भरपाई देण्याचे त्यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्याकरिता ते दि. २५.५.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले होते.त्यावेळी जन माहिती अधिकारी यांना त्यांनी माहिती प्राप्त झाली नसल्यासंदर्भातील एक अर्ज दि. २५.५.२००६ रोजी दिला होता.सदर माहिती त्यांना जन माहिती अधिकारी

यांनी विलंबाने पुरविल्याप्रित्यर्थ त्यांच्यावर जास्तीत जास्त रु.२५,००० इतकी शास्ती लावण्याचे आदेश द्यावेत व या प्रकरणी अपील सुनावणीसाठी त्यांना उपस्थित राहावे लागल्याने, त्यांचा जाण्या-येण्याचा खर्च जन माहिती अधिकारी यांनी त्यांना द्यावा.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ३.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नगरपालिका नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली आहे व त्यातील त्यांना आवश्यक माहिती कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे, असे कळविले होते. तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांचे कार्यालयात अपिलार्थी कधीही हजर झाले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आता सिडीच्या स्वरुपात उपलब्ध असून सदर सीडी ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १०.३.२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दि. २०.४.२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय पारित केला आहे. सदर निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी, जी माहिती लगेच उपलब्ध आहे अशी माहिती व जी माहिती देणेकामी विलंब लागणार आहे अशी माहिती, अनुक्रमे प्रथमतः १५ दिवसांचे आत व त्यानंतर उर्वरित माहिती ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ मधील १(ख) या उपकलमातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दि. १५.१०.२००५ रोजी अगर तत्पूर्वी तयार करुन ठेवावयास हवी होती, तथापि ही माहिती, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.

२०.४.२००६ रोजी सुनावणी होईपर्यंत तयार करुन ठेवली नव्हती, असे दिसून येत आहे. अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत टळून गेल्यानंतरही परत सहा महिने इतका कालावधी व्यपगत होऊनही संबंधित नगरपरिषदेने स्वयंप्रेरणेने घोषित करावयाच्या माहितीसंदर्भात अशाप्रकारची उदासीनता दाखविणे, हे माहिती अधिकार अधिनियमामधील उद्दिष्टास छेद देण्यासारखे आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. अधिनियमातील अनिवार्य तरतुदींचे पालन विहित मुदतीत न करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विविध स्तरावर सहाय्य लागणार होते, अधिनियमातील कलम ५(५) मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे अधिकारी/कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी असे समजावे, अशी तरतूद आहे, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक अधिकारी व कर्मचारी हे निश्चितपणे जबाबदार ठरत आहेत, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब जिल्हाधिकारी, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक/अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती

त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना एकदा मनमाड ते नाशिक व परत आणि एकदा मनमाड ते औरंगाबाद व परत असा दोनदा प्रवास करावा लागला. जन माहिती अधिकारी यांनी जर अधिनियमातील विहित मुदतीमध्ये अपिलार्थीस माहिती दिली असती तर, त्यांना हा खर्च करावा लागला नसता. सदर नाहक खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची अपिलार्थी यांनी त्यांच्यावरील युक्तीवादामध्ये केलेली विनंती, हा खर्च अपिलार्थीस वृथा करावा लागल्याची खात्री पटल्यामुळे, आयोग मान्य करीत असून मनमाड ते नाशिक जाणे-येणे असे एकूण रु. ९०/- व मनमाड ते औरंगाबाद जाणे-येणे एकूण रु. २१०/-असे दोन्ही मिळून एकूण रु. ३००/- इतकी नुकसान भरपाई जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत अदा करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. सदर आदेश त्यांना आदेशित करण्यात येत आहे. सदर आदेश त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(ख) नुसार देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक/अधिकारी त्यांच्यावर जिल्हाधिकारी,नाशिक यांनी प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य

प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

४. अपिलार्थीस मनमाड नगरपरिषदेतर्फे नुकसानभरपाई रक्कम रु.३००/-हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अदा करण्यात यावी.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २३.०७.२००८** — **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हेमंत शंकरराव कवडे, 'जय योगेश्वर' वागदर्डी रोड,शिवाजीनगर नं.२ मनमाड ता. नांदगाव जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, मनमाड, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३९२

निर्णय दिनांक २४-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. योगेश अरविंद झांबरे,<br>राजयोग, शामा कॉम्लेक्ससमोर, गणपती<br>नगर, जळगाव | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी,<br>जळगाव | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,<br>बांभोरी, जळगाव | : | प्रतिवादी |
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | परीक्षा नियंत्रक, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,<br>बांभोरी, जळगाव |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. मधुकर मुकूंदराव पवार, जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मुकूंद वसंतराव बरिंदे, जन अपिलीय अधिकारी तथा

कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. योगेश अरविंद झांबरे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते २००६ या कालावधीशी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०३-२००६ रोजी दिलेल्या निर्णयासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. वरील अपिलीय अधिकारी यांचा निर्णयातील आदेश देतांना "मात्र ही निर्णय घेण्यातील चुक असू शकते व या प्राधिकरणाच्या मते अशी चुक अधिनियमाच्या सुरुवातीच्या काळात होणे शक्यही आहे", त्यांनी माहिती अधिकारातील कोणत्या कलमांचा आधार घेऊन सदरहू निर्णयाप्रत पोहोचून वरीलप्रमाणे माहीती अधिकारी श्री. बोरसे यांची पाठराखण केलेली आहे. त्याबाबतची माहिती अधिकारातील कलम व उपकलम याबाबतची सविस्तर माहीती नमुद करावी.

२. माहीती अधिकारी यांनी कळविलेनुसार माहीती मिळण्याकरीता मी दि. १२/०४/२००६ रोजी मनिऑर्डरने रक्कम रु. २२/- पाठविले असतांना ती परत पाठविली. माहिती अधिकारातील कोणत्या कलम / उपकलम / विद्यापिठाच्या नियमाच्या आधारे सदरहू मनिऑर्डर मला परत देण्यात आली त्या कलम / उपकलम / नियमाची सुस्पष्ट झेरॉक्स प्रत.

३. माहीती अधिकारातील कलमांन्वये शासनास सादर केलेल्या विद्यापिठात अस्तित्वात असलेल्या विद्यापिठातील अधिकार क्षेत्रानुसार असलेल्या ऑर्गनायझेशन चार्ट ची सुस्पष्ट झेरॉक्स प्रत. "

अपिलार्थीने सदर माहिती पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस या पत्राव्दारे दिलेली नाही असे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-६-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अपिलार्थीने दिनांक ०८-०७-२००६ अशी तारीख टंकलिखीत केलेली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीस दिनांक १९-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ बाबतची माहिती अद्यापही मिळाली नसल्याचे नमूद करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्दाम चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली आहे त्यामुळे ते शास्तीस पात्र झाले आहेत, असे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाशी संबंधित असल्याने अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत या पत्राव्दारे माहिती पुरविण्यात आली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे त्यांचे विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाशी संबधित असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०६-२००६ व १९-०७-२००६ रोजी उर्वरित मुद्दयावर माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने अशा प्रकारची मागणी यापूर्वी वेगळ्याने केली होती व त्यावेळी ती त्यांना पुरविण्यात आली होती. अपिलार्थीने या अपिलामध्ये उपस्थित केलेल्या २२ रुपये रक्कमेचा मुद्दा माहिती आयोगाने पूर्वी दिलेल्या अपील निर्णयामध्ये विचारात घेतला असून सदर रक्कम त्यांना परत करण्यात आली आहे व विद्यापीठाच्या कायद्यामध्ये आता दुरुस्ती करुन माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जापुरते, आवश्यक शुल्क, विद्यापीठ आता मनीऑर्डरव्दारे स्वीकारत आहे. अपिलार्थी हे वेगवेगळ्या अर्जाव्दारे एकाच प्रकारच्या माहितीची मागणी विद्यापीठाकडे करत असतात त्यामध्ये त्यांचा विद्यापीठाला त्रास देणे हाच एक हेतू आहे, त्यामुळे अपिलार्थीचे अपील नाकारण्यात यावे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाशी संबंधित होती. अपिलार्थीने केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये आदेश देतांना ‘‘मात्र ही निर्णय घेण्यातील

चुक असू शकते व या प्राधिकरणाच्या मते अशी चूक अधिनियमाच्या सुरुवातीच्या काळात होणे शक्यही आहे", असे नमूद केले आहे. येथे असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये त्यांचे जे मत व्यक्त केले आहे ते मत कायद्याच्या कोणत्या आधारे त्यांनी व्यक्त केले आहे याची माहिती अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात हवी आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन अपिलीय अधिकारी यांची भूमिका एका अर्धन्यायिक प्राधिकरणाची असून त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला पटेल अशा तर्कांचा व उपलब्ध कागदपत्रांचा, कायद्याचा व नियमाचा आधार घेऊन त्यांनी निर्णय देणे हे सर्वसाधारण परिस्थितीत अपिल निर्णयामध्ये अभिप्रेत आहे. त्यांनी या निर्णयामध्ये व्यक्त केलेले मत हे त्यांचे स्वतःचे आहे व अशा प्रकारचे मत निर्णयामध्ये व्यक्त करणे हा त्यांचा वैयक्तीक अधिकार आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या मत व्यक्त करण्याने अधिनियमातील कोणत्याही तरतुदींचा भंग झाला आहे, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे त्यांनी दिनांक १२-०४-२००६ रोजी मनीऑर्डरने रक्कम रुपये २२ पाठविली असता ती विद्यापिठाच्या कोणत्या नियमाव्दारे परत करण्यात आली त्या नियमांची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाने त्यांच्या प्रशासकीय सोईकरिता मनीऑर्डरच्या स्वरुपात रोख रक्कम न स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता व त्याप्रमाणे त्यांनी दिनांक २८-०९-२००५ रोजी हेड पोस्ट मास्तर, हेड पोस्ट ऑफिस, जळगाव यांना कळविले होते. या पत्राची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १९-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविली होती. विद्यापिठाने अपिलार्थीस मनीऑर्डर परत करण्याचा घेतलेला तत्कालीन निर्णय जरी वादातील नसला तरी त्यांनी तो कशाच्या आधारे घेतला याची माहिती त्यांनी दिनांक १९-०७-२००६ रोजी अपिलार्थीस दिली आहे. सद्यतस्थितीत राज्य माहिती आयोगाने यापूर्वी एका प्रकरणात दिलेल्या निर्णयानुसार, विद्यापीठ प्रशासनाने त्यांच्या नियमामध्ये आता

बदल केला असून संबंधित विद्यापीठ माहिती अधिकार अधिनियमाशी संबंधित बाबींवर माहिती देण्यापोटीचे शुल्क मनीऑर्डरच्या स्वरुपात स्वीकारत आहे, हे पाहता अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ चे निराकरण होण्यास हरकत नसावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०६-२००६ रोजी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये पुरविली असल्यामुळे या मुद्दयावर आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाचे वरील विश्लेषण पाहता, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयावर एक प्रकारे काही बंधने घालण्याचा अप्रत्यक्षपणे प्रयत्न केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांना एक अर्धन्यायिक प्राधिकरण म्हणून अधिनियमाव्दारे दिलेली मान्यता पाहता, अपिलार्थीस या प्रकारचे जन अपिलीय अधिकारी यांचे अभिप्राय व इतर माहिती विचारणे अनुज्ञेय होत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक १ ची माहिती त्यांना देणे अपेक्षित नाही. मुद्दा क्रमांक २ व ३ चे वरीलप्रमाणे निराकरण झाले असल्यामुळे अपिलार्थीस आता कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्याचे बाकी रहात नाही, असे दिसून येत आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास हेतूपूर्वक विलंब लावल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही, मात्र त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती देण्यासाठी विलंब लावल्याचे दिसून येत आहे, तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये माहिती देण्याचे अभिप्रेत असतांना या घटनेतील सर्व पत्रव्यवहार जन अपिलीय अधिकारी यांच्या सहीने हाताळला गेला आहे ही विद्यापिठाव्दारे झालेली चूक आहे. येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर अर्जदारास देय माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करुन देण्यात यावी व अपिलार्थीस त्यांच्या प्रथम

अपिलावरील निर्णय जन अपिलीय अधिकारी यांच्या सहीने पाठवावा असे विद्यापिठ प्रशासनास सूचित करण्यात येत आहे.

या घटनाक्रमामधील वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर व सर्व टप्प्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुद्दामहून व हेतूपुरस्सर चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पाठवली असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे हा अपिलार्थीचा मुद्दा, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. विद्यापीठ प्रशासनाने येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमान्वये त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या माहिती च अपिल अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीअन्वये कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. योगेश अरविंद झांबरे, राजयोग, शामा कॉम्लेक्स समोर, गणपती नगर, जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३९३

निर्णय दिनांक २४-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विवेक नारायण पाटील,<br>संपादक सा. पूर्व खान्देश,<br>बाहेरपुरा, राजे संभाजी चौक, अमळनेर,<br>जिल्हा जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>धरणगाव तालुका कृषि कार्यालय,<br>धरणगाव, जिल्हा जळगाव | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, धरणगाव,<br>जिल्हा जळगाव | : | प्रतिवादी |
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धरणगाव तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विवेक नारायण पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. चुडामन गंगाराम वलीकार, जन माहिती अधिकारी

तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धरणगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धरणगाव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ मध्ये धरणगाव तालुक्यात रोजगार हमी योजने अंतर्गत मातीनाला बांध करण्यात आला त्यावेळी दहीदुले व निंभोरा शिवारात केलेल्या कामासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> धरणगांव तालुक्यात दहिदुले शिवारात ८ माती नाला बांध व निंभोरा शिवारात ३ माती नाला बांध तयार करण्यात आले असून त्या बांधाच्या इस्टीमेंट नकला व मजूरांच्या हजेरी मस्टरच्या नकला तसेच त्या कामांवर कोणकोणते अधिकारी, कृषि सहय्यक, कृषी पर्यवेक्षक व कर्मचा-यांचे नियंत्रण होते त्याचे नाव व हुद्दा, सर्व काम पूर्ण झाले आहे किंवा कसे याची सर्व माहिती व नकला त्वरीत मिळाव्यात. कोणतेही कारण न देता त्वरीत नकला मिळाव्यात सदरचा अर्ज माहितीचा अधिकार २००५ च्या आधारे देत आहे नकलांची शासकीय फी भरण्यास तयार आहे.”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, त्यामध्ये अपिलार्थीने केलेल्या अर्जामध्ये त्यांना सदर माहिती कोणत्या कामासाठी पाहिजे, याचा सविस्तर खुलासा सादर केला नसल्याच्या कारणावरुन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, तसेच या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमाखाली वारंवार अर्ज करुन त्यांना हेतूपुरःस्सर त्रास देण्याचा ते प्रयत्न करत असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आणले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-११-२००६ रोजी प्रथम अपील करुन त्यामध्ये त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे हेतूपुर:स्सर टाळाटाळ करत असल्याचे नमूद केले आहे व माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन केल्याप्रीत्यर्थ संबंधितावर दिनांक २५-०९-२००६ पासून प्रत्येक दिवसाला रुपये २५० इतकी शास्ती लावण्याची त्यांनी या अपिलामध्ये मागणी केली आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-११-२००६ रोजी पत्र देऊन माहिती अधिकारी तालुका कृषि अधिकारी कायार्लय धरणगाव हे नकला देण्यास हेतूपुर:स्सर टाळाटाळ करत असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे खोडून टाकले व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ व वेळेअभावी सदर प्रकरणी अपिलार्थीस नकला देता येणे शक्य होणार नाही, परंतु त्यांच्या कार्यालयात समक्ष जाऊन दप्तराची पाहणी करण्याचे त्यांनी अपिलार्थीस सुचविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधितांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची मागणी केल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात दिनांक १९-०७-२००८ रोजी आयोगास दिले आहे. अपिलार्थीच्या लेखी निवेदनाचे अवलोकन करता त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस नकला दिल्या नाहीत, सदर नकला दडवून ठेवल्या व संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केला असल्याने त्यांना दंडनीय शास्ती करण्याची व मागणी केलेल्या सर्व नकला त्वरीत विनामूल्य मिळण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचे कार्यालय ५/२००५ पासून अस्तित्वात झाले असल्यामुळे त्यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पुरेसा कर्मचारीवृंद उपलब्ध नव्हता. अपिलार्थीने केलेल्या दुस-या एका तक्रार अर्जाच्या कामी अपिलार्थीने मागणी केलेले मस्टर्स जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक ०७-१०-२००५ रोजी सादर केले होते. सदर मस्टर्स त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिनांक ३०-११-२००६ रोजी परत करण्यात आले आहेत, त्यांच्या कार्यालयातील रिक्त जागा पूर्णतः भरल्या गेल्या नसल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती वेळेत पुरविता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक २५-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने धरणगाव तालुक्यातील दहीदुले व निंभोरा शिवारातील माती नाला बांधाच्या कामाचे नकाशे, अंदाजपत्रके, कामाची सद्यःस्थिती, मस्टरच्या झेरॉक्स प्रती व संबधित अधिका-यांची नांवे एवढीच मर्यादित स्वरुपाची माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या अर्जाप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांची सुरुवातीपासूनच मानसिकता नव्हती, असे त्यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक ०७-१०-२००६ रोजीच्या पत्रावरुन सिध्द होते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना माहिती कशासाठी हवी आहे याचा सविस्तर खुलासा त्यांनी सादर केला नसल्याचे म्हटले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (२)

मधील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना सदर माहितीचे कारण कळविणे अभिप्रेत नाही, किंबहुना माहिती अधिकार अधिनियमाचे हेच वैशिष्ट्य आहे व या वैशिष्ट्याचा वेगवेगळी व्यासपीठे व वेगवेगळ्या प्रसिध्दी माध्यामाव्दारे बराच बोलबाला झाला आहे, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे माहिती मागविल्यास सदर माहितीचे कारण अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना देणे हे त्यांच्याकडून बंधनकारक नाही ही सर्वश्रूत बाब जन माहिती अधिकारी यांना माहीत नव्हती हे केवळ अविश्वासनीय आहे, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने केलेल्या तक्रारीवरुन जिल्हाधिकारी कार्यालयाने, त्यांना मागणी केलेल्या माहितीमधील काही माहिती (मस्टर्सच्या प्रती) जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून दिनांक ०७-१०-२००५ रोजी हस्तगत करुन घेतल्या होत्या त्यामुळे या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नकाशा, अंदाजपत्रकांच्या प्रती, संबंधित अधिका-यांची नांवे व कामाची सद्य:स्थिती एवढी माहिती तरी किमान अपिलार्थीस पुरविणे त्यांच्या दृष्टीने फार अवघड बाब होती असे नाही, परंतु त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारे सकारात्मक कार्यवाही केलेली नाही. अर्जदाराने मागणी केलेली माहिती संबंधित प्राधिकरणाकडे उपलब्ध नसल्यास कशा प्रकारे कार्यवाही करावयाची याचे सुस्पष्ट विवेचन माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ६ (३) (एक) मध्ये केलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे जरी पाठवून दिला असता व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली असती तरी त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित कार्यवाही त्यांना अधिनियमातील विहित मुदतीत पार पाडता आली असती, तथापि अशाही प्रकारची कार्यवाही त्यांनी या टप्प्यावर केली नाही. जिल्हाधिकारी, जळगाव यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील संबंधित मस्टर्सच्या प्रती त्यांच्या कार्यालयास दिनांक ३०-११-२००६ रोजी पुरविल्या, तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती

देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे अथवा यासंदर्भात कधीही संबंधितांकडे पाठपुरावा केल्याचे आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाकडे अपिलार्थीने अपिल केल्यानंतर व शासन स्तरावरुन अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात सूचना प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्यासंदर्भात कोणतीही सकारात्मक कार्यवाही कधीही केल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन, दिसून येत नाही.

वरील संपूर्ण घटनाक्रम पाहिला असता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा, या ना त्या कारणास्तव अपिलार्थीस माहिती न देण्याकडे कल झुकल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देण्याची कारणे काहीही असोत, विशेषतः त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध कर्मचारी संख्या अपुरी होती असे त्यांच्या युक्तिवादामध्ये म्हटले आहे, तथापि त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कधीही कोणतेही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आढळून येत नाही. आज रोजी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ते विनामूल्य देण्यास तयार आहेत. हीच कार्यवाही त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अथवा त्योग्य त्यावेळी केली असती तर व जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या अपील अर्जाचा अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे सकारात्मक विचार केला असता तर कदाचित अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे हे व्दितीय अपील करावे लागले नसते. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस इतक्या प्रदीर्घ कालावधीने माहिती न देण्याचे कोणतेही समर्थनीय कारण आता उरत नाही. अशा प्रकारे कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे येथे नि:संशयपणे सिध्द होत आहे. आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५

(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जे संबंधीत सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित सहाय्यक / कर्मचारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपासून त्यांना कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रुपये २५००० /- (पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जळगाव यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल सप्टेंबर २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यंत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली भूमिका आयोगास संशयास्पद वाटत आहे, याची आयुक्त, कृषि, पुणे यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपासून त्यांना कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निकालपत्रात विवेचन केल्याप्रमाणे करावा.

४. सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जळगाव यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील असे पहावे.

५. वरील क्रमांक ४ च्या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जळगाव यांनी सप्टेंबर २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम

शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विवेक नारायण पाटील, संपादक सा. पूर्व खान्देश, बाहेरपुरा, राजे संभाजी चौक, अमळनेर, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धरणगाव तालुका धरणगाव, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धरणगाव, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, प्रशासकीय इमारत, आकाशवाणी शेजारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३९४

निर्णय दिनांक २४-०७-२००८

श्री. पंढरीनाथ बाबूराव बोडके, : अपिलार्थी
मु. मोह, पो. चिंचोली, तालुका सिन्नर,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा शल्य चिकित्सक,
नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालय,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा शल्य चिकित्सक,
नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालय,
नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. पंढरीनाथ बाबूराव बोडके, (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. उध्दव किसन शिरसाट, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. आसाराम दादासाहेब भालसिंग, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००५ ते १३-०९-२००६ या कालावधीशी संबंधित त्यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या रुग्णांना नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यापासून ते त्यांना डिसचार्ज देऊन घरी सोडविण्याच्या कालावधीपर्यंतच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

| “ क्र. | नांव | वय | एमएलसी नं. | केस नोंदणी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | रविंद्र यशवंत धात्रक | २३ | ४६२९/०५ | १६९६५ |
| २ | सुरेश बळवंत धात्रक | २५ | ४६३०/०५ | १६९६६ |
| ३ | रमेश रघुनाथ धात्रक | ३१ | ४६३३/०५ | १६९६७ |
| ४ | योगेश दत्तात्रय धात्रक | २२ | ४६३६/०५ | १६९६८ |
| ५ | शरद रघुनाथ धात्रक | २५ | ४६३४/०५ | १६९६९ |

वरील रुग्ण हे सर्वजण मु. पो. उमराळे, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील रहिवासी असून ह्या सर्वांना दि. १२/६/२००५ रोजी नाशिक जिल्हा रुग्णालयात अपघात विभागामध्ये दाखल केले होते व दिनांक १३/६/२००५ रोजी त्यांना सर्वांना डिस्चार्ज देऊन घरी सोडण्यात आले. त्यासंबंधीच्या बाबत आपण रुग्णांना दाखल करतेवेळेस त्यांच्याकडून उपलब्ध झालेली माहिती आपण केलेले औषधोपचार व विविध चाचण्या त्याच प्रमाणे घरी सोडण्याकरिता केलेली आपली कारवाई इत्यादी ह्या संबंधीची इत्यंभूत सविस्तर माहिती.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी रुपये ६४ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरुन सदर माहिती हस्तगत करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०९-११-२००६ रोजी ६४ रुपये इतक्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करुन संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेतली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०९-११-२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०३-११-२००६ च्या पत्राच्या स्थळप्रतीवर पोचसही दिल्याचे दिसून येते. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या दिनांक २५-१२-२००६ रोजी दिलेल्या अर्जाची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत दिली नसल्याचे म्हटले आहे व आपल्या व्दितीय अपील अर्जासोबत स्वत:च्या दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत जोडली आहे.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी आयोगाकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केल्यानंतरही त्यांच्याशी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ०९-११-२००६ रोजी, सदर माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये ६४ इतके त्यांच्या कार्यालयात भरल्यानंतर प्राप्त झाली आहे. सदर माहिती त्यांना आता जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असली तरी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळा अर्ज करावा लागला व बराच प्रयत्न करावा लागला.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सर्वसाधारणतः त्यांच्याकडे एखादा रुग्ण इस्पितळात दाखल झाल्यानंतर तो त्यांच्या कार्यालयातून सोडून जाईपर्यंत एक विशिष्ट कार्यपध्दती अवलंबिली जाते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात ज्या रुग्णांसंबंधी माहिती विचारली आहे, ते सर्व रुग्ण मेडिकोलिगल (न्यायवैद्यकीय प्रकरणाशी संबंधित असलेले) असे होते. संबंधित रुग्ण त्यांच्या सिन्नर येथील गावात झालेल्या मारामारीच्या प्रकरणाशी संबंधित असल्याने व सदर प्रकरण पोलीसात गेले असल्यामुळे, त्यांना न्यायवैद्यकीय प्रकाराशी संबंधित असे म्हणता येईल. संबंधित रुग्णांनी नगरपरिषद, सिन्नर येथे प्राथमिक उपचार घेतले व नंतर नगरपरिषदेकडील वैद्यकीय अधिका-याने सूचना दिल्यानुसार त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. हे रुग्ण त्यांच्या रुग्णालयामध्ये दिनांक १२-०६-२००५ रोजी भरती झाले. भरती झाल्यानंतर संबंधित डॉक्टरने या रुग्णांची तपासणी करुन त्यांच्यावर योग्य ते औषधोपचार केले व नंतर दिनांक १३-०६-२००५ रोजी त्यांचे रुग्णालयात मेडिकोलिगल प्रमाणपत्र करण्यात आले. रुग्ण शासकीय रुग्णालयात दाखल झाल्यानंतर प्रत्येक रुग्णाचा एक वेगळा केसपेपर

तयार केला जातो व त्यामध्ये रुग्णाची दाखल होतानाची तत्कालीन स्थिती मेडिकोलिगल रजिस्टरमध्ये नोंद केली जाते व तदनंतर त्यांना मेडिकोलिगल सर्व्हिस दिली जाते व त्याचबरोबर प्रत्येक रुग्णाला रुग्णालयातून सोडतांना डिसचार्ज कार्ड दिले जाते. या कार्डावर रुग्णाला करण्यात आलेल्या सर्व उपचारांची नोंद असते. उपरोक्त प्रकरणी तत्कालीन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-११-२००६ रोजीच्या अपील अर्जावर सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही, तथापि त्याची कारणे त्यांना आता सदर अधिकारी तेथे कार्यरत नसल्याने सांगता येत नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील संबंधित रुग्णांच्या प्रत्येक टप्प्यावरील माहिती अपिलार्थीस दिनांक ०९-११-२००६ रोजी सशुल्क पुरविण्यात आली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दिनांक ०३-११-२००६ रोजी तयार करुन ठेऊन ती अपिलार्थीस त्यांनी ६४ रुपये इतके माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरल्यानंतर दिली आहे. पूर्वीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे संभवत नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जामध्ये त्यांनी दिनांक २५-१२-२००६ च्या अर्जाचा संदर्भ दिला आहे, तथापि त्यांनी या अर्जासोबत दिनांक ०५-१०-२००६ रोजीचा याच जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अर्ज जोडला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्याने व ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

सबब वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील

प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंढरीनाथ बाबूराव बोडके, मु. मोह, पो. चिंचोली, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४६७, १४६८, १४६९, १४७०, १४७१, १४७२, १४७३, १४७४, १४७५, १४७६ व १४७७

निर्णय दिनांक   २४-०७-२००८

१ श्री. रऊफ एन. पटेल, : अपिलार्थी
पटेल प्रोव्हिजन्स, प्रियदर्शनी इंदिरानगर,
गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
सा. प्र. विभाग, जिल्हा परिषद,
औरंगाबाद
(अपील क्रमांक १४६७/०७)

२ जन माहिती अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
महिला व बालकल्याण विभाग,
जिल्हा परिषद, औरंगाबाद
(अपील क्रमांक १४६८/०७)

३ जन माहिती अधिकारी

तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद
(अपील क्रमांक १४६९/०७)

४ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता (सिंचन),
जिल्हा परिषद, औरंगाबाद
(अपील क्रमांक १४७०/०७)

५ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा
विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद
(अपील क्रमांक १४७१/०७)

६ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, औरंगाबाद
(अपील क्रमांक १४७२/०७)

७ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद
(अपील क्रमांक १४७३/०७)

८ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

(अपील क्रमांक १४७४/०७)

९ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, यांत्रिकी विभाग, जिल्हा

परिषद, औरंगाबाद

(अपील क्रमांक १४७५/०७)

१० जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद, औरंगाबाद

(अपील क्रमांक १४७६/०७)

११ जन माहिती अधिकारी

तथा समाजकल्याण अधिकारी,

जिल्हा परिषद, औरंगाबाद

(अपील क्रमांक १४७७/०७)

१२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची एकत्रित सुनावणी आज दिनांक २४-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रऊफ एन. पटेल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. संतोष वि. कवडे, जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सा. प्र. विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी क्रमांक १ असे संबोधण्यात येईल), श्री. सी. डी. बनसोडे, जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक २ असे संबोधण्यात येईल), श्री. बी. डी. दळवी, जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ३ असे संबोधण्यात येईल), श्री. एम. देवेंद्र आप्पा, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ४ असे संबोधण्यात येईल), श्री. एम. एच. मडामे, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ५ असे संबोधण्यात येईल), श्री. बी. डी. तोडकरी, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ६ असे संबोधण्यात येईल), श्री. जी. एस. सुसर, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ७ असे संबोधण्यात येईल), श्री. श्रीकांत कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ८ असे संबोधण्यात येईल), श्री. एम. आर. लाड, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, यांत्रिकी विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ९ असे संबोधण्यात येईल), श्री. डी. टी. खेडकर, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक १० असे संबोधण्यात येईल), श्री. एस. ई. जाधव, जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक ११ असे संबोधण्यात येईल) व श्री. अरुण ल. डुबे, अतिरिक्त मुख्य

कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी क्रमांक १ ते ११ यांच्याकडे सन २००६ ते ०७ या कालावधीतील कर्मचा-यांच्या बदल्यासंदर्भात एकूण ५ मुद्दयांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. १/४/२००७ रोजी कार्यरत संवर्गनिहाय कर्मचा-यांची संख्या.

२. मंजुर पदे, रिक्त पदे, भरलेली पदे, पद रिक्त राहण्याचे सक्षम कारण.

३. ३ वर्षावरील बदलीपात्र संवर्गनिहाय कर्मचा-यांची संख्या, १० वर्षावरील बदलीपात्र संवर्गनिहाय कर्मचा-यांची संख्या, १५ वर्षावरील बदलीपात्र संवर्गनिहाय कर्मचा-यांची संख्या.

४. १० व १५ वर्ष एकाच ठिकाणी कर्मचा-याला कार्यरत ठेवण्याचे सक्षम कारण.

५. कार्यालय प्रमुखांना शासनाने बदलीचे अधिकार दिले असतांना सुध्दा आपल्याकडून त्या निकषाप्रमाणे बदल्या केल्या जातात का ?

उपरोक्त विषयी सविस्तर माहिती सत्य प्रतीत देण्यात यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी क्रमांक २ व ११ यांनी अधिनियमानुसार विहित केलेल्या मुदतीत म्हणजे, दिनांक ११-०४-२००७ रोजीच्या त्यांच्याकडील पत्रान्वये त्यांना माहिती पुरविल्याचे तर जन माहिती अधिकारी क्रमांक ७ यांनी त्यांच्या कडील दिनांक ०९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमानुसार विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन बदल्यासंदर्भातील माहिती

त्यांच्या अधिकार कक्षेत येत नसल्याचे त्यांना कळविले असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी क्रमांक १, ३, ६, ८ व ९ यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी क्रमांक ४ व १० यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अर्जास दिनांक २०-०४-२००७ रोजी अधिनियमानुसार विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अनुक्रमे रुपये १० व रुपये ८ भरणा करण्याबाबत त्यांना कळविले तर जन माहिती अधिकारी क्रमांक ५ यांनी अपिलार्थीस माहिती तयार असून ती त्यांच्या कार्यालयात येऊन हस्तगत करुन घेण्याबाबत त्यांच्या भ्रमणध्वनीवर दिनांक ०७-०४-२००७ रोजी संपर्क साधून कळविल्याचे व त्यानंतर दिनांक १२-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी तयार ठेवल्याचे दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी क्रमांक २, ७ व ११ यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व उर्वरित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०५-२००७ रोजी प्रत्येकी एक अशी एकूण ११ स्वतंत्र प्रथम अपीले केली.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०५-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १४-०६-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००७ रोजी प्रत्येकी एक अशी एकूण ११ स्वतंत्र व्दितीय अपीले केली आहेत. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०५-२००७ रोजी सुनावणी ठेवली असता फक्त दोनच विभाग प्रमुख सुनावणीस उपस्थित होते व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रशासनाची बाजू ऐकून एकतर्फी निर्णय दिला व सुनावणीमध्ये दिलेला आदेश त्यांनी शेवटी बदलला असे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या सर्व खातेप्रमुखांकडून त्यांच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांच्याकडील कर्मचा-यांच्या बदल्यासंदर्भात माहिती मागविली होती, तथापि त्यांच्या या अर्जास कोणत्याही खातेप्रमुखाने विहित मुदतीत प्रतिसाद दिला नाही त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी सुरुवातीला दिनांक ०५-०६-२००७ रोजी ठेवली होती, तथापि त्यांच्या विनंतीवरुन सदर सुनावणी दिनांक २८-०५-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतली. सुनावणीच्या वेळी २ खातेप्रमुख सोडून इतर कोणीही खातेप्रमुख सुनावणीस हजर नव्हते. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी एकूण २ मुद्दयावर आदेश दिले होते, त्यापैकी पहिला आदेश म्हणजे सर्व खातेप्रमुखांनी माहिती अधिकाराखाली मागितलेली माहिती दिनांक ३०-०५-२००७ पर्यंत त्यांना उपलब्ध करुन द्यावी हा होता व दुस-या आदेशाव्दारे त्यांनी सदर माहिती पुरविण्यामध्ये झालेल्या दिरंगाईबद्दल दोषी कर्मचा-यांवर कारवाई करण्याचे आदेशित केले होते, परंतु त्यांना प्रत्यक्षात प्राप्त झालेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती जिल्हा परिषदेच्या सर्व खातेप्रमुखांच्या

कार्यालयाबाहेर डकविण्यात आली तरी देखील सर्व खातेप्रमुखांनी त्यांना त्वरीत माहिती द्यावी असाच फक्त उल्लेख आहे. या आदेशामध्ये दोषी कर्मचा-यांवरील कारवाईचा उल्लेख नव्हता. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी दिलेले तोंडी आदेश व नंतर प्रत्यक्षात पारित करण्यात आलेले लेखी आदेश यामध्ये अशा प्रकारची विसंगती आहे. त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी या विषयासंदर्भातील नस्तीतील त्यांनी दिनांक २८-०५-२००७ रोजी दिलेल्या आदेशाच्या टिपणीची प्रत आयोगास दाखविली. अद्यापही त्यांना कार्यकारी अभियंता, (पाणीपुरवठा), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), उप अभियंता, यांत्रिकी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून माहिती अप्राप्त आहे. सदर माहितीची त्यांना आता आवश्यकता नाही.

आज सुनावणीच्या वेळी उपस्थित ११ जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे खालील प्रमाणे युक्तिवाद करण्यात आला.

१. जन माहिती अधिकारी क्रमांक १ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना दिनांक २९-०५-२००७ रोजी प्रत्यक्षतः पुरविली आहे. सदर माहिती देण्यासाठी त्यांना ३० दिवस इतका विलंब लागलेला आहे.

२. जन माहिती अधिकारी क्रमांक २ यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जास दिनांक ११-०४-२००७ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांना माहिती दिली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी क्रमांक ३ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पाठविली व अपिलार्थीस ती प्राप्त झाली आहे. सदर माहिती अपिलार्थीस ५१ दिवस इतक्या विलंबाने दिल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

४.	जन माहिती अधिकारी क्रमांक ४ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जास त्यांनी दिनांक २०-०४-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यासाठी सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केल्यानंतर त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ०८-०५-२००७ रोजी पुरविली आहे.

५.	जन माहिती अधिकारी क्रमांक ५ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीबद्दल दिनांक ०७-०४-२००७ रोजी अपिलार्थीस भ्रमणध्वनीवर संपर्क साधून माहिती तयार असल्याचे कळविले होते. अपिलार्थी न आल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडे दिनांक १२-०४-२००७ रोजी तयार करुन ठेवली होती व अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः मागितली असल्याने त्यांनी अपिलार्थीस पुन्हा दिनांक १४ व १६-०४-२००७ रोजी दूरध्वनीवरुन संपर्क साधला व अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. अपिलार्थीस दूरध्वनी केल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयाचे दूरध्वनी बील दाखविले. तथापि सदर बिलावरुन त्यांनी अपिलार्थीस फक्त दिनांक ०७-०४-२००७ रोजी त्यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधल्याचे दिसून येते तथापि त्यांनी दिनांक १४ व १६०४-२००७ रोजी संपर्क साधल्यासंबंधी कोणताही लेखी पुरावा सादर केला नाही. यावरुन त्यांच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादावर अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २०-०४-२००७ व ०८-०५-२००७ रोजी व्यक्तिशः हजर झाले होते, तथापि त्यावेळी कार्यालयात संबंधित अधिकारी हजर नव्हते त्यामुळे त्यांना व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेता आली नाही. सदर माहिती अपिलार्थीस आजपावेतो मिळालेली नाही.

६.	जन माहिती अधिकारी क्रमांक ६ कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२००७ च्या

अर्जासंदर्भातील माहिती त्यांना त्यांच्याकडील दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३१-०५-२००७ रोजी प्रत्यक्षतः हस्तांतरीत केली आहे.

७. जन माहिती अधिकारी क्रमांक ७ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील माध्यमिक शिक्षकांच्या बदल्या या संबंधित संस्था करत असल्याने व त्यांच्या कार्यालयातील बदल्या जिल्हा परिषदेकडील सामान्य प्रशासन विभाग करत असल्याने ही बाब त्यांच्या अधिकारकक्षेत येत नाही.

८. जन माहिती अधिकारी क्रमांक ८ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन नंतर त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस १९६ रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात या माहितीपोटी भरण्याचे सूचित केले आहे. तथापि यासंदर्भातील संबंधित कागदपत्रांच्या प्रती आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये आढळून येत नाहीत. परंतु यांच्याकडील दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी सदर माहिती अपिलार्थीस प्रत्यक्ष हस्तांतरीत केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते.

९. जन माहिती अधिकारी क्रमांक ९ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या प्रथम अर्जासंदर्भातील माहिती त्यांनी दिनांक २७-०४-२००७ रोजी त्यांच्याकडे तयार करुन ठेवली होती, तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित न राहिल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही, त्यामुळे अपिलार्थीची वाट पाहून त्यांनी दिनांक ३०-०५-२००७ रोजी म्हणजेच जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस

माहिती तयार असल्याचे कळविले, तथापि सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात हजर झाले नाहीत.

१०. जन माहिती अधिकारी क्रमांक १० यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक २०-०४-२००७ रोजी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला होता व या पत्रामध्ये त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८ इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले होते, तथापि अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्या कार्यालयाकडे न भरल्यामुळे त्यांनी सदर माहिती अपिलार्थीस पुरविली नाही.

११. जन माहिती अधिकारी क्रमांक ११ यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी प्रतिसाद देऊन त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती दिलेली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्या तोंडी व लेखी अपील आदेशातील विसंगतीची कारणे आता स्पष्ट करता येणार नाहीत कारण आयोगासमोर उपस्थित असलेले जन अपिलीय अधिकारी हे नवीन नेमणूक झालेले अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत तर आदेश देणारे जन अपिलीय अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्दयांवर त्यांच्या कार्यक्षेत्रातील कर्मचा-यांच्या बदल्यसंदर्भात सन २००६-०७ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. या ५ मुद्दयावरील अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील अंशतः, मुद्दा क्रमांक ४ व ५ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट

केलेल्या ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही.  अधिनियमातील कलम २ (च) मध्ये माहिती या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

<u>कलम २ (च)</u>

‘‘ ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. ’’

वरील व्याख्येचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांची भूमिका लक्षात येते.  माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका ही एका विश्वस्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे ते विश्वस्त असतात.  अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देणे या अधिनियमातील दोन्ही विहीत प्रक्रियांमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना कारणे विचारणे, अथवा त्यांच्या एखाद्या कृतीबद्दल, निर्णयाबद्दल सदर बाब नियमाप्रमाणे आहे काय, असे त्यांचे अभिप्राय वा खुलासा अपेक्षित करणारी माहिती त्यांनी विचारणे येथे अभिप्रेत नाही.  या प्रकरणी अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २ मधील अंशतः, मुद्दा क्रमांक ४ व ५ व्दारे अशा प्रकारची माहिती विचारली असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती देय होत नाही.  मात्र उर्वरित मुद्दा क्रमांक १,३ व २ अंशतः या मधील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देय ठरते.  या प्रकरणी येथे असे लक्षात घेतले पाहिजे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असता सदर माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून

विहित मुदतीत प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही अपिलार्थीची असते. त्याकरिता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे स्वतः हजर राहणे, (कोणीही प्रतिनिधी न पाठविता) जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेणे, हे ‘‘व्यक्तिशः’’ या संज्ञेमध्ये अभिप्रेत आहे. याच बरोबर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर होऊनही त्यांना त्यांच्याकडून माहिती उपलब्ध होऊ शकली नाही तर त्यांच्या या कार्यालयाच्या प्रत्येक भेटीची नोंद त्यांनी संबंधीत कार्यालयाकडे व स्वतःकडे ठेवणे गरजेचे आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी तोंडी व लेखी दिलेल्या त्यांच्या अपील निर्णयावर प्रामुख्याने आक्षेप नोंदविले आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जात दर्शविलेले आक्षेप योग्य आहेत असे आयोगास आढळून आले आहे. हे पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जासंबंधात दिलेल्या निर्णयामधील विसंगती सिध्द होत आहेत. किमान जन अपिलीय अधिकारी या अर्धन्यायिक प्राधिकरणाने अशा प्रकारच्या विसंगती त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये राहणार नाहीत याची पुरेपूर दक्षता घेतली पाहिजे. परंतु दुर्दैवाने आयोगास या प्रकरणी तसे घडल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे म्हटल्यास ते फारसे वावगे होणार नाही.

या प्रकरणामध्ये अपिलार्थीने एकूण ११ जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकाच प्रकारची माहिती मागितली होती. या ११ जन माहिती अधिका-यांपैकी अपिलार्थीस सहा (जन माहिती अधिकारी क्रमांक २, ४, ५, ७, १० व ११) जन माहिती अधिका-यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे उर्वरित पाच (जन माहिती अधिकारी क्रमांक १, ३, ६, ८ व ९) जन माहिती अधिका-यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयानंतर देखिल जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्यासंदर्भात उदासिनता दर्शविली गेली असल्याचे दिसून येत आहे, त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीने त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जे संबंधीत अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे हे पाहता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रतिसाद न दिलेल्या संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तदनंतर १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना आता माहितीची आवश्यता नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची अपीले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १४६७/०७, १४६८/०७, १४६९/०७, १४७०/०७, १४७१/०७, १४७२/०७, १४७३/०७, १४७४/०७, १४७५/०७, १४७६/०७ व १४७७/०७ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच २ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तदनंतर १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-०७-२००८ — राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. रऊफ एन. पटेल, पटेल प्रोव्हिजन्स, प्रियदर्शनी इंदिरानगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सा. प्र. विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, यांत्रिकी विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२ जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५ निर्णय नस्ती.

**ाज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३९८

निर्णय दिनांक : २५.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मनोज निंबाजी हिवरकर,<br>रा.ककोडा ता.मुक्ताईगर जि.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक वनसंरक्षक (भ. व का.)<br>वन विभाग, जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपवनसंरक्षक,<br>जळगाव वन विभाग, जळगाव | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. मोहमद फहीम महेमूद, जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (भ. व का.), वन विभाग,जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. पद्माकर नारायण भामरे, जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, जळगाव वन विभाग, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. मनोज निंबाजी हिवरकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२०.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये सन २००० ते २००७ या कालावधीमधील वडोदा येथील वन क्षेत्राशी संबंधित एकूण तीन मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) वटोडा येथील वनक्षेत्रपाल जि.राम. सूतार हे सन २००० पासून मुख्यालयी सतत गैरहजर असतांना त्यांना दरमहीन्यास पगार कसा काय देण्यात आला. त्या बाबत उपवनसंरक्षक भामरे सो.यांचा खुलासा व त्या संर्दर्भातील कागदपत्रे

२) तसेच वटोडा वनक्षेत्रपाल जि.राम. सूतार हे हल्ली का सुटटीवर आहेत. त्यांची सुटटी कोणत्या नियमांतून मंजूर करण्यात आली या बाबतचा तपशील व त्या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती व त्यांच्या सुटटीच्या विनंती अर्जाची नक्कल तसेच समंधीत वनक्षेत्रपालाची सुटटी मंजूर करणाऱ्या सक्षम अधीकाऱ्याने सदर वनक्षेत्रपाल यांनी ज्या कारणाने सुटटी मंजूर केली असल्यास त्या बाबतच्या चौकशीची सर्व कागदपत्रे व सुटटी मंजूरीच्या पत्राची नक्कल. तसेच सुटटीच्या कालावधीत त्यांनी पगार घेतलेला असल्यास त्याचा तपशील.

३) जि.राम. सूतार वनक्षेत्रपाल यांनी सूटटी घेतल्या नंतर तेथील चार्ज कोणास दिला. तेथील चार्ज जवळपासच्या वनक्षेत्रपाल यांना न देता सदरचा चार्ज घेतलेल्या अधीकाऱ्यालाच का चार्ज दिला गेला याबाबत मा.भामरे सो. उपवनसंरक्षक यांचा अहवाल. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.अपिलार्थीस सदर पत्र

त्यांनी त्यांच्याकडील ५०२ या क्रमांकाने पाठविल्याचे दिसून येते, मात्र सदर पत्र अपिलार्थीस प्रत्यक्षतः कधी पाठविले, याची नोंद त्यांनी आयोगास सादर केलेल्या मुद्रांकवहीच्या नोंदवहीवर झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या या नोंदवहीच्या झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येत नाही. यानंतर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे २६.३.२००७ रोजी याच माहितीसंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दि. २५.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ५.५.२००७ रोजी पारित केले आहेत. सदर आदेश त्यांनी त्यांच्याकडील क्र. ४८५ च्या पत्राद्वारे पाठविल्याचे दिसून येते. मात्र आयोगाने पूर्वसूचना देऊनही सदर आदेश अपिलार्थीस पाठविल्याचा पुरावा म्हणून त्यांनी त्यांच्याकडील जावक रजिस्टरच्या संबंधित पृष्ठाची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली नाही. मात्र त्यांनी उपरोक्त सुनावणीमध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १५.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये रु.३२/- इतके शुल्क त्यांच्याकडे भरण्याचे सूचित केल्याची नोंद आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचे आवश्यक ते शुल्क न भरल्याने अपिलार्थीचे अपील त्यांनी निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन अपिलीय अधिकारी यांनी नियमाप्रमाणे सुनावणी न घेता त्यांच्याशी अनावश्यक पत्रव्यवहार केला असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीन त्यांच्या दि. २०.२.२००७ रोजी केलेल्या अर्जास त्यांनी अधिनियमातील विहित मुदतीत दि. १५.३.२००७ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३२/- त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात न केल्याने अपिलार्थीस त्यांना ही माहिती पुरविता आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दि. २५.४.२००७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर होते. त्यावेळी त्यांनी आवश्यक ते शुल्क रु. ३२/- हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणेसंबंधी त्यांना अवगत केले होते. तथापि त्यानंतरही अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचा सदर दि. ५.५.२००७ रोजीचा अपिलावरील निर्णय पारित होईपर्यंत अपिलार्थीने त्यांच्याकडे शुल्क भरले नव्हते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २६.३.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २५.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्यासंबंधीचे आदेश दि. ५.५.२००७ रोजी पारित केले आहेत. अपील निर्णय पारित करेपर्यंत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठीचे शुल्क भरले नाही. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, अपिलार्थी हे त्यांना देण्यात आलेले टपाल कधीही स्वीकारत नाहीत, अशाप्रकारचा अनुभव त्यांना वेगवेगळया वेळी, अपिलार्थीने केलेल्या वेगवेगळया अर्जासंदर्भातील पत्रव्यवहारांमध्ये आलेला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने केलेल्या दि. २०.२.२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.३.२००७ रोजीच्या प्रथम पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटीचे रु. ३२/- इतके शुल्क भरण्याचे कळवून आवश्यक तो प्रतिसाद दिला आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस नेमक्या कोणत्या तारखेस पाठविण्यात आले, याचा पुरावा त्यांना आज आयोगासमोर सादर करता आला नाही, तसेच

या पत्रामध्ये त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(३) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या माहितीची एकूण पृष्ठ संख्या व ही माहिती पुरविण्यासाठी प्रतिपृष्ठ दर हा तपशील कळविलेला नाही. या पत्रामध्ये त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थीस पोस्टेज खर्च रु.१०/- इतके भरण्याचे सूचित केले. या सर्व कारणांवरुन जन माहिती अधिकारी यांचे दि. १५.३.२००७ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील या मुद्यांचा विचार न करता, त्यांच्या दि. २५.४.२००७ रोजीच्या अपील निर्णयामध्ये अपिलार्थीस अप्रत्यक्षपणे रु.३२/- इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नसल्याने, अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्यांवर माहिती विचारलेली आहे. या मुद्यांचे अवलोकन करता यातील सर्व मुद्यांची अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहिती अंशतः 'माहिती' या शब्दाच्या अधिनियमातील व्याख्येशी सुसंगत आहे, तर उर्वरित काही माहिती या व्याख्येशी सुसंगत नाही. यापैकी मुद्दा क्र. ३ ची माहिती अपिलार्थीस देय नाही. कारण या मुद्याद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबाबत कारणे विचारली आहेत व त्यांच्याकडून खुलासे अपेक्षित केले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' देणे या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न अथवा खुलासे विचारणे व त्याचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील श्री. सुतार यांनी सन २००० ते २००७ या कालावधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेले रजेचे अर्ज, त्यांच्या पगारपत्रकाची प्रत, रजा मंजूरी आदेशाची प्रत इतकीच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते. जन माहिती अधिकारी यांचे दि. १५.३.२००७ रोजीचे पत्र वरील परिच्छेदामध्ये

वर्णिल्याप्रमाणे आयोगाने अवैध ठरविले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून ही माहिती हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थी यांनी हे आदेश निर्गमित होताच, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सात दिवसांच्या आत स्वतः, व्यक्तिशः उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती हस्तगत करुन घ्यावी. सदर माहिती अपिलार्थीच्या अधिकृत प्रतिनिधीस देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोज निंबाजी हिवरकर, रा. काकोडा, पो. कुऱ्हा ता.मुक्ताईनगर, जि. जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (भ.व का.) जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, जळगाव वन विभाग,आकाशवाणी चौक,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३९९

निर्णय दिनांक : २५.०७.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजू ओंकार शेवरे,<br>मु.पो. वडाळा-वडाळी ता.चाळीसगाव<br>जि.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, चाळीसगाव<br>जि. जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी,<br>पाचोरा, जि.जळगाव | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राजू ओंकार शेवरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) श्री. भगीरथ गिरीधर रौडे, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, चाळीसगाव, जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. गोपाळ रामदास दांडगे, उपविभागीय अधिकारी, पाचोरा विभाग, पाचोरा, जि.जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२९.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते २००६ या कालावधीतील केरोसीन व रेशन पुरविण्याबाबत खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" वडाळा गावाला २००० पासुन किती टक्के केरोसीन/रेशन वितरीत केले आहे. त्याचे वेळोवेळी बदललेले दर, प्रति युनिट रॉकेल किती मिळायला पाहीजे (रेशनिंग माल प्रत्येक महिण्याला प्राप्त झालेला कोटा, त्याचे भाव २००० ते आजपर्यंत (१५/७/२००६ ला अंत्योदय यादीची तक्रारीचे काय केले. नविन यादी तयार केली का नाही.) "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेख कक्षात उपलब्ध करुन ठेवलेली असल्याने, अपिलार्थीस, शासन नियमाप्रमाणे नकलेच्या फीचा भरणा करुन त्यांनी सदर माहिती अभिलेख कक्षाकडून, परस्पर प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित केले. सदर पत्राची प्रत त्यांनी अभिलेखापाल यांना दिली असून त्यांनी अपिलार्थी यांच्याकडून शासन नियमानुसार नक्कल फी घेऊन त्यांना नक्कल देण्याचे आदेशित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.३.२००७ व २.४.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीने दि. १५.३.२००७ च्या सुनावणीच्या वेळी पुढची तारीख मागितली, त्यावरुन त्यांना दि. २.४.२००७ ही तारीख देण्यात आली, तथापि अपिलार्थी हे सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिले. या संदर्भात अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचे पत्र दि. ३.४.२००७ रोजी प्राप्त झाले असल्याने ते दि. २.४.२००७ रोजी सुनावणीस हजर राहू शकले नाहीत. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय पारित न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहिती अधिकार

अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.२.२००७ रोजी दिलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांचे लेखी म्हणणे दि. ३.४.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केले होते. तथापि त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला नाही. अपिलार्थी यांच्यातर्फे पुढे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये प्रथमतः रु.९०/- इतके शुल्क व तद्नंतर रु. ८.४० असे एकूण रु.९८.४० माहितीपोटी भरल्यानंतर त्यांना एकूण तीन टप्प्यात माहिती देण्यात आली. त्यापैकी प्रथमतः दि. २१.२.२००७ रोजी व नंतर ३.५.२००७ रोजी व अंतिमतः कधी माहिती देण्यात आली, याची तारीख त्यांना निश्चितपणे सांगता येणार नाही, कारण शेवटची माहिती प्राप्त झाल्याची तारीख त्यांना आठवत नाही व सदर माहिती संबंधितांकडून साक्षांकित करुन देण्यात आलेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट आहे, कारण त्यांनी मूळ अर्जामध्ये रॉकेल व रेशन संदर्भात माहिती मागितली असता त्यांना अभिलेख कक्षाद्वारे फक्त रॉकेलच्या संदर्भातील माहिती देण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. २६.४.२००८ पासून कार्यरत आहेत.अपिलार्थीने अर्ज करतेवेळी श्री. शशीकांत मंगरुळे (सध्या तहसीलदार, सिन्नर म्हणून कार्यरत) हे या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीस अभिलेख कक्षाकडून परस्पर माहिती प्राप्त करुन घेण्याचे का सूचित केले, याची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती पैकी उर्वरित माहिती ते आता अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. १.६.२००७ पासून कार्यरत असून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेण्याचे अथवा अपिलार्थीच्या लेखी म्हणण्यास प्रतिसाद न देण्याचे कारण त्यांना आता सांगता येणार नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २९.१२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम ६ च्या तरतुदीप्रमाणे अर्ज केला होता. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात अधिनियमातील कलम ७ व २(च) प्रमाणे कार्यवाही करुन त्यांनी मागणी केलेल्या माहितीमधील "नवीन यादी तयार केली का नाही" हा मुद्दा, ज्याची माहिती अपिलार्थीस ती अधिनियमातील तरतुदीनुसार विसंगत असल्याने देय होत नाही, वगळता, त्यांना उर्वरित माहिती देणे गरजेचे होते, तसे त्यांनी त्यांच्याकडील दि. २२.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे केल्याचे दिसून येते. तथापि या पत्राचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताही सकारात्मक दृष्टीने प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती (नकला) तहसील कार्यालयाच्या अभिलेख कक्षातून आवश्यक ते शुल्क परस्पर भरुन प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अवैध व चुकीची आहे. कारण या प्रकरणी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(३) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस त्यांना देण्यात येणाऱ्या माहितीची पृष्ठसंख्या व प्रतिपृष्ठ दर कळवावयास हवा होता, तथापि त्यांनी असे न करता, अपिलार्थीस स्वतः जन माहिती अधिकारी या नात्याने माहिती देण्याची जबाबदारी टाळल्याचे दिसून येते. संबंधित अभिलेख कक्षाने अपिलार्थीकडून रु. ९८.४० इतके शुल्क आकारुन त्यांना जी माहिती दि.

२८.१.२००७ अथवा तत्पूर्वी मिळणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अनुज्ञेय होते, ती माहिती त्यांना विहित मुदतीपेक्षा विलंबाने म्हणजे दि. २१.२.२००७ व ३.५.२००७ रोजी दिली आहे. सदर माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीमध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये मिळाली नसल्याचे या प्रमाणे येथे स्पष्ट होत आहे. अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस जर तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती अपेक्षित दिली नाही तर त्यांना आवश्यक ती माहिती विनामूल्य प्राप्त करुन घेण्याचा अधिकार प्राप्त होत असतो. या तरतुदीकडे तहसीलदार यांच्या कार्यालयातील अभिलेख कक्षाने व संबंधित तहसीलदार यांनी दुर्लक्ष केल्याचे येथे स्पष्ट होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २२.१.२००७ रोजीच्या पत्राची प्रत त्यांच्याच कार्यालयातील अभिलेखापालाला दिलेली आहे. ही प्रत अभिलेखापालाला देताना त्यांनी माहिती देण्याकरिता संबंधितांवर वेळेची कोणतीही मर्यादा घालून दिल्याचे दिसून येत नाही. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना देण्याचा उल्लेख नसून अभिलेख कक्षातील 'नकला' अपिलार्थीस देण्याचे अभिलेखापालालाल सूचित केले आहे. अभिलेख कक्षातील 'नकला' व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित प्रती यामध्ये मूलतः फरक आहे. अभिलेख कक्षातील 'नक्कल' ही महसूल विभागाने निर्धारित केलेल्या दराने अपिलार्थीस उपलब्ध होऊ शकते. तसेच ही 'नक्कल' मूळ कागदपत्रांऐवजी द्वितीय प्रत म्हणून मूळ कागदपत्रासारखी वापरता येते, मात्र माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या आधारे जन माहिती अधिकारी यांना माहिती विचारल्यानंतर त्यांनी या नकलेची प्रत प्रतिपृष्ठ रु. २ या दराने अपिलार्थीस पुरविणे अधिनियमातील तरतुदीनुसार, त्यांना भाग आहे. अशा प्रकारे प्राप्त झालेली झेरॉक्स प्रत ही फारतर सत्यप्रत म्हणून वापरता येईल. मात्र ती मूळ दस्तऐवजाची नक्कल अथवा द्वितीय प्रत म्हणून वापरता येणार नाही. माहिती

अधिकार अधिनियमामध्ये अर्जदारास माहिती पुरवितांना त्यांनी ज्या स्वरुपात माहिती मागितली आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे.

थोडक्यात, उपरोक्त उणिवांमुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस दि. २२.१.२००७ रोजी दिलेले पत्र वरील कारणास्तव अवैध ठरत आहे व आता अधिनियमातील विहित केलेला कालावधी व्यपगत झाला असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देणे भाग आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये सदर माहिती अपिलार्थीस ते दहा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार असल्याचे म्हटले आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती (रेशन संबंधी) त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी. तसेच अपिलार्थीकडून या माहितीपोटीचे त्यांनी घेतलेले शुल्क रु.९८.४० याच कालावधीत त्यांना परत करावे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अथवा त्यांनी त्यांच्याकडे अपिलासंदर्भात केलेल्या लेखी निवेदनावर कोणताही निर्णय न घेऊन त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अशाप्रकारे कोणताही निर्णय न घेऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब महसूल आयुक्त, नाशिक यांनी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक तो व योग्य असा प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असा आयोगाचा निष्कर्ष आहे. त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीमुळे ते

अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, अशा सर्वांवर हे आदेश निर्गमित होताच, तीन महिन्याचे आत प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात १० ते १२ वेळा गेल्याचे त्यांनी आयोगास सांगितले, तथापि या संदर्भातील कोणताही ठोस पुरावा ते आयोगास सादर करु शकले नाहीत, त्यामुळे ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी १० ते १२ वेळा गेले होते, हा त्यांचा दावा आयोग फेटाळून लावत आहे.

वर आदेशित केल्याप्रमाणे आता अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत स्वतः उपस्थित राहून हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहिती पुरविण्यापोटी घेतलेले शुल्क रु.९८.४० इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत परत करावे.

४. विभागीय आयुक्त,नाशिक विभाग,नाशिक यांनी, या प्रकरणातील संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजू ओंकार शेवरे,मु.पो. वडाळा-वडाळी ता.चाळीसगाव जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, चाळीसगाव, जि. जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,पाचोरा विभाग पाचोरा, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४००

निर्णय दिनांक : २५.०७.२००८

१ श्री. मदन सुखदेव लोळगे, : अपिलार्थी
रा. शेवगाव, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
अहमदनगर विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी
तथा प्रादेशिक व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः आगार प्रमुख,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
शेवगाव, जि.अहमदनगर

जन अपिलीय अधिकारीः विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
अहमदनगर विभाग, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. जनार्दन माधवराव उदमल्ले, जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,अहमदनगर विभाग,अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शिवराम मनोहर जाधव,प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन

महामंडळ,नाशिक हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, म.रा.मार्ग परिवहन महामंडळ, शेवगाव, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अपिलार्थी श्री. मदन सुखदेव लोळगे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१०.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वैयक्तिक सेवेशी निगडीत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "A) अर्जदार हा रा. प. शेवगांव आगारातील एक माजी वाहक असून त्यांचे दि. १०.१०.९४ ते दि. २५.४.९७ या कालावधीचे मूळ हजेरी पत्रकाची (Muster) झेरॉक्स कॉपी ची प्रत मिळावी व
>
> B) दि.२२.९.९७ रोजी मा. अण्णासाहेब हजारे यांचे मार्फत सादर झालेल्या तक्रारीची मा. जिल्हाधिकारीसाहेब, अ.नगर यांचेमार्फत झालेल्या चौकशी अहवालाची प्रत मिळावी. "

अपिलार्थीने सदर माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही, याचे कारण उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता, जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दि. १०.१०.२००६ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे अपिलार्थीने सादर केला नाही. यावर आयोगाने सदर अर्ज त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याने प्राप्त झाल्यासंदर्भात त्यांना दिलेल्या दि. ११.१०.२००६ रोजीची पोचसही जन अपिलीय अधिकारी यांना दाखविली असता त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात कोणत्याही अर्जास नेहमी सही व शिक्का यासह पोच दिली जाते, आयोगाकडे प्राप्त अपिलार्थीच्या प्रथम अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरील सही त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही कर्मचाऱ्याची नाही. या

संदर्भात त्यांनी त्यांच्या कार्यालयात पूर्ण चौकशी केली असता अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर त्यांच्या कार्यालयाने अशाप्रकारे पोचसही दिल्याचे सिध्द होऊ शकले नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. २८.११.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने सदर अपील प्रादेशिक व्यवस्थापक, महा.राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक यांच्याकडे केले आहे. या प्रकरणी माहिती अधिकारी म्हणून आगार व्यवस्थापक, महा.राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शेवगाव व जन अपिलीय अधिकारी म्हणून विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, अहमदनगर यांची नेमणूक केली गेली आहे. अपिलार्थीचा अपील अर्ज प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दि. ११.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून दिला. सदर अपील अर्ज विभाग नियंत्रक, म.रा.मा.परिवहन महामंडळ, अहमदनगर यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि. १९.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक यांच्याकडे पाठविली व परत प्रादेशिक व्यवस्थापक यांनी दि. ५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती अपिलार्थीस पाठवून दिली. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर या प्रकरणी कुठल्याही प्रकारची सुनावणी झाल्याचे आयोगास उपलब्ध झालेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि या संदर्भात प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक यांनी अपिलार्थीशी पत्रव्यवहार करुन अपिलार्थीस दि. ५.१.२००७ रोजी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. तथापि ही माहिती अर्धवट असल्याचे कारणावरुन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०४.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. सदर अपील त्यांनी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दि. २२.३.२००७ रोजी दाखल केल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये त्यांना, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपासून दीर्घकाळ वंचित व ताटकळत ठेवून, अर्धवट

माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी व्यथित केले व आजतागायत त्यांना माहिती न पुरविल्याने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची त्यांनी विनंती आयोगास केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

या प्रकरणी प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी हे आगार प्रमुख, म.रा. मार्ग परिवहन महामंडळ शेवगाव जि. अहमदनगर आहेत, तथापि आज रोजी सुनावणीसाठी ते हजर नाहीत.

जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,राज्य परिवहन,अहमदनगर यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक,शेवगाव यांच्याकडे करावयास हवा होता. तथापि त्यांनी या प्रकरणी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीच्या दि. २८.११.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत त्यांना प्रादेशिक व्यवस्थापक,नाशिक यांच्याकडून दि. ११.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाली. त्यानंतर त्यांनी दि. १९.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रादेशिक व्यवस्थापक,नाशिक यांना सादर केली व नंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ५.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस ही माहिती दिली. अपिलार्थीने त्यांच्याकडे एकूण दोन मुद्यावर माहिती विचारली होती. त्यापैकी मुद्दा क्र. ‘ए’शी संबंधित, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अर्जदाराच्या मूळ हजेरीपटाच्या झेरॉक्स कॉपीची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविली, तथापि अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. ‘बी’ द्वारे विचारलेली माहिती त्यांना अपिलार्थीस पाठविता आली नाही, कारण दि. २२.९.१९९७ रोजी

श्री. अण्णा हजारे यांनी दिलेल्या तक्रारीची प्रत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे प्रत उपलब्ध नाही व तसे जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांच्याकडील दि. २३.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये त्यांना कळविले आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ दि. १०.१०.२००६ रोजीचा कथित अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. या अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांना प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक विभाग यांच्याकडील दि. ११.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथमतः अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासोबत प्राप्त झाली, सदर प्रत त्यांना प्राप्त होताच, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी लक्षात घेऊन त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्रादेशिक व्यवस्थापक यांना दि. १९.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे दिली व त्यानंतर त्यांनी ही माहिती त्यांच्याकडील दि. ५.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पाठविली. "अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नाही", या जन अपिलीय अधिकारी यांच्या विधानाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी हेआयोगासमोर आज उपस्थित नाहीत व जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यासंदर्भातील त्यांनी आयोगाकडे सादर केलेली कथित पोच वादातीत नाही, त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या झेरॉक्सप्रतीवर फक्त 'प्राप्त' अशा अभिप्रायास एका अज्ञात व्यक्तीची सही असल्याचे दिसून येत आहे. ही सही जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील कोणत्याही कर्मचाऱ्याची नाही, असे जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केले आहे, याचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज सुनावणीस हजर नाहीत. म्हणून जन अपिलीय अधिकारी यांचे त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नाही, हे म्हणणे ग्राहय धरण्यात येत आहे. अपिलार्थीचा मूळ अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक यांच्याकडील दि. ११.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त होताच त्यांनी अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ‘ए’ संबंधित माहिती अपिलार्थीस प्रादेशिक व्यवस्थापक, नाशिक यांच्यामार्फत दि. ५.१.२००७ रोजी पुरविली आहे. मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ‘बी’ द्वारे विचारलेली माहिती ते अपिलार्थीस पुरवू शकत नाहीत, कारण श्री. अण्णा हजारे यांनी जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचयाकार्यालयात दिलेल्या कथित दि. २२.९.१९९७ रोजीच्या तक्रारीची प्रत खुद्द जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या कार्यालयात देखील आढळून येत नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास उद्देशून दिलेल्या दि. २३.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये स्पष्ट होत आहे.

वरील विवेचन पाहता अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिली आहे, मात्र त्यांच्याकडे मूळात उपलब्ध नसलेली माहिती ते अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत, कारण ही तक्रार श्री. अण्णा हजारे यांनी ज्यांना उद्देशून दिलेली होती, त्या जिल्हाधिकारी कार्यालयात देखील ही तक्रार आता आढळून येत नाही, त्यामुळे साहजिकच जन माहिती अथवा अपिलीय अधिकारी हे आता अपिलार्थीस या संदर्भातील माहिती पुरवू शकणार नाहीत, हे उघड आहे.

प्रसंगावशात्, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दि. २२.९.१९९७ रोजीची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यासंदर्भात उचित कार्यवाही – या संदर्भातील संबंधित कार्यालयाकडे करावयाची चौकशी, जन माहिती अधिकारी यांनी वेळीच न करता जन अपिलीय अधिकारी यांनी केली व तीही अत्यंत विलंबाने म्हणजेच आयोगाकडील सुनावणीच्या पूर्वी जेमतेम तेरा दिवस आधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे या पत्राच्या उपलब्धतेविषयी चौकशी केली, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती देण्यासंदर्भात पूर्ण उदासीनता दाखविल्याचे सिध्द

होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या उदासीन वृत्तीबाबत त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत : मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २५.०७.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मदन सुखदेव लोळगे,रा. लांडेगल्ली, मु.पो.ता.शेवगाव जि.अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शेवगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,अहमदनगर विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३९५

निर्णय दिनांक २८-०७-२००८

श्री. अशोक हिंमतराव पाटील, : अपिलार्थी
"सह्याद्री", साने गुरुजी हौसिंग सोसायटी
अमळनेर, जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अमळनेर,
जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक
बांधकाम विभाग, अमळनेर,
जिल्हा जळगाव

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अशोक हिंमतराव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अनिल संतोष पाटील, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अमळनेर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी

असे संबोधण्यात येईल) व श्री. संजय दत्तात्रय सोनवणे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील पत्र क्रमांक १३३५/ २००६ दिनांक २०-१०-२००६ अन्वये त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" १. आपण उपरोक्त विषयात केलेल्या कारवाईच्या झेरॉक्स प्रति (नोटीस आदी).

२. पावसाळ्यात अतिक्रमण काढता येत नाही याबाबत नियम संदर्भ कायदा असल्यास त्याचा संदर्भ झेरॉक्स प्रती.

३. माझ्या दि. २६-९-०६ च्या माहितीच्या अधिकार अर्जाला झालेला विलंब त्यास कोण जबाबदार ? उल्लंघन (नियमाचे) झाले आहे का ?

४. झाड तोडण्याबाबत कार्यवाही काय केली."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहितीसंदर्भात एकूण रुपये २२ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ३०-११-२००६ रोजी भरले व तदनंतर त्यांनी दिनांक ०२-१२-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली. अपिलार्थीस त्यांनी एकूण ११ पृष्ठांची माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या

अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०१-२००७ रोजी सुनावणी घेतली व या संदर्भातील आपले आदेश दिनांक १८-०१-२००७ रोजी पारित केले. या अपील निर्णयामध्ये अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही जण उपस्थित असल्याचे व सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या तक्रारीचे निराकरण होऊन त्यांचे समाधान झाल्याचे सांगितल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती संदर्भहीन, चुकीची, दिशाभूल करणारी व असत्य असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जाची कोणतीही दखल घेतली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खोटी आहे, पावसाळ्यात अतिक्रमणे काढता येत नाहीत याबाबत त्यांना कोणताही संदर्भ त्यांनी दिला नाही व त्यांना दिशाभूल करणारी उत्तरे दिली आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दिनांक १६-११-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीने या माहितीपोटीचे

शुल्क रुपये २२ हे त्यांच्या कार्यालयात दिनांक ३०-११-२००६ रोजी भरल्यानंतर त्यांनी आवश्यक ती माहिती दिनांक ०२-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक ०६-०१-२००७ रोजी सुनावणी घेतली त्यावेळेस अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात हजर होते. या सुनावणी संदर्भातील त्यांचे आदेश त्यांनी दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये पारित करुन ते अपिलार्थीस कळविले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्दयावर माहिती मागविली होती. यापैकी पहिला मुद्दा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून दिनांक ३०-१०-२००६ रोजी लिहिलेल्या १३३५ क्रमांकाच्या पत्राचा आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता, हे पत्र म्हणजे अपिलार्थीच्या दिनांक २६-०९-२००६ रोजीच्या माहिती अधिकाराअंतर्गत केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती आहे असे वाटते. दिनांक २६-०९-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे अपिलार्थीने धुळे चोपडा रस्त्यावरील अमळनेर शहरातील अतिक्रमणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०२-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात पावसाळ्यात अतिक्रमणे काढू नयेत अशा अर्थाचे कोणतेही अधिनियम त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत असे माहिती जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले, तथापि एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००६ रोजी दिलेल्या पत्रामध्ये त्यांना खुलासा करुन त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी

यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्रमांक ३ व्दारे विचारणा केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ४ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे झाडे तोडण्याविषयी काय कार्यवाही केली असा मोघम स्वरुपाचा प्रश्न जन माहिती अधिकारी यांना केलेला आहे. झाडे म्हणजे निश्चित कोणती झाडे, कोठील झाडे त्यांचा संदर्भ इ. झाडांचा तपशील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये दिलेला नाही, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रत्यक्षात असलेल्या झाडासंदर्भातील त्यांनी केलेली कार्यवाही या पत्राव्दारे कळविल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रमातील सर्व टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही पाहता त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये, अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर माहिती दिल्याचे दिसून येत आहे. या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत माहिती दिल्याचे दिसून येत आहे. मूळात पावसाळ्यामध्ये अतिक्रमणे काढू नयेत अशा अर्थाचे कोणतेही आदेश शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निर्गमित झाले नसल्याने ते अपिलार्थीस देय होत नाहीत एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयासंदर्भात अकारण खुलासा केल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवितांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना देण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची अंदाजे संख्या व ती

पुरविण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर हे कळविणे अधिनियमातील कलम ७ (३) प्रमाणे अभिप्रेत आहे, तथापि अपिलार्थीच्या या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस शुल्काचा हिशोब न देऊन याव्दारे अशी कोणतीही कार्यवाही न करुन त्यांनी माहिती अधिकार अधिनियम कलम ७ (३) च्या तरतुदींचा भंग केला आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे अदा केलेले शुल्क रुपये २२ हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहिती देण्यापोटीचे घेतलेले शुल्क रुपये २२ हे त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत परत करावे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-०७-२००८ — राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक हिंमतराव पाटील, ‘‘सह्याद्री’’ साने गुरुजी हौसिंग सोसायटी अमळनेर, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अमळनेर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४०१

निर्णय दिनांक २८-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुधाकर रामचंद्र जाधव,<br>एन-४१-जेए ३-१२-१, सावतानगर, नवीन<br>सिडको-४, नाशिक-८ | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य<br>अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित,<br>खोली नं. ७४, तळमजला, महाराष्ट्र<br>गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व<br>विकास महामंडळ मर्यादित, खोली नं. ७४,<br>म्हाडा तळमजला, महाराष्ट्र गृहनिर्माण<br>भवन, वांद्रे, मुंबई | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित, खोली नं. ७४, म्हाडा इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१ |
| | जन अपिलीय अधिकारी | : | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित, खोली नं. ७४, म्हाडा इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१ |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. सुहास रंगराव काळे, जन माहिती अधिकारी तथा

महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित, मुंबई व जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. सुधाकर रामचंद्र जाधव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित जानेवारी २००३ ते सप्टेबर २००६ या कालावधीमधील कर्जप्रकरणासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित मुंबई याची स्थापना होऊन कामकाज कोणत्या वर्षापासुन सुरुवात झाली.
>
> स्थापना झाल्यापासुन ते आजपर्यंत महामंडळाकडे किती कर्जप्रकरणे आलेली आहेत त्यापैकी किती कर्जप्रकरणे मंजुर केलेली आहेत व किती कर्ज प्रकरणे पेडींग आहेत व कोणत्या कारणास्तव पेडींग आहेत यासबंधीची अियरवाई (वर्षानुसार) माहीती मिळावी तसेच सदरील पेडींग सर्व कर्जदाराची नावे कळावीत. "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविल्याचे दिसून येत आहे. या माहितीमध्ये, अपिलार्थीने मागणी केलेल्या सर्व कर्जदारांची नांवे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही. सदर माहिती २५० पृष्ठांची असल्याने अपिलार्थीस माहिती

देण्याचा खर्च व रजिस्टर्ड पोस्टाचा खर्च या खर्चाचा भरणा करण्यास्तव जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्राव्दारे कळविले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती साध्या पोस्टाने पाठविल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या या कृतीपृष्ठ्यर्थ त्यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीची संगणकाव्दारे तयार केलेली एक प्रत आयोगास दाखविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न प्राप्त झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज पाहिला असता असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणातील प्रथम अपील संबंधित खात्याच्या मंत्र्यांकडे केल्याचे दिसून येते, जे सर्वस्वी चूक आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही, तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यामार्फत त्यांच्याकडील दिनांक २१-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक १४-११-२००६ रोजीच्या प्रथम पाठविलेल्या पत्राची प्रत परत पाठविली. थोडक्यात जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारे अपिलार्थीचे प्रथम अपिल निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या महामंडळाकडे एकूण १३ कर्मचा-यांची पदे मंजूर असून यापैकी चतुर्थ श्रेणीची ४ पदे असून ९ पदे व्दितीय व तृतीय श्रेणीची आहेत. ही सर्व पदे कंत्राटी पध्दतीने भरली असून त्यांच्याकडे आवश्यक ते मनुष्यबळ नसल्याने त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविता आली नाही, मात्र अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मागितलेल्या माहितीतील, प्रलंबीत कर्जदारांची नांवे या मुद्दयाव्यतिरिक्त उर्वरित माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीस संबंधित कर्जदारांची यादी पुरवावयाचे झाल्यास सदर माहितीच्या पृष्ठांची अंदाजे संख्या २५० इतकी होईल. सदर यादी त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्याकडे भरल्यास ही माहिती ते अपिलार्थीस तात्काळ देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रलंबीत कर्जदारांच्या यादीशिवाय उर्वरित सर्व माहिती त्यांच्याकडील दिनांक १४-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. या माहितीचे अवलोकन करता, ती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. येथे असे दिसून येईल की, अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमातील कलम ७ प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत त्यांनी किमान अपिलार्थी यांना माहितीपोटी लागणारे आवश्यक ते शुल्क कळविणे भाग होते, तथापि अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जो प्रथम प्रतिसाद दिला आहे

तो विहित मुदतीपेक्षा एक महिन्याच्या विलंबाने दिला आहे, त्यामुळे साहजिकच अधिनियमातील कलम ७ (६) नुसार, त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ३० दिवसांपेक्षा जास्त विलंब झाल्याने, ही माहिती त्यांना अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार आता विनामूल्य पुरविणे आवश्यक आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्‌हेतूने देण्याचे जरी टाळले नसले तरी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त विलंब लावलेला असल्याने यापुढे माहिती अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जांवर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, अशी त्यांना आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज करतांना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही असे म्हटले आहे, परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १४-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना माहिती पुरविल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने सबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील न करता ते संबधित खात्याच्या मंत्र्यांकडे केले ही अपिलार्थीची कृती चुकीची आहे, हे येथे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद

दिनांक २८-०७-२००८

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर रामचंद्र जाधव, एन-४१-जेए ३-१२-१, सावतानगर, नवीन सिडको-४, नाशिक-८.

२ जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित, खोली नं. ७४, म्हाडा इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित, खोली नं. ७४, म्हाडा इमारत, बांद्रा (पूर्व), मुंबई - ५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४०२

निर्णय दिनांक २८-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. आशिष उत्तमचंद बोरा,<br>एस. टी. स्टॅण्ड कॉर्नर, कर्जत,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तहसील कार्यालय, कर्जत,<br>जिल्हा अहमदनगर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी, कर्जत,<br>जिल्हा अहमदनगर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार, कर्जत, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. आशिष उत्तमचंद बोरा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. वासुदेव बळवंत भापकर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कर्जत (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व श्री. अरुण प्रभाकर उजागरे, तहसीलदार कर्जत, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कर्जत यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे निवडणुकीमध्ये उमेदवारांनी भरलेल्या अनामत रकमेबाबत मार्च २००५ ते ऑक्टोबर २००६ अखेरपर्यंत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ वरील कालावधीत झालेल्या तालुक्यातील सर्व निवडणुकांमध्ये किती उमेदवारांनी किती अनामत रकमा जमा केल्या त्यातील परत किती उमेदवारांना दिल्या व उर्वरीत रक्कम कोठे जमा केली याबाबत निवडणुकनिहाय माहीती हवी आहे.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात खालीलप्रमाणे उत्तर दिले.

“ उपरोक्त संदर्भानुसार आपण माहीतीच्या अधिकार कायद्यान्वये केलेल्या अर्जावरुन कळविणेत येते की, आपण मागणी केलेल्या माहीतीचा या कार्यालयात शोध घेतला असता सर्व ग्रामपंचायतीच्या निवडणुकीची माहीती आढळ होत नाही म्हणुन संबंधीत निवडणुक निर्णय अधिकारी यांना लेखी पत्र देऊन पुनःच माहीती मागविलेली आहे. सदरची माहीती त्यांचे कडुन प्राप्त झाल्यानंतर आपणास माहीती देण्याची व्यवस्था करीत आहोत.”

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही, मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या माहितीच्या संदर्भात तहसीलदार कर्जत यांच्याशी संपर्क साधण्याची विनंती केली. कोणत्याही अपिलार्थीच्या अपील अर्जावर कशा प्रकारे निर्णय घेऊ नये याची या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी केलेली ही कृती म्हणजे, एक उत्तम उदाहरण ठरेल, यात शंका नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मार्च २००५ ते ऑक्टोबर २००६ या कालावधीशी कर्जत तालुक्यातील संबंधित ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये किती उमेदवारांनी किती अनामत रकमा जमा केल्या व त्यापैकी किती उमेदवारांना त्या परत केल्या व उर्वरित रकमा कोठे जमा केल्या यासंदर्भातील माहिती हवी होती. सर्वसाधारण परिस्थितीत उमेदवारांनी अनामत रक्कम भरल्यानंतर ही रक्कम संबंधितांनी शासकीय कोषागारात भरणे अभिप्रेत आहे, तथापि महसूल खात्यातर्फे उमेदवारांकडून अनामत रकमा जमा करुन घेण्यात येतात व त्या संबंधितांना परत केल्या जात नाहीत. या प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याची त्यांना शंका आहे. त्यांना हव्या असलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे देखिल वेळोवेळी अर्ज केले होते. प्रत्येक वेळी महसूल खात्यातील अधिकारी त्यांना त्यांच्या कनिष्ठ अधिका-याकडे पाठवून त्यांची बोळवण करत असतात.

त्यांना आजही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०९-१०-२००७ रोजी कर्जत तालुक्यातील ५९ पैकी ४९ ग्रामपंचायतीची माहिती प्राप्त झाली आहे. या माहितीमध्ये त्यांनी संबधितांना अनामत रकमा कोणत्या तारखेला परत केल्या याचा काहीही उल्लेख नाही, त्यामुळे ही माहिती अर्धवट आहे तसेच त्यांना ५९ पैकी अद्यापही १० ग्रामपंचायतीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळावी अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये केली आहे. तसेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये निवडणुकीमध्ये उमेदवारांकडून अनामत रक्कम घेतली जाते तथापि काही उमेदवारांना अनामत रक्कम परत केली जात नाही व त्या रकमेचा हिशोब या विभागामध्ये कोठेही ठेवला जात नाही ही वस्तुस्थिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी त्यांनी ही माहिती मागविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, कर्जत तालुक्यातील संदर्भिय कालावधीमध्ये ग्रामपंचायत निवडणूका पार पाडण्यासाठी वेगवेगळ्या खात्यातील कर्मचारी ''निवडणूक निर्णय अधिकारी'' म्हणून त्यांच्यातर्फे नेमले गेले होते. संबंधित उमेदवारांकडून आवश्यक त्या अनामत रकमा प्राप्त करुन घेणे व निवडणूक निर्णय जाहीर झाल्यानंतर त्या परत करणे हे काम संबंधित कर्मचा-यांचे असते. या कर्मचा-यांच्या सेवा शासनाच्या विविध विभागाकडून तात्पुरत्या स्वरुपात त्यांच्याकडून निवडणुकीच्या कामासाठी अधिगृहीत केल्या जातात. उमेदवारांनी भरलेल्या अनामत रकमा, या रकमांची पुढे संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी लावलेली विल्हेवाट याची माहिती फक्त त्या अधिका-यांनाच असते. निवडणूकीमध्ये उमेदवारांकडून घ्यावयाच्या अनामत रकमेचे नियोजन कसे करावयाचे यासंदर्भात काहीही निश्चित अशी पध्दती सध्या प्रचलीत नाही व अशा प्रकारची कोणतीही तरतूद महसूल खात्यातर्फे विहित देखिल केलेली नाही, त्यामुळे

अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे माहितीची मागणी केली त्यावेळी त्यांना संबंधित अधिका-यांशी संपर्क साधून त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घ्यावी लागली. अपिलार्थीस माहिती न देणे अथवा ती देण्यास टाळाटाळ करणे अशा प्रकारचा कोणताही उद्देश त्यांचा कधीही नव्हता. केवळ सर्व निवडणूक निर्णय अधिका-यांकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना वेळ लागल्याने अपिलार्थीस त्यांनी विलंबाने, दिनांक ०९-१०-२००७ रोजी ४९ ग्रामपंचायतीची माहिती पुरविली आहे व उर्वरित १० ग्रामपंचायतीची संबंधित माहिती त्यांना ३१-१०-२००७ रोजी देण्यात आलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप सोपे व व्याप्ती मर्यादित होती, तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची उपलब्धता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी नव्हती. त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिका-यांकडून विशेष प्रयत्न करुन प्राप्त करुन घ्यावी लागली. ग्रामपंचायतीच्या निवडणूका ज्या प्रकारे घेतल्या जातात त्या प्रकारची कार्यपध्दती पाहता उमेदवारांकडून निवडणुकीपोटी प्राप्त करुन घेतलेली रक्कम, ती त्यांना आवश्यकतेनुसार परत करण्याची अथवा एखाद्या उमेदवाराची अनामत रक्कम जमा झाल्यास ती रक्कम नंतर शासकीय कोषागारात जमा करावयाची पध्दत अद्याप निश्चित करुन देण्यात आलेली नाही व नेमकी हीच उणीव अपिलार्थीने व्यक्त केलेल्या कथित भ्रष्टाचाराचे मूळ असू शकते. त्यामुळे अपिलार्थीने आज रोजी त्याच्या युक्तिवादामध्ये व्यक्त केलेल्या कथित भ्रष्टाचाराच्या शंकेस वाव घेण्यास भरपूर वाव मिळतो. सबब सचिव (ग्रा.वि.वि.) / (महसूल) यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या खात्यातर्फे पार पाडण्यात येणा-या निवडणुकीबाबत, विशेषतः उमेदवारांकडून प्राप्त होणा-या अनामत रकमा संबंधित निवडणूक निर्णय अधिका-यांकडे प्राप्त झाल्यानंतर त्या रकमा त्यांनी कोठे व कशा जमा करावयाच्या, उमेदवारांनी त्यांचे उमेदवारी अर्ज मागे

घेतल्यानंतर किती कालावधीमध्ये ही रक्कम त्यांना कशी परत करावयाची याचे स्पष्ट विवेचन करणारे एक परिपत्रक त्यांच्या स्तरावर जारी करुन त्याची अंमलबजावणी संबंधित जन माहिती अधिकारी ह कसोशीने करतील, याची त्यांनी दक्षता घ्यावी. अपिलार्थीने संबंधित उमेदवारांना अनामत रकमा कधी परत केल्या होत्या याचा (दिनांकाचा) त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये समावेश नसल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांना या मुद्दयावर असे सूचविण्यात येत आहे की, त्यांनी सर्व ग्रामपंचायतींना भेट देऊन अथवा संबधित उमेदवारांना त्यांच्या कार्यालयात बोलावून त्यांच्याकडून संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत सदर रकमा त्यांना परत झाल्याबाबतचे दिनांकासह जबाब नोंदवून त्याची एक प्रत अपिलार्थीस पुरवावी. त्यांनी ही कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत करावी.

जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात ज्या निवडणूक निर्णय अधिका-यांनी अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा जास्त विलंब लावलेला आहे अशा सर्व अधिका-यांवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करावी / प्रस्तावित करावी.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात ज्या निवडणूक निर्णय अधिका-यांनी अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा जास्त विलंब लावलेला आहे अशा सर्व अधिका-यांवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करावी / प्रस्तावित करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. आशिष उत्तमचंद बोरा, एस. टी. स्टॅण्ड कॉर्नर, कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४०३

निर्णय दिनांक २८-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रविंद्र नानासाहेब बरडे,<br>घ. नं. १७४, सदर कॅम्प, भिंगार,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. नरहरी रामभाऊ शेळके, जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. रविंद्र नानासाहेब बरडे,

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. विलास राजपूत, कांबी, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनूसूचित जमातीच्या अवैध जात प्रमाणपत्राबाबत मे २००५ ते ऑक्टोबर २००६ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १. मा. जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांचे जा. क्र. २००६/साशा/ मा.अ./ कावी/३६१ दि. २८/८/०६ च्या पत्रांनुसार तहसीलदार औरंगाबाद यांना श्री. विलास खुशालसिंग राजपूत रा. कांबी, ता. शेवगाव जि. अहमदनगर यांचे विरुध्द कारवाई करण्यासाठी लेखी अवगत केले होते त्यानुसार तहसील औरंगाबाद यांनी श्री. विलास खुशालसिंग राजपूत यांचे वर कोणती कायदेशीर कार्यवाही केली त्याची माहीती द्यावी.

२. तसेच वरिल संदर्भीय पत्रानूसार जात प्रमाण पत्र निर्गमीत करणारे तत्कालीन आधिकारी व कर्मचारी यांचा त्यात दोष आहे काय याबाबत स्वतंत्ररित्या चौकशी करण्याबाबत उपचिटणीस गृह शाखा यांना कळविल्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय ? चौकशी अधिकारी त्यांचे नाव पद तसेच त्यांनी केलेल्या चौकशी अहवालाची सत्यप्रत मला देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त न झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले, सदर अर्ज प्राप्त न झाल्याने त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात कोणतीही माहिती पुरविता आली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०३-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यासंदर्भात सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपर जिल्हादंडाधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते, तथापि सदर माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जावर तत्कालीन जिल्हाधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०३-२००७ रोजीच्या दिलेल्या निर्णयाप्रमाणे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्या या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांनी आयोगाकडे एक शपथपत्र सादर केले असून त्यात अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी त्यांच्याकडे केली आहे त्याची त्यांना सर्वप्रथम कल्पना अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावरुन आली. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली व या सुनावणीसंदर्भात त्यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे सुनावणीनंतर संबंधित अपर जिल्हादंडाधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांच्या दिनांक २३-०३-२००७ च्या पत्रान्वये पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागितली आहे. यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक १ ची माहिती त्यांनी अपिलार्थीस सुसंगत अशी पुरविल्याचे दिसून येत आहे तर अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक २ शी संबधित माहिती त्यांनी अर्धवट दिल्याचे दिसून येत आहे. या माहितीमध्ये त्यांनी चौकशी अधिका-याचे नाव व पद व त्यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपिलार्थीस पुरविली नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर त्यांच्याकडे अद्यापही संबंधित चौकशी अधिका-याचा चौकशी अहवाल प्राप्त झाला नाही असे स्पष्ट केले आहे. संबंधित चौकशी उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत चालू असून माहितीची अपिलार्थीने मागणी करतेवेळी श्री. आण्णासाहेब शिंदे नावाचे अधिकारी या पदावर कार्यरत होते. संबंधित चौकशी अधिका-याकडून त्यांना आता ३० दिवसाच्या आत अहवाल प्राप्त होण्याची अपेक्षा आहे.

वरील वस्तुस्थिती पाहता, आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित

माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र नानासाहेब बरडे, घ. नं. १७४, सदर कॅम्प, भिंगार, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४०५

निर्णय दिनांक २९-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे,<br>अमळनेर, जि. जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा चेअरमन,<br>श्रमसाफल्य एज्यूकेशन सोसायटी अमळनेर,<br>जि.जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहायक धर्मादाय आयुक्त,<br>जळगाव विभाग, जळगाव | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. भदाणे चंद्रकांत भानुदास (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. अभिजीत सुभाष भांडारकर,संचालक जन माहिती अधिकारी तथा चेअरमन श्रमसाफल्य एज्यूकेशन सोसायटी अमळनेर, जि.जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.३१.०१.२००६ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

‘ १) आपल्या संस्थेने प्राचार्य रमाई शा.शि.महाविद्यालय अमळनेर या नांवे स्टेट बँकेत खाते क्र.५२१२ आहे. सदर खाते सुरु केले, त्यावेळी खाते चालवण्या बाबत जे अधिकार दिले होते. त्या ठरावाची प्रत व सन २००२ मध्ये परत सदर खाते चालविण्या बाबत जो ठराव दिलेला आहे. त्या ठरावाची प्रत मला हवी आहे.

२) आपल्या संस्थेत सन १९९० पासून आपण प्रभारी प्राचार्य म्हणून जे ठराव वेळो वेळी किती केले आहेत, त्या सर्व ठरावाच्या प्रति मला हव्या आहेत.

३) दि. २७.१२.०५ या दिवशी आपल्या संस्थेत जे सर्व ठराव झाले. त्या सर्व ठरावांच्या प्रति मला आवश्यक आहे, तरी मी वरील सर्व ठरावांच्या प्रतिंची मागणी केल्या प्रमाणे मला सर्व ठरावाच्या प्रति ८ दिवसांच्या आंत ‘माहितीचा अधिकार, या कायद्यान्वये देण्याचे करावे. हि नम्र विनंती.‘

माहिती अधिकार अधिनियमाद्वारे माहिती मागताना अपिलार्थीने राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ११.१०.२००५ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेतील विहित प्रपत्राचा नमुना वापरल्याचे दिसून येत नाही, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर अर्ज एका कोऱ्या कागदावर केला असून या पत्रावर आवश्यक तो रु.१०/- इतक्या किमतीचा कोर्ट स्टॅम्प चिकटविल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. प्रतिसाद न देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थींचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.४.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, संबंधित संस्थेकडे त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागवूनही संबंधित संस्थेने त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती अद्यापपावेतो पाठविली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता त्यांच्याकडील दि. २४.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांचे अपील फेटाळल्याचे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २.६.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचा दि.३१.१.२००६ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना उद्देशून केला होता व तो रजिस्टर्ड पोस्टाने दि. ३.२.२००६ रोजी, संबंधित संस्थेचे चेअरमन यांचेकडे पाठविला होता, त्यासाठी त्यांनी रु.२५/- इतका खर्च केला असून त्यांनी अमळनेर पोस्ट ऑफीसची २११३ क्रमांकाची पावती आयोगास सादर केली व सोबत रजिस्टर्ड पोस्टाची पोचपावतीही त्यांनी आयोगास सादर केली. तथापि रजिस्टर्ड पोस्टाच्या पोचपावतीवर पोस्टाचा कुठेही शिक्का नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी तथा चेअरमन यांच्या प्रतिनिधीने असा युक्तीवाद केला की, अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही, अपिलार्थी यांनी आयोगास दाखविलेल्या सदर अर्ज पाठविल्याच्या पोस्ट खात्याच्या रजिस्टर्ड पोच पावतीवरील सही त्यांची नाही. परंतु त्यांची सही खुद्द अपिलार्थी यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात केली असून, अपिलार्थीच्या संस्थेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरुन ही सही अपिलार्थीचीच

असल्याची त्यांना खात्री आहे. (तथापि अध्यक्षांच्या प्रतिनिधीने अपिलार्थी यांच्यावर केलेला सदर आरोप त्यांना मान्य नाही, असे त्यांनी आयोगास सांगितले.) आज सुनावणीमध्ये स्पष्ट झाल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे मूळ माहितीसाठीचा अर्ज करतांना तो विहित प्रपत्रामध्ये केलेला नाही व त्यावर रु.१०/- इतक्या किमतीचा कोर्ट फी स्टॅम्प त्यांनी चिकटविलेला नाही, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेले द्वितीय अपील खारीज करण्यात यावे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता. तथापि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मर्यादित असल्याचे दिसून येते. यामध्ये अपिलार्थीस ही माहिती संबंधित संस्थेने देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील मनुष्यबळ व साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार, अशातील बाब येथे संभवत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीच्या अर्जावर रु.१०/- इतक्या किमतीचा कोर्ट फी स्टॅम्प लावला नसल्याबद्दल आक्षेप घेतला आहे. सदर आक्षेप योग्य असून आयोगास अपिलार्थी यांनी सादर केलेल्या प्रथम अर्जाची प्रत पाहता, त्यावर अपिलार्थी यांनी रु.१०/- इतक्या किमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकविल्याचे आढळून येत नाही. आता अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु.१०/- चा कोर्ट फी स्टॅम्प देऊन नंतर आवश्यक ती माहिती संस्थेकडून हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने केलेला मूळ अर्जाचा दिनांक व सुनावणीचा दिनांक पाहता, या प्रकरणी बराच कालावधी व्यपगत झाला असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडून रु.१०/-

इतक्या किमतीचे कोर्ट फी स्टॅम्प प्राप्त करुन घेऊन, हे आदेश निर्गमित होताच त्यांना तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून रु.१०/- इतक्या किमतीचे कोर्ट फी स्टॅम्प घेऊन, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २९-०७-२००८** **राज्य माहिती आयोग,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत भानुदास भदाणे, समर्थनगर, धुळे रोड, अमळनेर, जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी, अमळनेर, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, जळगाव विभाग, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४०६

निर्णय दिनांक २९-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रमेशचंद्र किसनलाल कुचेरीया,<br>रा.आग्रारोड, धुळे | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, धुळे | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार,<br>धुळे | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रमेशचंद्र किसनलाल कुचेरीया (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अशोक बळवंतराव मोहेकर, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत, तर जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१५.६.२००६ रोजीच्या अर्जन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९७३ ते १९८४ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

‘ तालुका वतन दरखास्त नं.३०/५५ च्या सोबतच्या कागदपत्रांच्या सत्यप्रती पुरवाव्यात ही विनंती.‘

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ६.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस निश्चित कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे, त्यांच्या यादीची अपिलार्थीकडे मागणी केली. यावर अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. २६.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केली. अपिलार्थीच्या अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे सदर माहिती त्यांच्याकडे सध्या उपलब्ध नसल्याचे कळवून अपिलार्थीचा मूळ अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २५.९.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे तसेच त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दि. ३.८.२००६ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी त्यांच्या निर्णयाविरुध्द कोणाकडे अपील करावयाचे आहे, याचा उल्लेख केलेला नाही, त्यामुळे त्यांचे विरुध्द राज्य शासनाकडे अहवाल पाठवून शासनाला त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.१०.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १०.११.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती

आयोगाकडे दि. २६.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी या नात्याने केलेला पत्रव्यवहार तहसीलदार, धुळे यांनी केलेला आहे व अपिलीय अधिकारी म्हणून देखील त्यांनीच निर्णय दिलेला आहे, ही बाब आक्षेपार्ह आहे, हे आयोगाचे निदर्शनास आणून दिले आहे. तहसीलदार यांनी आपल्या या कृतीद्वारे न्यायाची प्रतारणा केली असल्याने त्यांच्याविरुध्द कार्यवाही व्हावी व त्यांना मनस्ताप झाल्याबद्दल रु.२५००/- नुकसान भरपाई मिळावी, अशी विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व सदर कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याची त्यांची खात्री आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या माहितीची मागणी केलेली आहे, ती मौजे अवधान, तालुका धुळे येथील सर्व्हे नंबर ६५ च्या हस्तांतरणासंबंधीची आहे. सदर जमिनीची मूळ मालकी श्री. वामन महारु पाटील यांची होती. सदर जमिनीचे मूळ मालक श्री.वामन महारु पाटील व अपिलार्थीचे वडील श्री. किसनलाल कुचेरीया हे दोघेही मयत आहेत. दिनांक ५.२.१९८३ रोजी उपविभागीय अधिकारी, धुळे विभाग यांच्या कोर्टात श्री. राजाराम वामन पाटील (मयत वामन महारु पाटील यांचे वारसदार) व श्री. पारसमल किसनलाल कुचेरीया (अपिलार्थींचे भाऊ) यांच्यामधील जमीन हस्तांतरण प्रकरणात निकाल लागला होता. या निकालान्वये श्री. पाटील यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या कोर्टात केलेले अपील उपविभागीय अधिकारी यांनी फेटाळून लावले होते. तथापि त्यानंतर या निर्णयावर धुळे येथील दिवाणी न्यायालयाने स्थगिती दिली होती. सदर स्थगिती उठविल्याबाबत त्यांना काहीही माहिती नाही. (परंतु सुनावणीचे वेळी आता सदर स्थगिती उठविल्याची अपिलार्थीने आयोगास माहिती दिली.)

सदर प्रकरण बऱ्याच कालावधीपूर्वीचे असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली कागदपत्रे त्यांना अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येत नाहीत. अपिलार्थीस सदर कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांनी त्यांच्या अभिलेख कक्षामध्ये पुरेपूर शोध घेऊन तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अभिलेख कक्षामध्येही संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊनही त्यांचे सदर कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत. अपिलार्थीशी केलेल्या पत्रव्यवहारामध्ये प्रत्येक पत्रावर निवासी नायब तहसीलदार यांनी 'तहसीलदार यांचेकरिता' अशी सही केली आहे, ही चूक संबंधितांच्या नजरचुकीने झाली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, विशेषतः उपविभागीय अधिकारी, धुळे विभाग यांनी पारित केलेला दि. ५.२.८३ रोजीचा आदेश पाहता दरखास्त क्र. ३०/५५ ही अस्तित्त्वात असल्याचे दिसून येते. शिवाय या दरखास्तीशी संबंधित सर्व कागदपत्रे जतन करण्याचे प्राथमिक कर्तव्य तहसीलदार, धुळे यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्याचे असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जमीन हस्तांतरण करण्यासंबंधीची असल्याने, सदर कागदपत्रे शासकीय अभिलेख्यांच्या वर्गीकरणाप्रमाणे 'अ' संवर्गातील असल्याने त्यांचे कायमस्वरुपी जतन करण्याची जबाबदारी तहसीलदार, धुळे यांची आहे, यात शंका नाही, ही कागदपत्रे बराच शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकली नाहीत, असा त्यांचा युक्तीवाद आयोग अमान्य करीत आहे. अपिलार्थीने ज्या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्या प्रकरणाचे गांभार्य लक्षात घेता उपरोक्त प्रकरणाची माहिती जतन करण्यासाठी तहसील कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यावर जिल्हाधिकारी, धुळे यांना आवश्यक वाटल्यास प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य ती प्रशासकीय कार्यवाही, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येते.

अपिलार्थीने उपस्थित केलेल्या प्रकरणातील कायदेशीर गुंतागुंत लक्षात घेता या टप्प्यावर अपिलार्थीने आपल्या प्रश्नाची तड लावण्यासाठी दिवाणी न्यायालयाकडे दाद मागणे उचित ठरेल, असे आयोगाचे मत आहे. तसेच माहिती अधिकारी या नात्याने, माहिती अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त झालेल्या प्रथम अर्जावर पत्रव्यवहार करतांना संबंधित नायब तहसीलदार यांनी तहसीलदार यांचेकरिता म्हणून आपली सही केली व सहीखाली नायब तहसीलदार तथा जन माहिती अधिकारी असा उल्लेख न केल्याने, उपरोक्त प्रकरणी त्यांच्या हातून घडलेल्या या प्रमादाबाबत त्यांना आयोगामार्फत सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, धुळे यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती महसूल विभागाच्या ज्या कर्मचाऱ्याकडे सामान्यतः असणे अभिप्रेत आहे व ज्यांनी सदर अभिलेखे गहाळ केली आहेत, अशा सर्व कर्मचाऱ्यांवर आवश्यकतेनुसार हे आदेश निर्गमित होताच प्रचलीत सेवानिर्णयाप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच, दोन महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २९-०७-२००८** — **राज्य माहिती आयोग,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेशचंद्र किसनलाल कुचेरीया,१७२५अ, बॉम्बे लॉज चौक, आग्रारोड, धुळे

२.	जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	जिल्हाधिकारी, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४०७

निर्णय दिनांक २९-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. लक्ष्मण तानका देवरे,<br>रा. जळगाव ता. जि.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा जनसंपर्क अधिकारी,<br>जनसंपर्क विभाग,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपआयुक्त (सा.प्र.),<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. सौदागर दत्तोबा जाधव, जन माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. राजेंद्रकुमार नरसिंह वळे, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत, तर अपिलार्थी श्री. लक्ष्मण तानका देवरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१४.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. महादेव देवळे माजी महापौर यांनी डिसेंबर, २००३ मधील दिलेल्या सूचनेवर केलेल्या कार्यवाहीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

‘१) म.महादेव देवळे (माजी महापौर) मुंबई यांचे पत्रक एम् एस्/६७३१/एम् जी डिसेंबर २००३ चे पत्रांतील सुचनांचे कार्यवाही पत्रकाची सत्यप्रत व त्या अनुषंगाने काढलेल्या पत्रकांची सत्यप्रत.

२) सोबत जोडलेल्या शासन निर्णयाप्रमाणे फोटो न लावलेल्या शाळा, कार्यालये मोठी पत्त्यासह यादी १-१२-२००३ ते ३०-१०-२००६

महापौर यांचे पत्रावर केलेली कार्यवाहीचे कार्यवाहीपत्रक (घ्द्धदृड़ड्ढड्डद्दत्दढ़) व त्यानुसार काढलेली पत्रके यांची सत्यप्रत तसेच खाली दर्शविलेल्या शासननिर्णयाप्रमाणे फोटो न लावलेल्या कार्यालये व शाळा यांची यादी.‘

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज आयुक्त महानगरपालिका, बृहन्मुंबई यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीच्या या अर्जास मनपा आयुक्त यांनी त्यांच्याकडील दि. २३.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे पत्ते कळवून त्यांच्याकडून माहिती अपेक्षित करण्याचे सूचित केले. आयुक्त, मनपा, मुंबई यांच्याकडून या पत्राची प्रत जनसंपर्क अधिकारी यांना दिली गेली होती. आयुक्तांच्या पत्रावर संबंधित जन संपर्क अधिकारी यांनी कार्यवाही करुन त्यांच्याकडील दि. १५.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस परत त्यांना अपेक्षित असलेली माहिती त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व कार्यालयांकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेतील वेगवेगळया खात्यामधील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाची व पत्त्यांची कोणतीही कल्पना जनसंपर्क अधिकारी यांनी

अपिलार्थीस दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे टाळल्याचे नमूद करुन त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कार्यवाही करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.१.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २३.१.२०७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती अपिलार्थीस दहा दिवसांचे आत व उर्वरित मुद्यावरील माहिती अपिलार्थीस तात्काळ देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या पहिल्या मुद्यासंदर्भात संपूर्ण माहिती त्यांनी त्यांच्याकडील दि. ३१.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविली. अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र. २ च्या माहिती संदर्भात त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची यादी अपिलार्थीस या पत्रासोबत पाठविली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६(३) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी स्थानांतरित केला नाही, शासन निर्णयातील जबाबदारी जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारलेली नाही व ती पार पाडली नाही, महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे किती छायाचित्रे शासकीय मुद्रणालयातून घेतले याची संख्या दिली नाही व त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यालये,कार्यशाळा, शाळा, विद्यालये व इतर कार्यालयात

ज्या ठिकाणी शासकिय छायाचित्रे लागले नाहीत त्यांचे पूर्ण पत्ते व दूरध्वनी क्रमांक त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाले नाहीत, असे म्हटले आहे. थोडक्यात त्यांनी आपल्या मूळ मुद्दा क्र. २ मधील माहितीची मागणी या द्वितीय अपील अर्जामध्ये कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, या पदावर ते दि. २३.७.२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी बृहन्मुंबई मनपाकडे अर्ज केला त्यावेळी श्री. दादासाहेब शिवजातक नावाचे अधिकारी कार्यरत होते. सदर अधिकारी आज रोजी हयात नाहीत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासकीय कारभाराची व्याप्ती प्रचंड प्रमाणात असून त्यांच्याकडील वेगवेगळया खात्यामध्ये एकूण ५३० जन माहिती अधिकारी यांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे एकत्रित अशी सहजरित्या उपलब्ध नव्हती व मनपाच्या कार्यक्षेत्रातील कामाचा प्रचंड व्याप पाहता त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती देणे शक्य झाले नाही. परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे मागितलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयानंतर दि. ३१.१.२००७ रोजी अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जन माहिती अधिकारी यांचे पत्ते अपिलार्थीस कळवून त्यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचे त्यांनी या पत्रामध्ये पुढे सूचित केले आहे. त्यांचा अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती न देण्याचा कोणताही उद्देश नव्हता. आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, बृहन्मुंबई मनपाच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण ६४ जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या गेल्या आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत लवकरात लवकर त्यांना पोहोचविण्याचे प्रयत्न केले जातील. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. २०.०१.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २३.१.२००७ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात मागितलेल्या माहितीचे स्वरुप जरी सकृतदर्शनी सोपे भासत असले तरी, या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात होती. हे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर आज युक्तीवादामध्ये स्पष्ट केले आहे. मूळात अपिलार्थीच्या प्रथम माहितीसाठीचा अर्ज प्रथमतः तत्कालीन जनसंपर्क अधिकारी श्री. दादासाहेब शिवजातक यांच्याकडे प्राप्त झाला. त्यावर त्यांनी त्यांच्याकडील दि. १५.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. या संपूर्ण घटनेच्या या प्रथम टप्प्यावरील जनसंपर्क अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. कारण कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकाऱ्याकडे मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर अशा अर्जावर कशाप्रकारे कार्यवाही करावयाची, याचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) मध्ये सुस्पष्ट विवेचन केले आहे. या तरतुदीप्रमाणे जनसंपर्क अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांचे आत पाठविणे व त्याची प्रत अपिलार्थीस पाठविणे भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनीसुध्दा त्यांच्याकडील अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २३.१.२००७ रोजीचा

निर्णय देतांना त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विशिष्ट असे वेळेचे बंधन घालून दिल्याचे दिसून येत नाही. त्या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस लवकरात लवकर माहिती देण्याचे सूचित केले आहे. तथापि हे आदेश दि. २३.१.२००७ रोजी निर्गमित केल्यानंतरही आजतागायत अपिलार्थीस त्यांचे मूळ अर्जामधील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती प्राप्त झाली आहे किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. कारण उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशाप्रकारचा कोणताही तपशील उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडील कार्यक्षेत्राच्या व्याप्तीची वस्तुस्थिती जरी खरी असली तरी त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) याप्रमाणे वेळीच कार्यवाही केली असती तर अपिलार्थी, त्यांना आवश्यक असलेली ही माहिती प्राप्त होण्यासाठी इतक्या प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित राहिले नसते, हे खचितच. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची नुसती उपेक्षाच केली असे नव्हे तर आजतागायत संबंधित अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती त्यांना प्राप्त झाली आहे किंवा कसे याबाबतचा तपशीलही त्यांच्याकडे उपलब्ध नाही, ही माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीची शोकांतिका आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. आज रोजी आयोगासमोर झालेल्या युक्तीवादामध्ये उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त लवकरात लवकर माहिती देण्याचे आयोगास आश्वासित केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण दोन मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे, त्यामुळे आता त्यांना अपिलार्थीस फक्त मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती पुरवावी लागेल. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज केल्यापासून त्यांना, माहिती देण्यासंदर्भातील विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या पध्दतीने द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात

येते की, आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत न पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी आता हयात नसल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केले, हे पाहता त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत, मात्र सध्या कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी यांची माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करण्याची जबाबदारी आहे, असे आयोगाचे मत आहे, त्यांनी त्यांच्या या पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून एक वर्ष उलटून गेल्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्यांनी उपरोक्त प्रकरणी घेतलेल्या अशा नकारात्मक भूमिकेबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २९-०७-२००८** **राज्य माहिती आयोग,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मण तानका देवरे, अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले सेवा मंडळ, ८५, नवीपेठ, जळगाव-४२५ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी, विस्तारीत इमारत, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४०८

निर्णय दिनांक २९-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल,<br>रा. बोदवड ता.जि.जळगाव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग,<br>जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग,<br>जळगाव. | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपअभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम),
उपविभाग, भुसावळ
जि.जळगाव

जन अपिलीय अधिकारीः जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम)
विभाग, जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),श्री. सुभाष नामदेव भंगाळे, जन माहिती अधिकारी

तथा उपअभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, भुसावळ जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. संजय नारायण नारखेडे, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२६.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८५ ते २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील बोदवड गावातील रस्त्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

‘ १) बोदवड गावातुन उजनीस जाणारे कीती रस्ते आहेत. त्यातील गांव नकाशा प्रमाणे अथवा भुमी अभीलेख प्रमाणे अधीकृत रस्ते कीती व कोणते आहे. व त्याची रुंदी लांबी कीती आहे व त्यावर शासनाचा कीती खर्च केव्हा केव्हा झालेला आहे. याची नकाशासह माहीती द्यावी. व शासनाच्या खर्च झाल्या प्रमाणे रस्ते वास्तवीक स्थीतीत आहे काय याची माहीती द्यावी.

२) सदर रस्ते केंव्हा पूर्ण झाले व कोणामार्फत झाले यांची खर्चासह माहीती द्यावी. व सदर रस्ते कागदोपत्री नोंद असले प्रमाणे नसल्यास कोणाच्या कर्तव्याची कसुर आहे. व त्याबाबत दखल घेण्याचे अथवा प्रशासकीय कार्यवाही करण्याचे अधीकार कोणाचे आहे याची नाव व पत्यासह ऑफीसची माहीती द्यावी. टेलीफोन नंबर, फॅक्स, यांची माहीती द्यावी.‘

अपिलार्थीने सदर माहिती पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.११.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना दिनांक

२६.९.२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांनी या रस्त्यावर लाखो रुपये खर्च होऊन प्रत्यक्षात रस्ताच उपलब्ध नाही, अशी तक्रार या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांच्या या अपील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २२.१२.२००६ रोजी पारित केले. सदर निर्णय देताना त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.१२.२००६ च्या आत माहिती दिली असल्याने व अपिलार्थी या सुनावणीसाठी उपस्थित नसल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले असून ही माहिती देण्यासंदर्भात त्यांनी टाळाटाळ केल्याचे नमूद केले आहे व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली खरी व संपूर्ण माहिती मिळण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती खोटी आहे. कारण या संदर्भातील माहिती कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर), जळगाव यांच्याकडून त्यांनी घेतली असता या रस्त्यावर आजपर्यंत अंदाजे रु. १ कोटी २३ लाख इतका खर्च झालेला आहे.जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये या रस्त्याचे बांधकाम हे २०-२५ वर्षापूर्वी झाल्याचे म्हटले आहे. तथापि त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, जळगाव यांच्याकडून यासंदर्भात माहिती घेतली असता या रस्त्यावर सन १९९५ पासून खर्च करण्यात आल्याचे दिसून येते. या प्रकरणी त्यांना सत्य माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षा आहे. त्यांना स्पष्ट स्वरुपात माहिती

अपेक्षित असल्याने त्यांनी प्रथमतः हा अर्ज कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, जळगाव यांच्याकडे केला होता, तथापि त्यांनी सदर अर्ज भुसावळ येथील उपविभागीय अभियंता यांच्याकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. त्यांना सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. मात्र त्यांना, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ७.११.२००६ रोजी प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. १९/२६.१०.२००६ अशी तारीख टाकून रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविलेली माहिती त्यांना दि. ७.११.२००६ नंतर प्राप्त झाली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये कार्यकारी अभियंता यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांनी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात दि. १८.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविली व ती माहिती कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २७.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली. त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती सत्य आहे.सदर रस्त्याचे २०-२५ वर्षापूर्वी बांधकाम (उत्तर) विभगामार्फत झाले, ही माहिती त्यांना सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभागाच्या कार्यालयाकडून तोंडी स्वरुपात प्राप्त झाली. या रस्त्यावर त्यांच्या कार्यालयातर्फे कोणताही खर्च करण्यात आला नाही. सदर रस्ता दुरुस्ती व देखभालीकरिता त्यांच्या ताब्यात आहे. परंतु या रस्त्यावरील दुरुस्ती व देखभाल वगळून खडीकरण, मोऱ्या बांधकामे, डांबरीकरण इत्यादी स्वरुपातील कामे सार्वजनिक विभागामार्फत केले जातात.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, या रस्त्यावर जिल्हा परिषदेमार्फत काहीही खर्च करण्यात आला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. २०.१२.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २२.१२.२००६ रोजी पारित केले आहेत. सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी गैरहजर असल्याने व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपविभागीय अभियंता,भुसावळ यांनी दिली असल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ मधील अंशतः माहिती अपिलार्थीस देय नाही. शासनाचा खर्च झाल्याप्रमाणे रस्ता वास्तविक स्थितीत आहे काय, अशा स्वरुपात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती विचारलेली आहे, जी अधिनियमातील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. उर्वरित माहिती अपिलार्थीस देय ठरत आहे. अपिलार्थी यांचा दावा असा आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती चुकीची आहे. या रस्त्यासंदर्भात अपिलार्थीने जिल्हा परिषद, बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, जळगाव यांच्या कडून माहिती प्राप्त करुन घेतली आहे. अपिलार्थीने आज आयोगासमोर, सन १९९५ पासून ते आजतागायत या रस्त्यावर रु.१ कोटी २३ लक्ष रुपये इतका खर्च झाल्याची माहिती त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेतल्याचे सांगितले. सदर काम सा.बां.विभागाकडून केले गेले असल्याने साहजिकच या रस्त्यावरील झालेल्या कामाची माहिती सा.बां.विभागाकडे असेल, हे उघड आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या रस्त्यावर जिल्हा परिषदेकडून आजतागायत कोणताही खर्च झाला नाही, हे म्हणणे धारिष्टयाचे आहे. कारण हा रस्ता दुरुस्ती व देखभालीसाठी जिल्हा परिषदेकडे असताना त्यांवर अद्यापपावेतो काहीही खर्च झाला नाही, ही गोष्ट आयोगास अशक्यप्राय वाटते. अपिलार्थीने आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मागील तारीख टाकून माहिती दिल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पाठविल्यासंदर्भात त्यांना आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी सुनावणी नोटीशीत पूर्वसूचना देऊनही, आयोगासमोर त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची संबंधित प्रत आयोगास सादर केली नाही. यावरुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मागील तारीख टाकून माहिती दिल्याच्या विधानामध्ये तंथ्यांश असावा, असे अनुमान आयोग काढत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने आता अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगाव यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने या प्रकरणी मागितलेली माहिती त्यांना, त्यांचे कार्यालयातर्फे तपासणी करुन, त्यानंतर ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य देण्याची त्यांनी कार्यवाही करावी.

अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्याचे अधिकार कोणाचे आहेत त्यांचे नाव पत्त्यासह दूरध्वनी व फॅक्स क्रमांक इ.माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशाप्रकारची माहिती दिली नसल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.
३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

जळगाव यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २९-०७-२००८** **राज्य माहिती आयोग,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा. बोदवड जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद (सा.बां.) उपविभाग, भुसावळ, जि. जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक मंडळ, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४०९

निर्णय दिनांक २९-०७-२००८

१ श्री. भास्कर बुधा पाटील, : अपिलार्थी
मु. डांगुर्णे, ता. शिंदखेडा,
जि.धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, डांगुर्णे, ता.शिंदखेडा,
जि.धुळे

२ जन अपिलीय अधिकारी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, शिंदखेडा,
जि.धुळे

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी,
(ग्राम पंचायत),
पंचायत समिती, शिंदखेडा
जि.धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. भास्कर बुधा पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. घनश्याम तानाजी आहिरे, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, डांगुर्णे ता.शिंदखेडा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. गौतम दिनकर सोनवणे जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार

अधिकारी (ग्रा.पं.) पंचायत समिती, शिंदखेडा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२५.९.२००६ रोजीच्या अर्जन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे  त्यांच्या ग्रामपंचायतीशी संबंधित सन २००५-२००६ ते दि. ३०.८.२००६ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

‘ १. सन २००५-०६ व दि. ३०/०८/२००६ अखेर खालील प्रमाणे दप्तरच्या नक्कला पाहीजे.

१.१. संपुर्ण ग्रामिण रोजगार योजना कॅशबुक नक्कल व व्हाऊचर फाईल नक्कल.

१.२. १२ व्या वित्त आयोग, इस्टिमेंट, वर्क ऑर्डर, कॅशबुक, व व्हाऊचर नक्कल

१.३. पाणीपुरवठा कॅशबुक व व्हाऊचर

१.४. दलित वस्ती सुधार योजना कॅशबुक व्हाऊचर नक्कल.

१.५. ग्रामनिधी कॅशबुक व व्हौचर नक्कला

१.६ तसेच सर्व पासबुक झेरोक्स.‘

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ तत्कालीन जन माहिती यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील मूळ अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर पोचसही दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे  विहित मुदतील प्रतिसाद माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १९.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.३.२००७, २.४.२००७ व ९.४.२००७ रोजी घेतली व या संदर्भातील आपले आदेश दि. ९.४.२००७ रोजी पारित करुन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न

भरल्याने त्यांनी अपिलार्थीचे सदर अपील फेटाळल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २५.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये काही माहिती मागितली होती. सदर अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. चौधरी यांना दि.२९.९.२००६ रोजी प्राप्त झाला. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नसून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. ११.१२.२००६ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थी यांचा दि. २५.९.२००६ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. मात्र अपिलार्थीने हीच माहिती त्यांच्या दि. २५.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. ही माहिती अपिलार्थीस देण्याप्रीत्यर्थ त्यांनी माहिती पोटीचे शुल्क रु. २६३०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याची अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १२.१२.२००६ च्या पत्रान्वये सूचना केली होती. तथापि अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात न भरल्याने त्यांना आजपावेतो दि. २५.०१.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती पुरविण्यात आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की,जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे केलेली कृती बरोबर असून, ही कृती ध्यानात घेऊन अपिलार्थी यांच्या दिनांक १९.१२.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला व अपिलार्थीचे अपील त्यांनी आवश्यक ते शुल्क न भरल्याने, फेटाळले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ दि. २५.९.२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही, हे पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. चौधरी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज आपला पदभार सोडताना सध्याचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरित केला नसावा, असे अनुमान काढण्यात येत आहे. आता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमातील विहित केलेली मुदत व्यपगत झाली असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.९.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य द्यावी लागेल, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २९-०७-२००८** **राज्य माहिती आयोग,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर बुधा पाटील,मु. डांगुर्णे, ता. शिंदखेडा, जि.धुळे.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत डांगुर्णे, ता. शिंदखेडा, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्राम पंचायत) पंचायत समिती, सिंदखेडा, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४१०

निर्णय दिनांक ३०-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. श्रीकांत रंगनाथ कुलकर्णी,<br>प्रेरणा सोसायटी - आराधना बंगला,<br>टाकळी रोड, गांधीनगर,<br>नाशिक | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,<br>नाशिक | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र<br>औद्योगिक विकास महामंडळ, पुणे मंडळ-<br>२, चिंचवड, पुणे | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. श्रीकांत रंगनाथ कुलकर्णी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. प्रकाश रामलाल भंडोपिया, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. राजीव पुरुषोत्तम परळे, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे फ्लॅटेड बिल्डींग बांधकाम परवानगीबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " सातपूर औद्योगिक (MIDC) वसाहतीत फ्लॅटेड बिल्डिंग (औद्योगिक गाळे बांधणेसाठी) च्या तळघरात (बेसमेंट) उत्पादनांसाठी बांधकाम व वापराची परवानगी MIDC कडून मिळेल का ?
>
> परवानगी मिळणार नसल्यास MIDC च्या कुठल्या नियमानुसार ? त्या नियमांची साक्षांकित प्रत व तो नियम लागू झाल्याची तारिख सह प्रत मिळण्यास विनंती करत आहे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मंजुरीकरिता नकाशा सादर केलेला नसल्यामुळे तळघराची मंजुरी देता येते किंवा नाही हे आता कळविता येणे शक्य नसल्याचे कळवून, अपिलार्थीने नकाशा मंजुरीकरिता सादर केल्यास त्यानंतर त्यांना कळविण्यात येईल, असे कळविले. त्यांच्या या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुढे असेही अवगत केले आहे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील नकाशे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या विकास नियमावलीनुसार मंजूर केले जातात. सदर नियमावलीच्या प्रती मुख्य नियोजक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त होऊ शकतील.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांना जास्तीत जास्त दंड आकरण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १५-१२-२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज निकाली काढला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाचे अवलोकन करता सदर अपील, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देतांना, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती दिली आहे व त्यांच्याकडील दिनांक १३-१२-२००६ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस महामंडळाच्या विकास नियमावलीच्या पृष्ठ क्रमांक ९१ ते ९३ च्या छायांकीत प्रती देण्यात आल्या आहेत या २ मुद्दयांवर निकाली काढल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. (याची नोंदणी आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दिनांक १७-०४-२००७ रोजी झाली आहे) या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची दिशाभूल करुन त्यांच्याकडून दिनांक १३-१२-२००६ रोजीचे खोटे व बेकायदेशीर पत्र लिहून घेतले आहे त्याची चौकशी करण्यात यावी व त्यांना जास्तीत जास्त रकमेची शास्ती लावण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टपणे मिळाली नाही त्यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे तळघरात उत्पादनांसाठी बांधकाम व वापराची परवानगी एमआयडीसी कडून मिळेल का अशी माहिती विचारली होती, तथापि यावर स्पष्टपणे उत्तर न देता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना बांधकाम नियमावलीची प्रत जेथे उपलब्ध आहे अशा कार्यालयाचा पत्ता दिला. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रस्तावित उत्पादनांसाठी तळघरात बांधकाम व वापराची परवानगी मिळेल किंवा नाही अशी माहिती विचारली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती स्पष्ट स्वरुपात प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीकडून, त्यांचे प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाले आहे, असे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून फसवून लिहून घेतले गेले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली होती. अपिलार्थीने कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीस सुनावणीच्या वेळेस त्यांच्याकडील बांधकाम नियमावलीच्या पृष्ठ क्रमांक ९१ ते ९३ विकास नियंत्रण नियम पुस्तकाच्या पृष्ठाच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आल्या. त्यावेळी अपिलार्थीने सदर माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे त्यांना लिहून दिले होते. अपिलार्थीकडून त्यांचा जबाब कोणत्याही पध्दतीने त्यांना न फसविता त्यांनी प्राप्त करुन घेतला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर ऑगस्ट २००७ पासून रुजू झाले असून, अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी दिनांक १३-१२-२००६ रोजी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून घेण्यात आली. त्यांच्या

कार्यालयात उपलब्ध कागदपत्रावरुन त्यांना असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी देण्यात आली असून सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्याची पोच त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे एकूण २ प्रश्नार्थक मुद्दयांवर माहिती विचारली होती, याबाबत मुद्दा क्रमांक १ व्दारे त्यांनी त्यांच्या सातपूर औद्योगिक वसाहतीतील फ्लॅटेड बिल्डींगमध्ये असलेल्या गाळ्याच्या तळघरात (ज्या इमारतीतील अपिलार्थीचा गाळा आहे) उत्पादनासाठी व वापरासाठी परवानगी एमआयडीसीकडून मिळेल काय अशा अर्थाची माहिती विचारली होती. अपिलार्थीने ज्या बेसमेंटसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती विचारली आहे ते बेसमेंट सातपूर औद्योगिक वसाहतीतील फ्लॅटेड बिल्डींगमधील आहे. ही इमारती औद्योगिक वापरासाठी, सिकॉक या सोसायटीमार्फत बांधली गेली आहे. अद्यापपावेतो या इमारतीला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे पूर्णत्वाचा दाखला दिला गेला नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे स्पष्ट केले आहे. सदर इमारतीस पूर्णत्वाचा दाखल मिळाला नसल्याने परंतु त्या आधीच अपिलार्थीस त्यांच्या गाळ्यामध्ये काही उत्पादन करण्याची इच्छा असल्याने त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे मार्गदर्शन प्राप्त करुन घेण्यासाठी वरीलप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत माहिती विचारली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप जरी प्रश्नार्थक स्वरुपात असले तरी या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्पष्टपणे मार्गदर्शन करण्यास कोणतीही अडचण नव्हती. सुनावणीच्या शेवटी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले आहे की, त्यांनी आता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस ही माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानाच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी त्यांच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या

अपिलार्थीस पाठविलेल्या कथित पत्राची मूळ प्रत आयोगास दाखविली. या पत्राचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता त्यांच्या मागणीशी सुसंगत माहिती दिल्याचे दिसून येते. सदर पत्र अपिलार्थीस सुनावणीच्या दिवसापर्यंत प्राप्त झाले नव्हते. या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने सदर माहिती अपिलार्थीपासून दडविल्याचे अथवा त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे आयोगास नि:संशयपणे आढळून न आल्याने संबंधितांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून त्यांच्या दिनांक २४-०७-२००८ रोजीच्या पत्राची एक प्रत (सहपत्रासह) विनामूल्य प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, ते त्यांचे कार्यालयात, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत, कार्यालयीन वेळेत केव्हाही उपस्थित झाल्यास, त्यांना ही माहिती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळता नियमित कार्यालयीन वेळेत व्यक्तिशः हजर राहणे आवश्यक आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना ते त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य ठेवावी.

३. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, सुटीचे दिवस वगळता इतर कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेत, ७ दिवसाच्या आत स्वतः उपस्थित राहून, हस्तगत करुन घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. श्रीकांत रंगनाथ कुलकर्णी, प्रेरणा सोसायटी - आराधना बंगला, टाकळी रोड, गांधीनगर, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातपूर, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे मंडळ-२, चिंचवड, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४१२

निर्णय दिनांक ३०-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विठ्ठलराव किष्टय्या मडूर,<br>वैष्णवी सेल्स कार्पोरेशन भिस्तबाग रोड,<br>सावेडी, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सह धर्मादाय आयुक्त, पुणे | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | अधीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विठ्ठलराव किष्टय्या मडूर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. अशोक बाबुराव वाघमारे, निरीक्षक, जन माहिती

अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी कोतवाली पोलीस स्टेशन येथे दिनांक १३-०८-१९९७ रोजी केलेल्या पत्राच्या कारवाईसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १. वरील संदर्भीय पत्राचे काय झाले ? त्या पत्रानुसार संबंधितांवर काय कारवाई केली गेली किंवा कोणत्या प्रकारे चौकशी झाली व त्याबाबत काय निर्णय झाला याची माहिती.

२. मी वरील पत्रानुसार कोतवाली पोलिस स्टेशन येथे दिनांक १२/८/१९९७ रोजी समक्ष तक्रार केली होती. ती तक्रार जर तुमच्या मते खोटी होती, तर माझ्यावर फौजदारी कारवाई का करण्यात आली नाही ? तसेच वरील पत्रातील प्रकरणाचे पुढे काय झाले याविषयीची सविस्तर माहिती देण्यात यावी.

महोदय, आपण भ्रष्टाचार करण्यास खत-पाणी घालुन आम्हांस निव्वळ वेळकाढुपणा, दप्तर दिरगांई करुन वेळ मारुन नेत आम्हांस तरी त्या निवेदनावर त्वरीत लक्ष घालून कायदेशीर कारवाई करुन जी कारवाई केली गेली त्यांची झेरॉक्स प्रत मला त्वरीत मिळावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन मूळ अर्जाव्दारे अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात समक्ष उपस्थित राहण्यास कळविले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याच्या पुराव्यापुष्ठ्यर्थ त्यांच्याकडील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन त्यांनी त्यांच्याकडील ९३८ क्रमांकाच्या दिनांक २४-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती अपिलार्थीस पुरविली गेली असल्याचे दिसून येत आहे. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०७-२००६ अशी तारीख नोंदविली आहे, मात्र त्यांच्याकडील जावक नोंदवहीमध्ये दिनांक २४-०७-२००६ रोजी सदर पत्र पाठविल्याची नोंद आहे, तसेच या नोंदीतील हस्ताक्षर व या नोंदी व्यतिरिक्त इतर पत्रांच्या संदर्भात असलेले हस्ताक्षर यामध्ये फरक असल्याचे दिसून येत आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीने प्रथम अपील चुकीच्या प्राधिकरणाकडे म्हणजेच सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्याकडे केले होते. या अपिलावर सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी दिनांक २१-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीस योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाकडे त्यांचे याविषयासंदर्भातील अपील सादर

करण्याचे सूचित केले. सदर आदेश देतांना सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने केलेले अपील त्यांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेरील जिल्ह्याशी संबंधित असल्याने त्यांनी हे आदेश दिले आहेत. तथापि अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०८-१९९७ च्या पत्राव्दारे अहमदनगर कोतवाली पोलीस स्टेशनकडे अध्यक्ष मार्कंडेय मंदिर देवस्थान, अहमदनगर या नात्याने श्री. मार्कंडेय विद्यालय, अहमदनगरचे मुख्याध्यापक व इतर दोघांविरुध्द त्यांनी केलेल्या पैशाच्या अपहाराविषयी तक्रार केली होती. सदर तक्रारीचा अर्ज पोलीस स्टेशन अहमदनगर येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०८-१९९७ रोजी पाठविला होता, त्या अर्जावर काय कारवाई जन माहिती अधिकारी यांच्याकडून करण्यात आली याची माहिती त्यांना आजही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अनुक्रमे सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर व सह धर्मादाय आयुक्त, पुणे या चुकीच्या प्राधिकरणाकडे केले होते. अपिलार्थीच्या दिनांक २७-०६-२००६ रोजीच्या अर्जास अनुसरुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये व तदनंतर दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात समक्ष बोलाविले होते, तथापि अपिलार्थी त्यावेळी त्यांच्या कार्यालयात हजर राहिले नाहीत. अपिलार्थीस आवश्यक असलेली

माहिती त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये देण्यासाठी त्यांना प्रत्यक्ष बोलाविले असता ते पत्र वाचून अपिलार्थीने ते स्वीकारण्यास नकार दिला. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या पत्राची मूळ प्रत आयोगास दाखविली. त्याचे अवलोकन करता त्यामध्ये अपिलार्थीने पत्र स्वीकारण्यास नकार दिला आहे असे संबंधित निरीक्षकाचे अभिप्राय त्यांनी दिनांक ११-०९-२००६ रोजी त्यावर त्यांच्या सहीसह नोंदविल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाप्रीत्यर्थ आयोगास एक निवेदन दिले असून (विनादिनांकाचे) त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्या दिनांक २१-०९-२००६ रोजीच्या आदेशानुसार त्यांच्या कार्यालयात आजपावेतो प्रथम अपील सादर केलेले नाही, मात्र याच माहितीसाठी त्यांनी दिनांक २३-०६-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयाकडे मागणी केली असता अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस दिनांक १६-०७-२००८ रोजी माहिती पुरविली आहे, त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात यावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. त्याप्रमाणे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातून समक्ष घेऊन जाण्याबाबत सूचित केले होते, तथापि हे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यासाठी परत अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलाविले, या पत्राची प्रत अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडली आहे.

यावरुन हे पत्र अपिलार्थीस मिळाल्याचे सिध्द होत आहे. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना व्यक्तिश: माहिती हस्तांतर करण्याचा प्रयत्न केला तथापि सदर पत्र वाचून अपिलार्थीने हे पत्र स्वीकारण्यास नकार दिला व त्याप्रमाणे हे पत्र देणा-या निरीक्षकाचे अभिप्राय जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या मूळ प्रतीवर नोंदविलेले आहेत. याहीपेक्षा महत्त्वाची बाब अशी आहे की, सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाकडे प्रथम अपील करण्याची सूचना देऊनही त्यांनी आयोगाकडे सरळ त्याच दिवशी व्दितीय अपील केले आहे. (दिनांक २१-०९-२००६ रोजी सूचना देऊनही). अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी आता अधिक कालपव्यय होऊ नये म्हणून आयोगाने सुनावणी घेण्याचे ठरविले आहे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या आयोगास सादर करण्यात आलेल्या नोंदीवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने हीच माहिती दिनांक २३-०६-२००८ रोजी त्यांच्याकडे मागितली असता त्यांनी ती माहिती दिनांक १६-०७-२००८ रोजी त्यांना पुरविली. सदर माहिती अपिलार्थीस आता प्राप्त झाली आहे असे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थी यांनी या प्रकरणी प्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश: माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने अपिलार्थीची आहे. याचा अर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वत: उपस्थित राहणे, माहिती तयार नसल्यास ती माहिती तयार करुन घेण्यासाठी ते उपस्थित राहिल्याची लेखी नोंद करुन नंतर ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेणे असा होतो. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिश: माहिती घेण्यासाठी अधिनियमातील विहित मुदतीत कधीही हजर झाले नाहीत व ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०९-२००६ रोजी माहिती देण्याची तयारी दर्शविली त्यावेळी ती माहिती वाचून ती स्वीकारण्याचे त्यांनी नाकारले. याहीपेक्षा महत्त्वाची

बाब म्हणजे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून हीच माहिती दिनांक १६-०७-२००८ रोजी प्राप्त झालेली आहे हे पाहता या टप्प्यावर आयोगास निर्णयार्थ कोणताही मुद्दा उरलेला नाही असे दिसून येत आहे.

वरील संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थी यांच्याकडून केल्या गेलेल्या तांत्रिक चुकामुळे व अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगावशात् येथे असे दिसून येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या कार्यालयाने उपरोक्त निर्णयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे त्यांच्याकडील जावक नोंदवहीमधील दिनांक २४-०७-२००६ रोजीच्या पत्रव्यवहाराची नोंद आयोगास संशयास्पद वाटते. या प्रकरणी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी स्वतः चौकशी करुन यावर पुढील आवश्यक ती कारवाई करावी, असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विठ्ठलराव किष्टय्या मडूर, वैष्णवी सेल्स कार्पोरेशन, भिस्तबाग रोड,

सावेडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४१५

निर्णय दिनांक ३०-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. देवाजी वामनराव ठोके,<br>मु. पो. काजीसांगवी, तालुका चांदवड,<br>जिल्हा नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस उप निरीक्षक, चांदवड<br>पोलीस स्टेशन, तालुका चांदवड, जिल्हा<br>नाशिक | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस उप अधीक्षक, मनमाड<br>विभाग, मनमाड, तालुका नांदगाव,<br>जिल्हा नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. देवाजी वामनराव ठोके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अशोक सुदाम गडकरी, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप निरीक्षक, चांदवड पोलीस स्टेशन व जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, मनमाड विभाग, मनमाड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व श्री. शरदचंद्र मुरलीधर गव्हाणे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप निरीक्षक, चांदवड पोलीस स्टेशन हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात दिनांक १८-०७-२००६ व दिनांक २२-०९-२००६ रोजी सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कारवाईसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "(१) ता. १८/७/२००६ (२) ता. २२/९/०६ रोजी चांदवड पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे सबंधितांवर झालेल्या कायदेशीर कार्यवाही बाबतची माहीती."

अपिलार्थीने सदर माहिती सर्वसाधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ४७ दिवस माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर ४२५० रुपये व त्यांच्या अपिलावर अंतिम निर्णय होईपर्यंत रुपये २५० प्रमाणे शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र यासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये

त्यांनी आपला निर्णय कळविला. त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीचा परत उल्लेख केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत अपिलार्थीस त्यांच्या अपील अर्जावर निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विलंबाने व अपूर्ण माहिती प्राप्त झालेली आहे तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपील अर्जासंदर्भात कोणताही निकाल दिलेला नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली. या प्रकरणी त्यांना झालेल्या मानसिक त्रासाबद्दल व त्यांना झालेल्या खर्चाबाबत त्यांना नुकसानसानभरपाई मिळावी व अधिनियमाच्या कलम २० मधील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या ज्या वेळी माहिती मागितली त्या त्या वेळी त्यांना ती पुरविली आहे. उपरोक्त प्रकरणात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक २६-०२-२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक १८-०७-२००६, २२-०९-२००६ रोजी जे अर्ज केले त्या दोन्ही अर्जातील त्यांचे म्हणणे एकच असून त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर संबंधितांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला असून सदर प्रकरण कोर्टात दाखल केले आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण जे. एम. सी. कोर्ट, चांदवड येथे न्यायनिवाड्याकरिता प्रलंबीत

आहे, तसेच अपिलार्थीच्या दिनांक १८-०७-२००६ च्या तक्रारीवर त्यांनी दिनांक २८-०८-२००६ रोजी चॅप्टर प्रोसिंडींग भरुन ती तहसीलदार चांदवड यांच्याकडे पाठविली आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे दिलेल्या दिनांक २२-०९-२००६ रोजीच्या अर्जातील मजकूर दिनांक १८-०७-२००६ च्या अर्जाप्रमाणेच असून एकदा चॅप्टर प्रोसिंडींग पाठविल्यानंतर त्याच आरोपाकरिता ६ महिन्याच्या आत दुसरी चॅप्टर प्रोसिडींग अनुज्ञेय नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०९-२००६ रोजीच्या अर्जावर चॅप्टर प्रोसिडींग पुढे पाठविली नाही. अपिलार्थीचा त्यांच्या शेताच्या प्रश्नावरुन पाटे या गावातील श्री. तळेकर नावाच्या व्यक्तींशी मालकीहक्कासंदर्भात वाद झालेला असून या प्रकरणात अंदाजे एकूण ९ दावे न्यायालयामध्ये सध्या प्रलंबीत आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीस अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी हे का सुनावणी घेऊ शकले नाहीत यासंदर्भात कोणतेही कारण आयोगास सांगता आले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या अर्जाब्दारे मागणी केलेली माहिती त्यांना सर्वसाधारण परिस्थितीत दिनांक २७-०१-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अपेक्षित होते, तथापि सदर माहिती अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने पुरविल्याचे दिसून येत आहे. सदर विलंबाचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यावेळी न्यायालयाच्या ताब्यात असल्याने त्यांना सदर माहिती न्यायालयाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी काही कालावधी लागला. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला असे सांगितले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १८-०७-२००६ व २२-०९-२००६ रोजीच्या अर्जावर काय कारवाई केली हे त्यांना दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती

अधिकारी यांनी कळविले आहे.  अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कथित कारवाई त्यांच्या दिनांक १८-०७-२००६ व २२-०९-२००६ रोजीच्या अर्जावरुन केली नसून ही त्यांच्या पत्नीने केलेल्या वेगळ्या अर्जाच्यासंदर्भातील आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती याच अर्जासंदर्भातील असल्याचे सिध्द केले आहे, त्यामुळे अपिलार्थीचा, जन माहिती अधिकारी यांनी चुकीचा व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे, हा दावा आयोग फेटाळून लावत आहे.  उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जो विलंब लागलेला आहे तो विलंब जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने अथवा अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळण्याच्या दृष्टीने लावल्याचे आयोगासमोर निःसंशयपणे सिध्द झाले नाही.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावयाची माहिती त्यावेळी न्यायालयाकडे प्रलंबीत होती व ही माहिती त्यांना न्यायालयाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी विलंब लागला हा मुद्दा जरी ग्राह्य धरला तरी माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे प्रथमतः विहित मुदतीत प्राधान्याने कार्यवाही करणे अपेक्षित आहे, याची त्यांनी इतःपर नोंद घ्यावी. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती न्यायालयाकडून संबंधित अभिलेखे तात्पूरत्या स्वरुपात मागवून घेऊन, त्यातील माहिती अपिलार्थीस पूरवून हे अभिलेखे न्यायालयास त्वरित परत करणे साधारण परिस्थितीत त्यांच्याकडून अपेक्षित आहे.  उपरोक्त प्रकरणी अशा प्रकारची कृती न करता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना ताकीद देण्यात येत आहे व भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त होणा-या अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.  अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असल्यामुळे आता त्यांना माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १२-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या या कृतीव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा नि:संशयपणे भंग केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाची नोंद जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ३०-०७-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देवाजी वामनराव ठोके, मु. पो. काजीसांगवी, तालुका चांदवड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप निरीक्षक, चांदवड पोलीस स्टेशन,

तालुका चांदवड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, मनमाड विभाग, मनमाड, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४८२

निर्णय दिनांक ३०-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रसाद महाराज गुरु ज्ञानेश्वर महाराज अमळनेरकर, मार्फत श्री. बबनराव पांडुरंगराव बेंद्रे, (सेवानिवृत्त तहसीलदार), प्लॉट नं. ४० "अक्षय", महाराणा प्रताप सोसायटी, सिडको, एन-७, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. बबनराव पांडुरंगराव बेंद्रे अपिलार्थी श्री. प्रसाद महाराज गुरु ज्ञानेश्वर महाराज अमळनेरकर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. हरीचंद्र आसाराम सरोदे, जन माहिती अधिकारी तथा प्रभारी

अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. सदगुरु सखाराम महाराज विठ्ठल रुख्मिणी संस्थान अमळनेर शी संबधित खालीलप्रमाणे एकूण २ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

> " Shri Sadguru Sakharam Maharaj Vithal Rukhmini Sansthan Amalner Dist. Jalgaon is a Registered Trust No. is (A-465 Jalgaon). I have applied for update list of present Trustees on 28-7-06 secondly I have applied for अनूसूची १ (नियम-५ पहा) सार्वजनीक व्यवस्थांचे/ नोंदणीपत्रक) (कामापुरती नक्कल) on 13-9-06 (8 copies). I have to submit certified copies in the Ashti Court in case No. 146/03 and in the Court of Hon. Joint Charity Commissioner Nasik in case No. 22/01 25/01

अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १३-१०-२००६ रोजीचे सदर पत्र अपिलार्थीस दिनांक १८-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दिनांक ३१-१०-२००६ रोजी पारित केले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक

१३-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा मुद्दा मान्य करुन अपिलार्थीचे हे व्दितीय अपील त्यांनी फेटाळून लावले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. तसेच सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाचे शेड्युल १ चे रजिस्टर जीर्ण अवस्थेत असल्याचे नमूद करुन सदर रजिस्टर आजपावेतो अद्ययावत करण्यात आले नाही, असे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक १३-१०-२००६ रोजी आवश्यक असलेली माहिती अर्धवट स्वरुपात प्राप्त झाली आहे. त्यांनी त्यांच्या मूळ अर्जात शेड्युल १ ची प्रत मागितली होती, तथापि रजिस्टर जीर्ण झाले असल्यामुळे जन माहिती अधिकारी हे त्यांना ती माहिती पुरवू शकले नाहीत, त्यामुळे त्यांनी स्वत: त्यांच्याकडील उपलब्ध कादपत्रांच्या आधारे शेड्यूल १ ची नव्याने पुनर्बांधणी करुन ही प्रत जन माहिती अधिकारी यांच्यकडे सादर केली होती. सदर प्रत, जन माहिती अधिकारी यांना जर त्यांच्याकडे आधीची शेड्युल १ ची उपलब्ध प्रत अपिलार्थीस जर आता देता येत नसेल तर किमान त्यांनी तयार करुन दिलेली प्रत तरी त्यांना प्रमाणित करुन द्यावी असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीकडून शेड्यूल १ ची प्रत त्यांना नव्याने प्राप्त झाल्यास ती तपासून त्याच्यावरील नोंदी प्रमाणित करण्याची कार्यवाही ते आजपासून एक महिन्याच्या आत पूर्ण करतील व सदर प्रपत्र-१ ते विनामूल्य हस्तांतर करतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत स्वरुपाची माहिती त्यांच्या दिनांक १४-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. सदर अर्जामध्ये अपिलार्थीने २ मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यातील पहिला मुद्दा म्हणजे सध्या कार्यरत असलेल्या संस्थानच्या विश्वस्तांची यादी व या संस्थानच्या परिशिष्ट १ ची प्रत, याबाबत पहिल्या मुद्दयास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत उत्तर दिले आहे, मात्र दुस-या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर आयोगास स्वीकारार्ह वाटत नाही. सदर उत्तराव्दारे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या परिशिष्ट १ च्या संदर्भातील माहिती देण्यास प्रत्यक्षपणे नाकारल्याचे येथे दिसून येत आहे. सदर माहिती नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील नोंदीची पाने अर्धवट फाटलेली आहेत, त्यामुळे मिळकतीचा पूर्णपणे बोध होत नाही असे कळविले आहे. ज्या नोंदी पूर्णपणे दिसून येतात तेवढ्या मिळकतीच्या नोंदी अपिलार्थीस पुरविता येतील, परंतु त्यांना स्वतः सदर नकलांकरिता स्वतंत्र अर्ज करावा लागेल असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. येथे असे लक्षात घेतले पाहिजे की, आता माहिती अधिकार अधिनियम अस्तित्वात आल्याने व त्याच्या अंमलबजावणीच्या संदर्भात शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११-१०-२००५ रोजी क्रमांक R.T.I. 2005/C.R. 315/०५/५ च्या अधिसुचनेनुसार माहितीच्या शुल्काची निश्चिती केली आहे. अपिलार्थीस येथे "नकला" अपेक्षित नसून परिशिष्ट १ ची (ए ४ किंवा ए ३ च्या आकारमानाकरिता प्रतिपृष्ठ दर रुपये २ /-) झेरॉक्स प्रत हवी आहे. ही देण्याकरिता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरावयास लागणारे शुल्क वरील अधिसुचनेतील कलम ४ मधील तरतुदीनुसार त्यांना कळविणे अपेक्षित होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क

अपिलार्थीस कळविण्यासाठीचा अधिनियमामध्ये विहीत केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना आता विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडील उपलब्ध अभिलेखे जीर्ण झाले असल्यास त्यांची नव्याने पुनर्बांधणी करुन ते तपासून त्याची प्रमाणित प्रत अपिलार्थीस देण्याचा प्रस्ताव जन माहिती अधिकारी यांच्यासमोर मांडला आहे. सदर प्रस्ताव तपासून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या परिशिष्ट १ ची प्रत देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही ३० दिवसाचे आत करण्याची उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले आहे. सबब संबधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्याच्या मूळ अर्जातील मागणी केलेली उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीस सध्या कार्यरत असलेल्या विश्वस्तांची यादी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या पत्राने पुरविली असून या यादीतील काही विश्वस्त मयत झाले असल्याचे अपिलार्थीने आयोगास सांगितले. सदर विश्वस्त मयत झाले असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती दिली असा त्यांचा ग्रह झाला आहे, तथापि या माहितीच्या त्रुटीची पुर्तता करण्यासाठी सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरित करणे गरजेचे आहे असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबधित जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्याच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती प्रमाणित करुन ती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रसाद महाराज गुरु ज्ञानेश्वर महाराज अमळनेरकर, मार्फत श्री. बबनराव पांडुरंगराव बेंद्रे, (सेवानिवृत्त तहसीलदार), प्लॉट नं. ४० "अक्षय", महाराणा प्रताप सोसायटी, सिडको, एन-७, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४८३

निर्णय दिनांक ३०-०७-२००८

१ श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे, : अपिलार्थी
१३९, गांधीनगर, धुळे रोड, नंदुरबार,
तालुका जिल्हा नंदुरबार

२ श्री. अशोक नामदेव पाटील,
१३९, गांधीनगर, धुळे रोड, नंदुरबार,
तालुका जिल्हा नंदुरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
बांधकाम उपविभाग, पंचायत समिती,
धडगाव, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप अभियंता, बांधकाम उपविभाग,
पंचायत समिती, धडगाव, जिल्हा नंदुरबार

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, धडगाव, तालुका धडगाव, जिल्हा नंदुरबार

जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद

(बांधकाम) उपविभाग, धडगाव, तालुका

धडगाव, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०७-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे व श्री. अशोक नामदेव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. रमेश रामचंद्र शेवाळे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, धडगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, धडगाव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात एप्रिल २००५ ते मार्च २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ आपल्या कार्यक्षेत्रात झालेल्या सर्व प्रकारच्या कामांचे अंदाजपत्रक आणि मोजमाप पुस्तीकेच्या छायांकित प्रति.”

अपिलार्थीने सदर माहिती रजिष्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला हा अर्ज बांधकाम उपविभागाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांना प्राप्त न होता तो प्रथमतः गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धडगाव यांच्याकडे प्राप्त झाला. सदर अर्ज त्यांच्याकडे अप्राप्त असल्याचे जन माहिती अधिकारी हे आजही आयोगासमोर सांगत आहेत, तथापि अपिलार्थीने आयोगासमोर सादर केलेल्या पुराव्यावरुन अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दिनांक २७-०४-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊन आदेश पारित केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, मात्र उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, धडगाव यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ११-०७-२००६ चे पत्र आयोगास उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या पत्रात अपिलार्थी यांना द्यावयाच्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यास ते तयार आहेत काय याचा जन माहिती अधिकारी यांना लिहिलेल्या अर्जात उल्लेख नसल्याचे नमूद केले आहे. सदर बाबींची पुर्तता करुन त्यांनी अपिलार्थीस नव्याने अर्ज करण्याचे या पत्रात सूचित केल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाची व प्रथम अपिलाची त्यांनी दखल घेतली नाही व त्यांना त्यांच्याकडील दिनांक ११-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज केला असून त्यामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती नसल्याने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यास ते तयार आहेत काय अशी निरार्थ विचारणा त्यांनी त्यांच्या दिनांक ११-०७-२००६ रोजीच्या पत्राव्दारे

त्यांच्याकडे केली आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही, मात्र अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक २४-०६-२००६ रोजी केलेले अपील त्यांना प्राप्त झाले त्यावेळी या अपिलाबरोबर त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज पाहिला व त्यांना अपिलार्थीस कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे याचा उलगडा झाला. त्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी पूर्णपणे विसंगत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांच्या उपविभागाकडील केलेल्या एप्रिल २००५ ते मार्च २००६ या कालावधीतील सर्व कामांचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकांच्या छायांकीत प्रती मागितल्या होत्या तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कडील कामांची यादी २ वर्षे ३ महिने इतक्या विलंबाने पाठवून दिल्याचे दिसून येत आहे. त्यांनी विलंबाने देखिल अपिलार्थीस पूर्णतः चुकीची माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अत्यंत मोघम स्वरुपाची व प्रचंड व्याप्ती असलेली माहिती मागितली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रात झालेल्या सर्व कामांच्या अंदाजपत्रकांच्या व मोजमाप पुस्तिकांच्या छायांकीत प्रती अशा मोघम स्वरुपाची मागणी केली आहे. या माहितीमध्ये कोणत्याही विशिष्ट कामाचा उल्लेख नाही. सर्वसाधारणतः तालुका स्तरावरील जिल्हापरिषदेच्या बांधकाम उपविभागाकडून अनेक प्रकारची लहान व मोठ्या

स्वरुपाची कामे करण्यात येत असतात. यामध्ये त्यांना विविध विभागांकडून त्यांच्यावर सोपविण्यात येणा-या बांधकामांचाही समावेश असतो. अपिलार्थीने जरी मोघम स्वरुपात माहिती मागितली असली तरी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या अर्जासंदर्भातील निर्णय अधिनियमातील कलम ७ (१) नुसार ३० दिवसाच्या आत कळविणे भाग होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले. मात्र अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडील दिनांक १६-०६-२००६ रोजीच्या अपील अर्जासोबत जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २४-०६-२००६ रोजी प्राप्त झाला त्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रथमतः दिनांक २४-०६-२००६ रोजी प्राप्त झाला, असे जरी गृहीत धरले तरी त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००८ रोजी म्हणजेच २ वर्षे ३ महिने इतक्या विलंबाने माहिती दिली व ही माहिती देखिल अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी कोणत्याही प्रकारे सुसंगत नसून पूर्णतः भिन्न स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जाची व माहिती अधिकार अधिनियमाची एक प्रकारे कुचेष्टा केली आहे, असे आयोगास प्रतीत होत आहे. त्यांनी अपिलार्थीस विलंबाने चुकीची माहिती पुरविली आहे व सत्य माहिती देण्याचे टाळले आहे. त्यांनी दाखविलेल्या अशा प्रकारच्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर विभागीय महसूल आयुक्त, नाशिक विभाग यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. त्याचबरोबर त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीचा प्रथम अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धडगांव यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-याकडे प्राप्त झाला व ज्यांनी सदर अर्ज लघुपाटबंधारे उपविभागाकडे हस्तांतर केला त्या लिपिकावरही मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, नंदूरबार यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. माहितीचे मोघम स्वरुप पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी विशिष्ट कामांची जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळ्या अर्जाव्दारे माहिती मागवावी. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार यथायोग्य कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर विभागीय महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धडगांव यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-याकडे प्राप्त झाला (पत्रव्यवहार पाहणारे लिपीक) व ज्यांनी सदर अर्ज लघुपाटबंधारे उपविभागाकडे हस्तांतरीत केला त्या लिपिकावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य

प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-०७-२००८ राज्य माहिती आयुक्त,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भास्कर गुलाबसिंग गिरासे, १३९, गांधीनगर, धुळे रोड, नंदुरबार, तालुका जिल्हा नंदुरबार.

२ श्री. अशोक नामदेव पाटील, १३९, गांधीनगर, धुळे रोड, नंदुरबार, तालुका जिल्हा नंदुरबार.

३ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, धडगाव, तालुका धडगाव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, धडगाव, तालुका धडगाव, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ विभागीय महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३९७

निर्णय दिनांक ३१-०७-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विष्णू विठ्ठल साबळे,<br>मु.पो.विंचुर ता. निफाड जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.<br>लासलगाव उपविभाग,ता.निफाड जि.नाशिक | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.<br>ग्रामीण विभाग चांदवड, जि.नाशिक | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. विष्णू विठ्ठल साबळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. मिलींद भगवान चौधरी, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.लासलगाव, ता.निफाड, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. चंद्रशेखर उत्तमराव पाटील, जन अपिलीय अधिकारी तथा (प्र)कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. चांदवड विभाग, जि.नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२१.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित अधिनियमातील कलम ४ प्रमाणे प्रत्येक शासकीय प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने प्रसिध्द करावयाच्या माहितीसंबंधी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> ‘ (एक) आपले कार्यालय व आपले कार्यालयाच्या अधिपत्याखाली आसलेले सर्व कार्यालयात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये (प्रकरण दोन) कलम ४ चे पोटकलम १ चे पोटकलम ख चे पोटकलम-एक ते सतरा प्रमाने प्रत्येक कार्यलयात दिनांक १/१०/२००५ पासून तर आज पावेतो समान आदर्श नमुण्यात माहिती ठेवलेली आहेत काय ? त्या ठेवलेल्या नमुण्याच्या छायाकींत प्रती प्रत्येक कार्यालयानुसार स्वतंत्रपणे देण्यात याव्यात?
>
> (दोन) आपले कार्यलयामध्ये कलम ४ चे पोट कलम १ चे पोट कलम (क) प्रमाणे नेटर्वक मार्फत जोडलेल्या बेबसाईटचा नंबर देण्यात यावा व आपल्या कार्यालयामध्ये उपलब्ध आसलेली सीडी देण्यात यावी.
>
> (तीन) आपल्या कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियमा प्रमाणे कलम ४ अन्वयेचे पोट कलमानुसार माहिती ठेवली नसेल तर आपण या कार्यालयाचे प्रमुख व सक्षम अधिकारी या नात्याने कोणते प्रयत्न केले आहेत तसेच काय कार्यवाही केली आहे ? त्याबद्दलची माहिती ?‘

या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन या पृष्ठयर्थ संबंधित ग्रामपंचायतचा दाखला जोडला असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदर काम प्रगतीपथावर असल्याचे या पत्रामध्ये त्यांनी अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २१.९.२००६ रोजी प्रथम अपील करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीवर कोणाकडे अपील करावयाचे याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे नमूद केल आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणूनबुजून माहिती देण्याचे टाळले असल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे शास्ती लावण्याची व त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची विनंती त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना केली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दि. २१.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस या प्रकरणातील तत्कालीन स्थितीविषयी माहिती देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या वेबसाईट 'श्ख्णठ्ठडुत्द्मड़दृ.त्द' वर उपलब्ध असल्याचे कळविले आहे. याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील प्रत्येक कार्यालयासाठी स्वतंत्र वेबसाईट उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. या पत्रामध्ये पुढे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणूनबुजून माहिती पुरविण्यासाठी कसूर केल्याचे न आढळल्यामुळे, त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही व विभागीय चौकशीची शिफारस करता येणार नसल्याचे नमूद केले आहे. थोडक्यात, त्यांनी या पत्राद्वारे अपिलार्थीने त्यांच्या अपिलामध्ये केलेली माहितीची मागणी फेटाळून लावली आहे व याद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य

माहिती आयोगाकडे दि.०४.०४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे जाणूनबुजून टाळल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे. त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील करेपर्यंत त्यांना माहिती प्राप्त होण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहावे लागले, याबद्दल झालेल्या खर्चाची नुकसान भरपाई देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती करुन पुढे जन माहिती अधिकारी यांना आयोगाकडील सुनावणीसाठी संबंधित कंपनीकडून देण्यात येणारी प्रवासखर्च व दैनिक भत्त्याची रक्कम देण्यात येऊ नये, अशीही आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये सुनावणी घेतली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदर माहिती अद्यापपावेतो न दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्यावेळी प्रथमतः माहितीची मागणी केली, त्यावेळी ती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती, सदर माहिती त्यांच्याकडे काही प्रमाणात आजही उपलब्ध नाही, त्यामुळे काही माहिती त्यांच्या कंपनीच्या वेबसाईट ‘mahadiscom.in’ वरुन गोळा करुन व काही माहिती त्यांच्या कार्यालयामार्फत नव्याने तयार करुन ते ती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविता आली नाही, याबद्दल ते महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वतीने दिलगीर आहेत. अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे या पदावर कार्यरत नसून त्यांची अन्यत्र बदली झालेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तीस दिवसांच्या आत देण्यात येईल, या जन माहिती अधिकारी यांच्या आश्वासनाचा त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या अखेरीस पुनरुच्चार केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना जी माहिती मागितली होती, ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.१०.२००५ रोजी अगर तत्पूर्वी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार भाग होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून झाली नसल्याचे दिसून येते. मूळात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य नीटपणे पार पाडले नाही परंतु अपिलार्थीने माहिती मागितल्यानंतरही अशी माहिती तयार करण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती 'mahadiscom.in' या वेबसाईटवर उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले, तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, म.रा.वि.वि.कं.म.लासलगाव उपविभागाशी संबंधित, 'mahadiscom.in' या वेबसाईटवर, या कार्यालयाच्या शेवटच्या स्तरावरील यंत्रणेसंदर्भातील, त्यांच्या कार्यालयासंदर्भात माहिती प्रसिध्द झाली आहे किंवा कसे, हे कळण्यास मार्ग नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या

कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची नावे या वेबसाईटवर प्रसिध्द झाली आहे किंवा कसे असे त्यांना वानगीदाखल विचारले असता त्यांनी या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर दिले. यावरुन म.रा.वि.वि.कं.ने त्यांच्या या वेबसाईटमध्ये प्रसिध्द केलेली माहिती एका विशिष्ट स्तरापर्यंतच उपलब्ध असावी, असे आयोगाने अनुमान काढले आहे. तथापि माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ च्या तरतुदीद्वारे व अधिनियमाच्या मूळ उद्देशामध्ये अपेक्षित असलेली, - विभागाच्या सर्व स्तरावरील यंत्रणेच्या संपूर्ण पारदर्शकतेची अपेक्षा लक्षात घेता प्रत्येक शासकीय प्राधिकरणाने व त्यांच्या कनिष्ठतम कार्यालयाने त्यांच्या कार्यालयाशी संबंधित अशी सतरा मुद्यांवरील माहिती ठेवणे गरजेचे आहे, याचे भान संबंधितांना नसावे, असे वाटते. सबब व्यवस्थापकीय संचालक यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कंपनीच्या कनिष्ठतम स्तरावरील कार्यालयाची या १७ मुद्यावरील माहिती वेबसाईटवर उपलब्ध होईल, या दृष्टीने त्यांच्या सध्याच्या वेबसाईटची व्याप्ती वाढविण्याकरिता त्वरित व्यवस्था करावी. उपरोक्त प्रकरणी संबंधितांनी मागणी केलेली माहिती आता तीस दिवसांच्या आत तयार करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आश्वासित केले आहे व अपिलार्थीस माहिती देण्याचा अधिनियमातील विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यालयाशी संबंधित अधिनियमातील कलम ४ (ख) प्रमाणे अनिवार्य असलेली सर्व माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत कार्यवाही न करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर, प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित

होताच तीन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तद्‌नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांना आयोगाकडे सुनावणीस हजर राहण्यासाठीचा प्रवासभत्ता नामंजूर करावा, अशी विनंती केली आहे, या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडील सुनावणीस हजर राहणे हा त्यांच्या दैनंदिन प्रशासकीय कर्तव्याचा एक भाग असल्याने अशाप्रकारचे आदेश पारित करणे आयोग उचित समजत नाही व तसे केल्यास ती अधिनियमाच्या कक्षेबाहेरील कार्यवाही होईल, हे अपिलार्थी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे व त्यांची ही विनंती फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३.व्यवस्थापकीय संचालक,म.रा.वि.वि.कं.म.मुंबई यांनी, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल, त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याच्या आत करुन

आपला अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक : ३१-०७-२००८ राज्य माहिती आयोग,

खंडपीठ औरंगाबाद

**प्रत,**

१. श्री. विष्णू विठ्ठल साबळे,मु.पो.विंचुर ता. निफाड जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.लासलगाव, ता.निफाड, जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.ग्रामीण विभाग, चांदवड, जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४१६

निर्णय दिनांक ३१-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिपक बाळासाहेब कुऱ्हाडे,<br>रा. श्रीरामपूर, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहा.वनसंरक्षक (रोहयो),<br>अहमदनगर जि.अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपवनसंरक्षक,<br>अहमदनगर जि.अहमदनगर | | |
| १ श्री. पी.बी.धानके | : | त्रयस्थ पक्ष |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. नंदकिशोर चंद्रकांत रामदिन, जन माहिती अधिकारी तथा सहा.वनसंरक्षक (रोहयो) अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दिलीप धनजी गुजेला, जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत, तर अपिलार्थी श्री. दिपक बाळासाहेब कुऱ्हाडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२०.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. पी.बी.धानके, सहा.वनसंरक्षक यांच्याशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

> ‘ श्री. पी. बी. धानके सो. सहाय्यक वन-संरक्षक श्रीगोंदा स्थित अहमदनगर यांचे मला आपल्या कार्यालयामार्फत शाळा सोडल्याचा दाखला व जात दाखल्यांची ॲटेस्टेड प्रती मिळाव्या ही विनंती. शासकीय नियमाप्रमाणे फी भरण्यास मी तयार आहे.‘

सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्यास त्रयस्थ पक्षाने हरकत घेतल्याने, अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १६.०१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. सदर अपिलावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात २९.१.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले व त्यांनी या संदर्भातील त्यांचे म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे सादर केले. अपिलार्थीचे लेखी म्हणणे विचारात घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.२.२००७ रोजी आपला निर्णय पारित केला. या निर्णयामध्ये त्यांनी जन

माहिती अधिकारी यांच्या मताशी सहमती दर्शवून अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. १५.०७.२००८ पासून कार्यरत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जातील माहिती त्रयस्थ पक्षाने उघड करण्यास हरकत घेतल्याने, देण्याचे नाकारले होते. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आता उपलब्ध असून ते अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १६.१.२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दि. २९.१.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर राहिले व त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे त्यांच्याकडील दि. २५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये सादर केले, ते म्हणणे लक्षात घेऊन त्यांनी अपिलार्थीच्या अपील प्रकरणात निर्णय घेतला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाची, त्यांच्या कार्यालयात

उपलब्ध असलेल्या शाळा सोडल्याचा दाखला व जातीच्या दाखल्याच्या साक्षांकित प्रती मागितल्या होत्या. तथापि अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे, त्या त्रयस्थ पक्षाने ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी नकार दिल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ३.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यास नकार दिला. जन माहिती अधिकारी यांनी ही कार्यवाही अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये केलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांच्या मताशी सहमती दर्शवित, अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. त्रयस्थ पक्षाचे शाळा सोडल्याचा दाखला व जातीचे प्रमाणपत्र ही दोन कागदपत्रे, या कागदपत्रांच्या आधारे संबंधित त्रयस्थ पक्षाने नोकरी प्राप्त केली असल्याने व शासन नियंत्रित विविध प्राधिकरणामध्ये या प्रमाणपत्रांच्या आधारे आर्थिक व इतर स्वरुपात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष वेगवेगळया स्वरुपात फायदे मिळत असल्याने अपिलार्थीची ही माहिती जरी, वैयक्तिक स्वरुपाची असेल तरी, ती हे फायदे घेण्यासाठी शासनाकडे सादर केल्यानंतर तीचे स्वरुप वैयक्तिक अथवा खाजगी असे न राहता या माहितीला आपोआप सार्वजनिक स्वरुप प्राप्त होत असते. कारण या कागदपत्रांच्या आधारे शासकीय तिजोरीतून त्रयस्थ पक्षाच्या पगारावर व इतर सोयींवर खर्च होत असतो ही बाब येथे लक्षात घेणे जरुरीचे आहे. आज सुनावणीस त्रयस्थ पक्ष व अपिलार्थी हे गैरहजर आहेत व उपस्थित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीने, आपल्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश

निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

३. अपील मान्य करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकित करुन त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक : ३१-०७-२००८ राज्य माहिती आयोग,

खंडपीठ औरंगाबाद

**प्रत,**

१. श्री. दिपक बाळासाहेब कुऱ्हाडे,वॉर्ड नं. ७, सूर्यनगर, श्रीरामपूर, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो) अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४१७

निर्णय दिनांक ३१-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिलीपराव नायकू थोरात,<br>मु.पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव,<br>जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा ग्राम विकास अधिकारी,<br>ग्राम पंचायत, सुरेगाव<br>ता.कोपरगाव जि. अहमदनगर<br>२ जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, कोपरगाव,<br>जि. अहमदनगर | : | प्रतिवादी |
| प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी | : | विस्तार अधिकारी,<br>(कृषी),<br>पंचायत समिती, कोपरगाव<br>जि.अहमदनगर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. दिलीपराव नायकु थोरात (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रामदास पुंडलिक डुबे, जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत सुरेगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना

जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री.प्रकाश इरभान मोरे, जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषी) पंचायत समिती, कोपरगाव, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.३०.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १२४/१ (अ) अन्वये आकारणी करण्यात आलेल्या इमारतींचा तपशील या विषयावर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> ‘ ग्रामपंचायत सुरेगाव हद्दीतील कोसाका उद्योग समुहामार्फत सुरु असलेला उद्योग व त्यासाठी लागणारी यावर ग्रामपंचायत मार्फत करण्यात आलेली आकारणी प्रत्येक उद्योगानुसार तपसिलवार माहिती व तसेच अुप इमारतीची कर आकारणी. ‘

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही, मात्र संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील दि. १९.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगाव यांना दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस, त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात सरळ उत्तर द्यावयाचे सोडून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती चुकीच्या प्राधिकरणाकडे म्हणजे जन अपिलीय अधिकारी यांचेकडे पाठवून दिली आहे, असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३.१.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर या अपील अपिलार्थीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगाव यांच्याकडे केले होते, त्यावेळी गट विकास अधिकारी हेच या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दि. ५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांनी दि. ३०.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे कळवून सदर माहिती घेऊन जाण्याची त्यांना या पत्रामध्ये विनंती केली आहे. तथापि अपिलार्थी हे माहिती घेऊन जाण्यासाठी हजर न राहिल्याने त्यांनी हीच माहिती दि. २०.१.२००७ रोजी पोस्टाने पाठवून दिली आहे. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.३.२००७ द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेगळीच माहिती दिली व माहिती न देता, ठरावाच्या नकला देऊन अपूरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली, असे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती न पुरवून चुकीची माहिती पुरविली. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १२४/१(अ) अन्वये संबंधित ग्रामपंचायतीने कोपरगाव सहकारी साखर कारखाना, उद्योग समुहावर

कोणत्या कराची आकारणी केली, याचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला होता, तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना या संदर्भात चुकीची माहिती देऊन त्यांची दिशाभूल केली आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १२४/१ (अ) द्वारे कोसाका उद्योग समुहावर ग्रामपंचायतीने केलेल्या कर आकारणीसंदर्भात माहिती मागितली होती. तथापि सदर उद्योग समुहावर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १२४ प्रमाणे कर आकारणी करण्यात येत नसून याच अधिनियमातील कलम १२५ अनुसार कर आकारणी करण्यात येते. कलम १२५ मध्ये पंचायतीने बसविलेल्या कराचा भरणा करण्याऐवजी, कारखान्याने ठोस रकमेच्या स्वरुपात अंशदान देणे या स्वरुपाच्या प्रक्रियेचा समावेश होतो.त्यामुळे अपिलार्थीस कोसाका उद्योगसमुहावर किती आकारणी केली जाते, हे माहित होण्यासाठी त्यांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १२५ प्रमाणे जी कार्यवाही त्यांची ग्रामपंचायत करते, याची माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, सुरेगाव ग्रामपंचायत हद्दीतील कोसाका, उद्योग समुहावर सदर ग्रामपंचायत, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १२५ प्रमाणे कर आकारणीची कार्यवाही करत आहे. कलम १२५ मधील तरतुदीनुसार अशाप्रकारच्या उद्योगसमुहाकडून ठोक स्वरुपात कर प्राप्त करुन घेण्याची तरतुद आहे. सदर प्रकारे करण्यात येणाऱ्या कराची आकारणी ही शासन मान्यतेनंतर करावयाची असते, तथापि आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांनी असे

स्पष्ट केले की, कोसाका उद्योगसमुहाची स्थापना सन १९६२ साली झाली, तेव्हापासून ते आजतागायत त्यांना ठोक अंशदान स्वरुपात कर आकारणी करण्यात येत आहे. यासाठी त्यांनी अद्यापपर्यंत शासनाची मान्यता घेतलेली नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कलम १२४ प्रमाणे या उद्योग समुहास कर आकारणी केली जाते, याची माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, ते मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १२४ प्रमाणे कोसाका या उद्योग समुहास कर आकारणी करत नाहीत, असे आढळून येत आहे. त्यामुळे प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस , याबाबत वस्तुस्थितीवर आधारित माहिती पाठविणे जास्त संयुक्तिक ठरले असते, मात्र त्यांनी अपिलार्थीस कोसाका उद्योग समुहावर कलम १२५ अन्वये जो ठोक कर आकारला जातो, याची माहिती दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे उल्लेखिलेल्या कलमांची माहिती देताना अपिलार्थीने विचारलेली माहिती ज्या कलमाच्या तरतुदीवर आधारित आहे, त्या कलमातील (कलम १२४) तरतुदी लक्षात न घेता अपिलार्थीस दुसऱ्या कलमाखालील तरतुदीप्रमाणे (कलम १२५) ते सध्या करत असलेल्या कर आकारणीबाबत माहिती दिलेली आहे, त्यांच्या या कृतीमागील उद्देश अपिलार्थीस माहिती देण्याचा आहे. ही माहिती त्यांनी कोणत्याही असद्हेतूने अपिलार्थीस दिली आहे, असे आयोगास निःसंशयपणे आढळून येत नाही. मात्र अपिलार्थीस जी माहिती दि. २९.१२.२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत होते, ही माहिती, जरी ती चुकीची असली तरी, दि. २०.१.२००७ रोजी म्हणजेच अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विलंबाने प्राप्त झाल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी सरळ पत्रव्यवहार करुन माहिती देण्याऐवजी त्यांनी अपिलार्थीस गट विकास

अधिकारी यांच्यामार्फत माहिती पुरविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यांची सदर कृती चुकीची असून त्या चुकीचा परिणाम म्हणून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहावे लागले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात अशाप्रमाणे लावलेल्या विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे, सदर ताकीदीची नोंद संबंधित गट विकास अधिकारी अथवा इतर सक्षम प्राधिकरणाने त्यांच्या सेवापुस्तिकेत घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात्, या प्रकरणी आयोगास असे लक्षात आले आहे की, कोपरगाव सह.साखर कारखाना उद्योग समुहावर संबंधित ग्रामपंचायत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १२५ अन्वये करीत असलेल्या कराच्या आकारणीची योग्यायोग्यता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांच्या पातळीवर तपासून आवश्यक ती कार्यवाही या प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेऊन त्वरेने करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३.जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून,सदर ताकीदीची नोंद गट विकास अधिकारी, पं.स.कोपरगाव जि.अहमदनगर अथवा इतर सक्षम प्राधिकरणाने त्यांच्या सेवापुस्तिकेत घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक : ३१-०७-२००८ राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीपराव नायकू थोरात, मु.पो.कोळपेवाडी ता.कोपरगाव जि.अहमदनगर-४२३६०२

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, सुरेगाव ता. कोपरगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषी),पंचायत समिती, कोपरगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती. कोपरगाव जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४१८

निर्णय दिनांक ३१-०७-२००८

१ श्री. हरीयाल श्रावण फकिरा, : अपिलार्थी
रा. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याध्यापक,
श्री मार्कंडेय विद्यालय, श्रमिकनगर,
अहमदनगर जि. अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सचिव,
पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ,
अहमदनगर जि. अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. हरीयाल श्रावण फकिरा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), सौ. विद्या भास्कर वाघमारे, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मार्कंडेय विद्यालय, अहमदनगर, जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शंकर नारायण सामलेटी, जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ, अहमदनगर,

जि.अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१२.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या शाळेशी संबंधित सन २००५-२००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

‘ १) इ. १ ली ते ७ वी पर्यंत च्या विदयार्थ्यांची तुकडी निहाय विदयार्थी संख्या व त्यांच्या डिसें २००६ चे हजेरी पत्रकाची सत्यप्रत मिळावी.

२) विदयालयात शिक्षकेतर कर्मचारी किती आहेत त्यांच्या नावासह पदे केव्हापासुन सेवेत आहेत याची सविस्तर मा मिळवि.

३) आपले जा.क्र. १९९/०५-०६ दि २२/१२/०५ चे पत्रानुसार माहिती देण्यासाठी ५००/- रुपये मागणी केली होती. त्या प्रमाणे रक्कम देण्यात आली. परंतु आपणाकडुन नियमा प्रमाणे माहिती मिळु शकली नाही. मा.अधिकारी २००५ च्या कोणत्या नियमाप्रमाणे आपण ही रक्कम आकारली आहे याची सविस्तर माहिती मिळावी.

४) शाळा/संस्था कोणाच्या खात्यामध्ये हि रक्कम-५००/- रुपये भरणा करण्यात आला भरणा केल्याची पावती प्रत झेराक्स) मिळावी.

५) स न २००५/०६ या वर्षात अश्या प्रकारची किती रक्कम वसुल करण्यात आली.

६) माहिती अधिकार २००५ च्या नियमामध्ये कोण कोणत्या गोष्टी गोपनिय आहेत यांची सविस्तर माहिती दयावी (आपले जा.क्र.२०८/०५-०६ मधील गोपनियतेमुळे फर्म ची माहिती देता येत नाही असे कळविले)

७) मा. अधिकार २००५ च्या नियमामध्ये माहितीचे प्रयोजन देणे आवश्यक आहे या बाबत नियम कळवुन या बाबत सविस्तर माहीती दयावी.

८) माहितीची योग्य रक्कम स्विकारल्यावर पावती देणे बंधनकारक आहे/ किंवा नाही या बाबत मा.दयावी.

९) मा. अधिकार २००५ च्या कोणत्या नियमानुसार व कोणाला माहीती मोफत देण्यात येते. (जात/धर्म/व्यक्ती) या बाबत सविस्तर माहिती मिळावी. '

अपिलार्थीस सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ९.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीने कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नसल्याचे कारण दर्शवून अधिनियमातील कलम ८(ड) अन्वये त्यांना माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.२.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी या संदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.

२०.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये आपले आदेश पारित केले असून या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे. अपिलार्थीचे प्रथम अपील, त्यांच्या अपील अर्जासोबत त्यांच्या स्वाक्षरीचे प्रतिज्ञापत्र नसल्याने त्यांनी फेटाळल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठीटाळाटाळ केली असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तीवाद आयोगासमोर लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे जाणीवपूर्वक टाळले असल्याचे म्हटले असून, त्यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतीही गोपनीय स्वरुपाच्या कागदपत्रांची त्यांनी मागणी केली नव्हती. यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहिती देण्यासाठी रु. ५००/-इतक्या शुल्काची त्यांच्याकडील दि. २२.१२.२००५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली होती. सदर फीसची मागणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ त्यांना त्रास देण्याच्या हेतूने केली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती नाकारण्यासाठी दिलेले कारण अयोग्य व चुकीचे आहे, त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळण्याचे दिलेले कारणही चुकीचे आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी एकत्रितपणे संगनमत करुन त्यांनी माहिती देण्याचे नाकारले आहे, सदर कृती, माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ उद्देशाच्या विरुध्द असून केवळ अपिलार्थीस जास्तीत जास्त त्रास व्हावा, हेतूनेच जन

माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेश पारित केले आहेत.जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जाणीवपूर्वक दिलेला त्रास विचारात घेऊन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांनी दिलेला आदेश रद्द करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती अपिलार्थीस तातडीने देण्याचे त्यांना आदेशित करावे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये उपस्थित केलेला रु.५००/- ची मागणी हा मुद्दा अपिलार्थीच्या दि. १२.१.२००७ रोजीच्या अर्जासंबंधित नाही. त्यांनी पुढील निवेदन आयोगास लेखी स्वरुपात दिले असून यामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थी हे पेशाने रिक्षा ड्रायव्हर असून, त्यांची कोणतीही मुले जन माहिती अधिकारी यांच्या शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत नाहीत. अपिलार्थी हे वेळोवेळी त्यांच्या शाळेत येऊन अरेरावी व उद्दामपणाचे वर्तन करीत असतात व त्यांच्याकडून पैशाची मागणी करीत असतात त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पैसे दिले नाहीत तर त्यांच्या संस्थेविरुध्द अशीच तक्रार करण्याची धमकी देत असतात. अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियमाखाली त्यांच्याकडे आजतागायत किमान ५० अर्ज केलेले आहेत. माहिती अधिकारी अधिनियमानुसार अपिलार्थीस माहिती दिली असता अपिलार्थी हे त्यानंतर खोटया तक्रारी करुन ही माहिती वाईट प्रवृत्तीच्या लोकांना पुरवित असतात व सदर वाईट प्रवृत्तीचे लोक यानंतर वर्तमानपत्रामध्ये खोटया बातम्या छापून संस्थेची व संस्थेच्या सर्व शाळांची विनाकारण बदनामी करत असतात. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांनी कधीही टाळाटाळ केली नाही, याउलट त्यांनी अपिलार्थीने वेळोवेळी मागितलेली माहिती त्यांना पुरविली आहे. परंतु अपिलार्थी यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांच्याशी उध्दटपणाची वागणूक व धमक्यांचे ईशारे यामुळे जन माहिती

अधिकारी यांना अपिलार्थीबद्दल भिती उत्पन्न झाल्याने व अपिलार्थीवर त्यांचा विश्वास उरला नसल्याने त्यांनी अपिलार्थीस दि. १२.१.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भातील माहिती उघड करण्यास नकार दिलेला आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये संदर्भित केलेल्या रु.५००/- इतक्या शुल्काची मागणी अपिलार्थी यांच्या दुसऱ्या एका अर्जासंदर्भात चुकीने स्वीकारली गेली होती, सदर चूक लक्षात आल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. २६.२.२००७ रोजी मनीऑर्डरद्वारे परत पाठविली, तथापि सदर मनिऑर्डरचा अपिलार्थी यांनी स्वीकार केलेला नाही. आयोगाकडे अपील दाखल करतांना अपिलार्थीचा हेतू शुध्द नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेले सदर अपील फेटाळून लावावे, अशी त्यांनी शेवटी आयोगास विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आपला युक्तीवाद आयोगाकडे लेखी निवेदनाद्वारे सादर केला, सदर निवेदनामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, माहितीच्या अधिनियम पुस्तकातील अपील अर्जाच्या नमुन्याची पाहणी केली असता त्या नमुन्यामध्ये अपिलार्थीने अपील अर्जासोबत प्रतिज्ञापत्र सादर करणे गरजेचे आहे, असे नमुद केल्याने व अपिलार्थीने त्यांचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत न जोडल्यामुळे त्यांनी अपिलार्थीचे अपील नामंजूर केले आहे. हा निर्णय त्यांच्यामार्फत घेताना त्यांच्याकडून काही चूक झाली असल्यास त्याबद्दल त्यांनी आयोगाकडे लेखी निवेदनामध्ये दिलगीरी व्यक्त केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ९ मुद्यांवर त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती मागितली आहे. या पैकी मुद्दा क्र. १ ते ५ या मुद्याद्वारे अपिलार्थीने विचारलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम

२(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. मात्र अपिलार्थीने याच माहितीतील मुद्दा क्र. ६ ते ९ या एकूण ४ मुद्यावर विचारलेली माहिती या तरतुदीशी थोडी विसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मुद्दा क्र. ६ च्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ व ९ मध्ये कोणत्या प्रकारची माहिती सर्वसाधारण परिस्थितीत उघड करता येणार नाही, याचे स्पष्ट विवेचन दिले आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ व ९ च्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्यास अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळू शकेल. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ७ बाबत असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(२) अन्वये माहिती विचारताना अर्जदारास जन माहिती अधिकारी यांना कोणतेही कारण द्यावे लागणार नाही, अशी तरतुद आहे. सबब या मुद्यातील माहिती अपिलार्थीस देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कलम ६(२) च्या तरतुदीची झेरॉक्स प्रत देणे योग्य राहील, असे आयोगास वाटते. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ८ मध्ये अपिलार्थीने माहितीसाठी योग्य ती रक्कम स्वीकारल्यानंतर पावती देणे बंधनकारक आहे किंवा नाही, याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील प्राप्त अर्जातील माहितीसाठी शुल्क कशाप्रकारे स्वीकारावे, यासंबधी संबंधित संस्थेने काही निश्चित कार्यपध्दतीची आखणी केली असल्यास त्या संबंधातील परिपत्रकाची प्रत अपिलार्थीस देणे उचित राहिल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ द्वारे त्यांनी कोणत्या नियमानुसार व कोणास माहिती मोफत देण्यात येते, याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सविस्तर माहिती मागितली आहे. अपिलार्थी हे माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे वारंवार अर्ज करीत असतात. त्यामुळे दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना मोफत माहिती देण्याची तरतुद अधिनियमातील कलम ७(५) मध्ये ही बाब त्यांना निश्चितपणे माहित असावी. परंतु एका परीक्षकाने प्रश्न विचारावेत व विद्यार्थ्याकडून त्याचे उत्तर प्राप्त करुन घ्यावे, अशा तऱ्हेने अपिलार्थीने ही खुलासे अपेक्षित करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारल्याचे दिसून येते. अर्थात, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील ज्या कलमाखाली माहितीची उत्तरे अपेक्षित केली आहेत, त्या कलमाची उत्तरे जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस अधिनियमातील संबंधित कलमांची झेरॉक्स प्रत मिळाल्यास, सदरची माहिती उपलब्ध होऊ शकेल, असे आयोगास वाटते. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ ते ५ शी संबंधित माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता देणे भाग आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, या माहितीमध्ये ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सर्वसाधारण परिस्थितीत नाकारणे योग्य नाही. अपिलार्थीस प्रथमतः माहिती नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ९.२.२००७ रोजीच्या पत्रामध्ये अधिनियमातील कलम ८ (ड) चा आधार घेतला आहे, तथापि हे कलम या प्रकरणी लागू होत नसल्याने ही माहिती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यास आता अधिनियमातील विहित मुदत व्यपगत झालेली असल्याने जन माहिती अधिकारी यांना ही माहिती त्यांना विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश

निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासोबत, अपिलार्थीने त्यांच्या स्वाक्षरीचे प्रतिज्ञापत्र दाखल न केल्याने, फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा सदर निर्णय चुकीचा आहे, कारण राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. ११.१०.२००५ रोजी जारी केलेल्या क्र. आर.टीआय. २००५/ सी.आर.३१५/०५/५ च्या अधिसूचनेमधील कलम ५ मध्ये अर्जदाराने अपील अर्ज कोणत्या प्रपत्रात सादर करावयाचा आहे, याचे मार्गदर्शन केले आहे, त्यामध्ये अशाप्रकारच्या प्रतिज्ञापत्राचा कोठेही उल्लेख नाही, या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय चुकीचा ठरत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहिती अधिकार अधिनियमाखाली माहिती मागवित असतात व सदर माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन त्याचा दुरुपयोग करुन संस्थेची बदनामी करतात, अशी तक्रार त्यांच्या निवेदनात केली आहे. याबाबत येथे असे स्पष्ट करण्यात येते की, कोणत्याही भारतीय नागरिकाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे किती वेळा माहिती मागावी याचे बंधन माहिती अधिकार अधिनियमात कुठेही नाही.

अपिलार्थीस माहिती नाकारण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद लक्षात घेता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या संस्थेविषयी कथित बदनामीकारक मजकूर छापून आणल्याने व त्यांच्या वर्तनाने जन माहिती अधिकारी यांच्या मनात अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात भीती निर्माण झाली व त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. त्यांनी

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याचे, हे कारण सहज मानव प्रवृत्तीनुसार असल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक टाळले, असे निःसंशयपणे सिध्द होत नाही.

माहितीचा उपयोग करण्यासंदर्भात अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी विवेक बाळगून माहिती अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचा उपयोग व्यापक जनहितासाठी करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-०७-२००८** **राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरीयाल श्रावण फकिरा, ६९९२, मंगलगेट, राजेश ॲटो,अहमदनगर, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,श्री मार्कंडेय विद्यालय, श्रमिकनगर, सावेडी अहमदनगर जि.अहमदनगर-४१४ ००३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ,अहमदनगर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४१९

निर्णय दिनांक ३१-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रविंद्र नामदेव इंगळे,<br>रा. धुळे. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी,<br>धुळे, जि. धुळे | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी,<br>धुळे | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. देवाजी उत्तम बोरसे, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धुळे जि.धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. अरुण उध्दव पटेल, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी धुळे, जि.धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रल्हाद मोतीलाल सोनवणे, तत्कालीन उपविभागीय कृषि अधिकारी, धुळे जि.धुळे हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. रविंद्र नामदेव इंगळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.१२.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित कृषि विषयक कामाविषयी एप्रिल ०४ ते दि.३० जून २००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

‘ खालील नमुन्यात यादी

१) योजनेचे नाव --------- ३) कामाचे स्वरुप ------- ४) क्षेत्रफळ ------- ५) मंजुर रक्कम ----- ६) खर्च झालेली रक्कम----- ७) कामाचे ठीकाण---- ८) काम सुरु केल्याची तारीख----- ९) काम पूर्ण झाल्याची तारीख----- १०) अंतिम मोजमाप दिनांक ------- ११) देयेक अदा केल्याची दिनांक व रक्कम ------ १२) प्रत्येक्ष काम करुन घेणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्याचे नाव व पद ------ १३) कामावर हजर असेलेल्या मजुरांच्या गावाचे नाव ------ १४) कामाची सध्यस्थिती -----

ब)- योजना निहाय कामाच्या प्रकारा नुसार मजुरीचे दर पत्रकाच्या प्रती ‘

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटी त्यांना रु.६०००/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी कमीत कमी दोन महिने इतका कालावधी लागेल, असे अपिलार्थीस कळविले. यावर अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. २१.७.२००६

रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तीस दिवसात त्यांना प्राप्त होणे अपेक्षित आहे, असे जन माहिती अधिकारी यांना कळविले. अपिलार्थीच्या या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडे चार योजनांची दरपत्रके उपलब्ध असल्याबाबत कळविले व यातील कोणत्या दरपत्रकांची अपिलार्थीस आवश्यकता आहे, हे कळविण्याचे अपिलार्थीस विनंती केली.यावर अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. १.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना कृषि निविष्ठा पुरवठयाची व रोहयोतील फळबाग लागवड योजनेच्या दरपत्रकांची त्यांच्याकडे मागणी केली. त्यानंतर सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ४.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ९८/-त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस दि. ९.८.२००६ रोजी प्राप्त झाले. या पत्रानुसार अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १०.८.२००६ रोजी रु.९८/-इतक्या शुल्काचा भरणा केला. अपिलार्थीने ज्या माहितीसाठी सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले होते, ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २९.८.२००६ रोजी पोष्टाने पाठविण्यात आली. सदर माहिती अपिलार्थीस दि. ९.९.२००६ रोजी प्राप्त झाली. मात्र या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कृषि विकास कामांची यादी प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.९.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, माहितीपोटी असंयुक्तिक

शुल्काची आकारणी करुन दिशाभूल करुन माहितीच्या अधिकारापासून वंचित ठेवल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची विनामूल्य मागणी करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.११.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश एका पत्राच्या स्वरुपात अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २४.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिले आहेत. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटीची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरली नसल्याने, ही रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित करुन त्यांचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय रद्द करण्याची व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मूळ अर्ज केल्याच्या दिनांकापासून शास्ती लावण्याची, जन माहिती अधिकारी यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्याची व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांच्या दि. १२.७.२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. १५.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना माहितीपोटीचे शुल्क रु. ६०००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे या पत्राद्वारे सूचित केले. अपिलार्थीने या विषयावर त्यांच्याकडे केलेल्या दि. २१.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी, 'वास्तविक मजूरीच्या दर पत्रका व्यतिरिक्त झेरॉक्स प्रती मागीतलेल्या नाहीत, फक्त नमून्यात यादी मागितली आहे', असे कळविले. त्यामुळे या पत्रास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.७.२००६ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडील चार योजनांची नावे कळवून त्यापैकी अपिलार्थीस कोणत्या योजनेच्या दरपत्रकाची आवश्यकता आहे, ते कळवावे म्हणजे, त्याबाबतचे शुल्क ठरविणे सुलभ होईल, असे कळविले. सदर दरपत्रकांच्या प्रती देण्यासाठी आवश्यक ते शुल्क अपिलार्थी यांच्याकडून आकारणी करुन त्यांना ही माहिती दि. ९.९.२००६ रोजी दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी खर्च झालेल्या योजनांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत दि. १५.११.२००६ रोजी पुरविली आहे.अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती ते अपिलार्थीस वीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि विकास कामासंदर्भातील एप्रिल २००४ ते दि.३०.०६.२००६ या कालावधीतील माहिती एकूण १४ मुद्यांवर मागविली होती.

सार्वजनिक प्राधिकरणाच्या कोणत्याही क्षेत्रीय कार्यालयामध्ये कामाचे नियोजन करताना, प्रगतीचा आढावा घेताना, खर्चाचे अंदाजपत्रक सादर करताना व या योजनांच्यावर झालेला खर्च, मागणी इ. बाबींची निश्चिती करताना, अर्थसंकल्प (बजेट) बनवताना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील या १४ मुद्यांचा समावेश असलेली माहिती सर्वसाधारणतः उपलब्ध असणे, हे अभिप्रेत आहे. याशिवाय, आपल्याकडे कार्यान्वित असलेल्या विविध योजनांमधील कामासंदर्भातील माहितीचे व कामांचे सुयोग्य व्यवस्थापन करण्याकरिता अपिलार्थीने जे मुद्दे, माहिती/कागदपत्रांच्या प्रती मागितलेल्या आहेत, त्या मुद्यांवरील माहिती संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे असणे गरजेचे आहे, किंबहुना अशाप्रकारची माहिती त्यांच्याकडे असल्याशिवाय या कामांचे भौतिक व आर्थिक व्यवस्थापन अपेक्षेप्रमाणे पूर्ण होणे संभवत नाही. जन माहिती अधिकारी यांचे दि. १५.७.२००६ रोजीचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले पत्र पाहता या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीची संभाव्य पृष्ठसंख्या कळविली नाही, जी अपिलार्थीस कळविणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(३) प्रमाणे अभिप्रेत आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कमीत कमी दोन महिने इतका कालावधी लागेल, असे अप्रत्यक्षरित्या सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीशी, जी माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ तत्त्वाशी पूर्णपणे विसंगत आहे, आयोग सहमत होऊ शकत नाही. आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मजूरीच्या दरपत्रकाव्यवतिरिक्त उर्वरित त्यांच्याकडील सर्व विकास कामांची माहिती अपिलार्थीस वीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त

प्रकरणी अपिलार्थी यांनी, मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी वर उल्लेखिल्याप्रमाणे अप्रत्यक्षपणे नकारात्मक प्रतिसाद दिला आहे. केवळ जन माहिती अधिकारी यांच्या अशा नकारात्मक वृत्तीमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घकाळ वंचित राहिल्याचे दिसून येते. अशाप्रकारच्या कार्यशैलीने त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून येथून पुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने व अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३ जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.सदर ताकीदीची नोंद जिल्हा कृषि अधीक्षक, धुळे यांनी अथवा इतर सक्षम प्राधिकरणाने त्यांच्या

सेवापुस्तिकेत घ्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३१-०७-२००८** **राज्य माहिती आयोग,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रविंद्र नामदेव इंगळे, ७६, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी देवपूर, धुळे,४२४ ००५

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धुळे, कृषि चिकीत्सालय, पिंप्री, चाळीसगाव रोड, जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, धुळे, कृषि चिकीत्सालय,पिंप्री फार्म चाळीसगाव रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा कृषि अधीक्षक, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४७८

निर्णय दिनांक ३१-०७-२००८

१ सौ. लतादेवी मदनलाल मालपाणी, : अपिलार्थी
रा. मालेगाव जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा सहा.विक्रीकर आयुक्त (प्रशासन),
नाशिक विभाग, नाशिक.
२ जन अपिलीय अधिकारी
तथा विक्रीकर सह आयुक्त (व्हॅट),
नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सौ. लतादेवी मदनलाल मालपाणी,रा. मालेगाव जि.नाशिक यांचे प्रतिनिधी श्री.रमेश मदनलाल मालपाणी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुधीर अनंतराव कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त (प्रशासन), विक्रीकर भवन, नाशिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल),श्री. साहेबराव कृष्णाजी रणसिंग, जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट), विक्रीकर भवन, नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२२.१२.२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मे. केदारनाथ द्वारकादास डागा व मे.केदारनाथ द्वारकादास डागा ॲण्ड कंपनी या दोन वेगवेगळया प्राधिकरणाशी संबंधित दि. १.४.२००० ते ३०.११.२००५ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

‘ कै. केदारनाथ राधाकीसन डागा (मृत्यु दि. १६/१२/२००२)यांचे स्वःताचे एकमेव अपत्य या नात्याने मला खालील माहीती हवी आहे. या आधी आपण मला जा क्र/ना वि/वि स आ/आस्था-१/ब-६४६/नाशीक दिनांक २८-०९-२००५ च्या पत्रानुसार काही माहीती पाठवली होती त्याची झेरॉक्स प्रत आपल्या माहीतीसाठी जोडीत आहे.

१) मेसर्स केदारनाथ द्वारकादास डागा, शिवाजी चौक, मु.पो.लासलगांव-४२२३०६ ता.निफाड जी नाशीक या भागीदारी संस्थेचा महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधीनीयम २००२ नुसार नोंदणीसाठी केलेल्या अर्जाची साक्षांकीत प्रत, नोंदणी क्रमांक व नोंदणी क्रमांक दिल्याची तारीख.

२) वरील भागीदारी संस्थेच्या आज असलेल्या भागीदारांची संपुर्ण नावे, पत्ता व प्रत्येक भागीदाराचा आयकर कायम खाते क्रमांक

३) वरील भागीदारी संस्थेची लेटेस्ट भागीदारी पत्रकाची साक्षांकीत प्रत.

४) वरील भागीदारी संस्थेचे माहीतीच्या संबंधीत कालावधीतील प्रत्येक वर्षीचा लेखापरीक्षणाच्या अहवालाची साक्षांकीत प्रती

५) वरील भागादारी संस्थेचे मुंबई विक्रीकर कायदा, केंद्रीय विक्रीकर कायदा तसेच महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधीनीयम २००२ अन्वये दाखल केलेले मासीक, त्रैमासीक, सहामाही, वार्षीक विवरणपत्रे (डङ्घ्यद्वद्धदद्म) यांच्या साक्षांकीत प्रती व त्या आधारावर झालेल्या विवीध प्रकारच्या आकारण्या (त्र्ह्मद्मङ्घ्ङ्घदद्यद्म) यांच्या साक्षांकीत प्रती

६) वरील भागीदारी संस्थेच्या वरील मुद्दा क्रमांक ५ नुसार आकारणीच्या वेळी तपासलेल्या लेखापुस्तकांच्या उदा. तेरीज पत्रक, व्यापारी पत्रक, नफा तोटा पत्रक, ताळेबंद यांच्या साक्षांकीत प्रती

७) मेसर्स केदारनाथ द्वारकादास डागा आणी कंपनी, शिवाजी चौक, मु.पो.लासलगाव-४२२३०६ ता.निफाड जी नाशीक या भागीदारी संस्थेचा महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधीनीयम २००२ नुसार नोंदणीसाठी केलेल्या अर्जाची साक्षांकीत प्रत, नोंदणी क्रमांक व नोंदणी क्रमांक दिल्याची तारीख

८) वरील भागीदारी संस्थेचा आयकर कायम खाते क्रमांक.

९) वरील भागीदारी संस्थेची ३१-०३-२००१ अखेर, ३१-०३-२००२ अखेर,३१-०३-२००३ अखेर, ३१-०३-२००४ अखेर, ३१-०३-२००५ अखेर,आणी ३०-११-२००५ अखेर असलेल्या

भागीदारी पत्रकाची साक्षांकीत प्रत, भागीदारांची संपुर्ण नावे व पत्ता तसेच प्रत्येक भागीदाराचा आयकर कायम खाते क्रमांक

१०) वरील भागीदारी संस्थेचे माहीतीच्या संबंधीत कालावधीतील प्रत्येक वर्षीच्या लेखापरीक्षणाच्या अहवालाची सांक्षाकीत प्रती

११) वरील भागीदारी संस्थेचे मुंबई विक्रीकर कायदा, केंद्रीय विक्रीकर कायदा तसेच महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधीनीयम २००२ अन्वये दाखल केलेले मासीक, त्रैमासिक, सहामाही, वार्षीक विवरणपत्रे (डङ्घ्यद्वद्धदद्म) यांच्या साक्षांकित प्रती व त्या आधारावर झालेल्या विवीध प्रकारच्या आकारण्या (त्रङ्मद्मद्मङ्गद्मश्चङ्घद्यद्म) यांच्या साक्षांकीत प्रती

१२) वरील भागीदारी संस्थेच्या वरील मुददा क्रमांक ११ नुसार आकारणीच्या वेळी तपासलेल्या लेखापुस्तकांच्या उदा.तेरीज पत्रक, व्यापारी पत्रक,नफातोटा पत्रक,ताळेबंद यांच्या साक्षांकीत प्रती'

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.१.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती पैकी त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती ती अपिलार्थीस पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्या दि. २५.१.२००६ रोजीच्या या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यांनी अपिलार्थीस दोन्ही प्राधिकरणासंदर्भात अपिलार्थीस स्वतंत्रपणे माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व सदर माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे अपिलार्थीस वाटल्याने त्यांनी

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.२.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील मुख्य माहिती आयुक्त यांना उद्देशून केले होते. मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय मुंबई यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज त्यांच्याकडील दि. २२.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये विक्रीकर सहआयुक्त, जे या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, त्यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी या संदर्भात आपले आदेश दि. २५.४.२००६ रोजी पारित करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली असल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले व त्यांना जादा माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी त्यांच्या विभागातील माहिती अधिकारी यांना समक्ष येऊन भेटावे, असे सूचित केले. जन अपिलीय यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०७.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४,६,१० व १२ संदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २२.१२.२००५ रोजीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास त्यांनी दि.

२५.१.२००६ रोजी अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती, ती माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये मे. केदारनाथ द्वारकादास डागा व मे. केदारनाथ द्वारकादास डागा आणि कंपनी या दोन स्वतंत्र कंपन्या असल्याचे नमूद करुन त्यांच्याकडे माहितीची मागणी केली होती. तथापि या पैकी मे. केदारनाथ द्वारकादास डागा आणि कंपनी या कंपनीची नोंद त्यांच्याकडे अद्यापपर्यंत झालेली नाही. त्यामुळे मे. केदारनाथ द्वारकादास डागा आणि कंपनी ही कंपनी त्यांच्यालेखी आजरोजी अस्तित्त्वात नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ७ ते १२ या संदर्भात अपिलार्थीस त्यांनीजी माहिती पुरविली आहे. ती वस्तुस्थितीवर आधारित नसून, ती त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या दि. २५.१.२००६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने ते परत नव्याने एक शुध्दीपत्रक दहा दिवसात जारी करणार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ व ६ च्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने मुद्दा क्र. ४ द्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, कारण अशाप्रकारच्या लेखा परीक्षणाच्या अहवालाच्या प्रती प्रत्येक कंपनी आयकर विभागाला प्रतिवर्षी सादर करीत असते. त्यामुळे ही माहिती विक्रीकर विभागाकडे उपलब्ध नाही. तर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ६ मधील व्यापारी पत्रक व नफातोटा पत्रक या प्रती त्यांच्याकडे सर्वसाधारणतः उपलब्ध असतात, या प्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेल्या कंपनीशी संबंधित व्यापार पत्रक, व नफातोटा पत्रकाच्या प्रती उपलब्ध आहेत किंवा कसे याचा ते तपास घेऊन यासंदर्भात निर्णय घेतील.

जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादास दुजोरा देऊन, असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २५.१.२००६ रोजीच्या

पत्रान्वये दिलेल्या माहितीचा ताळमेळ घालून आवश्यक ते शुध्दीपत्रक दहा दिवसांच्या आत जारी करण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मे. केदारनाथ द्वारकादास डागा व मे. केदारनाथ द्वारकादास डागा आणि कंपनी अशा दोन कंपन्यांच्या विषयी काही माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधित अशी माहिती होती. वास्तविकतः याबाबत जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११(१) प्रमाणे प्रथमतः कार्यवाही करणे अभिप्रेत होते. तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केले की, या प्रकरणातील त्यांच्याकडे मे.केदारनाथ द्वारकादास डागा आणि कंपनी या कंपनीची नोंद झालेली नसल्याने, या कंपनीची कोणतीही कागदपत्रे आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे साहजिकच अपिलार्थीस मुद्दा क्र. ७ ते १२ ची माहिती, आज रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्या विभागाकडे ठेवली जात नसून ती केंद्र शासन नियंत्रित आयकर विभागाकडे, प्रत्येक कंपनीमार्फत दरवर्षी नियमितपणे कर आकारणीस्तव सादर केली जाते. हे पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्यांना अशाप्रकारची माहिती हवी असल्यास, त्यांना आयकर विभागाकडे वेगळयाने स्वतंत्र अर्ज करावा लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ शी संबंधित, व्यापारी पत्रक व नफातोटापत्रक यांच्या प्रती

सर्वसाधारणपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्या उपलब्ध असल्याचे त्यांनी आज आयोगासमोर स्पष्ट केले, तथापि संबंधित कंपनीचे करनिर्धारण ज्या वर्षापर्यंत झाले आहे, त्याच वर्षापर्यंत त्यांच्याकडे त्या उपलब्ध असणे शक्य आहे. या मुद्यावरील माहिती देण्याच्या संदर्भात आता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने त्यांचा या संदर्भात आता प्रथम माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ प्रमाणे कार्यवाही करावी लागेल, हे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. २५.१.२००६ रोजीच्या पत्राचे शुध्दीपत्रक जारी करण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, सबब या मुद्यांवर शुध्दीपत्रक जारी करण्याची कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत करावी. तसेच अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याकरिता अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदीन्वये कार्यवाहीकरुन त्याप्रमाणे आपला निर्णय अपिलार्थीस कळवावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक : ३१-०७-२००८ राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. लतादेवी मदनलाल मालपाणी,रा. मालेगाव जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त (प्रशासन), विक्रीकर भवन, पाथर्डी फाटा, प्रशांतनगर, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट), विक्रीकर भवन, पाथर्डी फाटा, प्रशांतनगर, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४८५

निर्णय दिनांक ३१-०७-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. एकनाथ दशरथ पवार,<br>रा.जळगाव जि.जळगाव. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,<br>यावल ता.यावल, जि.जळगाव | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यावल,<br>जि.जळगाव | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०७.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. एकनाथ दशरथ पवार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. श्रीराम एकनाथ उमाळे, जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि.जळगाव, श्री. बाजीराव चंदा खैरनार तत्कालीन सहा. प्र. अ. ए. आ. वि. प्र. यावल, जि.जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. निंबाजी माणिकराव निकुमे, जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक

आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि.जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचेकडील दि.२९.०३.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९५ ते दि.२९.३.२००६ पर्यंतच्या कालावधीतील त्यांच्याकडील आस्थापनेसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

‘ १) कामाठी व स्वयंपाकी सवर्गातील एकूण मंजूर पदे

२) ------------- ‘------------‘------- भरलेली पद

३) भरलेल्या पदापैकी अनुसुचित जमातीच्या पोट जमातीचे कर्मचाऱ्याचे नांव, मुख्यालय, नांव नोंदणी क्रमांक, दिनांक

४) अनुसुचित जमाती व्यतिरीक्त भरलेल्या जात निहाय संख्या

५) आज रिक्त पदांची संख्या, कार्यालय, मुख्यालय.‘

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती पैकी अंशतः माहिती त्यांना या पत्राद्वारे अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील कर्मचाऱ्यांचे नाव, त्यांचे नोंदणी क्रमांक, रिक्त पदांचे मुख्यालय व संबंधित कार्यालय यांच्या माहितीचा या माहिती मध्ये समावेश नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.

१५.५.२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. यामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी वर निर्देशित केलेली दि. २३.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली माहिती, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.५.२००६ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दिल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी वर उल्लेखिल्याप्रमाणे त्यांच्याकडील दि. २३.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती दिली. सदर माहिती वर नमूद केल्याप्रमाणे अर्धवट असल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने तसेच ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी जाणूनबुजून चुकीची व अर्धवट दिल्याचे अपिलार्थीस वाटल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०८.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दि. २३.५.२००६ रोजी जाणूनबुजून चुकीची व सदोष माहिती पाठवून त्यांची दिशाभूल केली असल्याने संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करुन त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना त्वरित पुरविण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडील दि. ३०.७.२००८ रोजी, औरंगाबाद येथे या

सुनावणीच्या थोडा वेळ आधी प्राप्त झाली आहे. त्यांनी माहितीसाठीचा प्रथम अर्ज दि. २९.३.२००६ रोजी केला होता. त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी दोन वर्षाहून जास्त कालावधीपर्यंत वाट पहावी लागली. राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीचे पत्र आल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली व आजही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे कारण आदिवासी विकास विभागातर्फे अशाप्रकारच्या नोकऱ्यांकरिता नाव नोंदणी केली जाते. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीनंतर माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. १४.६.२००७ पासून प्रभारी स्वरुपात कार्यरत आहेत. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी त्यांची जन माहिती अधिकारी या पदावर नेमणूक केली गेली नव्हती.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी ज्यावेळी माहितीची मागणी केली, त्यावेळी त्यांच्या कार्यालयातील अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या रजिस्टरमध्ये उपलब्ध होती, ते रजिस्टर विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्गीय कक्षाकडे सादर केले असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एक महिना इतका विलंब लागला. त्यानंतर ते एकूण २४ दिवसांच्या अर्जित रजेवर निघून गेले व या रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची बदली होऊन त्यांचा कार्यभार श्री. ए.एम.थोरात यांच्याकडे हस्तांतरित केला होता. याहून त्यांना अधिक काहीही सांगावयाचे नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. २२.५.२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थी यांनी दि. १५.५.२००६ रोजी

प्रथम अपील अर्ज दाखल केला, त्यावेळी श्री. टी.बी.पाडवी नावाचे अधिकारी कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी का घेतली नाही, याचे कारण आता त्यांना सांगता येणार नाही. तसेच सदर अपिलीय अधिकारी आता शासन सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्या दि. २९.३.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत होती. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रथम प्रतिसाद न देता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.५.२००६ रोजी प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती दिलेला आहे. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अर्धवट असल्याचे दिसून येते, त्यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या कर्मचाऱ्यांची नावे, मुख्यालयाचे नाव व नोंदणी क्रमांक, रिक्त पदांचे कार्यालय व मुख्यालय या मुद्यावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस संपूर्ण स्वरुपात देण्याचे त्यांनी त्यांच्या संबंधित सहायकाला सूचित केले होते, तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी देय असणाऱ्या कालावधीमध्येच ते रजेवर गेले व त्यानंतर त्यांची या पदावरुन बदली झाली. त्यांच्या संबंधित सहायकाने अपिलार्थीस अर्धवट माहिती का दिली, याची कारणे ते आज रोजी आयोगास सांगू शकले नाहीत, मात्र अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंबाचे कारण

म्हणजे, संबंधित कागदपत्रे (रजिस्टर्स) विभागीय आयुक्त कार्यालयात सादर केली असल्याने ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही, असे आयोगास सांगितले. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) मध्ये अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व सहायक व कर्मचारी यांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या सुमारे दोन वर्षे इतक्या विलंबासाठी या प्रकरणातील सर्व संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक जबाबदार आहेत, असा आयोगाचा निष्कर्ष आहे, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती ही सहज, सरळ व मर्यादित स्वरुपाची असल्याने, अपिलार्थीस ही माहिती अधिनियमाद्वारे विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी न देणे, याचे वर उल्लेखिल्याप्रमाणे कोणतेही कारण सकृतदर्शनी समर्थनीय असल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांतील 'नोंदणी क्रमांक' हा मुद्दा वगळता आज रोजी तयार करुन आणली आहे. नोंदणी क्रमांक या मुद्यावरील माहिती वगळण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये कामाठी व स्वयंपाकी या संवर्गासाठी वर्तमानपत्रात जाहीरात काढून व समाजकल्याण विभागाकडून उमेदवारांची नावे मागवून, या पदावर त्यांनी भरती केली असल्याने या उमेदवारांचे नोंदणी क्रमांक त्यांच्याकडे नसल्याचे आयोगास सांगितले आहे. या माहितीमध्ये नोंदणी क्रमांक वगळता उर्वरित सर्व मुद्यांचा समावेश असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांना आता देऊ केलेली माहिती त्यांच्या अर्जाशी, नोंदणी क्रमांक हा मुद्दा वगळता, सुसंगत असल्याचे दिसून येते.

उपरोक्त प्रकरणात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा सुमारे दोन वर्षाहूनही अधिक कालावधीसाठी अपिलार्थीस वंचित ठेवण्यास संबंधित सर्व जन माहिती अधिकारी

व त्यांचे सहायक जबाबदार आहेत, असा निष्कर्ष आयोगाने वरील परिच्छेदामध्ये काढला आहे. जन माहिती अधिकारी यांना पूर्ण संधी देऊनही ते आयोगास त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे समर्थन करु शकले नाहीत. त्यांनी आपल्या या कृतीद्वारे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला निःसंशयपणे पात्र ठरविले असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक व इतर अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अन्वये तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी सर्व संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे एकूण रु.२५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित असलेले सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

लेखाशीर्ष-**"००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "**

सदर शास्तीची अधिकारी/कर्मचारीनिहाय विभागणी आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक यांनी हे आदेश निर्गमित होताच यथायोग्यरित्या सात दिवसांचे आत करावी व यासंबंधीचा आपला अनुपालन अहवाल आयोगास तद्नंतर सात दिवसात सादर करावा. सदर शास्तीची रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात

भरतील, असे आयुक्त,आदिवासी विभाग, नाशिक यांनी पहावे व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल सप्टेंबर, २००८ पासून दरमहा नियमितपणे, शास्तीची संपूर्ण रक्कम शासकीय कोषागारात भरणा होईपर्यंत आयोगास सादर करावा.

अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आज जन माहिती अधिकारी यांच्याकडून सुनावणीपूर्वी त्यांना नोंदणी क्रमांक या मुद्याव्यतिरिक्त पुरविण्यात आली. अपिलार्थीच्या 'नोंदणी क्रमांक' या मुद्यावरील माहिती आता शोधून देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. सबब या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी आज दिलेल्या माहिती मधील ज्या उमेदवाराचे नोंदणी क्रमांक त्यांच्याकडे उपलब्ध आहेत, त्या उमेदवारांच्या नोंदणी क्रमांकाची माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी नोंदणी क्रमांकाची उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ प्रदीर्घ कालावधीसाठी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम २०(१) च्या तरतुदीअन्वये प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावा.

४. आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक यांनी उपरोक्त आदेश क्र.३ प्रमाणे शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत करावी व यासंबंधीचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक : ३१-०७-२००८ राज्य माहिती आयोग,

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एकनाथ दशरथ पवार,मु.रिधूरवाडा, शनिपेठ, मरिमाता मंदीराजवळ, जळगाव ता.जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि.जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, आदिवासी विकास, आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.